
## श्याम कुलकर्णी

# हसरी वारी



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# हसरी वारी

## हे 470 पानी पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# हसरी वारी

लेखक : श्याम कुलकर्णी

# हसरी वारी


## लेखक : श्री. श्याम कुलकर्णी

**पत्ता : द्वारा श्री.जयवंत कुलकर्णी,"गन्धार"फ़्लॅट क्र.५/४**

**आयडियल कॉलनी,कोथरूड पुणे ४११०२९**

**संपर्क – व्हॉट्स ऍप क्र.९७६५४५६५८१**

**Email : sgk6642@gmail.com**


पुस्तकातील छायाचित्रे: श्री श्याम कुलकर्णी
मुखपृष्ठ: श्री.सतीश ब्रह्मे


या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

his declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १५ ऑक्टोबर २०२१ (सीमोल्लंघन शके १९४३)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# श्री श्याम कुलकर्णी



यंत्र अभियांत्रिकी मास्टर्स पदवी M.E. 1975

अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून निवृत्त. लेखनाची लहानपणापासून आवड. किर्लोस्कर, मनोहर, वसंत, प्रपंच, लोकसत्ता अशा अनेक नियतकालिकांमधून स्फुटलेखन प्रकाशित.



सतीश ब्रह्मे, मी व्यवसायाने बँकर आहे. पण लहानपणापासून चित्रकलेची आवड होती. सध्या निवृत्तीनंतर पूर्णवेळ चित्रकला आणि शिल्पकलेसाठी वेळ देत आहे.

# हसरी वारी



# दोन शब्द:

हे रूढ अर्थाने प्रवासवर्णन आहे असे म्हणता येणार नाही. २००२ पासून २०१५ पर्यंत आम्ही आठ वेळा अमेरिकेस जाऊन आलो. त्यासाठी केलेली तयारी व प्रत्येक वेळेस प्रवासात आलेले काही अनुभव हे जसे लक्षात राहिले तसे मी २००६ च्या म्हणजे तिसऱ्या वारीपासून माझ्या लहरीप्रमाणे लिहीत गेलो, त्यात बरेचसे हास्यकारक अनुभव आहेत आणि अनेकवेळा वारीस जावे तसे गेलो म्हणून नाव हसरी वारी! आठवेल तसे लिहीत गेल्यामुळे त्यात क्रमबद्धता नाही. त्यामुळे काही ठिकाणी पुनरुक्ती झाली असण्याची शकयता प्रयत्नपूर्वक टाळली असली तरी अनवधानाने झाली असण्याची शक्यता आहे ती कृपया दुर्लक्षित करावी.

२००२ ते २०२१ येवढ्या कालावधीत जग फारच बदलून गेले आहे त्यामुळे २००२ ची वारी त्यावेळच्या परिस्थितीशी मिळती जुळती तर शेवटची ही ती परिस्थिती बरीच बदलल्यावर झालेली आहे व या प्रकाशनाच्या वेळी तर ती आणखीच बदलली आहे, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

ही वारी सिद्ध होण्यास कारणीभूत होणाऱ्यात अर्थात पहिला मान माझ्या द्वितीय चिरंजीव सुजितचा, तर निम्मा वाटा त्यानंतर अमेरिकेसच जाणाऱ्या ज्येष्ठ चिरंजीव जयवन्तचा! वाऱ्या

घडवण्यात सिंहाचा वाटा अर्थातच माझ्या सौभाग्यवतीचा! पहिल्या वारीहून परत आलो की लगेच दुसऱ्या वारीची सिद्धता करण्याच्या तयारीस ती लागायची व बॅगा भरण्याचा मी नुसता प्रयत्न करू लागलो तरी ती बॅगांपासून मला दूर ठेवायची. मी म्हणजे तिच्या दृष्टीने पहिल्या वेळेला पाचवी बॅगच होतो.

हे लिखाण करण्यास मला प्रवृत्त करणारे माझे मित्र श्री. मुकुंदराव देऊस्कर यांच्या ऋणातच रहाणे मला आवडेल. या कथेचा पहिला भाग लिहून मी गप्प बसलो होतो, पण तो भाग त्यानी वाचला व मी त्यांच्यादृष्टीने काहीतरी वाचनीय लिहितोय असे त्यानी मत प्रदर्शित केल्यामुळे पुढील भाग लिहून "मनोगत" या जालावरील नियतकालिकात पाठवण्यास लागलो व त्यास बऱ्यापैकी प्रतिसाद मिळाल्यामुळे हे लिखाण पूर्ण झाले त्याबद्दल मनोगतच्या प्रशासकांचा व त्यावेळच्या वाचकांचाही मी ऋणी आहे. श्री.सतीश ब्रह्मे यानी अगदी थोड्या पूर्वसूचनेवरून पुस्तकासाठी सुयोग्य मुखपृष्ठ तयार करून करून दिले याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार! आता हे लिखाण प्रकाशित करण्याची तयारी दाखवल्याबद्दल मी "ईसाहित्य" च्या प्रशासकांचे आभार मानतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

श्याम कुलकर्णी

# प्रास्ताविक

अमेरिकेतील अनुभव पहिली वारी झाल्यावर जवळ जवळ सहा वर्षांनंतर लिहीत असल्याने आणि आता तर त्याला जवळ जवळ वीस वर्षे लोटल्यामुळे त्यावेळी मागास वाटणारा आपला भारत (मेरा भारत महान!) अतिशय वेगाने प्रगती करत असल्यामुळे आता अमेरिकाच मागास देश वाटायला लागलाय. त्यामुळे पहिल्या वारीतील अनुभव लिहिताना मी अमेरिकेच्या प्रगतीचे बरेच ठिकाणी कौतुक केले आता हेच पहाना मी मारे ऐटीत चतुर्मिती चित्रपटाविषयी लिहिले तर आपल्याकडे आता षण्मिती चित्रपट निघालेही. आता सहा मिती कशाला म्हणायचे याविषयी चर्चेला पुरेसा वाव आहे ही गोष्ट वेगळी! मी मॉलविषयी लिहिले न लिहिले तो त्याच्याहून आकाराने जास्त मोठे नसले तरी त्यापेक्षा कितीतरी अधिक गर्दी असणारे मॉल आता आपल्याकडेही निघालेले पाहतोय आणि तेथे बिल चुकते करायला त्याच्याहूनही जास्त वेळ लागण्याचा अनुभवही घेऊन झाला! येऊन जाऊन गाडी (बैलगाडी नव्हे) घेऊन न गेल्यामुळे गाडी पार्क कुठे करायची याविषयी काही अडचण मात्र आली नाही (तशी ती आपल्याकडे कोठेही उभी केली तरी चालते म्हणा) पण नंतर घरी येताना अनेक

रिक्षावाल्यांची मनधरणी केल्यावर मीटरपेक्षा दहा रुपये जास्त देत असाल तर नेतो या प्रेमळ आग्रहाला मान्यता द्यावी लागली. तरी बरं पुण्यातच आहे बंगलोरला नाही नाहीतर मीटरच्या दुपटी तिपटीने पैसे मोजावे लागले असते. आता कदाचित बंगलोरची स्थितीही बदलली असेल. अर्थात याबाबतीत तर भारत अगोदरच फार पुढारलेला देश आहे. पण आता मला हे सांगा तुम्ही अमेरिकेत टॅक्सीत बसल्यावर उतरताना एक दोन डॉलर गुपचुप टिप म्हणून देताच ना मग तेच या रिक्षाचालकांनी हक्काने आणि प्रेमळपणे मागून घेतले तर कुठे बिघडले.

अश्या पूर्वग्रहदूषित दृष्टीमुळेच अमेरिकेत जाईपर्यंत तो विकसित - पुढारलेला आणि आपण मात्र विकसनशील म्हणजे मागास असे वर्गीकरण आपण नव्हे तर इतर जगाने केले आहे तेच आपण खरे मानून चालतो. पण अमेरिकेत गेल्यावर अमेरिकेलाच मागास देश म्हणावे लागेल असे वाटू लागते. ज्या क्षेत्रात आपण पुढारलेले अर्थात विकसित आहोत त्यात त्या देशाला विकसनशील तरी म्हणता येईल की नाही शंकाच आहे कारण त्या क्षेत्रात विकास करण्याची मूळ इच्छा तरी हवी ना! आता हेच पाहा व्यापारी म्हणून एके काळी ब्रिटिश लोक प्रसिद्ध होते आणि त्यातीलच काही अमेरिकेत गेल्यामुळे त्या क्षेत्रात तेच आघाडीवर असायला हवेत की नाही? पण नाही. कोंणत्याही गोष्टीचा

(वस्तूचाच नव्हे) व्यापार करण्यात आपण त्यांना केव्हाच मागे टाकले आहे. व्यापार करण्यासाठी आपल्याला कोणतीही गोष्ट चालते. मग त्यात शिक्षण असो, पदव्या असोत किंवा परीक्षेच्या प्रश्न पत्रिका असोत.

अमेरिकेत पर्यटक यावेत म्हणून प्रत्येक स्थळ सुशोभित करून प्रेक्षणीय करण्यात उगीचच पैशाचा अपव्यय करताना दिसतात. त्याऐवजी त्या स्थळातील वस्तूंचाच व्यापार केला तर? म्हणजे सुंदर सुंदर दुर्मिळ पेंटिंग्स किंवा शिल्पे उगीच संग्रहालयात सडत पडण्यापेक्षा त्यांचाच व्यापार करण्याची कल्पना नाही त्यांना सुचत! आपल्याकडे सगळयाच वस्तू एवढेच काय माणसेही विकाऊ असतात. अमेरिकेत रिपब्लिकन सेनेटर डेमोक्रेट झालाय किंवा उलटे झालेय असे कधी ऐकू आले नाही. कदाचित या बाबतीत फारच कमी पर्याय असण्याचा हा फायदा (की तोटा?)! आपल्याकडे कसे दररोज राजकीय व्यक्ती वेगळयाच पक्षात असतात. एवढेच काय पण नवीन पक्षही काढतात. केवळ महाराष्ट्रात २०१९ च्या निवडणुकीत १६ पक्ष तर भारतात एकूण २६९८ पक्ष आहेत, असे दिसते. या व्यापारात किती फायदा असतो याची यां अमेरिकनांना कल्पनाच नसावी. अनेक अभयारण्ये ठेऊन जंगली प्राण्यांच्या संरक्षणात पैशाचा अपव्यय करण्यापेक्षा त्यांची शिकार आपणच करून त्यांच्या कातडीचा किंवा शिंगांचा वा

सुळ्यांचा व्यापार करण्याची शक्कल त्यांना सुचवण्यासाठी आपल्या वनमंत्र्यांनाच तिकडे पाठवायला हवं.

राम गणेश गडकऱ्यानी बाळकराम या नावाने लिहिलेल्या विनोदी लेखात (परिशिष्ट पाहा) स्वयंपाकघरातील काही नव्या कृतींचा परिचय करून दिला आहे. (बघा गडकऱ्यांनाही या विषयाचे महत्व किती पूर्वी कळले होते. अगदी कमलाताई ओगले यांच्या पुस्तकापूर्वी आणि आपल्या दूरदर्शन वाहिन्यावर संजीव कपूरचा खानाखजाना सुरू होण्यापूर्वी.) तर ते असो. बाळकरामांच्या या लेखात त्यानी खाद्यपदार्थांच्या नावांने प्रचलित वाक्प्रचारांचा गमतीशीर वापर करून तो लेख लिहिला आहे. त्यात गुळाचा गणपती, चापटपोळया, धम्मकलाडू इ. पदार्थाबरोबरच बर्फीची चटणी हा पदार्थ दिला आहे. त्या खाद्यपदार्थ कृतीच्या शेवटी त्यांनी "माझ्या मते आपल्या आवडत्या कोणत्याही पदार्थाची चटणी सहज करता येते," असा विनोदी शेरा मारला आहे. गडकरी आज हयात असते तर त्यांनी त्यात भूखंडाचे श्रीखंड, शि़क्षणाचे शिक्रण, पदव्यांची खिरापत अशा नावाच्या पदार्थांची भर घालून "आमच्या मते भारतात कोणत्याही गोष्टीचे खाद्यपदार्थात रूपांतर करून त्याची सहज चटणी करता येते."असा शेरा मारला असता. खाते वाटपाबाबत मंत्रिमंडळातील घटकपक्षांत उगीच नाहीत वाद होत. खाते या शब्दातच खरे म्हणजे

हा अर्थ लपला आहे. खाद्यसंस्कृतीत नाहीतरी आपण पहिल्यापासूनच आघाडीवर आहोत अशी आघाडी घेणे अमेरिकनांना थोडेच जमणार आहे? तरी आपण मात्र मागासपणाचेच तुणतुणे वाजवत बसणार का? बुश, राइल्स भारतीयांच्या खाण्यावर टीका करतात त्यातील गर्भितार्थ खरा तर हाच आहे नाचता येईना अंगण वाकडे म्हणतात ते यांच्याबाबतीत अगदी खरे ठरते. ज्याना बाळकराम यांचा मूळ लेख आठवत नसेल वा माहीत नसेल त्यानी परिशिष्ट पहावे.

थोडक्यात भारत म्हणजे आपला देश मागासलेला व अमेरिका पुढारलेला हा माझा गैरसमज अनेक वाऱ्या झाल्यावर आता दूर झाला व खरे तर सर्व जगात आपला देश प्रथम क्रमांकावर आहे. सर्व जग जेव्हां अज्ञानाच्या अंध:कारात चाचपडत होते तेव्हां आपल्याकडे तक्षशिला, नालंदा अश्या विद्यापीठात बाहेरील देशातील लोक येऊन शिकत होते, रामायणकाळापासून आपण आकाशयानातून (आठवा पुष्पक विमान) फिरत होतो. सूर्यावरही पावसाळ्यात ढगांची गर्दी झाल्यावर निस्तेज व्हावे लागते तसे काही काळ आपले झाले होते पण तो पारतंत्र्याचा ढग दूर जाताच आपण पुन्हा तेजाने तळपू लागलो आहोत,

त्यामुळे हे प्रवासवर्णन नसून अमेरिकेत जाण्याची संधी मुलांनी आणून दिल्यावर जाता येता जे काही मजेशीर अनुभव आले त्याविषयी मी लिहिले आहे, यातून अमेरिकेविषयी काही ज्ञान प्राप्त झालेच तर तो एक योगायोग समजावा. आमच्या पिढीतील पालकांनी जरी परदेश पर्यटन करणे निषिद्ध मानले नव्हते तरी "गड्या आपला देश बरा" या उक्तीवर ठाम विश्वास ठेवला तसे पुढील पिढीने ते मानले नाही, आणि "जरा बाहेर जाऊन पाहूया तरी! " असा विचार करून जे बाहेर पडले ते तिकडचेच झाले. त्यामुळे अधिकाधिक पालकांना या "वारी"च्या वाचनाने पुन:प्रत्ययाचा अनुभव येऊ शकेल.

---------------------------------------------------

# १. पूर्वतयारी

पारपत्र (पासपोर्ट)

’काशीस जावे नित्य वदावे’ असे जुन्या काळी म्हणजे शंभर एक वर्षापूर्वी (किंवा त्याहीपूर्वी) म्हटले जायचे. त्यावेळीच्या मध्यमवर्गीयांच हे स्वप्न असायचं. त्यावेळच्या लोकांची स्वप्नही फारशी उच्च प्रतीची नसायची, त्यातले हे त्यामानाने बरेच वरच्या दर्जाचे! इंग्रजांच्या काळात इतकी सुरक्षितता होती की काठीला सोने लावून खुशाल काशीयात्रा करून यावे असे त्या लोकांच म्हणणं असलं तरी इंग्रजान काठीला लावायला सोनंच इतकं कमी ठेवलं होत की काठीला सोनं बांधून काशीला जाऊ इच्छिणारा त्या अगोदर स्वर्गाचीच वाट धरायचा.

पण आता मात्र जो तो काशीलाच काय परदेशातच पळतोय. मात्र स्वतःच्या खर्चाने परदेशी जाण्यापेक्षा परदेशी कंपनीने किंवा आणखी कोणी आमंत्रित केले म्हणून आणि पेपरात फोटो वगैरे छापून येऊन परदेशी जाण्यातली ऐट काही वेगळीच! तसा स्वखर्चाने जाणाऱ्याना फोटोही स्वखर्चाने (जाहिरातीच्या दरात) छापून घेता येतो म्हणा! सरकारी खर्चाने जाता येण्यासाठी तुम्ही मंत्री अगर किमान नगरसेवक तरी असावे लागते. मग स्वदेशात

सहज उपलब्ध असणाऱ्या गोष्टीची पहाणी परदेशात करण्याच्या महत्त्वाच्या कामासाठी जाणाऱ्या शिष्टमंडळात तुमचा समावेश होऊ शकतो.

मी अभियांत्रिकी पदवीधर असलो तरी त्या काळात अभियंत्याना परदेशी पाठवणे भारतीय कंपन्याना कमीपणाचे (पेक्षा अनावश्यक आणि खर्चिक) वाटे, तरीही जी काही थोडीफार शक्यता असे तीही मी अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापक होऊन आपल्या वाट्याला येणार नाही याची काळजी घेतली होती. नाही म्हणायला तशी एक शिष्यवृत्ती होती. त्यात तंत्रशिक्षकाना (त्यावेळच्या) पश्चिम जर्मनीस पाठवण्यात येई. (त्या वेळी पूर्व व पश्चिम जर्मनीचे एकीकरण झाले नव्हते) ती शिष्यवृत्ती घेऊन प्राध्यापक प. जर्मनीस जाऊन काय शिकून येत कोणास ठाऊक कारण या योजनेतून जाऊन येणाऱ्या प्राध्यापकानी तेथे काय शिकवण्यात आले याविषयी कधी एक चकार शब्द उच्चारल्याचे ऐकिवात नाही, शिष्यवृत्ती देण्यापूर्वी अशी अटच तंत्रशिक्षण खात्याकडून घालण्यात येत असावी. याबाबतीत सर्वच सरकारी खात्याइतकेच किंवा जरा अधिकच हे खाते दक्ष! (त्यावेळी अण्णा हजारे यांचे माहितीच्या अधिकारासाठीचे उपोषण व्हायचे होते.)

त्यामुळे शिक्षकाने आपली पात्रता वाढवू नये आणि एकाद्याने स्वत:च्या प्रयत्नाने वाढवलीच तर तिचा उपयोग तंत्रशिक्षणाचा दर्जा वाढवण्यासाठी तरी करू नये असा दंडकच त्या काळी होता. आता सर्व क्षेत्रातील शिक्षक प्राध्यापकांना आपल्या विषयातील स्नातकोत्तर पदवी PhD करणे आवश्यक करण्यात आले आहे त्यामुळे शिक्षणाचा दर्जा कितपत सुधारला याचा पत्ता नसला तरी PhD चा दर्जा मात्र घसरलाय असे ऐकिवात आहे. सध्या तर प्राथमिक शाळेपासूनच विद्यार्थ्यांना परीक्षेची जरुरी नाही असा निर्णय घेऊन आपला दर्जा वाढवण्याच्या बाबतीत विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भर व्हावे असा निर्णय घेऊन शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी एक दर्जेदार पाऊल शासकीय पातळीवरच घेण्यात येत आहे. असो!

मी नुकताच नोकरीला लागल्यामुळे या सगळया खाचाखोचा मला माहीत नसल्यामुळे त्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज केल्यावर मी खरेच आपण प. जर्मनीला जाणार अशा गोड धुंदीत काही दिवस वावरलो त्यासाठी जर्मन शिकण्याचा उपद्याप पण केला. पण मंत्री, नगरसेवक अशा महत्त्वाच्या व्यक्तीना महत्त्वाच्या कामासाठी परदेशात पाठवण्यातच सरकारच्या परदेशी चलनाची (अक्षरशः)वाट लागत असल्याने माझ्यासारख्या नुकत्याच शासकीय सेवेत प्रवेश केलेल्या प्राध्यापकास परदेशात पाठवून

त्याचा दर्जा वाढवण्याची चैन सरकारला परवडण्यासारखी नव्हती कारण शासकीय सेवेत ज्येष्ठता हा महत्वाचा निकष त्यामुळे माझा परदेश या शब्दाशी संबंध केवळ परदेश शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना लागणारी शिफारसपत्रे देण्यापुरताच काय तो राहिला पण त्याचबरोबर माझ्या हातावर विधात्याने मारून ठेवलेली परदेशगमनाची रेषा अशी थोडीच वाया जाणार होती? त्यामुळे मुलगा परदेशी गेल्यामुळे का होईना आम्हालाही परदेशगमनाचा योग आलाच पण तो त्यानंतर जवळ जवळ ३५-३६ वर्षांनी म्हणजे मी सेवानिवृत्त झाल्यावर!

आमचे कनिष्ठ चिरंजीव माझ्यासारखे " असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी" म्हणून कोणी आपल्याला परदेशी पाठवील अशा भ्रमात न रहाणारे असल्यामुळे अभियांत्रिकी पदवी प्राप्त होताच आम्हाला पत्ताही लागू न देता त्याने खटपट करून एक दिवस आपण अमेरिकेत जाणार आहोत असे जाहीर केले. अर्थात मला जे जमले नाही ते त्याने जमवल्याचा आम्हाला आनंदच झाला. तो जाऊन दोन वर्षे झाल्यावर तो आता लवकर परत येत नाही अशी खात्री झाल्यावर मात्र एकदिवस आम्हाला जावे लागेल अशी आशा वाटू लागून जावेच लागले तर निदान पारपत्र तरी असावे या दृष्टीने (आणि तेही त्याच्याच आग्रहामुळे) ते मिळवण्याच्या मागे आम्ही लागायचे ठरवले. ही गोष्ट विसाव्या

शतकातली! अशा बाबतीत चालढकल करण्यात मी पटाईत आहे. पण त्यावेळी मी औरंगाबादला होतो आणि तेथे पासपोर्ट ऑफिस नुकतेच निघाले होते आणि ही बातमी फारच कमी लोकाना माहीत होती इतकी की मी त्या ऑफीसमध्ये गेलो तेव्हा तेथे पासपोर्टसाठी फॉर्म मागायलासुद्धा माझ्याव्यतिरिक्त फक्त एकच गृहस्थ तेथे असलेल्या एकुलत्या एक खिडकीपाशी होता. त्यामुळे फार लांबलचक रांग आहे अशा छान कारणासाठी माझा पासपोर्ट काढण्याचा विचार रद्द करणे मला शक्य झाले नाही. शिवाय त्या खिडकीमधील व्यक्तीलाही नुसतेच बसून कंटाळा आल्या मुळे “वा! कोणीतरी जातोय बुवा परदेशाला “ याचे कौतुक वाटून त्याने तो अर्जाचा नमुना माझ्या हातात ठेवला. या वेळी आम्हाला परदेशी पाठवण्याचा जणु चंगच दैवाने बांधला होता.

पारपत्रासाठी अर्ज करण्याचा विहित नमुना मिळाल्यावर तो घरी आणून त्यावर पुरेशी धूळ जमण्याची मी वाट पाहिलीच त्याशिवाय अर्जासोबत जोडावयास लागणाऱ्या एका प्रमाणपत्राची त्रुटी माझ्याकडे होती. म्हणजे आमच्या लग्नाचे प्रमाणपत्र माझ्याकडे नव्हते (पूर्वी नवराबायकोचा एकमेकावर भरभक्कम विश्वास असल्यामुळे अशा प्रमाणपत्राची गरज पडत नसावी) आणि ते मिळवण्यासाठी पुन्हा लग्न करणे शक्य नव्हते. त्यासाठी एक शपथपत्र करून भागणार होते असे या गोष्टीचा अनुभव असणाऱ्या

माझ्या मित्राने मला सांगितले पण त्यासाठी लागणाऱ्या स्टॅंपपेपरचा नेहमीप्रमाणे दुष्काळ होता. अर्थात मला चालढकल करायला आणखीच चांगले कारण मिळाले. तेवढ्यात माझ्या आणखी एका मित्राची मुलगी पण नुकतीच परदेशी गेलेली असल्याने आणि तो माझ्याशी या विषयावर सहज बोलल्यावर त्याने तर पारपत्र काढलेसुद्धा असे कळले, आणि खरे तर तो माझ्याहूनही चालढकलप्रवीण असतानासुद्धा त्याने पारपत्र काढले हे ऐकल्यावर मात्र मी एकदम जागृत झालो पण त्याने माझ्यावर आणखी एक बोंबगोळा टाकला. त्याने सांगितले की आपण सरकारी सेवेत असताना पारपत्र काढायचे असल्यास संबंधित खात्याच्या प्रमुखाचे ना हरकत प्रमाणपत्र लागते. म्हणजे थोडक्यात माझ्या थोड्याफार झालेल्या मानसिक तयारीला खीळ घालण्याचे काम या बातमीने केले. त्यातल्यात्यात सुदैवाची गोष्ट एवढीच होती की असा अर्ज मला आमच्या महाविद्यालयाच्याच कार्यालयात देऊन तो पुढे तंत्रशिक्षण संचालकांकडे पाठवण्याची विनंती केली की भागणार होते आणि अशा लिखापढीत शिक्षकी पेशात असल्याने मी चांगलाच तयार असल्याने असा अर्ज कार्यालयात सादर करून माझे वाट पहाण्याचे व्रत मी इमाने इतबारे चालवले.

मधल्या काळात लग्नाच्या प्रमाणपत्राविषयी हालचाल करावी असा मी मानसिक प्रयत्न करत होतो कारण शारीरिक

हालचाल होण्यासाठी मनाची तयारी आवश्यक असते ना! पण तेवढ्यात मला आठवले की फार पूर्वी सौभाग्यवतीस तिचा शैक्षणिक दर्जा वाढवण्याची इच्छा झाली असताना लग्नाच्या प्रमाणपत्राची आवश्यकता पडली होती. त्यावेळी पाच रुपयाच्या स्टॅंपपेपरवर लग्न केल्याचे शपथपत्र तिला विद्यापीठात सादर करावे लागले होते. माझ्या वकील मित्रानेच तो स्टॅंपपेपर आणून मला कोर्टाची पायरी चढायला लावले होते. आणि शपथपत्र हाती पडताच न्यायाधीशमहारांजांशी हस्तांदोलन करण्याचा अगाऊपणा माझ्या हातून घडत होता तो त्याने मोठ्या शिताफीने मध्ये पडून टाळला होता. त्या शपथ पत्राची प्रत विद्यापीठास तिने दिली होती अर्थात मूळ प्रत घरातच असण्याची शक्यता होती आणि या वेळी मात्र आमच्या पत्नीच्या (हे उघडच आहे) व्यवस्थितपणामुळे ते शपथपत्र सापडायला मुळीच त्रास झाला नाही. पत्नीच्या उच्च शैक्षणिक दर्जाचा तिला व मलाही झालेला हा एकमेव फायदा! मात्र हे पाच रुपयाचे प्रमाणपत्र चालते की नाही अशी शंका आम्हा दोघानाही वाटत होती कारण मला तद्विषयक सल्ला देणाऱ्या मित्राला त्यासाठी कमीतकमी वीस रुपयांचा तरी स्टॅंपपेपर लागतो असे सांगण्यात आले होते तरीही आता तरी तेच द्यायचे आणि बघू पुढे काय होते ते असा निर्णय आम्ही घेतला. शिवाय आम्ही चेंडू तंत्रशिक्षण संचालकांकडे टोलवला असल्यामुळे तेच नेहमीच्या

प्रथेनुसार “तुम्हाला काय करायचेय अमेरिकेत जाऊन, आणि तिथे जाऊन तुम्ही काही देशद्रोही कारवाया करणार नाही कश्यावरून?” असे विचारून किंवा परदेशपर्यटण निषिद्ध या आपल्या थोर परंपरेची आठवण करून देऊन कदाचित आम्हाला अडवतील व मग पुढे काही करण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही अश्या समजुतीत राहून सध्यापुरतातरी तो विषय मी पार विसरून गेलो.

मला परदेशात जायची मुळीच घाई नाही हे आमच्या तंत्रशिक्षण कार्यालयासही समजल्यामुळे नेहमीची दफ्तरदिरंगाई न करता एक दिवस अगदी अलगदपणे ना हरकत प्रमाणपत्र महाविद्यालयाच्या कार्यालयात अवतीर्ण झाले. त्यानुसार मी परदेशात कुठल्याही प्रकारचे गैर वर्तन न करण्याच्या बोलीवर तसे प्रमाणपत्र मला देण्यात येत आहे असे लिहिले होते. मी बायकोसह जात आहे हे कळले असते तर त्यानी अशी शंकाही व्यक्त केली नसती अशी मला खात्री वाटते.

पारपत्र दाखल करण्यासाठी काही लोक मध्यस्थ वापरतात. हे मध्यस्थ अर्ज कार्यालयात दाखल करण्यापलीकडे काहीच करत नाहीत असा इतरांचा अनुभव आहे. आणि अजूनही औरंगाबादच्या पारपत्र कार्यालयास म्हणावी तशी ऊर्जितावस्था प्राप्त झालेली नसल्याने केवळ अर्ज दाखल करण्यासाठी

मध्यस्थाची नेमणूक करावी असे मला वाटले नाही. तंत्रशिक्षण संचालकांनी ना हरकत प्रमाणपत्र दिल्यामुळे आता मात्र पारपत्रासाठी अर्ज दाखल करण्यात कसलाच अडथळा न उरल्याने मला दोघांचे अर्ज दाखल करावे लागले. मला पारपत्र मिळण्याची मुळीच घाई नाही याची कुणकुण पारपत्र कार्यालयातील कर्मचाऱ्यांनाही कशी लागली देव जाणे आणि त्यामुळे या कामासाठी विलंब लावण्याचा त्यांचा उत्साहच नष्ट झाला असावा! पण तरीही काही अडथळे शिल्लक होतेच, कारण मी महाविद्यालयातून एक दिवस घरी आलो तेव्हा घरी पोलिस येऊन गेल्याची सुवार्ता सौ. ने माझ्या कानावर घातली. सुदैवाने त्यावेळपर्यंत दूरदर्शनवर मालिकांचा सुळसुळाट झाला नव्हता त्यामुळे त्या बातमीने माझ्या मनावर कसलीच उलटसुलट प्रतिक्रिया झाली नाही शिवाय मालिकेत अशा वेळी त्या भागाचा शेवट करून प्रेक्षकाना पुढील दिवसापर्यंत टांगून ठेवतात तसे काहीही न करता लगेचच तो पारपत्रासाठी पोलिस तपास करायला आला होता हेही तिने सांगून टाकले.

अशा वेळी पोलिस कार्यालयात जाऊन त्यांची गाठ घेऊन योग्य ती दक्षिणा द्यायची असते असे शहाण्या व पूर्वानुभवी माणसांनी सांगून ठेवले आहे. खरं तर मला पारपत्र मिळायला कितीही उशीर झाला तरी हरकत नाही अशी माझ्या मनाची तयारी

असल्याने त्या शहाण्या माणसांचा सल्ला पाळण्याचे मला कारण नव्हते. पण " होणारे न चुके जरि तया ब्रह्मा असे आडवा " असे म्हणतात ना! त्यामुळे आमच्या पोलिस तपासातही काही अडचण राहिली नाही असेही सौ. ने मला सुनावले. त्याचे कारणही तसेच मजेदार होते. त्यावेळी औरंगाबादला असणारे पोलिस कमिशनर तिच्या नात्यात होते आणि ते एकदोनदा आमच्या घरी आल्याचे तपासणी करणाऱ्या पोलिसाने पाहिले होते ते तुमचे कोण एवढ्या प्रश्नाचे उत्तर हीच आमची पोलिस तपासणी झाली, आणि खरोखरच एक दिवस रजिष्टर पोस्टाने आमचे दोघांचीही पारपत्रे घरबसल्या आमच्या हातात पडली. नाहीतर पोलिस तपासणीसाठी आपल्या विभागाच्या पोलिस स्टेशनमध्ये जाऊन अनेक कागदांवर सह्या करून आपल्या कोणत्याही गुन्ह्यात सामील नसण्याची त्याना खात्री करून द्यावी लागते, हे त्यानंतर दोनदा पारपत्र काढताना माझ्या अनुभवास आले त्यावरून या वेळी आम्हाला परदेशगमन घडवण्याच्या बाबतीत नियती अगदी ठाम होती हे निश्चित, याचा अनुभव पुढेही यायचा होता.

पारपत्र जरी १९९९ च्या शेवटीशेवटी मिळाले तरी अमेरिकेला जाण्याचा योग मात्र तब्बल तीन साडेतीन वर्षानी म्हणजे २००२ च्या मे महिन्यात आला. खरे तर आता योग आणणे आमच्याच हातात होते पण मी नोकरी करीत असताना गेल्यास

फार दिवस रहाता येणार नाही अशी शक्यता होती. असे घाईघाईने जाऊन येण्यात आता आम्हाला स्वारस्य नव्हते. जायचे तर आरामशीरपणे जाऊन यावयास हवे असे आम्हास वाटत होते. आणि त्याप्रमाणे मी सेवानिवृत्त झाल्यावर आता आम्हाला जाण्यास काही अडचण नाही या कल्पनेने चिरंजीवानी आम्हाला यू. एस. भेटीचे निमंत्रण पाठवून दिले असे निमंत्रण व्हिसा मिळण्यासाठी आवश्यक असते म्हणे. !

# २. अमेरिकेचा व्हिसा (प्रवेशपत्र)

त्यामुळे आता व्हिसा मिळवण्याच्या मागे लागणे आवश्यक होते. या बाबतीत आपण भारतीय जितके उदारहृदयी तितकेच हे अमेरिकन लोक संकुचित वृत्तीचे! त्यामुळे अमेरिकन कॉन्सुलेटसमोर व्हिसा मिळवण्यासाठी उत्सुक भारतीयांच्या रांगा लागलेल्या असतात असा पूर्वी जाऊन आलेल्यांचा अनुभव होता. माझ्या अमेरिकेत गेलेल्या मुलालाच पहाटे पासून रांगेत उभे रहावे लागले होते. त्यांनी सांगितलेल्या हकीकतींवरून त्यासाठी अर्ज भरून दिल्यावर महिन्यादोनमहिन्यानी मुलाखतीला बोलावतात, तेथे अमेरिकन अधिकाऱ्यांच्या प्रश्नाच्या फैरीला तोंड द्यावे लागते. ते काय विचारतील याचा नेम नाही, अमेरिकेला कशाला जाताय, कुणाकडे जाताय, तिथे जाऊन काय करणार, तेथे तुमचा खर्च कोण करणार एक ना दोन. अरे या सगळ्या गोष्टी तुम्हाला काय करायच्यात. आमच्या देशात येणाऱ्यांना कधी आम्ही विचारले आहे का? तुमच्याच पूर्वजांपैकी काही आमच्या देशात आले आणि आमच्यावर राज्य करून गेले आणि आता सुद्धा पहा बरे कसे आमच्याकडे आवजाव घर तुम्हारा. कोण आलं  कोण गेलं याकडे लक्ष देण्याचा आगाऊपणा आम्ही करतो तरी का? मुळीच

नाही. काही दिवस त्यांना घुसखोर म्हटले तरी नंतर तेच आमच्यावर दादागिरी करू लागतात. बरेचदा आंतरराष्ट्रीय ख्यातीचे(दाउद इब्राहिम सारखे) लोकही आमच्याकडे येऊन गेल्यावर मग आम्हास जाग येते आणि त्यानंतर त्यांचा पाहुणचार करायचा राहिला ही रुखरुख दूर करण्यासाठी त्यांना आपल्याकडे पाठवावे म्हणून पोर्तुगाल, पाकिस्तान अशा देशांची विनवणी करावी लागते. (मजा म्हणजे आम्हाला अडवणारे हेच लोक आमच्याच देशातील घोटाळेबाज लोकांना मात्र आपल्या देशात आनंदाने विहार करू देतात)

आपली ही सहिष्णुतेची ऐतिहासिक परंपरा कोठे आणि हे अमेरिकन लोक म्हणजे असहिष्णुतेचा कळस. बोटाचे ठसे काय, समोरून, बाजूनी फोटो काय काही विचारू नका?जॉर्ज फर्नंडिससारखे लढाऊ व्यक्तिमत्वसुद्धा यांच्या तडाक्यातून सुटले नव्हते, तेथे आमच्यासारख्यांची काय कथा! त्यातून ९/११ (या दिवशी ओसामा बिन लादेनने जुळे मनोरे म्हणजे Twin Towers पाडले आणि अमेरिकेच्या सर्वश्रेष्ठतेच्या कल्पनेसच जणु खिंडार पाडले) नंतर मामला अधिकच कडक झालेला.

मुलाखतीला गेलेल्या पूर्वानुभवी लोकांकडून कळलेले काही किस्से असे! एका मित्राने मुलीच्या बाळंतपणासाठी जातो असे

सांगण्याचा त्याच्यामते चतुरपणा केला तर त्यासाठी तुम्हाला जायचं कारण नाही आमच्या देशात हॉस्पिटलात सगळ व्यवस्थित करतात असे सांगून त्याला माघारी पाठवण्यात आले तर दुसऱ्या एका असाच चतुरपणा करणाऱ्या मित्राच्या बायकोला तुम्ही एकट्या मॅनेज करू शकाल का असे विचारून तिला एकटीलाच व्हिसा देऊन मुलीच्या बापाला हात चोळत गप्प बसवले. आमच्या एका स्नेह्याच्या भावी जावयाच्या अडचणीमुळे त्यानी मुलीला वेगळ्या पद्धतीने व्हिसा मिळवून देऊन अमेरिकेत पाठवले आणि लग्न अमेरिकेत करण्याचा घाट घातला तर आता तिच्या आईबापानाच व्हिसा मिळून लग्नास हजर रहाता येईल की नाही अशी पंचाईत निर्माण झाली आहे अशा व्हिसाविषयक कहाण्या ऐकून आपल्याला व्हिसा न मिळाल्यामुळे आपले पोराने पाठवलेले निमंत्रण रद्द करावे लागते की काय अशी भीती मला पडली. पण या सर्व संकटांना तोंड देऊन जाण्याचा प्रयत्नही मी कदाचित करणार नाही या शंकेमुळे की काय बुशमहाराजांनी (हो तेच आपले त्यावेळी अमेरिकेचे अध्यक्ष असलेले) प्रसन्न होऊन त्याच सुमारास एक नवी योजना अमलात आणण्याचा सुविचार केला होता. आणि तो अमलातही आणला होता आश्चर्य म्हणजे आमच्या त्यावेळच्या व्हिसाप्राप्तीपुरताच तो अस्तित्वात होता,

यावरून नियतीने आम्हास अमेरिकेस पाठवण्याचा किती चंग बांधला होता हे कलते.

आमच्याचबरोबर आमचे आणखी एक मित्रही त्यांच्या मुलाच्या अडचणीवर मात करण्यासाठी अमेरिकेला प्रथमच निघाले होते. म्हणजे आमच्या वयाचे पालक अमेरिकेतील मुलांकडे जातात ते आपल्या सुनेच्या अथवा मुलीच्या प्रसूतीसाठी म्हणजे ड्यूटीवर आणि आमच्यासारखे जाणारे म्हणजे सुट्टीवर जाणारे अशी वर्गवारी करण्यात येते त्यामध्ये ते ड्यूटीवर जाणार होते अर्थात त्यांचे जाणे अधिक महत्त्वाचे होते त्यामुळे जोडीदार म्हणून त्यांना बरोबर घेऊन जावे असा विचार मी केला आणि एका सुप्रभाती आम्ही दोघे पुण्यातील व्हिसाऑफिसला गेलो. अर्थात तोपर्यंत बुशमहाराजांचे हृदयपरिवर्तन झाल्याची बातमी आमच्यापर्यंत पोचली नसल्याने आम्ही आपले आपल्याला मुलाखतीला बोलावल्यास मराठीत बोलायचे की इंग्लिशमध्ये बोलायचे याविषयीच चर्चा करत होतो कारण अमेरिकन इंग्लिश उच्चार आम्हाला कळणार नाहीत तेवढेच आमचे फर्डा इंग्रजी त्यांना समजणार नाही (कारण दोघेही प्राध्यापक)अशी दुहेरी खात्री आम्हाला होती त्यामुळे हा प्रश्न दुभाष्याची मदत घेऊन सोडवायचा निर्णय आम्ही करत होतो.

त्या चर्चेतच व्हिसा ऑफिसच्च्या पायऱ्या चढताना एक सुटाबुटातील व्यक्ती हातात बॅग घेऊन उभी आहे याकडे आमचे मुळीच लक्ष नव्हते. पण त्या इमारतीत व्हिसासाठी आवेदनपत्र कोठे मिळेल याची चौकशी करण्यासाठी आजूबाजूस आम्ही पाहू लागलो आणि अहो आश्चर्यम् जणु आमचीच वाट पहात असल्याप्रमाणे त्या व्यक्तीनेच आम्हाला आम्ही कशासाठी आलो आहोत हे विचारले, आणि आमचे उद्दिष्ट सांगताच आपल्या बॅगेतून सरळ व्हिसासाठी लागणारे आवेदनपत्रांचे नमुनेच काढून दिले आणि त्यानंतर जी बातमी सांगितली त्यामुळे आम्हाला आनंदाने वेडच लागायचे राहिले कारण त्याच वर्षी बुशसाहेबानी कृपावंत होऊन पेटी परवाना पद्धत (ड्रॉप बॉक्स)ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू केली होती. त्यानुसार पुण्यातील नागरिकांना पुण्यातील कॉन्सुलेटच्या ऑफिसमध्ये अर्ज सर्व प्रमाणपत्रांसह आणि आवश्यक शुल्काच्या धनादेशासह दाखल केल्यावर तसे प्रमाणपत्र मिळेल, आणि चार पाच दिवसात तुमच्या घरच्या पत्त्यावर कुरियरने व्हिसाच येईल, ते प्रमाणपत्र दाखवल्यावर ते तुमच्या हाती पडतील असे सांगण्यात आले आणि व्हिसा ऑफीसची पायरीही न चढता ते आवेदनपत्राचे नमुने घेऊन आम्ही घरी परतलो.

ते भरून त्यासोबत योग्य रकमेचा धनादेश मिळवण्यासाठी मी जवळची आणि आपली म्हणून महाबँकेत गेलो तर त्यानी तुम्ही बँकेचे खातेदार आहात का अशी सुरवात केल्यावर कदाचित व्हिसा ऑफिसपेक्षाही इथले लोक अधिक त्रासदायक ठरण्याची शक्यता आहे असे वाटून मी दुसऱ्या पण जवळच्याच बँकेत गेलो. त्यांनी मात्र मुकाट्याने मी मागितलेल्या रकमेचा दर्शनी धनादेश तयार करून त्यासाठी लागणारे शुल्क घेऊन माझ्या स्वाधीन केला. आणि दुसऱ्याच दिवशी सर्व कागदपत्रांसह व्हिसा ऑफिसला गेलो अर्थात सौभाग्यवतीलाही घेऊन! तिला मुलाखतीसाठी नाही तरी निदान ऑफिस कसले आहे हे कळावे आणि खरे तर मला जरा नैतिक धैर्य प्राप्त व्हावे म्हणून! जरी आमच्याजवळचे कागदपत्र वगळता बाकी सर्व सामान बाहेर ठेवून आम्हाला त्या ऑफिसच्या आत सोडण्यात आले तरी पुढे मात्र आम्हाला कसलेच प्रश्न न विचारता आमचे कागदपत्र खिडकीतील गोऱ्या महिलेने घेतले आणि तपासून आम्हाला तशा अर्थाची पावती दिली. आणि चार दिवसानी घरच्या पत्त्यावर व्हिसा येईल ही पावती देऊन ते ताब्यात घ्या असे तिने सांगितल्यावर मोठ्या धाडसाने मी मग आम्हाला दहा वर्षाचा व्हिसा मिळेल का असा प्रश्न विचारल्यावर तिने हे मुंबईच्या ऑफिसमधील लोक ठरवतील असे सांगून आमची बोळवण केली. चार दिवस जीव टांगणीला लागल्यावर अखेर

पाचव्या दिवशी खरोखरच कूरियरने दोघांची अमेरिकेची प्रवेशपत्रे (व्हिसा की व्हिसे?) आली. आम्हाला चक्क दहा वर्षाचे अनेकप्रवेशी (मल्टिपल एंट्री) प्रवेशपरवाने मंजूर होऊन आले होते.

अश्या प्रकारे काही का असेना या वेळी तरी “अगदी सोप्पे तर काम आहे, उगीचच लोक बाऊ करतात ” असे पारपत्र व अमेरिका प्रवेशपत्र मिळाल्यावर आम्हास वाटले. “घी देखा लेकिन बडगा नही देखा “ या म्हणीची आठवण पुढच्या वेळी पारपत्र तसेच व्हिसा मिळवताना आम्हाला येणार होता. हे त्यावेळी माहीत नव्हते पण त्याला अजून दहा वर्षाचा अवकाश होता कारण पारपत्र व प्रवेशपत्र दोन्ही दहा वर्षे मुदतीचे होते.

# ३. तिकिटे काढणे

अमेरिकेचे प्रवेशपत्र अर्थात व्हिसा विनासायास मिळाला आणि तोही दहा वर्षाचा ही आमच्या दृष्टीने फारच मोठी उपलब्धी होती. विमानप्रवासाची तिकिटे मिळवण्याचा अल्पसा प्रयत्न मी केला होताच. कारण आमच्या पूर्वानुभवी मित्रानी निरनिराळ्या विमानकंपन्या एकाच प्रवासासाठी वेगवेगळी भाडी आकारतात येवढेच काय पण निरनिराळ्या प्रवासी कंपन्या त्यातपण आणखी काही सवलती देतात आणि त्यात किफायतशीर भावात तिकिट खरेदी करून बरेच पैसे वाचवता येतात असा मोलाचा सल्ला दिला. आमचा यापूर्वीचा प्रवासाचा अनुभव मराठवाड्यात अधिक काळ कंठल्यामुळे म. रा. मा. प. मं (महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळ) पुरताच मर्यादित असल्यामुळे विमानप्रवासास निघणे हे आमच्या दृष्टीने बिगरीतल्या मुलाला एकदम एस. एस. सी च्या परीक्षेला बसविण्याचाच प्रकार होता. (आता तोही परीक्षाच नसल्यामुळे बसू शकेल आणि परीक्षाच नसल्यामुळे पासही होईल म्हणा!) त्यामुळे निरनिराळ्या प्रवासी कंपन्यांकडून ऐकलेली माहिती फक्त ऐकून घेणेच आमच्या आवाक्यात होते, त्या माहितीचा भडिमार आमच्यावर करत असताना एअर इंडियाच्या

महाराजाने मात्र प्रवासी असले काय किंवा नसले काय त्याला काही फरक पडत नसल्याप्रमाणे आमच्या प्रवासाची तारीख मे महिन्यातील असल्यामुळे आणि आम्ही चौकशी मार्चमध्ये करत असल्यामुळे एक एप्रिलपासून दर बदलणार आहेत असे सांगून आम्हास लोंबकळत ठेवले आणि इतर कंपन्यांविषयी आम्ही साशंक होतो. आश्चर्य म्हणजे एअर इंडियाचे दर हे नेहमीच बदलत असतात आणि त्याची पक्की माहिती कोणत्याच प्रवासी कंपनीकडे नसते असे पुढे अनुभवास आले. इतरांपेक्षा आपण दोन पाऊल पुढेच! (की मागे?)

अलितालियाने ज्येष्ठ नागरिकासाठी काही सवलत देण्याची तयारी दाखवली होती. टाइम्स ऑफ इंडियात मात्र निरनिराळ्या प्रवासी कंपन्या अगदी कमी भाड्यात अमेरिकेला अथवा जगात कुठेही नेण्याची तयारी दाखवणाऱ्या जाहिराती देत होत्या. आमच्या साडूंना मी फोन करून विचारले कारण त्यांचा एक पाय नेहमी विमानातच असतो तर त्यानी एअर फ्रान्स ची तिकिटे ब्लॉकच करून टाकली. एअर फ्रान्सचे भाडे बरेच जास्त म्हणजे इतर काही कंपन्यांपेक्षा माणशी वीस हजार रुपये अधिक होते. आणि त्यांच्या दृष्टीने ती अगदी किरकोळ बाब होती. अर्थात ब्लॉक करताना पैसे द्यावे लागत नसल्यामुळे मला फारसा धक्का बसला नाही. आमच्यासारख्या परत येणाऱ्या व्यक्तींसाठी तिकिट

परतीचेच असते आणि एकेरी प्रवासाच्या भाड्याशी तुलना करता ते बरेच कमी पडते. तसेच तुम्ही चार महिने रहाणार की सहा महिने यावरही तिकिटाचे दर अवलंबून असतात. परतीची तारीख निश्चित नसल्यास घेतलेल्या तिकिटास खुले किंवा ओपन तिकिट म्हणतात, पण काही विमानकंपन्या अशी तिकिटे देत नाहीत आणि दिल्यास जास्त भाडे लावतात सुदैवाने या सर्व माहितीच्या गोंधळातून आम्ही सावरण्यापूर्वी सुजितनेच एअर इंडियाचेच ओपन तिकिट पाठवून आमची सुटका केली. अमेरिकेतील महाराजाला मात्र मे महिन्यातले दर माहीत असावेत किंवा महाराजाला बहुधा डॉलर प्रिय असावा. अर्थात त्याने पाठवले नसते तर मी शेवटी एअर इंडियाचेच तिकिट घेतले असते याला दोन कारणे होती. एक म्हणजे एअर इंडियाचे विमान त्यावेळी सहार (आता छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय) विमानतळावरून निघून लंडन मार्गे जे. एफ. के. (न्यूयार्क) विमानतळावर उतरे आणि या प्रवासात लंडनला एक थांबा असला तरी विमान आणि विमानतळ बदलावा लागत नव्हता (आताही तीच परिस्थिती आहे) आणि दुसरे कारण एअर इंडियातील खानपान सुविधा आमच्यासारख्या शाकाहारी मंडळींना योग्य होती.

# ४. प्रवासाची पूर्वतयारी

आता यापुढील तयारी म्हणजे सामान काय आणि किती न्यायचे याची! पण ही तयारी सौ. ने आणि त्याशिवाय आम्ही जाणार याची वर्दी लागलेल्या आणि ज्यांचे पाल्य अमेरिकेत आहेत अशा आमच्या मित्र आणि मित्र नसलेल्याही लोकानी अगोदरच सुरू केलेली दिसली. सौभग्यवतीचा दूरदर्शीपणा इतका की पासपोर्ट मिळाल्या दिवसापासूनच तिने तयारी सुरू केली असावी असे तिने न्यावयाच्या सामानाचा डोंगर माझ्यापुढे उभा केल्यावर मला कलले. याशिवाय आम्हाला बऱ्याच लोकांचे प्रेमळ आवाजात फोन येऊ लागले की आमच्या बॅगेत थोडी जागा असेल तर त्याना काहीतरी पाठवायचे आहे. त्यावेळी अमेरिकेस जाणाऱ्यांचा इतका सुळसुळाट झाला नव्हता. एक दिवशी सकाळीच आमचा फोन खणाणला आणि मी कानाला लावताच पलिकडून 'मी देशपांडे बोलतोय" असे शब्द ऐकू आले. देशपांडे हे नाव आमच्या कुलकर्णी नावाइतकेच सर्वसमावेशक असल्याने ' आपण कोणते देशपांडे" अशी पृच्छा मी केली त्याव्र त्यानी सांगितलेले नाव माझ्या परिचयाचे नव्हते पण त्यानी त्यांचा मुलगा आमच्या मुलाचा मित्र असल्याची माहिती देऊन अगदी थोडेसे

सामान आमच्याबरोबर पाठवायचे आहे असे सांगितले. त्यांचे सामान नेणे ही आमची जणु जबाबदारीच आहे असा त्यांचा सूर वाटल्याने मी 'माझ्या मुलाने काही तसा उल्लेख केला नाही" असे त्यांच्या कानावर घातले तेव्हां"असे कसे म्हणता असे एकमेकाला साह्य करावे लागते "असा उपदेश करायला सुरवात केल्यावर मात्र मला फार आनंद झाल्याचे मी न दर्शवल्यामुळे देशपांडे साहेबानी माझा नाद सोडला. आता अमेरिकेत सगळयाच गोष्टी कदाचित भारतापेक्षाही स्वस्तात उपलब्ध होऊ लागल्याने अशी मदत मागणारे कमी भेटू लागले आहेत.

सामान काय न्यावयाचे यावर बरीच चर्चासत्रे झाली सुजितला आवश्यक वस्तूंची यादी त्याने दिलीच होती. आम्हाला त्यावेळी प्रत्येकी ३६ किलो वजनाच्या प्रत्येकी दोन बॅगा आणि केबिनमध्ये प्रत्येकी सात ते दहा किलो वजनाची एक बॅग नेण्याची मुभा होती, बॅगाचे आकारमानही निश्चित केलेले होते. अशा प्रकारच्या बॅगा आमच्याकडे असणे शक्यच नव्हते त्यामुळे संन्याशाच्या लग्नाप्रमाणे आम्हाला बॅगेपासून तयारीला लागणे आवश्यक होते, त्या बॅगा आणल्यावर त्या आपल्याला खेळण्यासाठी आणल्या आहेत अशी आमच्या नातवाने समजूत करून त्यावर उड्या मारून बॅगा पुरेश्या दणकट आहेत याची शहानिशा करून दिली. त्यानंतर त्या बॅगात सामान भरण्याचे आणि काढण्याचे काम जायच्या

आधल्या दिवसापर्यंत चालू होते कारण सामानाचे वजन जरा जास्त झाले तर ते काढायला लावतात असे ऐकले होते. त्याशिवाय अमुक वस्तु घेऊन जाता येत नाही तमुक वस्तु अमेरिकेच्या विमानतळावर काढून फेकून देतात असे पूर्वानुभवी लोकानी आम्हाला घाबरवण्याचे बरेच प्रयत्न केले. अर्थात त्यांच्या मते असा मोलाचा सल्ला देऊन ते आमच्यावर उपकारच करत होते. या सल्ल्यांमुळे आमचे बॅगा भरण्याचे काम दुपटीने वाढले होते कारण बॅगेत गेलेली प्रत्येक वस्तू एकदोनदा तरी बॅगेबाहेर काढली जाऊनच शेवटी बॅगेत स्थानापन्न होत असे. त्यानंतर वजन बरोबर ३६ किलो करण्यासाठी बऱ्याच वस्तूना आपली जागा बदलावी लागली. वजनाविषयी मी एवढा काटेकोर कॉलेजात केमिकल बॅलन्स वापरतानाच झालो होतो आणि त्यानंतर कधीतरी बायकोसाठी दागिना (अशी वेळ क्वचितच आली) घ्यायला सोनाराकडे गेलो तेव्हां! मात्र त्यानिमित्ताने वजनमापक काटा घरी आला आणि त्याचा उपयोग घरातील व्यक्तीची वजने करण्यातही झाल्यामुळे सौचे केवळ मानसिक वजनच नव्हे तर शारीरिक वजनही माझ्यापेक्षा जास्त आहे हे सप्रमाण सिद्ध झाले.

अमेरिकेत जाताना स्वत: साठी मात्र फारसे काही न्यावे लागत नाही म्हणजे अमेरिकन लोक कपड्यांविषयी (आणि कपडे घालण्याविषयीही) फारसे आग्रही नसल्यामुळे केवळ

लज्जारक्षणापुरते कपडे नेले तरी चालते, मग हौस म्हणूनच ज्यादा कपडे न्यायचे असल्यास न्यायचे, शिवाय उन्हाळयातच आम्ही जात असल्याने थंडीसाठी खास काही नेणे आवश्यक नव्हते. त्यामुळे माझे काम फारच सोपे झाले. अर्थात सौभाग्यवतीचे वस्तू गोळा करण्याचे काम अमेरिकन प्रवेशपत्र मिळाल्या दिवसापासून सुरू झाले होते. त्यामुळे तिची बॅग नेहमीप्रमाणेच हाउसफुल्ल होती.

या वयात परदेशी(येवढेच काय पण परगावीदेखील) जाताना न विसरता नेणे आवश्यक असलेली गोष्ट म्हणजे आमची नेहमीची औषधे आणि अमेरिकेत जाताना त्याचबरोबर आवश्यक म्हणजे आरोग्यविमा. कारण अमेरिकेत तुमचा विमा नसेल तर डॉक्टर तुमच्या अंगाला हातही लावायला घाबरतात म्हणे! आणि तोही थोडाथोडका नाही तर पाच लाख डॉलर्स ची भरपाई करण्याइतका हवा असा मुलाचा आग्रह! बरे खर्चाची सबब सांगितली तर तो पैसे पाठवायला तयार असल्याने नकार देता आला नाही त्यामुळे वाया जाणार याची खात्री असली तरी जनरल इन्शुअरन्स कं ला सत्तर पंच्याहत्तर हजार रुपयांचा नैवेद्य दाखवून आलो. येवढे करूनही आमच्या एका मित्राला एक दात काढण्यासाठी अमेरिकेत आलेला खर्च भारतात येऊन पाच सहा महिने झाले तरी त्याची भरपाई झाली नव्हती असा त्यांचा अनुभव! कारण त्या विम्यात दातांचा खर्च मात्र

अंतर्भूत नसतो, त्यामुळे अमेरिकेतील बरेच भारतीय लोक दातांची दुरुस्ती भारतात येऊन करतात असे पुढे आमच्या दंतवैद्याकडून कळले. . दुसऱ्या एका मित्राचा अनुभव वेगळाच होता. तो चार महिनेच अमेरिकेत रहाणार असल्याने त्याने विमा तेवढ्याच मुदतीचा घेतला होता पण त्याना मुक्काम वाढवावा लागला म्हणून विम्याची मुदत संपल्यादिवशी ते विमा कंपनीकडे निघाले आणि जातानाच जिन्यात पडून पायाला फ्रॅक्चर झाले प त्यांचे नशीब येवढे खराब की त्याच दिवशी मुदत संपल्यामुळे त्याना एकही पैसा खर्चाची भरपाई मिळाली नाही. आणि अश्या क्षुल्लक गोष्टीसाठी अमेरिकेत किती खर्च होतो याचा धडा विकत घ्यावा लागला.

बॅगा भरल्यानंतर आम्ही निघायला सिद्ध झालो म्हणायला हरकत नव्हती

आमच्याशी फोनवर बोलून आणि एक मोठा विरोप (ईमेल) पाठवून सुजितने सहार विमानतळावर प्रवेश केल्यापासून ते केनेडी (जे. एफ. के.) विमानतळातून बाहेर पडेपर्यंत कायकाय करावे लागते, कोठे काय खबरदारी घ्यायला हवी याविषयी बऱ्याच सूचना दिल्या होत्या. परीक्षेला बसणाऱ्या मुलासारखा मी त्या डोक्यात घोळवत होतो शिवाय जे पूर्वी जाऊन आले होते त्यानी त्यांच्या मुलांना द्यायचे गाठोडे आमच्या बॅगमध्ये बसू शकले नाही

तरी निराश न होता आपल्या अनुभवाचे भले मोठे गाठोडे आम्हाला बरोबर देण्यात कुचराई केली नव्हती.

बरोबर आमचे भारतातील चिरंजीव आणि अनुभवी मंडळी होतीच, कारण आम्ही पुण्याहून प्रथम आमच्या साडूंकडे उतरून मग सहार विमानतळावर गेल्याने आमच्या विरोधास न जुमानता त्यानी विमानतळावर आमच्या सोबत येण्याचा आपला हट्ट सोडला नाही आणि त्यामुळे मी आता अगदीच निर्धास्त मनाने निघत होतो कारण काही अडचण आलीच तर त्यांचा मदतीचा हात सदैव पुढे होताच. एअर इंडियाच्या विमानाची सहार विमानतळावरून सुटण्याची वेळ सकाळी ६-३० अशी दिसायला सोयिस्कर असली तरी त्याअगोदर तब्बल चार तास विमानतळावर हजर रहावे असा शिरस्ता असल्याने घरातून पहाटे दोन अडीच अशा अगदी अडनेड्या वेळेला निघावे लागते. त्यात लवकर उठण्यासाठी लावलेला गजर एकचा न लागता चुकुन १२ चाच लागल्यामुळे भलत्याच वेळी आम्ही उठून बसलो आणि त्यानंतर झोप येणे शक्य नव्हते, (हा गजर आमच्या सालेसाहेबांनी लावला होता कारण तोही बहिणीला निरोप द्यायला म्हणून आला होता त्यामुळे त्याच्यावर रागावण्या ऐवजी"बरे झाले आणखी एक तास तयारीला म्हणजे तिष्ठत रहायला, मिळाला असे त्याचे कौतुकच

करणे भाग पडले) अर्थात अगोदरही फार झोप लागली होती अशातला भाग नव्हता. त्यामुळे विमानतळावर आम्ही पहाटे एक दीडलाच डोळे चोळत पोहोचलो.

यापूर्वी दोनदा या विमानतळावर सुजितला सोडण्यासाठी आलो होतो पण त्याचे लुफ्तान्साचे तिकिट असल्याने त्यावेळी वेगळ्या टर्मिनलवर गेलो होतो. त्यावेळी २ए आणि २बी अशी टर्मिनल्स होती. आता २सी हे नवे स्थानक झाले होते म्हणजे आमच्या परदेशगमनासाठी सगळेच किती उत्सुक होते हे लक्षात यावे. आणि त्यावरून केवळ एअर इंडियाच्याच विमानांचे उड्डाण होणार असल्याने अगोदरच आडवेळ असल्याने तेथे इतका शुकशुकाट होता, की त्या विमानतळावरूनच आपले विमानोड्डाण होणार आहे यावर विश्वास ठेवणे कठीण होते. शिवाय केवळ एअर इंडियाचीच विमाने म्हणजे केवळ भारतीय प्रवासीच जाणार म्हणून उगीच स्वच्छतेची वगैरे काळजी घेण्याचाही प्रयत्न केलेला दिसत नव्हता. आजचा विमानतळ जो देशापरदेशातही नावाजला जातो तो पहाणाऱ्याना २ सी हा कसा होता याची कल्पना करणेच अशक्य आहे. पण त्यामुळे एक झाले की हा शिवाजीनगर एस. टी. स्टॅन्डचाच विस्तारित नमुना आहे असे वाटून माझे दडपण थोडे कमी झाले शिवाय अनुभवी मंडळी बरोबर होती म्हणूनच मी तग धरला. बाहेरच बऱ्याच हातगाड्या उभ्या

करण्यात आलेल्या होत्या(, आपल्याकडे त्यासाठी काही पैसे मोजावे लागत नाहीत, अमेरिकेत मात्र ही सेवा मोफत नाही.) त्यातीलच दोन आमच्याबरोबर आलेल्यानी आमच्या हातात सोपवून आमचे सामान त्यावर चढवून आता निघा अशी खूण केल्यावर कळले की आता खऱ्या अर्थाने आम्ही परदेशपर्यटनासाठी निघालो कारण यापुढे आम्हाला साथ देणारी मंडळी आत येऊ शकणार नव्हती. ती बाहेरूनच आम्हाला धीर देण्याचे काम करू लागली. येऊनजाऊन बाहेर ती उभी असल्याने जर तशीच काही अडचण आलीच तर किंवा बॅगेतील सामान काढावेच लागले तर परत घेऊन जाण्यासाठी ती तेथे असल्याने आमची पंचाईत होणार नव्हती.

# ५. निघालो एकदाचे!

आता अगदी हातातून दोर सुटलेल्या पतंगासारखीच आमची अवस्था झाल्यासारखे वाटले. आम्ही जणू काय एअरपोर्ट झाडायलाच पोचल्यामुळे एक्सरे स्क्रीनिंग सुरू झाल्यावर त्यावर बॅगा चढवणारे पहिले आम्हीच होतो. आमच्या चार मोठ्या आणि दोन लहान बॅगा बेल्टवरून एक्सरे मशीनखालून खडखड करत निर्विघ्नपणे पलीकडे जाऊन पडल्या आणि पलीकडील कर्मचाऱ्याने त्या प्लॅस्टिक बेल्टने सील करून टाकल्यावर विमानतळावर वाचायला म्हणून नेलेले पुस्तक आतच राहिल्याचे ध्यानात आले. पण केबिन बॅगांचे सील महत्त्वाचे नसते हे त्यावेळी तरी माहीत नसल्यामुळे गप्प बसलो. बोर्डिंग पास मिळण्यासाठी आता योग्य कौंटरवर जायचे होते अर्थात तेथेही रांग लावून उभे राहणारे आमच्याशिवाय कोणीच म्हणजे प्रवासी आणि कर्मचारी पण--- नव्हते. बसलो वाट पाहत त्यांच्या येण्याची! कारण आता सामान त्यांच्या ताब्यात देऊन मोकळे झाल्याशिवाय हालचाल करणे अवघड होते. थोड्या वेळाने त्या कौंटरवरचे कर्मचारी आले आणि आमचे तिकीट व पासपोर्ट पाहून आमच्या बॅगांना काउंटरशेजारून जाणाऱ्या पट्ट्यावर आश्रय मिळाला. आम्ही

अगदी काटेकोर वजन करून आणल्यामुळे वजन जादा होण्याची शक्यता नव्हतीच त्यामुळे आमच्या चार बॅगा सुरळीतपणे आत गेल्या. आम्हाला ऐल सीट्स (कडेच्या) घ्या असे मुलाने कळवले होतो (त्यावेळी पैलतोगे काऊ कोकताहे या गाण्याची आठवण झाली आणि कदाचित तो अमेरिकेतील आमच्या मुलाच्या घराबाहेर कोक(ल)त असेल असा विचार मनात आला.)आम्ही तसे म्हटल्यावर आम्हाला पाहिजे तशा जागांचे बोर्डिंग पासेस मिळाले. यापुढे तिकिटाऐवजी तेच दाखवावयाचे. आता हातात फक्त केबिन बॅग्ज च राहिल्या आणि हलके हलके वाटू लागले.

इमिग्रेशनमध्ये जाण्यापूर्वी बरोबर आलेल्या सगळ्यांना जाऊन सगळे ठीक जमले असे सांगितले. म्हणजे आता त्यांना सटकायला हरकत नव्हती इमिग्रेशनच्या वाटेने आत गेले की परत बाहेर येता येत नाही, निदान आमच्यासारख्या सामान्य माणसांना तरी! त्या टेबलापाशी बसणाऱ्या माणसाने आमचा व्हिसा आणि पासपोर्ट पाहून आम्हाला दहा वर्षाचा व्हिसा कसा मिळाला याविषयी उत्सुकता (की आश्चर्य?व्यक्त केली. खरे तर आमच्या पुढील अनुभवावरून बहुतेकाना दहा वर्षाचाच व्हिसा मिळतो असे दिसले. ब्रिटिश लोक मात्र त्याबाबतीत कन्जूष आहेत ते सहा महिन्याचाच व्हिसा देतात आणि त्यासाठीही भक्कम पैसे मोजून घेतात.) कदाचित नुकताच त्याच्या मुलाला अमेरिकेचा व्हिसा

नाकारण्यात आला असावा नाहीतर अमेरिकन कॉन्सुलेटने आमच्यावर मेहेरबानी केल्याचे त्याला दु: ख व्हायचे तसे काही कारण नव्हते. त्याच्या प्रश्नाचे उत्तर न देताच आम्ही पुढे सटकलो कारण त्याची तशी अपेक्षा नसावी आणि आम्हाला उत्तर माहीत नव्हते. यापुढील भागात एका चौकटीतून प्रवेश करावा लागत होता. त्या चौकटीच्या बाहेर ठेवलेल्या टोपलीत आपले बूट, घड्याळ, पर्स, पँटचा बेल्ट, काढून ठेवावे लागते, त्या टोपल्या केबिनबॅगांसह चाळणीखालून जातात आणि पलीकडे जाऊन पडतात, आपण मात्र त्या चौकटीतून प्रवेश करायचा त्यावेळी मेटल डिटेक्टर सर्वांगावरून फिरवून आपण विमान उडवण्याच्या तयारीत आलो नसल्याची खात्री करून घेण्यात येते. पलीकडे जाताना सौ. च्या अंगावरून मेटल डिटेक्टर फिरवल्यावर आवाज आल्यामुळे मी घाबरलो पण नंतर ते चुकीचे निदान झाल्याचे कळले आणि मग आम्ही केबिनबॅगांसह विमानात चढण्याच्या लायकीचे ठरवल्यावर आम्हाला पलीकडे प्रवेश मिळाला. बोर्डिंग पासवरच कोणत्या क्रमांकाच्या प्रवेशद्वारातून विमानात प्रवेश करावा लागेल याची नोंद असते त्या भागात जाऊन ते द्वार उघडण्याची आम्ही तेथे असलेल्या अनेक आरामशीर खुर्च्यांपैकी आम्हाला सोयिस्कर वाटणाऱ्या खुर्च्यांत बसून वाट पाहू लागलो.

यापूर्वी विमानप्रवासाचा अनुभव नसल्यामुळे चित्रपटात नायक नायिका विमानाला लावलेल्या शिडीवरून उतरताना आपल्या आईवडिलांकडे पाहून हात हालवताना पाहिल्यामुळे आपणही तसेच प्रवेशद्वार उघडल्यावर विमानात शिडीने चढणार अशा कल्पनेने, " पायऱ्या जरा जपून चढ " अशी सूचना सौ. ला देण्याचा विचार करत होतो. पण तरीही ज्यना पाहून हात हालवायचे ती मंडळी तर बाहेरच राहिली होती. तेवढ्यात सहा वाजल्यामुळे आम्हाला " एअर इंडियाच्या न्यूयॉर्कला जाणाऱ्या उड्डाणातील प्रवाशांनी तयार राहावे" अशी सूचना मिळाली व आम्ही लगबगीने तयार झालो. प्रथम व्हीलचेअरवर बसणारे आणि बालके बरोबर असणारे प्रवासी आणि एक्झिक्युटिव्ह क्लास च्या प्रवाशांना आत सोडण्यात आले त्यानंतर आमच्या आसनक्रमांकानुसार आम्हाला आत सोडण्यात आले. आत गेल्यावर बऱ्याच लांबलचक बोगद्यासारख्या मार्गाने आम्ही चालू लागलो. तो मार्ग इतका लांबलचक होता की हे आता आम्हाला जे. एफ्. के. पर्यंत चालतच नेतात की काय असे वाटू लागले तोच समोर एक प्रवेशद्वार आणि त्यात हसतमुखाने उभे राहून आमचे स्वागत करणारे हवाई सुंदरी आणि इतर कर्मचारी दिसल्यावर आपण विमानानेच जाणार याची खात्री वाटून जिवात जीव आला. हवाई सुंदऱ्या बहुतेक सेवानिवृत्तीपूर्वीचा शेवटचाच प्रवास करायला निघाल्या

असाव्यात. अर्थात आमच्यासारख्या सेवानिवृत्त होऊनच प्रवासाला निघणाऱ्या प्रवाशांसाठी महाराजाने ही खास योजना करणे योग्य असले तरी इतर प्रवाशांची त्यामुळे निराशा झाली असण्याची शकयता असल्याने मला त्यांची दया आली. त्यांनी आम्हाला आमच्या हातातील बोर्डिंग पासेस पाहून आमच्या बैठका कोणत्या भागात आहेत याविषयी दिग्दर्शन केले आणि त्यांच्या सूचनेनुसार आमच्या आसनक्रमांकाकडे जाऊन हाशहुश करत बसलो.

विमानात शिरल्यावर परत बरोबर घेतलेल्या पुस्तकाची आठवण झाली. ते पुस्तक केबिन बॅगमध्ये होते आणि केबिनबॅग आत शिरताच नेहमीच्या तत्परतेने डोक्यावरील सामान ठेवण्याच्या जागेत ठेवल्याचेही स्मरण झाले. ते काढून घ्यायचा विचार करतो तोच विमानातील कर्मचारी आणि हवाई सुंदऱ्या सगळया वरच्या कप्प्यांची झाकणे जोरात आवाज करत लावून जाताना बेल्ट बांधायला आणि मोबाईल बंद करायला सांगून गेल्या. तेव्हा मला बेल्टची आठवण झाली. त्याची टोके माझ्याच अंगाखाली गेलेली काढून लावायला गेलो तेव्हा एक टोक शेजारील सौ, च्या सीटचेच हातात आले आणि ते ओढून बेल्ट बांधायच्या प्रयत्नात तिच्या स्वातंत्र्यावर आक्रमण होऊन सगळया प्रवाशांना ऐकू येईलशा आवाजात " अहो माझा बेल्ट कशाला ओढताय?" अशी माझी

कानउघाडणी झालीच शिवाय लग्नाच्या वेळी दोघेही एकाच बेल्ट्मध्ये सामावू शकलो असतो एवढीच ती होती पण ती परिस्थिती आता राहिली नव्हती. शेवटी तिनेच माझ्या बेल्टचे तिच्याच अंगाखाली गेलेले टोक माझ्या हातात दिल्यावर मला बेल्ट लावणे शक्य होऊन कर्तव्यपूर्तीचा आनंद झाला.

आता विमान चालू होण्याची आम्ही वाट पाहू लागलो सुरवातीला बराच काळ फक्त घरघराटच ऐकू येत होता आणि वैमानिकाच्या सूचनेवरून आम्ही उड्डाण करत आहोत येवढे समजले पण विमान जागा सोडायला तयार नव्हते. अर्थात आमच्या नेहमीच्या एस्. टी. च्या प्रवासाप्रमाणे सर्व प्रवासी स्थानापन्न झाल्यावर या बसचा टायर पंक्चर झाल्यामुळे सर्व प्रवाशांनी खाली उतरून दुसऱ्या बसमध्ये बसावे अशी सूचना विमानप्रवासात होत नसावी अशी आशा मला होती. तो अनुभव पुढच्या वारीत येणारच होता. सुदैवाने वैमानिकाने काही तांत्रिक कारणामुळे विमान सुटायला उशीर होत असल्याचे सांगून दिलगिरी व्यक्त केली आणि माझा जीव थोडासा भांड्यात पडला कारण तांत्रिक अडचणीमुळे किती विलंब होईल याचा अंदाज नव्हता पण लगेचच पुन्हा घरघर सुरू होऊन विमान गजगतीने चालू झाले. ते बराच वेळ चालले आणि पुन्हा थांबले मग परत ते उलट्या दिशेने धावू लागले पुन्हा ते थांबले आणि आता कसे काय होणार अशा चिंतेत मी

असतानाच ते एकदम वेगाने योग्य दिशेने धावू लागले ते आता मात्र उड्डाण करायचेच या करारानेच! आणखी वीसपंचवीस सेकंदातच जमिनीशी संपर्कामुळे चाकांचा होणारा खडखडाट एकदम बंद होऊन आपण हवेत तरंगत आहोत याची जाणीव झाली. आमची आसने खिडकीजवळ नसली तरी शेजारच्या खिडकीतून आपण मुंबईच्या आकाशात विहार करू लागल्याचे आणि खालील रस्ते, इमारती. माणसे लहान होत जात आहेत हे समजत होते. समोरच्या पडद्यावर विमानाचा वेग, जमिनीपासून उंची, निघण्याची वेळ. गंतव्य स्थान आणि अंतर तेथे पोचण्याची वेळ या गोष्टी दिसू लागल्या.

विमान वर जाताना कानाला दडे बसण्याची शक्यता असते त्यामुळे पूर्वानुभवी माणसांच्या सल्ल्यानुसार कानात घालण्यासाठी कापसाचे बोळे बरोबर घेतले होते त्यांची आठवण विमान योग्य त्या उंचीवर स्थिर झाल्यावर झाली आणि ते बोळे मी शोधू लागल्यावर " आता कश्याला कानात बोळे घालताय ती वेळ निघून गेली" हे सौ. ने बजावलेच. . थोडक्यात प्रत्येकालाच दडे बसतात असे नाही याचे प्रात्यक्षिक झाले. पुस्तक काढावे काय असा विचार करत होतो पण तेवढ्यात समोरील पडद्यावर संकटकाळी तुमच्या डोक्यावरील ऑक्सिजन मास्क कसा वापरायचा किंवा विमान पाण्यात पडल्यास लावावयाचे लाईफ

जॅकेट कसे वापरायचे याचे दिग्दर्शन झाले. त्यानंतर आता बेल्ट सोडायला आणि हालचाली करायला हरकत नाही अशी सूचना मिळाल्यावर मी वरून पुस्तक काढावे काय याचा विचार करू लागलो, तेवढ्यात मनोरंजनासाठी विमानात खुर्चीच्या मागील पिशवीत हेडफोन होते. ते खुर्चीस असलेल्या कनेक्शन पॉईंटला जोडल्यावर आणि कानाला लावल्यास संगीत अथवा समोर चालू असलेल्या चित्रपटातील संवाद ऐकणे शक्य होते. हे लक्षात आले. पण येथेही बसच्या प्रवासाचाच अनुभव माझ्या वाटणीस आला. अगदी वातानुकूलित लक्झरी बसने प्रवास केला तरी नेमकी माझ्याच खुर्चीची पाठ हटवादीपणे आपला ताठ बाणा सोडायला तयार होत नाही. आणि रात्रभर इतर लोकांचे घोरणे मला ताठ मानेने आणि पाठीने मला ऐकून घ्यावे लागते. येथेही मी कानाला हेडफोन लावल्यावर काहीच ऐकू येत नव्हते मात्र नेहमीप्रमाणे कनेक्शन करण्यात चूक करणारी माझी बायको मात्र संगीत ऐकण्यात (की समोरील चित्रपट बघण्यात) गुंग झाली. होती, माझी अडचण मी तिला तसे सांगताच तिने मी लावलेल्या कनेक्शनची पाहणी केली आणि ते बरोबर नसल्याचे प्रमाणपत्र देताच विमानसुंदरीस बोलावून तिला माझी अडचण सांगितली पण आता विमान चालू झाल्यावर काही करता येत नसल्याबद्दल तिने दिलगिरी व्यक्त

केली. व ती उदार मनाने मी स्वीकारली. (कारण दुसरा पर्यायच नव्हता)

आमच्या बायकोने आपल्या कानाला हेडफोन लावून माझ्याशी बोलण्याचे कनेक्शन तोडून टाकले होते. त्यामुळे मी मात्र समोरच्या खुर्चीच्या पाठीवर असलेल्या पुस्तिकेत विमान समुद्रात पडल्यास तरंगण्यासाठी दिलेले जाकीट कसे फुगवावे आणि वापरावे किंवा खुर्चीच्याच वरून येणारा ऑक्सिजनचा मुखवटा तोंडावर कसा चढवावा याविषयी दिलेल्या सूचना वाचत बसलो. आणि इतरेजन संगीत चित्रपटाचा आस्वाद घेत असताना विमान समुद्रात केव्हा पडते याची वाट पाहत बसलो. अर्थात त्या सूचनांचा एवढा अभ्यास केल्यामुळे विमान खरोखरच समुद्रात पडल्यास मी वाचणार होतो अशातला भाग नव्हता फार तर बुडता बुडता (आपल्या पेश्याला अनुसरून) त्या विषयावर एकादे लेक्चर देऊ शकलो असतो. पण त्यातही दुः खाची बाब ही की हा लेक्चर देता देता (तानाजी जसा लढता लढता) मेला असे सांगायला तरी कोणी उरेल की नाही याचीही शंकाच होती. पण थोड्या वेळाने सौ. ने उदार मनाने आपल्या खुर्चीचे कनेक्शन मला दिले आणि मलाही संगीत ऐकू येऊ लागले. आणि थोड्याच वेळात तिच्या औदार्याचे कारण कळले. एक म्हणजे चित्रपटाची भाषा तिला कळत नव्हती. कारण आमचे विमान Air India असले सर्व चित्रपट इंग्रजीच

होते. अलिकडे मात्र अगदी Air France ने गेलात तरी हिन्दीच काय पण मराठी चित्रपटही असतात इतका भारतीय प्रवाशांनी आपला लौकिक वाढवलाय. अर्थात त्यावेळी तरी इंग्रजी चित्रपटच बघणे भाग होते व त्यातीलही भाषा मलाही फार समजत होती अशातला भाग नव्हता, संगीताच्या बाबतीत बोलायचे झाले तर भारतीय शास्त्रीय आणि उपशास्त्रीय संगीताची एकच कॅसेट एअर इंडियाच्या साठ्यात उपलब्ध होती आणि प्रत्येक पंधरा मिनिटांनी तीच पुन्हा पुन्हा लावली जात होती, थोडक्यात वीस तासाच्या प्रवासात सर्व गाणी अथवा ख्याल प्रवाशाला मुखोद्गत व्हावेत अशी एअर इंडियाची इच्छा असावी. उतरल्यावर त्याची चाचणी घेत नाहीत हे भाग्य! इतर चॅनेलवरील रॉक आणि पॉप संगीतात आम्हा दोघांनाही मुळीच रस आणि गम्य नव्हते. खाद्यपेयांच्या ट्रॉलीज मधून मधून येत होत्या पण नेमका तो मंगळवार असल्यामुळे आणि तो आमचा उपवासाचा दिवस असल्यामुळे त्यांच्या खानपानापैकी सुका मेवा काही फळे आणि चहा आणि काही शीतपेयांचाच काय तो आम्ही समाचार घेऊ शकलो. मधल्या काळात मोठ्या धाडसाने मी केबिन बॅग काढून त्यातील पुस्तक काढून वाचायला सुरवात केली आणि रात्री १२ पासून डोळ्याला डोळा न लागल्याने मला हळूहळू झोप लागली आणि जाग आली

तेव्हा लंडनचा विमानतळ आला आता पट्टे आवळा अशी सूचना ऐकूनच. !

लंडनला पोचायला जरी जवळजवळ दहा तास लागले होते तरी घड्याळात मात्र सकाळचे अकराच वाजले होते. आम्ही पश्चिमेला चाललो होतो ना! हवा चांगली असल्याची घोषणा झाली त्यामुळे लंडन राहिले पण हीथ्रो विमानतळ तरी पाहायला मिळेल अशी आशा होती पण तेथेही आमची पार निराशा झाली. आम्हाला विमानतळावर जाऊ दिले गेलेच नाही त्या ऐवजी बाहेर नेऊन एका अतिशय छोट्या हॉलमध्ये आमची रवानगी झाली. तेथे सगळ्यांना बसायपुरतीही जागा नव्हती आणि टॉयलेटही नव्हते. ज्या पूर्वानुभवी मंडळींनी विमानातील अतिआकुंचित टॉयलेटऐवजी विमानतळावरील प्रशस्त सुविधेचा लाभ घ्यायचे ठरवले होते त्यांची परिस्थिती मात्र फारच बिकट झाली. बाहेर सोडायचेच नव्हते तर व्हिसा तपासण्याची काय आवश्यकता होती कळले नाही. भाग्यच आमचे की सामान ताब्यात घेऊन पुन्हा ते चाळणीखालून न्यावयास लावले नाही कारण ९/११ नंतर प्रवास करणाऱ्या काही मित्रांवर असा प्रसंग आला होता. अर्धा पाऊण तास त्या हॉलमध्ये काढल्यावर पुन्हा आम्हांस विमानात सोडण्यात

आले त्या काळात विमानाची अंतर्गत सफाई करतात म्हणे! आम्ही पूर्वीच्याच जागी स्थानापन्न झालो. त्यानंतरचा प्रवासही बराचसा झोपेतच झाला. माझ्या मागील आसनावरील प्रवासी बरोबर खाद्यपेयांच्या गाड्या आल्या की जागा होत असे आणि मद्याचा भरपूर मोठा डोस पचवून पुन्हा झोपेच्या अधीन होत असे.

नऊ तासांनी न्यूयॉर्कचा जे. एफ्. के. विमानतळ आल्याची घोषणा झाली तेव्हा तेथील घड्याळात दुपारचे चार वाजले होते. आम्हाला आय- ९४ फॉर्म्स प्रत्येकी एक आणि दोघात मिळून एक डिक्लेरेशन फॉर्म भरायला देण्यात आले. (आता फक्त डिक्लरेशनच लागते) मला आमचे दोघांचे फॉर्म्स भरायचे असल्याने आणि अजून डोळयांवर झोप असल्याने प्रत्येक वेळी फॉर्म भरताना काहीतरी चूक व्हायची. कधी माझ्या फॉर्ममध्ये बायकोचा पासपोर्ट नंबर तर कधी तिच्या फॉर्ममध्ये माझी जन्मतारीख असे घोटाळे करत मी बरेच फॉर्म्स खराब केले. फॉर्म्स मागण्यासाठी मी बायकोला पाठवत होतो, फॉर्म भरण्याचे काम मी करत असल्याने तिलाही ती जबाबदारी आपली आहे असे वाटत होते पण शेवटी विमान कर्मचाऱ्यांनी आता हे शेवटचेच फॉर्म असे निक्षून बजावून सांगितल्यावर तिनेही मला तसे निक्षून सांगितल्यावर मात्र माझ्या हातून चूक न होता फॉर्म्स भरले गेले. फॉर्म्स अगदी प्रवासाच्या शेवटी दिल्यामुळे भरायला पुरेसा वेळ नव्हता अशी तक्रार बरेचजण

करत होते त्याअर्थी त्यांच्याही हातून अशाच चुका झाल्या असण्याची शक्यता वाटली. मी फॉर्म्स भरताना केलेल्या चुका पाहून माझ्या मागे बसलेल्या प्रवाशाने प्राशन केलेल्या पेयाचा परिणाम त्याच्या ऐवजी माझ्यावरच झाला की काय की चुकून हवाई सुंदरीने मला ज्यूसऐवजी आणखी काही दिले अशी शंका सौ. ला आल्याचे तिने बोलून दाखवले. तो प्रवासी मात्र एका झटक्यात फॉर्म भरून मोकळा झाला होता. त्याचे कारण त्याची बायको बरोबर नसल्यामुळे त्याच्यावर कसलेच दडपण नव्हते असे मी तिचे समाधान करण्याचा प्रयत्न केल्यावर त्याचा परिणाम उलटाच झाला. असो! बाहेर पडताना विमान कर्मचाऱ्यांनी (अगदी सुटलो यांच्या तावडीतून असा चेहरा न करता) हसून व हात जोडून आम्हाला निरोप दिला (की आमचा घेतला?) आणि पुन्हा लांबलचक बोगदा मार्गाने बाहेर पडलो.

# ६. आणि पोचलोही!

लगेच इमिग्रेशनसाठी निरनिराळ्या रांगा लागल्या होत्या त्यातील एका रांगेत आम्हाला उभे केले गेले. तेथील कर्मचारी आमचे पासपोर्ट, व्हिसा यांची पाहणी करून आम्ही किती महिने राहायचे याचा विचार करून तसा शिक्का आमच्या प्रवासपरवान्यावर मारत होते. आम्हा दोघांची पाहणी करून आम्ही कोणाकडे आणि कशासाठी चाललो आहोत असे विचारल्यावर आम्ही मुलाला भेटायला आलो आहोत असे सांगितल्यावर त्याचा पत्ता विचारून खात्री करून घेण्यात आली. आणि किती दिवस राहणार असे विचारल्यावर मी इमानेइतबारे चार महिने म्हणून सांगितले त्यावर स्मितहास्य करून मारलेला शिक्का बघून आश्चर्य वाटले कारण त्याने सहा महिन्याचा शिक्का मारला होता. कदाचित आमच्या पूर्वीच्या प्रवाशास त्याने तो शिक्का वापरला असावा तर तोच शिक्का मारावा उगीच कशाला बदलायचा नाहीतरी हा चार महिनेच राहायचे म्हणतोय असा विचार त्याने केला असावा, किंवा चार महिन्या ऐवजी सहा महिनेच काय कितीही काळ राहिला तरी ही मंडळी काही विशेष त्रासदायक होणार नाहीत असाही केला असावा. काहीका असेना इतरांना येणाऱ्या अनुभवाच्या उलट

अनुभव आम्हाला आला. कारण काही लोकांना सहा महिने सांगूनही तीनच महिन्याचा किंवा महिन्याचाच परवाना देण्यात आल्याचे अनुभव काही जणांनी निवेदन करून आम्हाला घाबरविले होतेच.

आमच्या एका मित्राचा अनुभव मात्र नमुनेदार होता. त्याच्या पूर्वीच्या प्रवाशाने माझ्याचसारखा चार महिने राहण्याचा विचार व्यक्त केला होता त्याला वापरलेला शिक्काच त्या मित्रवर्यांच्यासाठी इमिग्रेशनवाल्याने मारण्यासाठी हात उचलताच या आमच्या मित्रमहाशयानी आपला हात मध्ये घातला कारण त्यांना सहा महिने राहायचे होते. त्या मित्राच्या सावधानतेचे मला तरी कौतुक वाटते कारण आमच्याच भवितव्यतेच्या चिंतेत मी इतका मग्न असतो की आपल्यापुढची व्यक्ती काय बोलते आणि त्यावर काय प्रतिक्रिया होते या गोष्टीकडे लक्ष देणे मला तरी काही जमले नसते. अर्थात त्या वेळीही इमिग्रेशनवाल्याने मला जसे चार महिने सांगूनही सहा महिन्याचाच शिक्का मारून दिला होता तसाच प्रकार असता तर त्याला हात मध्ये घालण्याची काही जरुरी नव्हती असो त्याच्या हात घालण्याचा काही विपरीत परिणाम झाला नाही हे त्याचे सुदैव आणि त्यांनाही सहा महिन्याचा शिक्का मारून मिळाला. प्रत्येकाचा अनुभव प्रत्येक वेळी वेगळा असतो ही आश्चर्याची गोष्ट कारण आम्हालाच पुढच्या वेळी आम्ही चार महिने

म्हटल्यावर त्या खुर्चीवरील व्यक्तीने आमचे तिकीट फायला मागितले व तसा शिक्का मारून दिला. सध्या मात्र फक्त अमेरिकेत प्रवेश ज्या तारखेला केला त्या दिनांकाचा शिक्का मारून देतात कारण नियमाप्रमाणे सहा महिन्याच्या वर तुम्ही राहूच शकत नाही, त्यामुळे परत जाताना त्या मुदतीच्या आत तुम्ही परत गेलात म्हणजे झाले!

आता सामान ताब्यात घेण्याची वेळ आली. बॅगेज क्लेम अशी खूण असलेल्या भागात आम्ही प्रवेश केला. तेथे निरनिराळे पट्टे वर्तुळाकार मार्गात फिरत होते आमच्या उड्डाणाचा क्रमांक असलेल्या पट्ट्याजवळ जाऊन आम्ही सामान येण्याची वाट पाहू लागलो. त्यापूर्वी एक डॉलरमध्ये एक हातगाडी विमानतळावर उपलब्ध होईल अशी सूचना मुलाने देऊन ठेवल्यामुळे एक एक डॉलरची नाणी मुठीत पकडून आम्ही जात होतो पण आम्हाला यावेळी तेवढाही त्रास होऊ नये अशी अमेरिकनांची इच्छा असावी त्यामुळे त्या पट्ट्यापाशीच दुसऱ्या कुणीतरी सोडलेल्या दोन हातगाड्या आम्हाला मिळाल्या आणि फिरत्या पट्ट्यावरून सामान येण्याची वाट पाहू लागलो. आमच्या बॅगांसारख्याच सगळ्या बॅगा दिसत असल्याने आपल्याच बॅगा आपल्याला कशा मिळणार अशी भीती मला पडली होती पण सौ. ने मात्र कशी काय आपली बॅग बरोबर हेरली आणि पट्ट्यावरून खाली खेचलीसुद्धा मग

तिच्यापाठोपाठ इतर बॅगांनीही शरणागती पत्करली. एकूणच इतरांच्या अनुभवाचा आम्हाला काही उपयोगच होऊ नये अशी बुशसाहेबांची इच्छा दिसली.

विजयी वीरांप्रमाणे आपले सामान दोन ढकलगाड्यांवर चढवून आम्ही आता शेवटचा

अडथळा म्हणजे सामानासह अमेरिकन कस्टम अधिकाऱ्यांच्या चाळणीतून बाहेर पडण्याचा पार करायला निघालो. बाहेर पडताना आपल्या बॅगा उघडायला लावतात आणि त्यातील त्यांच्या दृष्टीने आक्षेपार्ह म्हणजे काही खाद्यपदार्थ वगैरे (कारण आमच्याकडे बॉंब असणे शक्यच नव्हते)काढून बाहेर फेकून देतात का हे पाहणे आणि काही प्रश्न विचारतात का हे पाहणे येवढेच उरले होते. पण तेथेही आम्ही आणि आमचे सामान अगदीच लक्ष न देण्याच्या लायकीचे ठरलो आणि आपल्याला मुळीच भाव न मिळाल्याचे कणभरही दुः ख न होता (उलट थोडासा आनंदच) आम्ही बाहेर पडलो. आम्ही बाहेर पडत असतानाच सुजितचा, आमच्या मुलाचा चेहरा दिसला आणि जीव भांड्यात पडला. पण अनपेक्षितपणे त्याच्याबरोबर एक व्यक्ती दिसली ती होती एक गोरी चष्मा लावलेली मुलगी! आम्हाला भारतात करावयाच्या तयारीचा मेल करताना त्याने त्याच्या एका मैत्रिणीचे

आई वडील नुकतेच येऊन गेल्यामुळे तिने केलेल्या तयारीचा उल्लेख त्यात होता. त्याउपर आणखी काही अधिक आहे की काय अशी शंका मला आली होती आणि आता आम्ही बाहेर पडताच " ही संयुक्ता राव " अशी तिची ओळख करून देताना तिने आम्हाला वाकून नमस्कार केल्यामुळे ती खरी असावी असे वाटले.

आता आम्ही निश्चिंत झालो कारण मुलगा बरोबर होता. न्यूयॉर्क विमानतळाबाहेर पडताना आमच्या सामानाचा ताबा त्या दोघांनी घेतला होता आणि आम्ही त्यांच्याबरोबर चालू लागलो, रस्ता ओलांडण्यापूर्वी संयुक्ताने समोरच्या खांबावरचे बटण दाबले आणि समोरचा दिवा हिरवा होताच आम्हाला चला असे म्हटले. आपण बटण दाबून रहदारी थांबवू शकतो ही गोष्ट आमच्या तर्कशक्तीच्या बाहेरची होती कारण सिग्नल तांबडा असला तरी वाहने थांबत नाहीत हा आमचा सिंहगड रोड अथवा पुण्यातील कोठल्याही रस्त्यावरचा अनुभव! पुढे तर केवळ आम्ही बटण दाबले म्हणूनच नाही तर आम्ही रस्ता ओलांडतो असे पाहूनही मंत्र्यांच्या गाड्या येताना थांबावी तशी रहदारी थांबते हे पाहून आम्ही अगदी अचंबित झालो. सुजितने आम्ही येणार आमचे सामान बरेच असणार म्हणून एक मोठी गाडी भाड्याने आणली होती. बाहेर भला मोठा वाहनतळ होता आणि त्यात आपली गाडी

शोधून त्याने सामान चढवले आणि आमचा अमेरिकेतील रस्त्यावरचा पहिला प्रवास सुरू झाला.

गाडीत आमच्या गप्पा चालू असल्याने माझे लक्ष बाहेर जरा कमीच होते, शिवाय सौ. ला संयुक्ताशी बोलण्यात अधिक रस होता कारण मला ज्या गोष्टीची शंका होती त्याविषयी तिला खात्रीच होती ज्यावेळी माझे लक्ष बाहेर गेले त्यावेळी आम्ही सुजितच्या घराच्या बरेच जवळ आलो होतो असे तो म्हणत होता आणि रस्त्यावरील दुतर्फा दुकाने आणि हॉटेले यावरील पटेल कॅश अंड कॅरी, सब्जीमंडी वगैरे वाचल्यावर चिमणराव स्काउटमास्तरांच्या गाडीचे बैल रात्री उलटे फिरून परत पुण्यातच आले तसे आम्ही पण चुकून पुन्हा भारतातच आलो नाही ना असे क्षणभर वाटले, पण बरोबर अमेरिकेतील मंडळी असल्याने तसे काही नाही याची खात्री होती. शिवाय दुकाने भारतीय असली तरी रस्त्यावर वाहने शिस्तीत चालत होती त्या अर्थी आपण भारतात असणे शक्य नाही असे वाटले. नंतर मात्र न्यू जर्सी तील हा भाग अगदी मिनिइंडियाच आहे हे समजले. काही दिवसांनी येथील अमेरिकनांनाच गुजराती शिकावी लागेल अशी शक्यता वाटते. कारण येथे भेटणारा कोणताही गुजराती आपल्याशी प्रथम गुजरातीमधूनच बोलू लागते. आपल्या मराठी लोकांचे तसे नाही बरं का. ते प्रथम आणि शक्यतो

नंतरही इंग्रजीतच बोलण्याचा प्रयत्न करणार. आपल्या देशातही मराठी पुढारी आपली प्रतिक्रिया मराठीत न देता हिंदीमध्ये देण्याचा प्रयत्न का करतात समजत नाही कारण बहुतेक पत्रकार मराठी जाणतात. शिवाय निदान महाराष्ट्रात तरी मराठीतच बोलावे असा आग्रह असायला काय हरकत आहे?. दोन अडीच तासांच्या छोट्या प्रवासानंतर आम्ही सुजितच्या घरात शेवटी प्रवेश केला त्याचा पत्ता होता

# ७. हिडन व्हॅली ड्राइव्ह, एन् जे. (न्यू जर्सी)

जे. एफ्. के. विमानतळापासून सुजितच्या घराकडे यावयास जवळजवळ दोन अडीच तास लागले.

सुजितचे घर म्हणजे एक सदनिका होती. आपल्याकडे महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ घरे बांधून भाड्याने देत असे, अजूनही देतात म्हणे आणि त्यांचा देखभाल खर्च त्या भाड्यातून निघत नाही असे दिसल्यावर काहीतरी

एकमुष्टी रक्कम घेऊन त्या भाडेकरूंच्या नावावर करण्याचा आंतबट्ट्याचा व्यवहार करत होते त्याचप्रमाणे येथे

काही खाजगी संस्था अशा प्रकारच्या सदनिका बांधून भाड्याने देतात, मात्र भाडे आकारताना त्या उत्पन्नातून

देखभाल व्यवस्थित होईल याची काळजी करतात आणि खरोखरच देखभालही करतात. न्यू जर्सीत मिडलसेक्स

मॅनेजमेंटने अशा अनेक सदनिकांची संकुले निर्माण केली आहेत. त्यापैकी हिडनव्हॅली ड्राइव्ह या संकुलामध्ये

सुजितची सदनिका होती. स्वयंपाकखोली, दिवाणखाना आणि एकच शयनखोली (थोडक्यात वन बी एच के)

अशी रचना होती पण क्षेत्रफळ त्यामानाने बरेच मोठे म्हणजे जवळजवळ ११०० चौरस फूट होते . शिवाय

घरात गृहमंडळाकडूनच ए सी. फ्रीज. वॉशिंग मशीन स्वयंपाकाचा गॅस, या सर्व सोयी दिलेल्या होत्या. त्या

संकुलामध्ये चारच इमारती होत्या आणि सर्व तीन मजली म्हणजे तळमजला आणि वर दोन मजले अशा होत्या.

अर्थात त्यामुळे उद्वाहक नव्हते, आणि त्याची सदनिका पहिल्या मजल्यावर असल्याने व त्यावेळी बरेच

जिने चढण्याची रग आमच्या अंगात असल्यामुळे त्याचे काही विशेष वाटले नाही. पुण्यातही आम्ही तेवढ्या पायऱ्या चढत होतोच. . आपल्यासारखे जिन्याचे ९-९ पायऱ्यांचे अथवा ४-६-८ असे भाग

पाडलेले नव्हते. जिना सरळ खालून सुरू होऊन अठरा पायऱ्यांवरच संपे आणि तो संपला की सुजितचा गाळा

असे जिने आता आपल्याकडील खेड्यापाड्यात किंवा पुण्यातील जुन्या वाड्यातच (आता किती उरलेत पुणे

म. न. पा. च जाणे) पहायला मिळतात सर्व इमारतीच्या बांधकामात लाकडाचा सढळ वापर. म्हणजे छत, जमीन

आणि भिंती सगळे लाकडी म्हणजे जिना लाकडीच हे ओघानेच आले. त्यामुळे आजूबाजूला शांतता असल्याने

कोणीही बाहेरून येत किंवा बाहेर जात असल्याची वर्दी सगळ्या भाडेकरूंना मिळत असे.

जमीन लाकडी असल्याने आपल्या चालण्याचा आवाज नारायण धारपांच्या गूढ कथांतील सत्रार किंवा अशाच पात्राच्या पावलांचा आवाज असल्याचा भास होई. इतके दिवस बरेच वेळा बायको जवळ येऊन उभी राहिली तरी मला पत्ता लागत नसे पण आता मात्र ती घरात कोठेही चालू लागली की भूकंप होऊ लागल्याचा भास होऊ लागला अर्थात असे बोलून दाखवून सर्वजणांसमोर आपली शोभा करून घेण्याचे धाडस माझ्यात नव्हते आणि ही केवळ तिचीच मक्तेदारी होती अशातला भाग नव्हता. तळमजल्याच्या सदनिकांच्या जमिनी कारपेटने

आच्छादित होत्या मात्र वरच्या दोन्ही मजल्यावर जमिनी गुळगुळीत लाकडी पट्ट्यांच्या बनवलेल्या असल्यामुळे

आणि त्यावर कारपेट नसल्यामुळे आमच्या चालण्याचे पडसाद आमच्यापेक्षा खालच्या मजल्यावरील भाडेकरूना

अधिक जाणवायचे आणि त्याची कल्पना आम्हाला येऊ शकत नसे त्यामुळे आमच्या नादात आणि आमच्या दृष्टीने अगदी

हलक्या पावलांनी चाललो तरी आमची चाल त्यांची झोप उडवण्यास पुरेशी होत असे. त्याचा पुढे आम्हास अनुभव येणारच होता.

घराची एकूण रचना केवळ लाकडाच्या वापरामुळे अशी होती की जवळच्या मेट्रो पार्क स्टेशनवरून गाडी

जाऊ लागली की भिंती हादरत. घराच्या खिडक्या पाहून तर मी चकितच झालो कारण जवळ जवळ भिंतीचा अर्धा भाग व्यापणाऱ्या खिडक्यांना फक्त काचेचे तावदान आणि कीटक येऊ नयेत म्हणून बाहेरून बारीक जाळी. आमच्या सुरक्षेच्या कल्पनेला पार सुरुंग लावणारी योजना. मी घर बांधताना काटकसर म्हणून प्रत्येक भिंत एक वीट जाडीची घेतल्याबद्दल मला सर्वांनी वेड्यात काढले होते त्यांच्या मते बाहेरील भिंत भक्कम दीड विटेची हवी(त्यावेळी घरे लोडबेअरिंग पद्धतीचीच असत). भक्कम लोखंडी जाळी असणाऱ्या खिडक्या बसवल्या होत्या तरी त्या उचकटून चोरी करण्याचा चोरानी प्रयत्न केला होताच आणि नंतर ते मी ज्या डॉक्टरना विकले त्यानी त्या घराचा इतिहास जाणून घेतल्यावर त्या जाळयांवर आणखी एक त्याहून अधिक जाडीच्या जाळीचे आवरण बसवले एवढेच नव्हे तर आतल्या प्रत्येक दाराला त्यानी आणखी एक लोखंडी सरकद्वार (रोलिंग शटर) बसवून घेतले

आणि आम्ही त्यांना भेटायला गेलो तेव्हां सगळी शटर्स खालीवर करून दाखवून अभिमानाने मला म्हणाले, " तुमच्या घरात (अजून ते त्या घराला याच नावाने संबोधत)चोर अगदी आलेच तरी सगळी दारे उघडेपर्यंत सकाळ निश्चित होणार. " त्यावेळी मला त्या चोरांची दया आली होती. पण आता मात्र मला माझी काळजी वाटू लागली. अमेरिकेत अगोदरच लहानलहान मुलेही हातात पिस्तूल घेऊन धडाधड दिसेल त्याच्यावर गोळी चालवतात असे ऐकलेले आणि आता या अशा घरात रहायचे!

अमेरिकेतल्या लोकांच्या धाडसाचे मला कौतुक वाटू लागले. मी भीत भीत माझी शंका मुलाकडे व्यक्त केल्यावर तो म्हणाला "काही काळजी करू नका येथे पोलिस लगेच येतात. आणि घरात कोणी रोख रक्कम दागिने अगर सोनेनाणे ठेवत नाही हे चोरानाही माहीत असते. " मी मनात म्हटले की त्यामुळेच चोर सरळ बँकाच लुटत असावेत. आपल्याकडे चोर फारसा भेदभाव न ठेवता सगळयांचीच सारख्याच ममत्वाने विचारपूस करत असतात अगदी आमदार, खासदार आणि मंत्री आणि कधी कधी पोलिस कमिशनरसुद्धा! उलट त्यांच्या घरात चोरी म्हणजे तर आपलाच माल आपण परत घेण्यासारखे आहे असे चोराना वाटत असावे. अशाप्रकारे चोरांना मुक्तद्वार असले तरी येथील नागरिक मात्र येथील पोलिस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर पूर्णपणे विसंबून आरामात

राहत होते तरी मला मात्र त्या रात्री झोप लागली नाही. खरे तर आमचे सगळे सामान चोरानी पळवले असते तरी त्याची किंमत फार फार तर पाचशे डॉलर तरी झालीअसती की नाही शंकाच होती, आणि एवढ्या क्षुल्लक गोष्टीसाठीचोर खिडक्या तोडण्याचे आणि १२८ किलो वजनाच्याआमच्या बॅगा पळवण्याचे श्रम करेल अशी मुळीच शक्यता नव्हती. शिवाय येथील पोलिस आपल्याकडल्यासारखे चोरी होईपर्यंत तेथे गैरहजर राहून चोरांना हातभार लावणारे आणि नंतर आपल्यालाच दटावणारे नसून खरोखरच नागरिकांचे संरक्षण करणे आणि त्याना कायदे पाळायला लावणे हे आपले कर्तव्य आहे असे मानतात याचा अनुभवपुढे आलाच. घरात असताना देखील बाहेरून पोलिसांच्या गाड्या धावत आहेत हे मधूनमधून ऐकू येणाऱ्या सायरनवरून जाणवत असे.

# ८. दक्ष पोलिस यंत्रणा

पोलिसांच्या दक्षतेचा आम्हासही एकदा अनुभव आलाच. एक दिवस संयुक्ता बाहेरून घरात शिरताना तिला शेजारच्या घरात किंचाळण्याचा आवाज ऐकू आला तेव्हा दक्ष नागरिकाप्रमाणे तिने ९११ या क्रमांकावर(पोलिसांना बोलावण्यासाठी) फोन केला तर दोनच मिनिटात पोलिस आले आणि त्यानी तिला कशासाठी फोन केला हे विचारले तेव्हा तिने त्यांना हा प्रकार सांगितला आणि ते शेजारच्या इमारतीत गेले. थोड्या वेळाने परत आमच्या दाराची घंटी वाजली आणि पोलिस "आम्ही चौकशी केली त्या घरातली लहान मुलेच गम्मत म्हणून किंचाळली होती" असे सांगूब तिने फोन केल्याबद्दल तिचे आभार मानून निघून गेले. मला खात्री आहे आपल्याकडे शेजारच्या इमारतीतच काय शेजारच्या सदनिकेतून असा आवाज आला असता तरी प्रथम पोलिसाना फोन करण्याच्या भानगडीत सुबुद्ध नागरिक पडलाच नसता पण अमेरिकेतून नुक्ताच परत आल्याने संवयीने त्याने केलाच असता तर प्रथम फोन उचललाच गेला नसता आणि समजा दैवयोगाने उचलला गेलाच असता तर होणाऱे संभाषण असे झाले असते

सु. ना. पोलिसांचा फोन नंबर लावतो. त्यावर

पोलिस स्टेशनमधून

"पर्वती पोलिस ठाणे कोण बोलतय?काय काम आहे?

सु. ना. - मी अमुक अमुक बोलतोय

"ते समजल हो पण काय काम आहे?"(च्यायला काय कटकट आहे साली! अलिकडे पब्लिक काही स्वस्थ बसू देत नाही)

सु, ना. अहो शेजारच्या फ्लॅट्मधून किंचाळण्याचे आवाज येत आहेत.

"मग आम्ही काय कराव अस वाटतय तुम्हाला? नवरा बायकोची भांडणं चालणारच थोडा वेळ वाट पाहा होईल शांत आपोआप. नाहीतर आम्हाला इतक्या लांब चक्कर मारायला लावण्यापेक्षा तुम्हीच का जाऊन बघत नाही काय झाले ते? अगदी खून वगैरे झाला असलाच तर बोलवा आम्हाला"

सु. ना. कपाळावर हात मारून घेतो.

अर्थात याबद्दल त्या पोलिसांना दोष देण्यात काही अर्थ नाही. कारण आपल्याकडे “अति झालं आणि हसू झालं” अशी परिस्थिती आहे. त्यामुळे गंभीर घटना कोणती व क्षुल्लक कोणती याबद्दल पोलिसांचाच मानसिक गोंधळ होत असावा, कारण एकादी गाडी वेगमर्यादा ओलांडून चालली असेल आणि ती

अडवावी तर त्यामधून एकादी अतिमहत्वाची व्यक्ती उतरते आणि त्या पोलिसाचीच गचांडी धरते. .

अमेरिकेतून भारतात फोन करताना ९१ क्रमांक प्रथम लावावा लागतो त्यात थोडे चूक होऊन जर ९११ लागला तर थेट तो इथल्या पोलिसानाच लागतो आणि मग त्यांच्या तपासणीस तोंड द्यावे लागते. एकदा आमच्या मित्रांच्या नातवंडाने चुकून असाच नंबर लावला आणि दोन मिनिटात पोलिस हजर! लहान मुलाने चुकून लावला सांगून त्यांचा विश्वास बसला नाही. कारण इथली पोरे पण शहाणी असतात, आईबाप मारू लागले तर लगेच पोलिसाना फोन करतात. म्हणजे पूर्वी मूल रडू लागले तर आईबाप त्याला पोलिसाला बोलावण्याचा धाक दाखवत तर येथे उलट पोरेच आईबापाना तसा धाक दाखवू लागली आहेत. पोलिसानी घरात येऊन सगळीकडे पाहणी केली आणि खरोखरच काही नाही आईबाप पोराला मारत वगैरे नाहीत याची खात्री झाल्यावरही थोडा वेळ घराबाहेर बसून परत जाताना घरातील व्यक्तींना सांगून निघून गेले.

आणखी एका वेळी मी माझ्या मुलाबरोबर गाडीत बसून स्वाध्याय ला चाललो होतो, दर रविवारी स्वाध्यायसाठी तो मला घेऊन जात असे, पण त्यादिवशी जरा जास्त वेळ लागल्यासारखे

वाटले म्हणून मी म्हटले, "आज फारच वेळ लागतोय! "यावर मुलगा म्हणाला "मामाची गाडी मागून येतेय" मला समजेना आमच्या पोराचा मामा इथे कुठून आला. पाहतो तर पोलिस व्हॅन मागून येत होती. म्हणजे लोकही पोलिसाना एवढे घाबरतात कारण आपण वेगमर्यादा ओलांडली किंवा आणखी काही वाहतुकीच्या नियमाचे उल्लंघन केले की ते ताबडतोब आपल्याला पकडणार आणि आपल्याला जबरदस्त दंड तर होणारच शिवाय आपल्या वाहन चालन परवान्यावर एक लाल खूण होणार आणि अशा तीन खुणा पडल्या तर परवानाच जप्त होणार याविषयी सगळ्या नागरिकांना खात्री असतें.

तेच आपल्याकडे पाहा बरे खुशाल एकदोघाना गाडीखाली लोळवा कोणी विचारणार नाही आणि तुम्ही चित्रपटतारा वा तारका असाल तर मग काही विचारायलाच नको, तुमच्या गाडीखाली येण्याचे भाग्य ज्यांच्या नशिबी आले असेल आणि चुकून माकून ते जिवंत राहिले असतील तर त्यांनाच जाब विचारला जातो की असे ताऱ्याच्या गाडीखाली येण्याचे धाडसच कसे झाले त्यांचे. जरी कायदा गाढव असतो असे म्हटले जाते तरी आपल्या देशात मात्र कायदा पाळणारा गाढव असतो असे म्हटलेजाते किंवा अनुभवास येते. आता आपल्याकडेही वेगमर्यादा ओलांडणे किंवा असे गुन्हे घडू नयेत म्हणून "व्हिडिओ कॅमेरे बसवले आहेत असे म्हणतात व

असा गुन्हा घडला तर घरी लगेच न्यायालयात हजर रहाण्याचे फर्मान येते असेही म्हटले जाते पण करोना काळातही स्कूटर वा मोटर सायकलवर तिघे बसून जितका जास्त आवाज निघेल अश्या पद्धतीने जाणारे लोक दिसतात त्यांना पकडण्यापुरते पोलिसबळ नसावे लसीप्रमाणेच त्यांचाहीपुरवठा मर्यादित असावा.

सगळ्या सुविधा असून या सदनिकेत आमच्या दृष्टीने एक फार मोठी त्रुटी आम्हाला सकाळी उठल्याउठल्या

जाणवली ती म्हणजे उठल्यावर बाथरूम आत कोणी गेल्यामुळे बंद असली तर बाकीच्यानी तो/ती बाहेर येईपर्यंत

हातावर हात धरून गप्प बसायचे (किंवा तोपर्यंत झोपायचेच)कारण बाथरूम (ज्याला ते रेस्ट रूम म्हणतात) मध्येच वॉशबेसिन, शॉवर आणि कमोड सगळे एकत्र! याबाबतीत आपली घरे लहान असली तरी किती सोयिस्कर असतात सगळ्या गोष्टी एकत्र नसल्यामुळे एकाच वेळी दात घासणारा, शौचाला जाणारा आणि अंघोळ करणारा अशा तिघांची सोय होते अगदी तशीच वेळ आली तर आणखी एक जण तांब्या घेऊन बाहेरही जाऊन शुद्धी करून घेऊ शकतो अशा बऱ्याच बाबतीत आपण अमेरिकनांपेक्षा कितीतरी पुढारलेले आहोत याचा प्रत्यय आला आणि अभिमान वाटला.

रस्त्यावरही एकदा माझी अशीच पंचाईत झाली होती. मुलाबरोबर गाडीतून जाताना मध्येच मला लघुशंकेची

भावना झाली आणि मी मुलाला तसे सांगितल्यावर तो म्हणाला आता रेस्ट एरिया येईपर्यंत थांबावे लागेल आणि ती रेस्ट एरिया बरीच दूर होती तेथपर्यंत मी कसाबसा तग धरू शकलो. आपल्याकडे असे कधीच झाले नसते. कोठेही मनात आले की गाडी रस्त्याच्या कडेला थांबवा आणि कोठेही जा(वऱ्हाडकार लक्ष्मण देशपांडे यांच्या शब्दात होल वावर इज युवर) अर्थात हे विश्वचि माझे विश्रांतिगृह (रेस्टरूम) या आपल्या वृत्तीमुळे आवश्यक असेल तेथेही अशा सोयी करण्याचा विचार आपण करत नाही ही मात्र दुर्दैवाची गोष्ट! आता त्यानंतर जवळ जवळ वीस वर्षे लोटल्यावर थोडा थोडा बदल दिसू लागला आहे.

लाकडाच्या सढळ वापरामुळे आगीचा धोका खूपच असतो त्यामुळे प्रत्येक सदनिकेच्या प्रत्येक खोलीत आगसूचक गजर बसवलेला असतो आणि त्याच्या आवाजाने लगेच आगीचे बंब धाव घेतात हे विशेष! याचा नंतरच्या आमच्या वास्तव्यात अनुभव आलाच. आमच्याच वर राहणाऱ्या एका स्वच्छताप्रेमी भारतीय गृहिणीने रेस्टरूममधील बेसिन आणि अंघोळीचा टब यामधील जागा स्वच्छ करण्याचा घाट घातला. त्या भागात पाणी निघून

जाण्याची सोय नसल्याने ते पाणी जमिनीत जिरून भिंतीमधील विद्युत्जोडणीच्या तारांवरून ओघळून शॉर्ट सर्किट होऊन आग लागून धूर निघू लागला आणि ताबडतोब सगळया इमारतीतील गजर वाजू लागून आगीच्या दोनतीन गाड्या तेथे जमा झाल्या. त्यामुळे पुढच्या वेळी नवरात्र अमेरिकेत साजरे करण्याची आवश्यकता भासली तेव्हा घरात नऊ दिवस लावायचा दिवासुद्धा आम्ही भीतभीतच वापरला.

भिंती खिडक्या याविषयी येवढे बेपर्वाई असणारे लोक दारांच्या कुलुपाविषयी मात्र फारच आग्रही असल्याचे दिसले. त्यामुळे आमच्या सदनिकेच्या दाराचे कुलूप लावणे आणि उघडणे आम्हाला कित्येक दिवस कठीण्च जात होते. त्यामुळे मुलगा बाहेर कामावर गेल्यावर आम्ही दोघेच घरात असलो तर बरेच दिवस आम्ही फिरायला दोघे एकदम बाहेर पडत नसू कारण दोघे बाहेर पडलो आणि कुलूप उघडता नाही आले तर काय करता. मग एक दिवस धाडस करायचे ठरवले व मी किल्ल्यांचा जुडगा घेऊन बाहेर पडलो व कुलुप लावले, हो कुलूप लावायलाही किल्ल्या लागतातच. (अर्तात आपल्याकडेही साधे कुलुप लावायला किल्ल्या लागतातच म्हणा पण खटक्याचे कुलूप ही भानगड मात्र किल्लीशिवाय लागून किल्ली आत विसरली तर असुन खास मालक घरचा अशी परिस्थिती होतेच! आता तर लॅचचा जमाना

असल्यामुळे आपल्याकडेही किल्ली बाहेर जातानासुद्धा किल्ली विसरली व सहज दार ओढून घेतले तर अनवस्था प्रसंग ओढवतो. याचा बहुतेकांनी अनुभव घेतला आहे असो! पण अमेरिकेत आपल्याच घरी आणि आम्ही दोघेच असताना असे घडले तर मोठेच संकट कारण तेथे आपल्या हाकेला धावून येणारे आणि कुलूप उघडण्यासाठी धडपड करणारे किंवा असा कसा झाला तुमच्या हातून बावळटपणा म्हणून दात काढणारे शेजारी नसतात म्हणून तर एवढी खबरदारी. तर असो! मी किल्ली घेऊन बाहेर पडून कुलूप लावले. या कामी माझी योजना करण्याचे धाडस सौ. ने केले हे आश्चर्यच पण जर मी कुलूप उघडू शकलोच नाही तर निदान मी बाहेर भटकत काळ काढू शकेन, हा त्यामागचा तिचा दृष्टिकोन असावा, पण सुदैवाने तसे काहीही न होता मी परत कुलूप उघडण्यात यशस्वी झालो त्यानंतर तोच प्रयोग सौ. ने यशस्वी रीतीने केला व आता आम्ही दोघे कुलूप लावून घराबाहेर पडण्यास मोकळे झालो.

प्रत्येक इमारतीसमोर मोकळी जागा होती आणि तेथे गाड्या पार्क करण्यासाठी व्यवस्थित आखीव जागा असत आणि तेथे वास्तव्य करणारालाच तेथे गाडी लावता येई. आमच्या इमारतीतून बाहेर पडल्यावर उजवीकडे वळून थोडे अंतर गेल्यावर एक मोकळे मैदान होते तेथे पूर्वी रोलर स्केटिंगची सोय असावी हे अमेरिकन

स्केटस अशा तेथल्या पाटीवरून समजत होते. त्याच्या थोडे पुढे गेल्यावर लगेचच एका मोठ्या इमारतीत ड्रग फेअर या नावाचे औषधाचे नाव असलेले तरी बऱ्याच वस्तू मिळणारे मॉल, त्याच्याच शेजारी मार्शल्स या साखळी दुकानातील एक मोठे मॉल थोडे पुढे त्याच इमारतीस लागून लाँड्री आणखी लागून असलेल्या बऱ्याच इमारतीत बरेच मॉल्स, ज्वेलरी शॉप्स असा मोठा दुकानांचाच भरणा असलेल्या इमारती होत्या. आणि गाड्या पार्क करण्यासाठी असलेली जागाच आपल्याकडील डेक्कन जिमखाना बसस्टँडपासून गरवारे पुलापर्यंतचे क्षेत्र व्यापेल इतकी होती. आता मात्र या सगळ्या इमारती पाडण्यात आलेल्या आहेत हे अलीकडील वारीमध्ये कळले.

त्यानंतर अधिक अधिक मोठे मॉल्स पाहिले, बरेचसे मॉल पूर्ण पाहण्यापूर्वीच पाय दुखू लागले, पुढेपुढेतर मी मुलांना खरेदी करा म्हणून सांगून कुठल्यातरी आरामशीर खुर्चीवर बसून आराम करीत असे. वॉलमार्ट, शॉपराइट, पाथमार्क, मार्शल्स ही काही प्रसिद्ध साखळीमॉल्सची नावे. (ही गोष्ट २००२ मधील आहे त्यामुळे यात आम्हाला नावीन्य वाटले आता या गोष्टी आपल्याकडेही आल्या आहेत)मॉल्समध्ये खाद्यपेये, स्टेशनरी, मिळत असे त्याशिवाय ठराविक प्रकाराचेच साहित्य विकणारी तर असंख्य दुकाने. तीही इतकी विस्तीर्ण की पूर्ण पाहणे अशक्यच. बेड

बाथ अंड बियॉंड (शयन व स्नानगृह सामान), होम डेपो (घर बांधण्या किंवा सजवण्यासाठीचे सामान), टॉयझरस, बेबी-ज-रस (खेलसाहित्यगृह आणि बालसाहित्यगृह) आयकिया (नुकतेच आपल्याकडे आले आहे)अशी विशिष्ट प्रकारचे सामान विकणारीही असंख्य दुकाने. आमच्या सुदैवाने शॉपराइट. मार्शल्स, ड्रगफेअर ही दुकाने आमच्या घरातून चालत जाण्याच्या अंतरावर होती. दुकाने चालत जाण्याच्या अंतरावर असली तरी कामात असणाऱ्या व्यक्तीला आठवड्यातून एकच दिवस मिळत असल्याने आणि अगदीच किरकोळ म्हणजे अर्धा लिटर दूध, अर्धा किलो भाजी अशा वस्तू आणायला गेले तर वस्तू घेण्यापेक्षा ज्या कौंटरवर पैसे द्यायचे तेथे एवढी गर्दी असे की तेवढ्या वस्तूच्या पेमेंटसाठी सहज अर्धा तास मोडायचा. एकदा अर्धा डझन केळी शॉपराइटमधून आणायला मला चालत जाऊन केळी घेऊन परत चालतच येण्यास अर्धा तास आणि दीड डॉलर किंमत चुकवण्यात एक तास असा वेळ गेला.

अजूनही भारतात आम्हाला घराबाहेर पडल्यापडल्या दिसणाऱ्या दुकानात हवी ती वस्तू मिळते, जास्त वस्तू असल्या तर वाणी घरी पाठवून द्यायलाही एका पायावर तयार असतो. त्यामुळे आमच्यासारख्या ज्येष्ठ आणि संवयीने आळशी बनलेल्या, गाडी चालवता न येणाऱ्या नागरिकांमुळे तरी मॉल संस्कृती आली तरी

अमेरिकेसारखी ती पूर्णतया रुजू शकली नाही. मॉल्समुळे वस्तू स्वस्त मिळतील आणि चांगल्या मिळतील असेही खात्रीने सांगता येत माही कारण भेसळ करण्याची संवय लागलेले भारतीय व्यापारी अमेरिकेत माल पाठवतानाही (देशाचे नाव बदनाम होईल याची अजिबात पर्वा न करता) जेथे भेसळ करायला मागेपुढे बघत नाहीर् तेथे मॉलची काय कथा?आपल्याकडे इतक्या मोठ्या जागा मॉल बांधायला आणि गाड्या पार्क करायला उपलब्ध होण्याचीही अडचण आहे अर्थात सध्याच्या मॉलकडे नजर टाकली तर लोकांना गाड्या लावायला जागा मिळते की नाही याची ना मॉलचालकांना काळजी ना त्यांना त्यासाठी परवानगी देणाऱ्या महापालिका अधिकाऱ्यांना काळजी. रस्त्यावर वाहतुक कोंडी होऊन चारदोन अपघात झाले आणि लोकांनी दगडफेक केली की मग सगळ्या यंत्रणा खडबडून जाग्या होणार. पण करणार काय? कारण काही करायला जागा तरी हवी!

# ९. रस्ता विद्यापीठ

फिरायला कुठे जायचे हा प्रश्न अमेरिकेत पडण्याचे कारण नव्हते कारण फिरायला खूप मोकळ्या जागा होत्या तरी पोचण्याच्या दुसऱ्या दिवसापासून फिरायला जायला योग्य जागा मी शोधू लागलो. पुण्यात आम्ही रहायला गेलो तेव्हां अगदी दाट झाडी होती, इतकी की दुपारी कडक उन्हात फिरायला बाहेर पडलो तरी थंड वाटावे, पण त्या रस्त्याची रुंदी वाढवण्यासाठी त्या सर्व झाडांची कत्तल करण्यात आली, त्यात अनेक दुर्मिळ वृक्षप्रजाती होत्या म्हणे, पण अश्या क्षुल्लक गोष्टींकडे लक्ष देण्यास नगरसेवकांना फुरसद नव्हती, त्यानंतर आता सिंहगड रस्त्यावर सकाळी सातपूर्वीच इतकी रहदारी चालू होते की मी सुरवातीला पुण्यातील आमच्या गृह संकुलाच्या मागील बाजूस असणाऱ्या आंबराईत फिरायला जाण्याचा पर्याय शोधला होता आणि माझ्यासारख्या बऱ्याच जणाना तो पसंत पडला होता पण आंबराईच्या मालकाला इतके ज्येष्ठ नागरिक या एकुलत्या एक शुद्ध हवेच्या ठिकाणाचा लाभ घेऊ लागले तर ते अधिकच दीर्घायुषी होऊन शासनास सेवानिवृत्तीवेतनचा फारच भूर्दंड पडेल आणि देशाचे मोठे नुकसान होईल असे वाटून लगेच त्याने तेथे

तारेचे कुंपण घालून टाकले. त्यामुळे शासनातर्फे त्याला बहुतेक काही बहुमान मिळण्याची शक्यता वाटते सध्या त्या विभागाचा नगरसेवक म्हणून त्याला संधी देण्यात आली आहे. आता तर सिंहगड रस्त्यावरही आणखी एक हवाई रस्ता होणार आहे म्हणे! अशा वातावरणातून अमेरिकेत गेल्यावर कोठेही फिरायला मला रान मोकळे मिळाल्यासारखे झाले तरीही मुलाने उगीच इकडेतिकडे जाऊ नका रस्ता चुकला तर पंचाईत व्हायची असा धाक घालून ठेवला होता. त्याने मोबाइल घेऊन जा असा आग्रह पण केला. पण मी रस्ता चुकण्यापेक्षा मोबाइलच हरवून टाकेन अशी मला भीती वाटत असल्याने मी टप्प्याटप्प्याने आपली फिरण्याची कक्षा वाढवायची असे ठरवले. सुरवातीस तर आम्ही एकएकटे फिरायला बाहेर पडायचे ठरवल्यामुळे पहिला टप्पा फक्त मुलाच्या घराशेजारच्या रोलरस्केटिंगच्या मैदानावरच तासभर फेऱ्या मारायच्या असा मी बेत केला कारण तेही तसे बऱ्यापैकी मोठे होते.

त्यानंतर हळूहळू रस्त्यावर जायचे असे ठरवले म्हणून बाहेर पडलो पण रस्ता इतका मोकळा पाहून पुढे जाण्याचा मोह आवरेना. रस्ता पाहून अमेरिकन लोकाना आमच्यापासून शिकण्यासारखे कितीतरी आहे याची जाणीव झाली कारण रस्ता अगदी जेवढी रुंदी उपलब्ध होती तितक्या रुंदीचा करून बाजूला पदपथ ज्याला इथे साइडवॉक म्हणतात ते पूर्ण करून रस्ता करण्याला शिल्लक काही

ठेवलेच नव्हते आपल्या गरजेपुरतेच वापरा आणि गरजा कमीतकमी ठेवा हा म. गांधींचा दृष्टीकोण या लोकाना कुठला पटायला. येथे रस्ते अगोदर तयार असतात आणि लोक त्या भागात नंतर रहायला सुरवात करतात. आपल्याकडे लोक नव्या भागात रहायला गेल्यावर बरेच दिवस ठेचकाळत जात रस्ता झाला तर बरे होईल असे म्हणत आणि ते न करत असल्याबद्दल नगरसेवकांना शिव्या देत देत प्रवास करतात शिशुपालाचे शंभर अपराध पूर्ण होण्याची वाट पाहणाऱ्या श्रीकृष्णाप्रमाणे नगरसेवक शिव्यांची लाखोली पूर्ण होण्याची वाट पाहतात, तोपर्यंत लोकांच्या चालण्यामुळे बऱ्यापैकी पायवाट तयार होते आणि रस्ता कमीतकमी किती रुंदीचा केला तरी भागेल याची त्यांना कल्पना येते.

त्यानुसार एकदिवस नगरविकास रचनेत शंभर फुटी म्हणून दाखवलेल्या रस्त्याची सुरवातीस वीस फुटाच्या रुंदीचीच आखणी होते आणि तरीही नागरिकांच्या आशेला पालवी फुटते. त्यानंतर काही दिवसानी त्या आखलेल्या रुंदीच्या दोन्ही बाजूने खडीचे ढीग दिसू लागतात आणि त्यामुळे पूर्वीपेक्षा चालणे किंवा वाहन चालवणे अवघड झाले तरी रम्य भावी काळासाठी ही अडचण नागरिक सोसायला तयार होतात. मग कित्येक दिवस काहीच घडत

नाही आणि त्या ढिगातील खडी हळूहळू जाणाऱ्यायेणाऱ्या पादचाऱ्यांना आजूबाजूने जाणाऱ्या वाहनापासून बचावण्यासाठी त्या खडीच्या ढिगावरून च चालावे लागून रस्त्यावर पसरू लागते. आणि एक दिवस भल्या पहाटे बऱ्याच कामगारांचा ताफा ती खडी पुन्हा ढिगात रूपांतरित करण्याचा प्रयत्न करून मग तीच नियोजित रुंदीची रस्त्याची पट्टी झाडण्याचा प्रयत्न करून जाणाऱ्या येणाऱ्याना त्यावरून चालणे किंवा वाहनातून जाणे मुश्किल करतात. त्यादिवसाच्या अखेरीस ती खडी रस्त्यावर पसरली जाते आणि दुसऱ्या दिवसापासून तेथील नागरिकांचे खरे हाल सुरू होतात, कारण खडी पसरण्याचे काम पूर्ण करून ठेकेदार आपली कामगारसेना दुसऱ्या तशाच कामासाठी हाकारतो पण तोपर्यंत डांबरीकरण करणारा ठेकेदार ठरायचे बाकी असते कारण कोणत्या ठेकेदाराकडून अधिक प्राप्ती होणार याची चाचपणी नगरसेवकांकडून चालू असते आणि त्यामुळे पहिला रस्ताच

बरा होता असे म्हणत पूर्वीपेक्षाही अधिक शिव्यांचा संग्रह नगरसेवकांपाशी तयार होतो आणि नाइलाजाने त्या खडीवरूनच चालण्याची संवय नागरिकांना आणि वाहनचालकांना पण लागते, त्यांच्या जाण्याने खडी बऱ्यापैकी दबली जाते आणि असाच रस्ता तयार होईल की काय असा विचार दृढ होताहोता एक दिवस रस्त्याच्या बाजूला रोडरोलर दिसू लागतो आणि पुन्हा नागरिकांच्या

आशेला पालवी फुटू लागते पण त्याला फळे येण्यापूर्वीच तो रोलर पुन्हा तेथून गुप्त होतो आणि पुन्हा शिव्यासप्तशतीचा पाठ नागरिक म्हणू लागतात. पण अचानक एक दिवस त्या भागाला कोणीतरी बडी असामी भेट देणार अशी आवई उठते. आणि एकदम कामगारांची मोठी फौज, रोडरोलर, डांबराची पिपे त्या भागात येऊन त्या दिवशी तो रस्ता वाहतुकीला बंद होऊन संध्याकाळपर्यंत एकदम चकचकीत डांबरी पट्टी त्या जागेवर दिसू लागते आणि त्या भागातील नागरिकांना स्वर्ग हाती आल्याचा भास होतो. इतक्या प्रतीक्षेनंतर तयार होणारा रस्ता कसाही झाला तरी तो पूर्वीपेक्षा बराच होता याविषयी नागरिकांत एकमत होते. तो रस्ता ती बडी असामी येईपर्यंत कसाबसा तग धरतो आणि हळूहळू रस्त्याच्या बाजूची धूळ त्यात पाऊस पडल्याने चिखलाच्या रूपाने तयार झालेल्या रस्त्यावर येऊन रस्ता डांबराचा नसून चिखलाचा आहे असे वाटू लागते

. असे झाले तरी " ठेविले अनंते तैसेची राहावे" अशा शिकवणीत वाढलेले आपले नागरिक तशाही

अवस्थेत हसतमुख राहण्याचा प्रयत्न करतात. रस्ता करणे ही इतकी सोपी गोष्ट आहे हे या बेट्या अमेरिकनांना माहीतच नाही आणि एकदा केलेला रस्ता जणू काही जन्मोजन्म टिकावा आणि

तो पुन्हा कधीच करायचा नाही अशा थाटात करण्याचा त्यांचा अट्टाहास न समजण्यासारखा वाटतो. खरे तर रस्ता ही गोष्ट बायकांच्या साड्यासारखी अथवा इतर वस्त्रप्रावरणाप्रमाणेच पुन्हापुन्हा करावी लागून त्यातून नगरसेवकांच्या कित्येक पिढ्यांना पुरेल अशी तरतूद करावयाची असते ही साधी गोष्ट यांना कळत नाही. काहीका असेना अशा पद्धतीने रस्ता तयार होताच महापालिकेच्या इतर विभागाना किंवा टेलिफोनवाल्याना जाग येते, रस्ता तयार झाला आहे असा दूरध्वनि संदेशच जणू त्याना जातो की लगेच केबल टाकण्यासाठी रस्ता खणण्याच्या तयारीत ते रस्त्यावर हल्ला करतात. या रस्त्याचा अनुभव मी सोलापूरला बदलून गेल्यावर घेतला. त्यावेळी माझे घर सोलापूरच्या त्यावेळीच्या टोकास होते व शेवटच्या भागातील रस्ता पहिले सहा महिने इतका खराब होता (म्हणजे त्याच्यावर खडीचा थर त्याकाळात पडून होता) की रात्री जर परगावाहून रेलवेने कुणी आले तर त्याना रात्र स्टेशनवरच काढावी लागे.

रस्त्याच्या बाबतीत मला येथे आणखी जाणवणारी गोष्ट म्हणजे रस्ता केवळ वाहतुकीसाठीच वापरायचा असतो ही यांची गैरसमजूत! . आपल्याकडे कसे रस्ता हा शक्य झाले तर वाहतुकीसाठी वापरायची चीज आहे. त्याव्यतिरिक्त भाजी विक्रेते, भेळपुरीवाले, किल्ल्या तयार करणारे, या सर्वांना रस्त्याचाच

आधार असतो. दुकानदाराना आपला माल गिऱ्हाइकांना दिसेल असा बाहेर ठेवायला रस्त्याचाच वापर करावा लागतो. वाहने पार्क करायला नागरिकांनाही रस्ताच आवडतो किंवा त्याना पर्यायच नसतो, येथे मात्र रस्ता फक्त वाहनांसाठीच शिवाय या रस्ताच्याच डाव्या उजव्या बाजूस नागरिकांनी कचरा टाकावा म्हणून मोठ्या कुंड्या ठेवलेल्या असतात, आपल्याकडेही भल्या मोट्या कचराकुंड्या शिवाय त्यावर सुंदर पुणे स्वच्छ पुणे असा संदेशही असतो. पण या कुंड्यांचा नागरिक खोखो खेळण्याच्या खुंटासारखा वापर करून कचऱ्याचा सडा मात्र रस्त्यावरच पडेल याची दक्षता घेतात. इथे मात्र पार्कात फिरायला गेलो तर बरोबर आणलेल्या पाळीव कुत्र्याच्या मालकांना त्या कुत्र्यामागे पिशवी घेऊन धावून त्याची विष्ठा बागेत पडू नये याची काळजी घ्यावी लागते नाहीतर त्यांना जबरदस्त दंड बसतो आपल्याकडे तर काही मानवप्राणीही रस्त्याच्या कडेची शोभा वाढवण्यात धन्यता मानतात. सोलापूर या शहरात मी काही काळ तेथील तंत्रनिकेतनात व्याख्याता होतो तेथे तर घरात संडास असूनही मोकळ्या हवेत उदरशुद्धी करण्याचीच लोकांना इतकी संवय की तंत्रनिकेतनाच्या प्रवेशद्वाराचे सुशोभीकरण त्यांच्याकडून होऊ नये म्हणून प्राचार्यांना पहाटे हातात दंडा घेऊन उभे रहावे लागे.

रस्त्यावर वाहने अतिशय वेगाने जात असतात आणि आणि ती फारच मोठ्या प्रमाणात चारचाकीच असतात. आपल्याकडे दिसणारी वाहनांची विविधता येथे दिसत नाही. आणखी एक जाणवणारी गोष्ट म्हणजे रस्त्यावर कोठेच पाळीव अथवा कसलेच प्राणी दिसत नाहीत. याउलट आपल्याकडे पाळीव प्राणी मालकाकडे कामापुरते राहून बाकीचा काळ रस्त्यावरच व्यतीत करतात त्यामुळे आपला रस्ता हे शिक्षणाचे मोठे केंद्रच असतो. अमेरिकेतील मुलांना साधे कोंबडे, गायी, घोडे. इ. प्राणी प्राणिसंग्रहालयातच जाऊनच पाहावे लागतात याउलट आपल्या बालकांना मात्र हती, घोडा, गाय बैल, म्हशी, कधीकधी उंट, कोंबड्या इ. चे सांगोपांग ज्ञान रस्त्यावरच मिळते त्यासाठी त्यांना प्राणिसंग्रहालयात जावे लागत नाही. फक्त आता वाघ सिंह आणि माशांसारखे जलचर प्राणीच काय ते रस्त्यावर दिसत नाहीत. (अलीकडे तेही दिसू लागलेत खरे म्हणजे ते आपल्या क्षेत्रात दिसू लागलेत म्हणण्यापेक्षा आपणच त्यांच्या क्षेत्रात त्याना दिसू लागलो य म्हणणे अधिक योग्य ठरेल.)बोरिवली वगैरे अभयारण्यांच्या शेजारील रस्त्यावर तेही दिसतात आणि मासेही रस्त्यावरच पण विकायला आलेले दिसतात, अर्थात ते जिवंत नसतात.

अधूनमधून. रस्त्यावरील प्राण्यांची आठवण येताच एका म्हशीने केलेली माझी फजिती आठवल्याशिवाय कशी राहील. नुकतेच लग्न झाल्यावर ऐटीत बायकोला घेऊन एरंडवण्यातून मेव्हण्यांच्या घरातून बाहेर पडून लोकमान्यनगरात जाण्यासाठी निघालो होतो अंगात त्यावेळी चांगलेच म्हणता येतील असे कपडे म्हणजे शुभ्र शर्ट आणि साटिन ब्ल्यू पँट होती. लोकमान्यनगरला जाण्यासाठी कर्वे रस्ता ओलांडून कॉजवेवरून(आता तेथे पूल झाला आहे.) चालतच जाता येणे शक्य होते. कॉजवेवर थोडे अंतर आम्ही गेलो तो समोरून म्हशींचा एक घोळका लडिवाळपणे एकमेकांच्या शिंगात शिंगे अडकवत आला त्यातील एका म्हशीला आमचे जोडीने चालणे आवडले नसावे आणि आम्ही जवळून जात असताना तिने शेपटीची एक डौलदार तान घेत समेचा एक फटकारा माझ्या छातीवर असा लगावून दिला की त्यापुढे येसाजी कंकाने ज्या तलवारीच्या एका वारात हत्तीची सोँड उतरवली तो वारही फिका पडावा आणि त्या फटकाऱ्याने माझ्या शर्टाची पुढची बाजू खांद्यापासून कमरेपर्यंत जानव्यासमांतर शेणाच्या पट्ट्याने सजून निघाली अर्थातच लगेचच परत घरी प्रवेश करून कपडे बदलूनच मला बाहेर पडावे लागले.

याशिवाय श्वानमित्र संस्थांमुळे कुत्र्यांच्या तर झुंडीच रस्त्यावर फिरत असतात. त्यामुळे आपल्याकडे ज्याविषयी उगीचच शिक्षणतज्ञ आणि राज्यकर्ते यांच्यातच जो चर्चेचा कल्लोळ चालू आहे त्या लैंगिक शिक्षणाचे केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे तर प्रात्यक्षिकही बालकांना रस्त्यावरच पहायला मिळत असल्याने उगीचच त्या विषयावर चर्चासत्रे कशासाठी चालू आहेत, समजत नाही. थोडक्यात रस्ता हे आपल्याकडील विद्यापीठच आहे म्हणाना कुटुंबनियोजनाचा प्रसार व्हावा तसा होत नसल्याने आपल्याकडे रस्त्यांचा लोकसंख्या नियंत्रणासाठीही उपयोग केला जातो त्यासाठी सलमानखान सारख्या ताऱ्यांची मदत होते. त्यामुळे आपल्याकडे डोळे उघडे ठेऊन अगदी काळजी पूर्वक रस्त्यावर चालावे लागते आणि तरीही तुमचे दैवच बलवत्तर असेल तर तुम्ही रस्त्यावर सुखरूपपणे चालू शकता. अशी सवय असल्याने रस्ता ओलांडताना एक वाहन येत आहे म्हणून मी थांबलो तर तो वाहनचालकच थांबून मला रस्ता ओलांडण्याचा आग्रह करू लागला आणि माझे अंतः करण अगदी भरून आले आणि बिचाऱ्याचा हिरमोड करायला नको म्हणून मी त्याच्या विनंतीस मान दिला.

रस्त्याच्या बाबतीत आणखी एक बाब माझ्या लक्षात आली, ती म्हणजे वेगनियंत्रक (स्पीडब्रेकर) पुढे आहे किंवा रस्त्याचे नाव

काय आहे अश्या पाट्या लावण्याची महान संकल्पना कोणत्या नगरसेवकाची किंवा महापौराची आहे याचा उल्लेख कोणत्याही पाटीवर नव्हता. आपल्याकडे अशी महान संकल्पना शोधणाऱ्या नगरसेवकाचे नावही त्या त्या विभागाच्या पाटीवर असते आणि त्यामुळे शहरातील प्रत्येक विभागात अश्या संकल्पना करणाऱ्या महान नगरसेवकांची माहिती प्रत्येक नागरिकास होते शिवाय वेगनियंत्रकाच्या आजूबाजूस पुरेशी मोकळी जागा ठेवून सुसाट वेगाने जाणाऱ्या धाडशी नागरिकांचे आशीर्वाद तर त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना जीव मुटीत घेऊन चालावे लागून त्यांच्याकडून घडणाऱ्या नामस्मरणाचे पुण्यही त्यांच्या खात्यात जमा होते.

रस्त्याचा असा अगदी मर्यादित वापरच माहीत असल्याने येथील वाहनचालकाना वाहने अगदी जपून चालवावी लागतात. आणि जिकडेतिकडे पाट्या दिसतात " कायद्यानुसार पायी चालणारास अग्रक्रम देणे आवश्यक आहे. " आपल्याकडे असे केले तर मला वाटते गाडी चालवणाऱ्याना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी चालतच जावेसे वाटेल. आणि अशा प्रकारे इंधनाची बरीच बचत होईल.

# १०. एक बेपत्ता देश?

अमेरिकेत जाण्यापूर्वी पद्मश्री पु. ल. देशपांडे यांचा " एक बेपत्ता देश" या शीर्षकाचा लेख वाचला होता. त्यात त्यांच्या अमेरिका वास्तव्यात ते बाहेर पडले असताना एका म्हातारीला पोस्ट ऑफिस कोठे आहे हे विचारायला जातात तेव्हा ती म्हातारी कशी थरथर कापायला लागते याचा उल्लेख केला आहे. आता पु. ल. यांना पाहून थर थर कांपावे असे काही त्यांचे व्यक्तिमत्व नव्हते. पण आता हे त्यानीच सांगितल्यामुळे त्यावर विश्वास ठेवायला हवा. पण त्या थर थर कांपण्यामागे त्यांच्या व्यक्तिमत्वाचा काही संबंध नसून अमेरिकेची त्यावेळीची परिस्थिती कारणीभूत होती हे त्यानीच पुढे सांगितले आहे. कारण एकट्यादुकट्या व्यक्तीला गाठून लुबाडण्याचे प्रसंग बरेच घडत असल्यामुळे हा आपल्यावर चाल करायला आलाय की काय अशी तिला कशी भीती वाटते याचा उल्लेख असल्यामुळे मी फिरायला बाहेर पडल्यावर अमेरिकन म्हाताऱ्या बाईला आपल्या कोठल्याही कृतीमुळे भीती वाटू नये याची दक्षता घ्यायचे ठरवले होते. अर्थात म्हाताऱ्या वा तरुण कोठल्याच अमेरिकन बाईला मी पत्ता विचारायला जाईन ही शक्यता संभवत नसल्यामुळे असा अनुभव येईल असे वाटत नव्हते

(तरुणीच्या बाबतीत माझ्याबरोबर सौ. असली तर ही शक्यताही नव्हती) अर्थात पु. ल. यांचा हा अनुभव १९६० च्या आसपासचा असावा! तसेच त्यावेळी सुनीताबाई त्यांच्याबरोबर नसाव्यात.

हे तर निश्चितच!

या परिस्थितीत सुधारणा का झाली हे नंतर अमेरिकेत असतानाच वाचण्यात आलेल्या फ्रीकॉनॉमिक्स या स्टीव्हन जे. लेविट आणि स्टीफन जे डुबनर या अर्थशास्त्रज्ञानी लिहिलेल्या पुस्तकावरून कळले. १९७३ या वर्षापर्यंत गर्भपात ख्रिश्चन धर्मानुसार गुन्हा मानला जाई पण १९७३ मध्ये याविषयी न्यायालयात एक खटला चालून त्यात नको असलेल्या अपत्याचा भार मातापित्यावर लादणे योग्य नव्हे असा निर्णय होऊन हळू हळू जवळ जवळ सर्वच अमेरिकन राज्यांमध्ये गर्भपात कायदेशीर करण्यात आला व त्यानंतर कृष्णवर्णियांनी नको असलेली संतती टाळल्यामुळे ही अनावश्यक व गुन्हेगारीकडे वळण्याची जास्त शक्यता असणारी मुले जन्माला न येण्याचा हा परिणाम झाला. अर्थात हा त्यानी काढलेला निष्कर्ष आहे. तरीही आमच्या तेथील वास्तव्यात सकाळी लवकर फिरायला जाऊ नका, खिश्यात जास्त पैसे ठेवू नका मात्र एकादा दुसरा डॉलर ठेवा कारण असा कुणी मागायला आलाच तर अगदीच काही दिले नाही म्हणून मार

बसायला नको असा सल्लाही नंतर आम्ही बरेच ज्येष्ठ नागरिक एकत्र जमू लागलो तेव्हां त्यांच्यापैकी जे अनुभवी होते त्यांच्याकडून मिळाला. त्यामुळे पुलंसारखा अनुभव आम्हाला न येता उलट या अमेरिकनांनी त्याही बाबतीत आमची दांडी उडवली. कारण एकदा मी आणि सौ. दोघेही फिरायला बाहेर पडलो. आम्हाला फारशी थंडी वाजत नसल्यामुळे आम्ही साधे स्वेटर्स घालून बाहेर पडलो तर एक अमेरिकन म्हातारा (म्हातारी नव्हे)आमच्याजवळ येऊन अगदी कनवाळूपणे म्हणाला. "अरे तुम्ही एवढ्या थंडीत फक्त साधे स्वेटर्स घालून काय बाहेर पडलाय जॅकेटस घाला उद्यापासून " अमेरिकन माणसे अगदीच माणूसघाणी किंवा माणसांना घाबरणारी असतात ही माझी गैरसमजूत दूर केल्याबद्दल आणि आम्हाला प्रेमळ सल्ला दिल्याबद्दल त्या म्हाताऱ्याचे दुसऱ्या म्हाताऱ्याने(म्हणजे मी) आभार मानले आणि आम्ही पुढे गेलो.

त्यानंतर पुढे बऱ्याच वाऱ्या झाल्यावर एका वारीत तर माझ्या मुलाच्या अमेरिकन शेजाऱ्याने आमचा मुलगा नवीन घर बांधून शेजारी रहायला आल्यावर त्याच्या स्वागतासाठी स्वत: बनवलेले गरमागरम चिकन आणून दिले आणि भारतीयांपेक्षा “हम भी कुछ कम नही” याचा प्रत्यय आणून दिला.

. त्यानंतर पुढे एकदा माझ्या मित्राच्या मुलाकडे (तो माझ्या मुलाचा मित्रही आहे.) आम्ही रहायला गेलो तेव्हा सकाळी फिरायला गेलो तेव्हा त्याच्या अमेरिकन तरुण शेजारणीनेही मला गूड मॉर्निंग केले आणि तू माझ्या शेजाऱ्याचा पाहुणा आहेस ना अशी माझी विचारपूस पण केली. रस्त्यावर बऱ्याच अमेरिकनांनी "गुडमॉर्निंग" म्हणून (त्यात स्त्रियाही आणि त्यात तरुणसुद्धा होत्या)आपल्या देशाविषयीचा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला उलट मधूनमधून दिसणाऱ्या भारतीय वाटणाऱ्यानी मात्र आमच्याकडे पाहिलेही नाही. आजकाल कोणीही अमेरिकेत यायला लागलेत बुवा किंवा बाई असं त्यांच्या दृष्टीक्षेपातून व्यक्त झाल्यासारखे वाटे (आमच्याविषयी ते पण असेच म्हणत असतील). पण एकूणच अमेरिकन लोक समोर येणाऱ्या व्यक्तीला हाय हॅलो म्हणतातच असे दिसले. अगदी तिकिटाच्या खिडकीत गेलेला माणूस अगोदर हाय म्हणूनच तिकिट मागणार.

पु. ल. यांचा अनुभव मनावर न घेता आम्ही मात्र कोणत्याही वेळी निर्धास्तपणे हिंडत होतो पण एकदा आमच्या मित्राकडे आम्ही दोघेच त्याचे घर जवळ असल्याने पायीच गेलो असता परतायला थोडा अंधार झाला तर त्यांच्या सुनेने आता चालत परत जाऊ नका असे सांगून आम्हाला आपल्या गाडीतून सोडण्याची तयारी दाखवली कारण आमच्या परतीच्या रस्त्यावर काही मुलांनी

रस्त्यावर जाणाऱ्या व्यक्तींना लुटण्याचा प्रयत्न केला असे तिला समजले होते. आपल्याकडेही अगदी दिवसा ढवळ्या स्त्रियांच्या गळ्यातील साखळ्या, मंगळसूत्र घेऊन पसार होण्याचे असे प्रकार चालतातच. पण तरीही मर्द मराठ्यांनी अंगावर दागिने घालून बाहेर पडण्याची परंपरा सोडलेली नाही

पुण्यातील तर माझ्या एका मित्राला सकाळी नऊ वाजता तो रस्त्यावरून चालत असताना अगदी साळसूदपणे एका स्कूटरवाल्याने थांबवले आणि " अहो काका ते गृहस्थ तुम्हाला बोलावत आहेत असे सांगितले. माझ्या मित्राने थांबून पाहिले तर त्या व्यक्तीने जवळ येऊन " अहो काका पुढे दंगा सुरू झाला आहे तुमची आंगठी, घड्याळ आणि चेन काढून जपून ठेवा म्हणून त्याला अंगठी, घड्याळ आणि चेन काढायला लावली आणि त्यालाच रुमालात गुंडाळायला लावली आणि त्याच्या हातातून घेऊन त्याच्या खिशात ठेवण्याचे नाटक केले. आमच्या मित्राने"तुम्ही कोण विचारल्यावर गुप्त पोलिस असे सांगितले आणि निघून गेला. थोड्या वेळाने मित्राने खिशात

हात घालून पाहिले तर काय आंगठी, चेन आणि घड्याळ बेपत्ता. एकूण आपला देश बेपत्ता नसला तरी येथे वस्तू आणि कधीकधी माणसेही बेपत्ता होतात हे खरे! एक गोष्ट मात्र खरी

आपल्या देशात रस्त्यावर एकटेदुकटे असणे क्वचितच शक्य असते आणि येथे मात्र रस्त्यावर हिंडणारे लोक कमीच. एकदा तर मी रस्ता चुकलो तर योग्य रस्ता विचारण्यासाठी मला अक्षरशः माणसे हुडकत हिंडावे लागले.

फिरण्यासाठी सगळेच रस्ते मोकळे असल्यामुळे मी बऱ्याच रस्त्यांचा शोध घेतला. रस्त्याना वेगवेगळ्या प्रकारे संबोधण्याचे कारण काही मला कळले नाही. कधी रोड, तर कधी स्ट्रीट तर कधी अव्हेन्यू तर कधी ड्राइव्ह तर कधी बुलेवार्ड, तर कधी नुसतेच सीटी (हा शॉर्ट फॉर्म आहे आणि तो कोर्ट्चा आहे असे नंतर कळले), हायवेला रूट म्हणतात. आपल्याकडेही पूर्वी बोळ(शालूकरांचा) गल्ली (तपकीर), आळी (दाणे)असे काही शब्दभेद होते पण आता मात्र शुद्ध रोड हा बहुतांशी एकच शुद्ध देशी पर्याय वापरला जातो. अगदीच मराठीचाच अभिमानी असेल तर मार्ग अथवा पथ हे शब्द वापरतो. उदा:सध्या आयडियल कॉलनी अश्या शुद्ध मराठी नावाच्या वस्तीत एका रस्त्याला चक्क सुप्रसिद्ध साहित्यिक पु. भा. भावे पथ व थोड्याच अंतरावर त्याच रस्त्याला नाटककार पु. भा. भावे पथ अश्या पाट्या दिसतात. रस्त्याची लांबी अधिक असती तर कथाकार पु. भा. भावे पथ आण्खी कादंबरीकार पु. भा. भावे पथ असेही नाव दिसले असते. या नावाच्या खाली मात्र नगरसेवकाचे नाव नसते हे आश्चर्य कदाचित पु. भा. भावे कोण

याची माहिती त्याना नसते. आयडियल कॉलनीच्या अंतर्गत रस्त्यावर मात्र आमच्या विभागाच्या अंतर्गत रस्त्यावर त्यावरील सर्व इमारतींची नावे असणारा फलक आणि प्रत्येक फलकावर या थोर कल्पनेचे जनक म्हणून त्या विभागाच्या नगरसेवकाचे नाव असते पण निवडणुकीच्या काळात मात्र शासकीय आदेशानुसार त्यावर डांबर फासण्यात येते, अश्या प्रकारे स्वत:चे नाव स्वत:च लिहून त्यावर काळे फासणे यात स्वकर्तृत्वाचा योग्य सन्मान होतो असे त्याना वाटत असल्यास नकळे!

# ११. घरांचे प्रकार

अनेक रस्त्यांच्या पाहणीत येथील घरांचे बरेच नमुने पहायला मिळाले. बाहेरून पहायला घरे एकाद्या काड्या पेटीच्या घरासारखी भासतात कारण लाकडाचा जास्तीतजास्त वापर! हिंवाळयात बर्फ घरावर साठायला नको म्हणून छते उतरती आणि भिंतींवरसुद्धा तिरप्या लाकडी पट्ट्या बसवलेल्या असतात्_ छतांना ती उतरती असल्यामुळे हिरवा, तपकिरी. , करडा, निळा वेगवेगळे रंग दिलेले दिसू शकले आणि लाकडी भिंतीना पण. ! आपल्याकडे रंगीत छते हा प्रकार अगदीच दुर्लभ, घरासमोर भरपूर मोकळी जागा आणि त्यावर हिरवेगार लॉन समोर सुंदर फुलझाडे आणि त्यांच्यावर आलेली सुंदर फुले सकाळी शेजारच्या घरातील म्हातारी माणसे देवपुजेला पळवत नाहीत्, लॉनवर छान संगमरवरी पुतळे आणि त्याना धक्का लागेल अशी मुळीच काळजी

लोकांना वाटत नाही हे आश्चर्य. कारण आमच्या भारतातल्या घरापुढील बागेतील फुले आम्ही उठण्यापूर्वी शेजारच्या आजींच्या देवांची पूजा करण्यासाठी गायब होतात एवढेच काय समोर ठेवलेली कचऱ्याची कुंडीसुद्धा टिकत नाही. येथे जागेचा तुटवडा नसल्यामुळे घरेही चांगलीच प्रशस्त असावीत. असावीत

म्हणण्याचे कारण मी काही एकूण एक घरे पाहिली नाहीत पण पाहिली तेवढी कमीतकमी दहा हजार चौरस फुटाच्या क्षेत्रफळावर बांधलेली आणि तीन शयनकक्ष तीन विश्राम खोल्या (रेस्टरूम) आणि तळघरयुक्त. तळघरात संगीतवाद्ये, टेबलटेनिसचे टेबल आणि बऱ्याच वस्तूंचा साठा असतो.

माझ्या एका विद्यार्थ्याने जागा विकत घेऊन घर बांधले आहे त्यात सात शयनकक्ष आहेत. त्या नवराबायकोस एकच मुलगी आहें नवरा कामावर गेल्यावर मुलीला शोधत राहणे एवढे एकच काम बायकोला पुरत असेल. सुजितनेही दोन वर्षांनी मोठे घर विकत घेतले त्यातही तीन शयनकक्ष आहेतच. बहुतेक घरे तीन पातळ्यांची म्हणजे तळघर, तळमजला आणि पहिला मजला, शयनकक्ष पहिल्या मजल्यावर तर तळमजल्यावर दिवाणखाना, स्वयंपाकघर, आणि कुटुंबखोली (फॅमिली रूम) अशी रचना असणारी असतात. समोर व मागे बऱ्यापैकी लॉन असतेच. काही फुलझाडांचे ताटवे, मोठी झाडेपण दिसली, मात्र फळझाडे घराच्या आवारात कमी दिसली.

. घराला कुंपण घालण्याची पद्धत कमीच दिसली यावरून शेजाऱ्यांशी जागेच्या मालकीवरून वाद होत नसावेत. माझे घर बांधून कांपाउंड वॉलसुद्धा झाल्यावर ती आपल्या हद्दीतून गेल्याचा

दावा नंतर घर बांधणाऱ्या माझ्या शेजाऱ्याने कसा केला होता आणि आपली कांपाउंड वॉल माझ्या हद्दीतून नेण्याचा कसा प्रयत्न केला होता याची यावेळी आठवण झाली. बागेतील फुले फळे किंवा शोभेच्या वस्तू पळवल्या जाण्याची भीती लोकांना वाटत नसावी. त्यामुळे गृहसंकुलातदेखील लोक लहान मुलांच्या सायकलीसारख्या वस्तू खुशाल बाहेर राहू देतात.

कारण घरात अडचण होते. या उलट अमेरिकेतील माझा मुलगा भारतात आल्यावर नुकतेच घेतलेले बूट सदनिकेबाहेरील त्यासाठी ठेवलेल्या रॅकमध्ये न टाकता बाहेरच उतरवून आत शिरला आणि नंतर थोड्या वेळाने बाहेर पडलो तो ते गायब. कारण इतका चांगला बूट असा उघड्यावर टाकायचा नसतो हे त्याला कळायला नको का?.

# १२. नावात काय आहे?. `

रस्त्यावरून जाताना काही दुकानांची नावे पाहिल्यावर येथील लोकाना आपल्यासारखी काव्यदृष्टी नाही याची जाणीव झाली. केस कापण्याचे वा कोठलेही दुकान असले तर त्यावर नाव नुसते हेअर कट किंवा नेल्स (नखे कापण्यासाठी वेगळे दुकान प्रथमच पाहिले. अर्थात आता नखांची पण किती निगा राखावी लागते हे दूरदर्शनवरील मालिका वगैरे पाहून कळू लागले आहे. आपल्याकडे सलूनमध्ये सर्वच गोष्टी एकत्र करण्याची पद्धत! (अर्थात हे फक्त पुरुषांच्या बाबतीतच) किंवा कॉफीच्या दुकानावर एस्प्रेसो अथवा जी असेल ती कॉफी किंवा लाँड्रीला नुसते वॉशर. बुटांच्या दुकानाला नाव काय तर म्हणे पेलेज शूज. आपल्याकडे कसे चैतन्य फूटवेअर,

उत्कर्ष लाँड्री अशी नावे वाचूनच दुकानात शिरायला उत्साह येतो. साड्यांच्या दुकानांची नावे तर काय विचारायलाच नको. वस्तू वापरण्याच्या बाबतीत सारख्या नवीननवीन वस्तूंचा आग्रह धरणारे अमेरिकन लोक नावांच्याच बाबतीत येवढे कंजूष का काही समजले नाही. या बाबतीत त्यांच्या इंग्रज परंपरेचा वारसा त्यांनी सोडला नाही असे दिसते (भो पंचम जॉर्ज)त्यामुळे मुलाला

बापाचेच नाव ज्यूनिअर म्हणून लावायची पद्धत बऱ्याच वेळा वापरलेली दिसते . जॉर्ज बुशसुद्धा या तडाक्यातून सुटले नाहीत. आपण पहिल्यापासूनच नावे ठेवण्याच्या (म्हणजे दुसरा अर्थ नव्हे) कलेत पारंगत! त्यामुळे विष्णुसहस्त्र नाम आपल्याकडे असते आणि तरीही मूल होताना आणखी

नव्या नावाचा शोध अगदी इंटरनेटवर घेतला जातो. त्यामुळे शेक्सपीयरने नावात काय आहे असे म्हटले असले तरी आपल्याकडे तरी नावातच खूप काही आहे हे निश्चित!

१२. हवामानाचा अंदाज

आम्ही गेलो तो मे महिना असल्यामुळे हवा बरीच उष्ण होती. सकाळी तर कडक ऊनही असे. अश्या परिस्थितीत एक दिवस स्वच्छ सूर्य प्रकाश पडला असताही सुजित छत्री घेऊन कामावर निघाला हे पाहून मी आश्चर्याने त्याला छत्री घेण्याचे कारण विचारले तर त्याने संध्याकाळी पाऊस येणार म्हणून ही खबरदारी असे सांगितले. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे संध्याकाळी तो कामावरून आला त्यावेळी खरेच धोधो पाऊस कोसळत होता. आपल्याकडेही दूरदर्शनच्या बातम्यातील शेवटचा भाग हवामान असा असला तरी तो फार गांभीर्याने कोणी घेत नाही. यावरून

पुण्यातील सिमला ऑफीस ऊर्फ ऑब्झर्वेटरीविषयी मला एकाने सांगितलेला किस्सा आठवला.

पुण्यातील वेधशाळाचे कार्यालय इंग्रजांच्या काळी सिमल्यास होते. . त्यावेळी जो व्हाइसरॉय होता त्याला एकदा त्याच्या खास मित्रांना पार्टी द्यायची होती आणि ती त्याच्या बंगल्याच्या पटांगणात! त्यामुळे

वेधशाळाप्रमुखाला फोन करून त्याने पार्टीच्या दिवशी संध्याकाळी हवा कशी असेल याविषयी विचारणा केली त्यावर त्याने साहेबांचे काम म्हणून जरा जास्त व्यवस्थित पहाणी करून सांगतो असे सांगितले. थोड्या वेळाने त्याने साहेबांना फोन करून "काही काळजीचे कारण नाही, हवा एकदम स्वच्छ राहणार आहे, पाऊस पडणार नाही "असे सांगितले. साहेबानी मग पार्टीचे निश्चित करून मित्रांना आमंत्रणे दिली. पार्टीच्या दिवशी सकाळी साहेब फिरायला बाहेर पडले असता त्यांना एक लमाण आपली गाढवे हाकीत रस्त्यावरून जाताना दिसला. त्याने साहेबाच्या बंगल्यासमोरील गडबड पाहिली होती. आणि उत्सुकतेने दरवानाला त्यामागचे कारणही विचारले होते. त्यामुळे साहेबाला पाहून आदबीने नमस्कार करून तो लमाण म्हणाला,

"साहेब आज संध्याकाळी पाऊस येणार आहे. "

"तुला कसे कळले?" साहेबाने विचारले.

" माझ्या गाढवांना कळते पाऊस येणार असेल तर. " त्याचे ते उत्तर ऐकून साहेबाला हंसू आवरेना, तरीही घरी परत आल्यावर त्याने वेधशाळाप्रमुखास पुन्हा फोन करून खरच पाऊस येणार नाहीना याची चौकशी केली. आणि त्याला पाऊस निश्चित येणार नाही अशी ग्वाही मिळाली, . त्यामुळे साहेब निश्चिंत झाले. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे संध्याकाळी पार्टी रंगात आल्यावर अगदी धोधो पाऊस आला आणि पार्टीच्या रंगाचा बेरंग झाला. साहेब एकदम संतापले आणि त्यानी वेधशाळेचे ते ओफिसच तेथून उचलून पार पुण्यात नेऊन टाका असा हुकुम दिला. तेव्हापासून म्हणे वेधशाळा पुण्यात आली. सिमला ऑफिस या नावामागचा इतिहास असा आहे म्हणे! आंतरजालावर पाहता खरोखरच १९२८ मध्ये शिमला (हा कंडक्टरचा उच्चार जो वेधशाळेचा बसस्टोप आला की पुकारतो))ऑफिस पुण्यात स्थलांतरित झाल्याचा उल्लेख वाचून कदाचित गोष्ट खरीही असेल असे वाटले आणि अजूनही त्यांनी आपली चुकीचे भाकित करण्याची परंपरा मात्र सोडली नाही हे लक्षात आले. . त्यामुळे वेधशाळेने पाऊस पडणार नाही असा हवाला दिला की लोक छत्र्या घेऊन बाहेर पडतात. यावर आर. के. लक्ष्मण यांचे एक कार्टूनही प्रसिद्ध आहे. त्यात बसस्टॉपवर तीन चार माणसे उभी आहेत व पाऊस पडत असल्याने

सर्वांनी डोक्यावर छत्र्या धरलेल्या आहेत पण त्यात फक्त एक माणूस मात्र छत्री नसल्यामुळे भिजत उभा आहे आणि रागारागाने शेजारच्या माणसावर खेकसत आहे, ''हो मी वेधशाळेतच काम करतो पण मला कळत नाही हे तुम्हाला कोणी सांगितलं?''

येथे अमेरिकेत मात्र हवामानाचा अंदाज क्वचितच चुकल्याचा अनुभव मला आला. अगदी दिवसाच्या वेगवेगळया वेळी किती तपमान असणार याविषयीचा अंदाजही आठवडा आठवडा अगोदर वर्तवला जातो आणि तो क्वचितच चूक ठरतो. आणि न्यू जर्सीतील हवा तर इतकी बेभरवशाची आहे की योग्य भाकीत आवश्यकच आहे. माझ्या मुलाने सांगितले की इथल्या हवेविषयी असे म्हणतात If you donot like NJ weather wait for five minutes and you will get good weather. यामागची अतिशयोक्ती सोडली तरी हवा फारच सारखी बदलत असते हे मात्र खरे. पण नंतरही वेगवेगळी वादळे येणार याविषयी सूचना लोकांना वेळेवर मिळते व त्याप्रमाणे लोक पूर्वतयारी करत व बरीच जीवित व वित्तहानी टळे. .

अमेरिकेत गेल्यावर वेळ घालवणे हा एक अवघड प्रश्न असतो असे पूर्वानुभवींचे मत होते. वेळ घालवणे याबाबतीत माझ्याच पेशातील एका सेवानिवृत्त मित्राची भूमिका मला पटत

नसली तरी मजेशीर वाटते. त्याना "वेळ कसा घालवता बुवा तुम्ही?" असे विचारल्यावर त्यांचे नमुनेदार उत्तर असते " वेळ घालवण्यासाठी आपल्याला काय करावे लागते बुवा?आपण काहीही केले नाही तरी वेळ जातच असतो, त्याला थोडेच हाताला धरून चालवावे लागते?" याच मित्राने कामाच्याहीबाबतीत आपली भूमिका अशीच परखडपणे माझ्यापुढे मांडली होती. तो सेवानिवृत्त झाल्यावर एकदा फिरताफिरता त्याची गाठ पडली असता मी " काय गुरुजी आता काय आराम ना?" असे विचारल्यावर लगेच त्याने "मग इतके दिवस काय करत होतो?" असे हसत हसत मलाच विचारले

होते, काही मित्र तर खरोखरच वेळ जात नाही म्हणून अमेरिकेतून लवकर परत आले होते, अर्थात संगीत, वाचन व लेखन अश्या छंदांमुळे मला हा प्रश्न कधी भेडसावत नाही. येथील ग्रंथालये इतकी भव्य ग्रंथसमृद्ध असतात आणि मांडणी इतकी व्यवस्थित असते की मी अर्ध्या तासात हवी तेवढी पुस्तके निवडून बाहेर पडत असे, हे ग्रंथालय तसे घराच्या बरेच जवळ होते.

बालसाहित्यासाठी वेगळा विभागच असून अनेक दहा बारा वर्षाच्या मुलानी तो भाग भरलेला असे त्यात अनेक प्रकारची आकर्षक मुखपृष्ठाची पुस्तके मांडून ठेवलेली असतात, शिवाय

पुस्तकांनी गच्च भरलेली कपाटे उघडून कोणतेही पुस्तक घ्यायची मुभा असे, अर्थात प्रवेशद्वाराजवळ तुम्ही पुस्तक ग्रंथालयकर्मचाऱ्यास नकळत नेत असल्यास पहाणी होऊन घंटा वाजण्याची सोय असते, पण पुस्तक सहजासहजी उपलब्ध होत असताना ते पळवण्याची इच्छा होणारी व्यक्ती क्वचितच! मुलांनी पुस्तके वाचावीत म्हणून विशिष्ट काळात त्यानी किती व कोणती पुस्तके वाचली याची चाचणी घेत, त्यात मुलांनी वाचलेल्या पुस्तकाचा सारांश मुलांकडून घेत व जास्तीत जास्त पुस्तके वाचणाऱ्या मुलास अगर मुलीस काहीतरी उत्तेजनार्थ बक्षीस मिळे. पुढे माझ्या नातवाने बरीच पुस्तके वाचून बर्याच वेळा बक्षिसे मिळवली. .

# १३. वैद्यकीय सेवा

न्यू जर्सी एडिसन ला आल्यावर लगेच जेट लॅगचा त्रास होईल अशी अपेक्षा होती. पण तसे न होता उलट झोपच उडून गेली. कदाचित पुष्पक मधील कमल हासनला गोंगाट नसलेल्या जागी झोप येत नाही तसेच येथे प्रदूषण हवेचे आणि ध्वनीचेही-नसल्यामुळेच की काय कोणास ठाऊक! . आमच्या पुण्याच्या सदनिकासंकुलात वाहनाच्या हॉर्नचा वापर एकमेकांना आव्हान किंवा आवाहन करण्यासाठी केला जातो् आणि हा आपला वारसा अगदी “ धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे“ पासूनचा आहे. पण त्या काळात श्रीकृष्ण व अर्जुन एकमेकाला बोलावण्यासाठी शंख फुंकीत होते असे काही दिसले नाही. इथे अमेरिकेत आल्यापासून हॉर्नचा आवाज काढणे हे असभ्यतेचे समजण्यात येते की काय अशी शंका येते उगीचच हॉर्न वाजवल्याबद्दल शिक्षा होत असावी. आपल्याकडे कसे रस्त्यात रणशिंग फुंकत असल्यासारखे हॉर्न वाजवत वाहने चालवत असतात. हॉर्न हे एकादे मनोरंजन करण्याचे किंवा कुणालाही घराबाहेर बोलावण्यासाठी वापरायचे साधन आहे अशी लोकांची समजूत असते. हॉर्नचा आवाज कमी वाटतो म्हणून की काय रस्त्यात निरनिराळी घोषणायुद्धे चालू असतात.

ध्वनिप्रदूषणामुळे बरीच जनता बहिरी झाली असली तरी आपला हा छंद सुटत नाही. याशिवाय हॉर्नचा आवाज कमी पडतो म्हणून की की काय उत्साही तरुण अपल्या गाडीचे ध्वनिमन्दक (सायलेन्सर) काढून जास्तीत जास्त वेगाने गाडी चालवून आपण किती मोठा आवाज काढू शकतो हे दाकवून वेगमर्यादा, ध्वनिप्रदूषण या कल्पना केवळ वेडगळ लोकांसाठी आहेत हे सिद्ध करतात. पंध्रा ऑगस्ट ला तर असे उत्साही तरुण अश्या ध्वनिवर्धक वाहनांची प्रभातफेरीच काढून आपणास खरेच स्वातंत्र्य मिळाले आहे हे जाहीर करतात, आणि अश्या स्वातंत्र्य दिग्दर्शनास देशबक्ती हे नाव असल्याने त्यांना अदवण्याचा देशद्रोह पोलिसही करू शकत नाहीत. येथे मात्र सारे कसे शांतशांत वाटत होते. बिचारे अमेरिकन तरुण!

तीच गोष्ट प्रदूषणाची. आपल्याकडे पोल्यूशन तपासणी करणाऱ्या पोलिसांच्याच गाड्यातून आणि जवळजवळ सर्व सार्वजनिक वाहतूक करणाऱ्या वाहनातून धुराचे लोट बाहेर पडत असतात. येथे त्याचाही मागमूस नव्हता तरीही निघाल्यापासूनच्या दगदगीमुळे आणि नंतरही काही दिवस नीट झोप न लागल्यामुळे सर्दी आणि खोकल्याने मला बेजार करून टाकले, तश्यातही दैनंदिन व्यवहार मी कसेतरी पार पाडत होतो. इन्शुअरन्स काढला असला तरी सर्दीखोकल्यासाठी डॉक्टरकडे जावेसे वाटेना, त्यामुळे

नेहमीच्याच ज्या गोळ्या मी बरोबर आणल्या होत्या त्यांचा वापर आणि गरम पाण्याच्या गुळण्या, व्हिक्सची वाफ घेणे अशा उपायांचा अवलंब करूनच आपले दुखणे हटवण्याचा माझा इरादा होता आणि तेच योग्य होते हे पुढे माझ्या मुलाला सर्दीखोकला झाल्यावर येथील डॉक्टरांनी जो अंटिबायॉटिक्सचा मारा त्याच्यावर केला त्यावरून समजले.

त्यादृष्टीने भारतात असणे खूपच फायदेशीर असते असे वाटले. येथे अगोदर इन्शुअरन्स असल्याशिवाय डॉक्टरकडे प्रवेशच नसतो. आणि परत डॉक्टरची अपोइंटमेंट मिळण्यापूर्वी रोग किंवा रोगी संपण्याची शक्यता असते. एकूण डॉक्टरांची वृत्ती लोकांना घाबरवण्याची असते आणि त्यामुळे आपल्या बुद्धीने उपचार करणे शक्यच नसते. त्यामुळे बरेच भारतीय आयुर्वेदिक उपचार सोयिस्कर, स्वस्त आणि खात्रीलायक असतात तेही करायला भारतातून गेलेल्या नव्या पिढीचे (म्हणजे आमच्या पुढच्या) लोक घाबरतात. अगदी लहानपणी मुलाला मधाचे बोट चाटवण्याची आपली भारतीय पद्धत, तर इथे मधाची चवही वर्षाच्या आतील मुलास द्यायची नाही. तीच गोष्ट वरच्या दुधाची. आमच्या पहिल्या नातवाला गायीचे दूध चौथ्या पाचव्या महिन्यात

आम्ही देऊ लागलो आणि त्याचा अमेरिकेत जन्मलेला धाकटा भाऊ मात्र वर्षाचा झाला तरी पावडरचे दूधच पीत होता -त्याला फॉर्म्युला म्हणतात म्हणे- माझा मोठा नातू नऊ वर्षाचा झाला तेव्हां त्याची दाढ किडली ती काढण्यासाठी दंतवैद्याची अपॉइंटमेंट घेऊन मुलगा आणि सून त्याला घेऊन गेले तर तेथे दोन तास वाट पाहून डॉक्टरकडे गेल्यावर हा आता ऍडल्ट झाला आहे आणि त्याचा इन्शुअरन्स तो किड (म्हणजे अल्पवयीन)असताना काढला होता, त्याचा इन्शुअरन्स ऍडल्ट या सदरात काढून ऍडल्टचे दात काढणाऱ्या दंतवैद्याकडे त्याला न्या अशी त्याची बोळवण करण्यात आली.

आता ज्या दंतवैद्याला दात काढता येतात त्याला लहान मुलाचे दात काढणे काय किंवा मोठ्या माणसाचे काय काय फरक पडणार आहे?मी तर माझे आणि माझ्या ह्याच नातवाच्या बापाचे (तो त्यावेळी सात आठ वर्षाचाच होता) एकाच डॉक्टरकडून एकाच बैठकीत (किंवा खुर्चीत)काढून आलो होतो आणि त्यातही त्याचा दात अगोदर काढून तो रडला नाही हे पाहून हे धाडस मी केले होते. याची आठवण होऊन या डॉक्टरला काय म्हणावे असे म्हणून कपाळावर हात मारून घेतला. बरं [ पुन्हा ऍडल्टचे दात काढणाऱ्या डॉक्टरची ऍपॉइंटमेंट घेण्यासाठी इन्शुअरन्स कव्हर नाही त्यासाठी पुन्हा इन्शुअरन्स कंपनीला कळवून वाट पाहा.

त्यामुळे तोपर्यंत नातवाचा दात आपोआपच पडेल असे मला वाटून गेले.

मेडिकल इन्शुअरन्स हा आणखी वेगळाच प्रकार आहे. त्यात काही गोष्टींचा समावेश होतो तर काहींचा नाही आणि हे आपण आजारी पडल्यावरच कळते. आपल्याला ज्या टेस्ट घ्यायला सांगतात त्याचा अहवाल आपल्या हातात पडत नाही तो सरळ ज्या डॉक्टरकडून औषधोपचार घेता त्याच्याकडेच पाठवला जातो. वैद्यकीय बाबींवर होणारा खर्च अगदी डोळे पांढरे करणारा असतो. अमेरिकेतच परिचय झालेले माझे एक मित्र हृदयविकाराने आजारी पडले आणि पेसमेकर बसवावा लागला, त्यानी इन्शुअरन्स काढला असूनही त्यांच्या उपचाराचा खर्च इतका झाला की त्यातील काही भाग अजून देण्याचे बाकी आहे असे त्यांच्या मुलाकडून आम्ही पुढच्या वारीवर आलो तेव्हां कळले. तरीही आम्ही काही लाख रुपये खर्च करून दोघांचा वैद्यकीय विमा घेऊनच आलो होतो. आमच्या सात आठ वाऱ्यांमध्ये झालेल्या वैद्यकीय विमा खर्चात आण्खी दोन तीन वाऱ्यांचा तिकीट खर्च होऊ शकला असता, अर्थात त्याशिवाय वैद्यकीय विमा कंपन्या तरी कश्या चालणार?

याशिवाय डॉ. रॉबिन कुक च्या कादंबऱ्या ज्यानी वाचल्या असतील त्याना या कंपन्या विम्याची रक्कम द्यावी लागू नये

यासाठी काय काय उपद्व्याप करतात हेही समजले असेल, अर्थात या बाबतीत आपल्या विमा कंपन्याही काही कमी नाहीत ही गोष्ट वेगळी!

# १४. शेजारी

येथे सदनिकेत आजूबाजूला कोण आहे याचा पत्ता कमीच लागतो, कारण दारावर नावाचे फलक लावण्याची पद्धत नाही. पण काही कारणामुळे अगदी शेजारी त्याचबरोबर आमच्या बरोबर खाली पण कोण राहते त्याचा पत्ता जरा वेगळ्याच कारणाने लागलाच. ! एकदा आमचे वॉशिंग मशीन बंद पडल्यामुळे सुजितने संकुल कार्यालयास फोन केला आणि त्यानी माणूस पाठवतो म्हणून सांगितल्यावर तो कामावर गेला. आमच्या भारतीय अनुभवानुसार सुजित घरी परत आल्यावरच किंवा त्यानंतरही काही वेळा फोन केल्यावर माणूस येईल अशी अपेक्षा होती. पण थोड्याच वेळाने दारावरील बेल टरारली. अशा वेळी कोण येणार आणि तेही सुजित घरी नसताना तरीही आम्ही भीतभीत दरवाजा किलकिला केला. एक उंचापुरा गोरा माणूस दारात उभा राहून काहीतरी सांगत होता पण त्याचे इंग्लिश आमच्या कळण्यापलिकडले होते, आता याला घरात घ्यायचे की नाही हा पेच आम्हाला पडला. कारण असे लोक येऊन घर लुटून नेतात अशी सुचना सुजितने केली होती. सुदैवाने आमच्या शेजारच्या सदनिकेतील व्यक्ती बाहेर डोकावली आणि त्याने तो आलेला माणूस संकुल कार्यालयाने पाठवलेला आहे असे

सांगितले. आमचे वॉशिंग मशीन बंद पडले आहे हे त्यानेच त्याला सांगितले. आलेल्या माणसाचे बोलणे तो स्पॅनिश असल्यामुळे आम्हाला कळले नव्हते. आमच्या शेजाऱ्याने दुभाष्याचे काम केले आणि आमची अडचण दूर झाली. आमचा हा शेजारी मुंबईचाच होता आणि गुजराती असला तरी त्याला मराठी बऱ्यापैकी येत होते. पुढे त्याच्या आईची आणि माझ्या सौ. ची बरीच दोस्ती झाली. त्यानंतर तो मधूनमधून गप्पा मारू लागला. तरी घरी येऊन बसण्याची प्रथा नाहीच म्हटले तर चालेल.

आमच्या बरोबर खाली राहणारा पण भारतीयच होता पण त्याचा परिचय जरा वेगळ्या संदर्भात झाला. एक दिवस आम्ही दोघेच घरात असताना दुपारी जरा वामकुक्षी घेत असताना बेल वाजली. आम्ही आश्चर्याने दार उघडले तर एक साधारण पंचवीस वर्षाची भारतीय तरुणी दारात उभी. "अंकल, यू आर मेकिंग नॉइज अंड आय कॅनॉट स्लीप" अस त्रासिक मुद्रेने ती म्हणत होती. आमच्या चालण्याचा आवाज होत असे हे खरे पण आम्ही चालत नसताना होत असेल असे वाटले नव्हते. तिला आम्हीही विश्रांतीच घेत होतो असे सांगितल्यावर चेहरा आणखीच वाकडा करून निघून गेली. सुजित ऑफिसमधून आल्यावर त्याला सांगितल्यावर तो म्हणाला, "तिला असे वर येऊन आपल्याला सांगण्याचे कारण नव्हते" ते प्रकरण तेवढ्यावरच मिटेल असे वाटले होते पण

त्यानंतरही आम्ही एकदा रात्री उशीरा घरी आल्यावर त्या नवराबायकोला त्रास झाल्याचे नवऱ्याने आम्हाला वर येऊन सांगितले त्यावेळी सुजित असल्यामुळे त्याने त्याला "व्हाय आर यू डिस्टर्बिंग अस? यू कॅन मेक कंप्लेंटटू अपार्टमेंट ऑफिस" असा दम दिला. ते एक सिंधी जोडपे होते. पुढे पुढे आम्ही चालू लागलो की तेच खालून छतावर काहीतरी आपटून आवाज काढायचे. थोडक्यात आमचे अघोषित ध्वनियुद्धच चालू झाले पण त्याचा शेवट कसा होईल याचाच आम्ही विचार करत असताना आश्चर्य म्हणजे एकदिवस खरोखरच आम्हाला संकुलकार्यालयाकडून पत्र आले आणि त्यात तुमच्याखाली राहणाऱ्या भाडेकरूला छतावर आवाज करून तुम्ही त्रास देता आणि अशी तक्रारपुन्हा आल्यास तुम्हाला सदनिका सोडावी लागेल" अशी नोटिस आली.

त्यानंतर आम्ही ते पत्र घेऊन सदनिका कार्यालयात गेलो तेव्हा तेथे असलेल्या सदनिका प्रतिनिधी ती एक तरुण स्त्रीच होती आम्हाला धीर देऊन "असा आवाज येतच असतो याची आम्हाला जाणीव आहे" असे सांगितले. त्यामुळे आम्ही निश्चिंत झालो तरीही आमच्यासारख्या नवागतांची झोप काही दिवस उडवायला ती घटना पुरेशी झाली. भारतात शासकीय गृहसंकुलात राहत असताना शेजाऱ्यांशी भांडण्याचे काही प्रसंग आले होते पण त्यामुळे घरातून हकालपट्टी होण्याची ताकीद मिळाली नव्हती. तेथे आपली भांडणे

आपाआपसात मिटवावी असा शासकीय दृष्टिकोण होता. आबा (त्यावेळी महाराष्ट्राचे गृहमंत्री आर. आर. पाटील गेले बिचारे)नी अशावेळी तंटामुक्त गाव तशी तंटामुक्त सदनिकेची योजना लागू केली असती. पण येथे मात्र या कारणामुळे लहान मुले असणाऱ्या पालकांना वरच्या मजल्यावर राहणे ही शिक्षाच वाटत असणार असे वाटले. ते पुढे आमचे थोरले चिरंजीव नातवाला घेऊन येथे आल्यावर अक्षरश: खरे ठरले!

# १५. बंद नसे कधी!

आम्ही येथे आल्यापासून आणखी एक महत्त्वाची जाणवण्यासारखी गोष्ट म्हणजे वीज पाणी आणि फोन अखंड चालू होते ते कधी बंद आहेत असे जाणवले नाही. भारतातून येणाऱ्याना ही गोष्ट खासच जाणवणार विशेषतः नियमित भारनियमनाला तोंड देणाऱ्या आम्हाला तरी. भारनियमनामुळे बराच वेळ वाया जातो हे खरेच पण गप्पा मारायला तो एक महत्त्वाचा विषय मात्र असतो आणि त्याबाबतीत आम्ही पुण्याचे लोक त्याहूनही मुंबई (उपनगरातील नव्हे)चे लोक किती भाग्यवान आहोत याचा टेंभा मरवण्यातील शान काही औरच! आम्ही येथे आल्यावर एकदाच काय ती वीज गायब झाली पण तरीही सुजितकडे गरम पाणी गॅसच्या बॉयलरवरच होत असल्याने आम्हाला ती गोष्ट विशेष जाणवेपर्यंत वीज पुन्हा सुरूही झाली. पुण्यात अलिकडे भारनियमन बरेच कमी प्रमाणात असले तरी त्याच्या वेळापत्रकाप्रमाणे कामाचेही तंत्र बसवावे लागते. केबलवाल्याचे आणि आमचे भारनियमन वेगवेगळ्या वेळात असल्याने दूरदर्शन दुप्पट काळ बंद असते. या सगळ्या गोष्टींच्या अभावामुळे बरेच वाटले. पण वीज व पाणी कधीच न जाण्याची संवय पुढील वारीमध्ये नडण्यची

शक्यता आहे हे त्यावेळी लक्षात आले नाही पण आम्ही तेथे नसताना एकदा सुजितच्या घरामागील झाड वादळाने पडले ते बरोबर स्वयंपाकघराची खिडकी तोडून घरात शिरले. त्यामुळे सर्व वीजजोडण्या खराब होऊन सर्व व्यवहारच बंद पडले सुदैवाने शेजारी मित्र व एडिसनमधील इतर मित्र यांच्या सहाय्याने त्याना कसेबसे दुरुस्ती होईपर्यंत दिवस काढणे शक्य झाले. खिडकीची भिंतच उघडी पडल्याने घर बंद करून बाहेर पडणे शक्य नव्हते व अर्धे अधिक व्यवहार वीज बंद पडल्याने बंद अशी विचित्र परिस्थिति झाली होती.

आपल्याकडे कसे रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग असल्यामुळे कोठल्याही अडचणींना तोंड देण्याची आपली क्षमता दांडगी आहे. कदाचित त्याचसाठी स्मार्ट शहर असा नुसता पुकारा करून परिस्थिती जैसी थे ठेवणे राज्यकर्त्यांना योग्य वाटत असावे. पावसाळ्यात निम्मी अर्धी पाण्यात बुडलेली मुंबई पावसाळा संपल्यानंतर पूर्ववत कामाला लागली अश्या बातम्या छापून कर्तव्यदक्ष मुंबईकर म्हणून कौतुक केले की झाले अश्या संकटांना तोंड द्यावे लागू नये अशी काही काळजी घ्यावी असे मात्र कोणाचेही शासन आले तरी शासनकर्त्यांना वाटत नाही हे आमचे केवढे भाग्य!

सुजितच्या घरातच वॉशिंग मशीन असल्यामुळे कपडे हवे तेव्हां धुवून टाकता येत होते त्यामुळे कपडे धुणारी बाई आली आता अंघोळ करून घ्या असा लकडा लावण्याचे सौ. चे सौख्य हिरावले गेले होते आणि माझी एक डोकेदुखी कमी झाली होती! काही सदनिकांत स्वतंत्र वॉशिंग मशीन नसते त्यांच्यासाठी सार्वजनिक वस्त्रस्वच्छता केंद्र संपूर्ण संकुलासाठी असून त्यात बरीच यंत्रे ठेवलेली असतात आणि ठराविक रकाम देऊन तेथे कपडे घेऊन जाऊन ठराविक रक्कम देऊन कपडे धुवून घेता येतात. आमच्या जवळील गुजराती बहुल वसाहतीत ही सोय होती. प्रथम त्यात काही नाणी टाकून यंत्र वापरण्याची सोय होती परंतु गुजूभाईनी त्यातून शक्कल काढून अमेरिकन नाण्यांच्याच आकाराची भारतीय नाणी टाकून स्वस्तात कपडे धुवून घेण्याची क्लुप्ती योजल्यामुळे ती व्यवस्था बंद करून सरळ सरळ प्रथम कपड्यांच्या आकारमानानुसार रक्कम घेऊनच यंत्र वापरण्याची परवानगी देण्यात येते. तेथे बराच वेळ जात असल्यामुळे बरेच लोक आठवड्यातून एकदा अगर दोनदाच कपडे धुण्याचा उपक्रम करतात. काही ठिकाणी अशी वस्त्रधुलाईकेंद्रे आहेत तेथे पैसे देऊन कपडे धुवून व वाळवून मिळतात, त्यातही काही काटकसरी (त्यात भारतीयच असतात असे नाही) लोक घरी कपडे धुवून फक्त

वाळवण्यासाठीही तेथे आणतात. त्यामुळे एका धुलाई केंद्रात येथे कपडे धुतले तरच वाळवून मिळतील असा फलकच लावला होता.

# १६. टपाल खाते

सुजित कामावरून आल्यावर घरात प्रवेश करताना एका हातात टपाल आणि दुसऱ्या हातात बराच छापील कागदांचा गठ्ठा घेऊन येत असे. संदेशवहनात इतकी प्रगती झाली तरी अजूनही अमेरिकन लोकांचा विश्वास टपाल खात्यावर आहे याचे कौतुक वाटले. आपल्याकडे मात्र टपालखात्याचे ९०% काम कुरियर सेवेनेच उचलले आहे. यात बहुतेक बँका, निरनिराळ्या कंपन्या यांचा समावेश होतो. एके काळी टपाल दिवसातून दोनदा आणि अगदी वेळच्यावेळी मिळत होते याच्यावर कोणाचा विश्वासच बसणार नाही. लग्न ठरल्यानंतर भावी पत्नीला मी दररोज पत्र पाठवून बेजार करीत असे त्यामुळे नाइलाजाने चार ओळीचे का होईना उत्तर तिला पाठवावे लागे त्या काळात मी पाठवलेले एक पत्र दुसऱ्या दिवशी तिला मिळून तिने लगेच पाठवलेले उत्तर मला तिसऱ्या दिवशी देण्याचा चमत्कार पोस्ट खात्याने केला आहे. आमच्या (माझ्याच)पत्रवाचनातील आतुरता जणू टपालखात्याच्याही लक्षात आली होती.

दुसऱ्या एका वेळी माझ्या बडोद्यात राहणाऱ्या बहिणीने माहेरपणासाठी घरी आल्यावर आपल्या पतिराजांना पाठवलेल्या

पत्रावर सगळा पत्ता बरोबर लिहून बडोदा व पिन क्रमांक लिहिताना तिला कसली एवढी घाई झाली होती कुणास ठाऊक (कदाचित टपालपेटीतून टपाल निघण्याची वेळ झाली असावी) पण त्या जागी तिने फक्त " बी" एवढे एकच अक्षर लिहिले आणि तसेच पत्र पोस्टात टाकले आणि आश्चर्य म्हणजे पत्त्यातील खाणाखुणांवरून पोस्टखात्याने ते बी म्हणजे बडोदा असेल असा तर्क करून ते पत्र बरोबर इष्ट पत्त्यावर पोहचविले हे आम्हाला कळण्याचे कारण म्हणजे लगेचच दोन तीन दिवसात आमच्या मेव्हण्यांचे एक जाडजूड पाकीट आले. खरेतर त्यांचाही बायकोसाठीच्या प्रेमळ शब्दांचा साठा माझ्याप्रमाणेच लग्नापूर्वी लिहिलेल्या पत्रांमध्येच खतम झाला होता असे असताना त्यांच्या त्या जाडजूड पाकिटाचे सर्वांनाच आश्चर्य वाटले पण ते उघडून पाहिल्यावर बहिणीच्या पत्राचे पाकीट(अर्थात तिने पाठवलेल्या पत्राचा कागद काढून घेऊन) त्यात त्यांनी ठेवलेले आणि पाहा कसा बावळटासारखा पत्ता लिहिला आहेस असा शेरा असलेले पत्र त्यात मिळाले. .

एकेकाळी असे कार्यक्षम असणारे टपाल खाते थोड्याच दिवसात इतके बिघडले की मी एकदा परगावी गेलो आणि परत यायला शनिवारपर्यंत उशीर होईल अशी तार केली ती मी प्रत्यक्षात शनिवारी घरी पोचल्यावर मिळाली आणि ती वेळेवर न पोचवल्याबद्दल सौ. ने तक्रार करताच हजरजबाबी पोस्टमनने "

त्यात शनिवारी पोचत आहे असेच लिहिले आहे ना? " असा मुंहतोड जवाब दिला. म्हणजे पोस्टमन तारा वाचून त्यातील तातडीनुसार त्यांचे वाटप करत असावेत! अलीकडे पोस्टखात्याकडे मुदतठेवीव्यतिरिक्त आणखी बऱ्याच गोष्टींच्या विक्रीचेही काम सोपवून शासनानेच त्यांच्या मूळ टपालवितरण कामाकडे दुर्लक्ष करण्यास उत्तेजन द्यायला सुरवात केली आहे. आता फक्त बिले आणि नोटिसा एवढेच काय ते टपालाने येते बाकी सर्वत्र कुरियरच वापरले जाते.

सुजितच्या सदनिकेच्या बाहेर असलेल्या पत्रपेटीत मात्र पोस्टमन अगदी नियमित टपाल टाकताना दिसे अर्थात त्यांना टपालखात्याची गाडी दिमतीस असे. आताही स्वतंत्र घरात राहायला गेल्यावरही तीच परिस्थिती आहे. मात्र त्यासाठी प्रत्येक घरमालकास घराबाहेर एक छोट्या खांबावर स्वतः ची टपालपेटी बसवावी लागते. आणखी एक चांगली बाब म्हणजे आपल्याला पाठवावयाचे पत्रही या पेटीवर ठेवल्यास ते तो पोस्टमन घेऊन जातो आणि पुढे ते योग्य ठिकाणी पाठवले जाते त्यासाठी पोस्टाची पेटी हुडकावी लागत नाही. पोस्टाच्या पेट्याही बऱ्याच ठिकाणी असतात आणि त्या चांगल्या दणदणीत मोठ्या असून आपल्या इकडल्यासारख्या झाडाला अथवा एकाद्या घराच्या भिंतीला लटकवलेल्या नसतात. आपल्याकडील पेट्यांची अवस्था पाहून

या पेटीत टपाल कसे टाकायचे याचाच पेच पडतो. पत्र आत घुसवताना ते न फाटता आत जाईल याची दक्षता घ्यावी लागते. लग्नपत्रिकांसारख्या आकाराने मोठ्या आणि संख्येने जास्त पाठवावयाच्या पाकिटांसाठी तर या पेट्या निरुपयोगीच असतात त्यासाठी पोस्टाच्या इमारतीत जाऊनच सगळी पाकिटे तेथील कर्मचाऱ्याच्या ताब्यात द्यावी लागतात. काटकसर जास्तीत जास्त कशी करावी हे आपल्या टपालखात्याकडून शिकावे कारण टपालकचेरीपासून टपालपेटीपर्यंत प्रत्येक गोष्ट कमीतकमी खर्चाचा आदर्श नमुना असते आणि तरी जनता म्हणते की " सरकार उधळपट्टी करते " उधळपट्टीसाठीच्या बाबी कोणत्या त्याची वेगळी यादी असते,

# १७. मॉलामाल

सुजितच्या हातातील कागदांचा दुसरा गठ्ठा असतो निरनिराळ्या मॉल्सच्या आकर्षक योजनांच्या

भेंडोळ्यांचा! एकावर एक फुकट हा प्रकार तर आपल्याकडेही अगदी सार्वत्रिक झाला आहे आणि नवनव्या शॉपिंग कॉम्प्लेक्सेसच्या उद्घाटनाबरोबर यांची संख्या वाढतच असते. इथल्या आणि आपल्या ऑफर्स यातील फरक एवढाच असतो की इथे त्यात फसवणुकीचा प्रकार कमी असतो किंवा नसतोच म्हटले तरी चालेल. घेतलेला माल परत घेण्याविषयी तर ते इतके तत्पर असतात की काही बहाद्दर भारतीयांनी भारतात जाताना नवा कॅंपकॉर्डर किंवा कॅमेरा घेऊन जाऊन तेथील मुक्कामात फोटो किंवा चित्रण करून महिन्याभरात येथे आल्यावर त्या वस्तू परत केलेल्या आहेत आणि काहीही प्रश्न न विचारता त्या परत घेतल्या गेल्या आहेत. कुठल्याही ट्रीपला जाताना ते असेच करतात असे त्यांनी मला अभिमानाने सांगितले. मला स्वतःला आलेला अनुभव म्हणजे मी एक घड्याळ एक डॉलरला मिळाले म्हणून घेतले पण घरी गेल्यावर त्यात काही दोष निघाल्यामुळे ते मी भीतभीतच परत

करायला गेलो तर विक्रेतीने एक शब्दही न बोलता पावती पाहून एक डॉलर काढून दिला.

थँक्स गिव्हिंग अथवा ख्रिसमसच्या सेलनंतर तर वस्तू परत घेण्यासाठीच खास काउंटर उघडलेले असतात. वाढदिवसालाही भेटी देताना त्याचबरोबर वस्तूची पावतीही दिली जाते ज्यामुळे आपल्याला पसंत नसेल तर ती वस्तू बदलून घेता येते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे येथे कोणतीही खरेदी करायला दूरच जावे लागत असल्याने केवळ वस्तू बदलून घेण्यासाठी दूर जाण्याचा कंटाळा येत नाही. आमच्या गावातील एक स्टेशनरी वस्तु विकणारा दुकानदार तर एवढा खविस होता की वस्तु परत घेण्याची बात तर दूरच पण त्याच्या दुकानातील एकाद्या वस्तूस चुकून तुमचा हात लागला तर त्याचा अर्थ ती वस्तु तुम्ही विकत घेतली आणि तिचे पैसे वसूल करून ती वस्तु तुमच्या गळयात मारणारच, त्यामुळे त्याचे आडनाव महाडिक होते तर आम्ही त्याला महाडिन्क म्हणत असू.

ऑफर्ससाठी लोक किती जीव टाकतात हे एका मॉलच्या थँक्सगिव्हिंग सेलच्या २२ नोव्हेंबरच्या खरेदीसाठी २१ तारखेच्या रात्री बारापासून लोक रांगा लावून उभे होते यावरून लक्षात येईल. एक महिला तर आठ महिन्याची गरोदर असून त्या मॉलपासून ३०-

४० मैल अंतरावरून येऊन रांगेत उभी होती. तिला वॉशिंग मशीन अगदी स्वस्तात मिळाले म्हणे. बहुतेक होणाऱ्या बाळाचे कपडे घरच्याघरी धुता यावे यासाठी तिचा हा सगळा आटापिटा असावा. माझ्या मुलाने पण अश्याच एका ऑफर्सचा फायदा घेण्यासाठी पहाटे पाच वाजता मॉलपर्यंत जाण्याचा विक्रम केला पण तोपर्यंत त्याला हवी असलेली वस्तू संपल्यामुळे त्याला हात हालवत परत यावे लागले, पण त्यात मजेची गोष्ट म्हणजे घरी आल्यावर सहज काँप्यूटरवर पाहत असताना तीच वस्तू ऑनलाइन खरेदीत त्याच कमी किमतीत उपलब्ध असल्याचे त्याला दिसले आणि त्याबे ऑर्डर नोंदवल्यावर खरोखरच दोन दिवसात ती वस्तू घरपोच मिळाली. आपल्याकडे मात्र अशा ऑफर्सची लालूच दाखवून ग्राहकांना आकर्षित करायचे आणि नंतर मात्र काहीतरी कारण दाखवून नको असलेली वस्तूच ग्राहकाच्या गळयात घालायची असे प्रकार होत असल्याचे आम्हाला आम्ही त्या भानगडीत पडत नसल्याने वृत्तपत्रातील बातम्यांवरूनच कळते. सिंहगड रस्त्यावरील मॉलमध्येच पेपरची रद्दी २५ रु. किलो या भावाने घ्यावयाचे आमिष दाखवून तेवढ्या रकमेची खरेदी त्या मॉलमध्येच करायला लावून त्यांना नको असलेला माल ग्राहकाच्या गळयात घालण्याचे प्रकार घडले आहेत.

मॉलमध्ये खरेदीस जाण्यात सर्वात मोठी अडचण म्हणजे तेथे वेळ फार जातो आणि गाडी पार्क करायला जागा मिळेल याची खात्री नसते. कधीकधी केवळ गाडी लावायला जागा न मिळाल्यामुळे खरेदीच रद्द करावी लागली आहे. एकदा सुजितसाठी जॅकेट घ्यायला गेलो, सुदैवाने गाडी लावायला जागा मिळाली या आनंदात आम्ही मॉलमध्ये शिरलो. त्याच्या मापाचे जॅकेट शोधायला जवळ जवळ अर्धा पाऊण तास लागला. कारण तो काही माझ्यासारखा बसले ना अंगावर चला घेऊन टाका अश्या वृत्तीचा नाही. मी मात्र बायकोसुद्धा समोर जी पहिली आली तिलाच पसंत करून टाकले, तो माझा शहाणपणाच झाला कारण बऱ्याच परिचितांनी बऱ्याच मुली पाहून पुन्हा पहिली जिला नकार दिला होता तिलाच बाबापुता करून तयार केले, असो! अर्थात

जॅकेटची गोष्ट जरा वेगळी! असो येवढ्या परिश्रमानंतर ते सापडल्यावर सुजितला रेस्टरूमला जायची इच्छा झाली. एवढ्या शोधानंतर सापडलेले जॅकेट मग माझ्या हातात देऊन तो रेस्टरूममध्ये गेला आणि मी त्या जॅकेटचा हँगर हातात धरून वेड्यासारखा उभा, जवळ कुठे बसायलाही जागा नाही. सुजित आल्यावर त्याला आपल्याला पँटही घ्यायची आहे याची आठवण झाली, पुन्हा तेथे जॅकेटसह जाऊन अर्धा तास घालवला, हवी तशी

पँट सापडल्यावर मग ती अंगावर घालून बघण्यासाठी तो ट्रायल रूममध्ये गेला तेथून परत येईपर्यंत परत मी जॅकेट घेऊन उभा!

सुदैवाने ती पँट त्याला बरोबर बसली. मग त्यानंतर एक लहान मुलाचे जॅकेट आमच्या नातवासाठी घ्यायचे होते. सगळीकडे शोधले पण लहान मुलांचे कपडे कोठे दिसेनात अखेर मॉलमधील कर्मचाऱ्यास विचारल्यावर त्याने तो विभाग वरच्या मजल्यावर आहे असे सांगितले मग आम्ही मोठे जॅकेट आणि पँटचे ओझे वागवीत वरच्या मजल्यावर निघालो. तेथे परत लहान मुलांच्या जॅकेटचा विभाग शोधण्यात दहा पंधरा मिनिटे गेल्यावर सुदैवाने सापडलेल्या विभागात हवे असलेले जॅकेट पाचच मिनिटात सापडल्यामुळे आनंदाने आम्हाला अगदी आर्किमेडिजसारखे युरेका युरेका म्हणत नाचावेच वाटण्याचे बाकी होते पण एवढ्यावर कुठे भागणार होते त्याच विभागात असणाऱ्या काउंटरवर आम्ही बिल करून पैसे देण्यासाठी थांबलो.

पण तेथेही आमच्या अगोदर चारपाच मंडळी होतीच. त्या काउंटरवर खरे तर दोन स्त्रिया बिले करण्यासाठी होत्या पण त्यातील एक कोठेतरी गुप्त झाली होती, आमच्या पुढे असणाऱ्या रांगेत सर्वात पुढे असणाऱ्या भारतीय स्त्रीचेच बिल तेथे असणारी मुलगी अगदी शांतपणे करत होती. तो सेलचा हंगाम असल्याने आणि त्या

पहिल्या स्त्रीने घरी आलेल्या भेंडोळयांतील सवलत पत्रकांचा सूक्ष्म अभ्यास करून आपल्या दोन अपत्यांसाठी इतक्या निरनिराळया कपड्यांच्या तऱ्हा घेतल्या होत्या की तिचे बिल करण्यासाठी एका स्वतंत्र काउंटरचीच आवश्यकता होती. त्यात तिने निवडलेल्या कपड्यांना तिने गोळा केलेली सवलतीची तिकिटे लागू पडत नसल्यास लगेच ती तो कपडा नाकारत असे. अशा प्रकारे तिने नाकारलेल्या कपड्यांचा ढीग मागे उभे असणाऱ्या आम्हा सर्व ग्राहकांच्या एकत्रित खरेदीपेक्षा जास्त होता. शेवटी अर्धा तास वाट पाहिल्यावर एकदाचा तिचा ढीग संपला तरी परत बिलाच्या रकमेविषयी ती त्या क्लार्कशी हुज्जत घालत होतीच तिच्या आणि आमच्या मध्ये असणारे तीन अमेरिकन ग्राहक बिचारे शांतपणे हा सर्व गोंधळ पाहत होते अर्थात आम्हीही भारतीय असलो तरी मनातल्या मनात तिला शिव्या देण्यापलीकडे काय करणार होतो?भारतात मात्र मागील ग्राहकांनी “ए बाई, तुझा सगळा घोळ नंतर मिटव, आम्हाला एक दोन वस्तूच घ्यायच्यत तेवढ्या घेऊदे मग बस तू शान्तपणे तुझी खरेदी करत” असे सुनावले असते. मधल्या तीन गिऱ्हाईकांनी मात्र आमच्यासारखीच अगदी मोजकीच खरेदी केल्यामुळे त्यानंतर पाच दहा मिनिटातच आमचा नंबर लागला आणि मी सुटकेचा श्वास सोडला,

पण तेवढ्यावर भागण्याचा तो दिवस नव्हता कारण सुजितने खरेदी केलेल्या जॅकेटवर किमतीचा शिक्का असणारा कापडाचा तुकडा तेवढा बरोबर नव्हता त्यामुळेआम्ही खालच्या मजल्यावर जॅकेट निवडले असल्यामुळे तेथील बिलकाउंटरवरच त्याचे बिल होईल असे आम्हाला सांगण्यात आले आणि मग आमची वरात खालच्या मजल्यावर आली सुदैवाने तेथील काउंटरवर दोन बिलिंग क्लर्क्स होते आणि दोघांच्याही पुढे एकएकच गिऱ्हाईक होते. त्यामुळे आमचा नंबर लगेचच लागला पण तेथील क्लार्कनेही सुजितचे जॅकेट उलटसुलट करून पाहत त्यावर किमतीचा शिक्का नसल्यामुळे आम्ही जॅकेट जेथून निवडले तेथे जाऊन तसलेच दुसरे जॅकेट घेऊन या त्याच्यावर असलेला किमतीचा शिक्का पाहून मग बिल करता येईल असे सांगून पुन्हा आम्हाला अगदी सापशिडीच्या खेळासारखे आरंभस्थानावर पाठवले.

आता त्या एवढ्या मोठ्या मॉलमध्ये आम्ही इतके फिरलो होतो की ते जॅकेट कोठे निवडले होते हे आठवण्यास आणि ती जागा शोधायलाही बराच वेळ गेला सुदैवाने त्याच प्रकारचे दुसरे जॅकेट तेथे होते हे आमचे भाग्य नाहीतर आम्हाला जॅकेट तयार करणाऱ्या उत्पादकाकडेच जावे लागले असते अश्या प्रकारे जवळजवळ दोन तासात तीन वस्तूंची खरेदी (जी मी सिंहगड रोडवरच्या दुकानात घरातून निघून पायी तेथे जाऊन अर्ध्या तासात

करून घरी येऊ शकलो असतो)करून आम्ही विजयी मुद्रेने बाहेर पडलो. माझी परिस्थिती अगदी गाढव मेले ओझ्याने आणि शिंगरू मेल हेलपाट्यानं त्यातल्या शिंगरासारखी झाली होती. इतके झाल्यावर जेव्हां सुजितला गाडी कोठे पार्क केली हे आठवेना (साहजिकच आहे, एवढे उलटसुलट फिरल्यावर असे होणे)तेव्हा मी तेथेच बसकण मारण्याच्या परिस्थितीत होतो पण बसकण मारायलाही जागा नव्हती. अखेर कसेबसे गाडीपर्यंत पोचून घरी आल्यावर आता खरेदीसाठी कधीही न जाण्याचा निश्चयच जणू मी केला.

# १८. ऑफिस ऑफिस!

सहा महिन्यासाठी भारताबाहेर राहण्यात माझ्या दृष्टीने महत्त्वाचा फायदा म्हणजे त्या काळात कोठल्याही कार्यालयाचे तोंड पाहावे लागत नाही. आपल्याकडे कार्यालयात मग ते कोणतेही असो, जायचे म्हणजे माझ्या अंगावर अगदी काटा उभा राहतो. अगदी आपल्या आपुलकीच्या माणसांची अशी जाहिरात केलेल्या बँकेतसुद्धा जायचे माझ्या जिवावर येते. आता ए. टी. एम्. वर पैसे काढण्याची सोय झाल्यामुळे बँकेत प्रत्यक्ष जायचे काम कमीच पडते म्हणा पण त्यामुळे तर कधीतरीच बँकेत जाताना छातीत आणखीच धडधडू लागते. ए. टी. एम्. मुळे प्रत्यक्ष बँकेत जावे लागले नाही तरी तेथूनही दूरनियंत्रणाने ग्राहकास छळता येतच नाही असे नाही. एकदा माझ्या मित्राने एका नामवंत (म्हणजे परत तीच आपुलकीची आणि आपली)बँकेच्या पुणे विद्यापीठ द्वारावरील ए. टी. एम्. मधून पैसे काढण्याचा प्रयत्न केला पण बहुधा यंत्रातील कॅश संपल्यामुळे किंवा आणखी कोणत्यातरी कारणामुळे पैसे काही मिळाले नाहीत मात्र जी स्लिप यंत्रातून बाहेर पडली त्यावरून पैसे खात्यातून वजा झाले होते असे दिसत होते. त्या बिचाऱ्याचे धाबे दणाणले. त्याने लगेच तेथूनच बँकेला फोन

केला पण त्यांनी उलट निर्ढावल्यासारखे त्यालाच विचारले, "तुम्हाला पैसे मिळाले नाहीत कशावरून?" हा म्हणजे चोराने चोरी करून आपण मुद्देमालासह पकडले तरी''ही वस्तू तुमचीच हे कश्यावरून असे विचारावे तसेच झाले. ते प्रकरण नंतर बरेच दिवस चालू होते. या बॅंकेने त्यांच्याच कर्मचाऱ्याच्या मुदत ठेवीची पावतीच गहाळ करून मुदत संपल्यानंतर मिळणाऱ्या रकमेसाठी त्याला बरेच तंगवले होते हे तो कर्मचारी माझा मित्र असल्यामुळे मला कलले.

मला मात्र एकदा कर्मधर्मसंयोगाने बँकेलाच (तीसुद्धा आपुलकीच्या माणसांची) छळण्याचा योग लाभला. त्यावेळी मी औरंगाबादला होतो आणि त्याच महान बँकेत माझे खाते होते. आणखी सुदैवाने माझे तेथील एका खिडकीधारकाशी मैत्री पूर्ण संबंध होते. त्यामुळे मला पैसे काढायला काही त्रास व्हायचा नाही. त्यावेळी पैसे चेकने काढण्याऐवजी बँकेतील स्लिप भरूनच काढले जायचे. (आजही त्या बँकेचा आग्रह असतो की चेकचा कागद महाग असल्यामुळे पैसे स्लिपनेच काढा किती ही काटकसर! एकदा तर या बॅन्केने मी चेकबुक वापरून पैसे काढले म्हणून मला ज्यादा आकार लावला होता तेव्हां खाते बंद करण्याची मी धमकी दिल्यावर बॅन्केच्या व्यवस्थापिकेने माघार घेतली!)त्यामुळे पासबुकच्या नोंदीवरूनच आपली शिल्लक(असलीतर) काय आहे

हे कळायचे. माझे पासबुक संपले होते आणि मी मागणी करूनही मला नवे पासबुक मिळाले नव्हते तसे मी शाखाप्रमुखांच्याही निदर्शनास आणले होते. त्यामुळे माझ्या खात्यात शिल्लक आहे का नाही आणि असल्यास किती आहे याची कल्पना मला नव्हती.

खिडकीवरील मित्राने शिल्लक असेल या कल्पनेने मला हवी ती रक्कम दिली आणि मी खिडकी सोडली. त्यानंतर माझी बदली औरंगाबादहून सोलापूरला झाली आणि मला त्वरित सोलापूरला जावे लागले. सोलापूरला मी थोडा स्थिरस्थावर होईतोवर एक दिवस अचानक आमच्या घरी त्या बँकेचे मॅनेजरमहोदय हजर झाले. मला आश्चर्यच वाटले कारण त्यांचा आणि माझा परिचय असला तरी लगेच सोलापूरला माझ्या घरी येऊन माझी गाठ घ्यावी इतका दृढ नव्हता. त्यांचे बँकेचे काम तेथे निघाल्यामुळे आलो अशी सुरवात करून अंदरकी बात नंतर उघड करत ते म्हणाले, " अहो, तुमच्या खात्यात रक्कम नसताना तुम्ही पैसे काढलेत आणि इकडे आलात आता आमची पंचाईत झाली आहे. " यावर मी बँकेकडून नवीन पासबुक न मिळाल्यामुळे असे झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आणल्यावर "आता झाले ते झाले पण आता लवकर पैसे भरून टाका" अशी विनंती त्यांनी केली. मी बँकेला पत्र लिहून माझी चूक नसताना असे झाल्यामुळे मला शक्य होईल त्यावेळी आणि त्या पद्धतीने मी पैसे भरेन असे कळवले आणि तसेच केले.

आता आपुलकी सिद्ध करणे बँकेला भाग होते. त्याचा वचपा त्यानी बहुतेक मला व्हिसासाठी डी डी पाहिजे होता त्यावेळी काढला (त्याचा उल्लेख सुरवातीसच केला आहे)

अश्या अनुभवांमुळे भारतात कोणत्याही कामासाठी शासकीय वा निमशासकीय कचेरीत जायचे म्हणजे माझे मानसिक संतुलन तेथे जाण्यापूर्वीच आपल्याला कोणते अनुभव येणार या कल्पनेने बिघडायला सुरवात होते कदाचित हा माझाही दोष असू शकेल. कोणत्याही ऑफिसच्या खिडकीमागील व्यक्ती आपल्याकडे शत्रुवत् पाहत आहे असे उगीचच वाटते. तरुण वयात अंगात रग असल्याने अशा व्यक्तीशी आवश्यक असल्यास भांडण्याची खुमखुमी होती पण आता तो उत्साह उरला नाही. ऑफिस ऑफिस ही पंकज कपूरची मालिका जरा अतिशयोक्तिपूर्ण असली तरी त्यातील निरनिराळ्या ऑफिसात येणारा अनुभव बऱ्याच अंशी आपल्याला येणाऱ्या अनुभवांशी मिळताजुळता असतो. कोणत्याही ऑफिसात न जावेसे वाटण्यामागे हेच कारण असते. त्यामुळे अमेरिकेत अशा कामाविषयीचे काही अनुभव ज्यात ते ज्या कामासाठी ऑफिसात गेले तेथील कर्मचाऱ्याने चहा पाजून नंतर त्यांचे काम केले असे मुलाकडून ऐकल्यावर. इतकेच काय एकदा मलाही तसा अनुभव आला. तेव्हां येथील सामान्य नागरिकाचा हेवाच वाटू लागला.

माझ्या मुलाला ग्रीनकार्ड मिळण्याच्या वेळी जन्मतारखेचा दाखला आवश्यक होता. आजपर्यंत त्याच्या एस्. एस्. सी. च्या प्रमाणपत्रावरील तारखेवर काम भागत होते पण आता मात्र येथील कार्यालयाला त्याचा जन्म ज्या तहसील वा ग्रामपंचायत क्षेत्रात झाला त्यांचाच म्हणजे सुजितच्या बाबतीत औरंगाबाद महापालिकेच्या आरोग्यविभागाचाच हवा होता. जन्ममृत्यूच्या दाखल्याविषयी आकाशवाणीवरील (त्यावेळी टी. व्ही. ऊर्फ दूरदर्शन नव्हते) निवेदक कानीकपाळी ओरडत असतानाही नेहमीच्या आळशी प्रवृत्तीनुसार लगेच आवश्यक नसल्यामुळे त्याच्या जन्माचे प्रमाणपत्र ताबडतोब घेऊन ठेवावे असे काही मला वाटले नाही. मुलांना शाळेत घालतानासुद्धा आम्हाला या दाखल्यांची जरुरी पडली नव्हती त्यामुळे सुजितचा जन्माचा दाखला आपण घेतलाच नाही याची आठवण जेव्हा त्याने आम्हाला फोन करून त्याची अडचण सांगितली तेव्हा झाली. त्याच्या एका मित्राचा जन्म सोलापूरला झाला होता त्यालाही अशीच अडचण उपस्थित झाली होती. आपापल्या महापालिकांमध्ये आम्ही पालकांनी बऱ्याच चकरा मारण्यासाठी कंबर कसली. कारण इतक्या पूर्वीचे प्रमाणपत्र मिळवायचे म्हणजे शिवाजी महाराजांच्या जन्माची तारीख शोधण्यासारखे इतिहाससंशोधनाचे काम होते आणि ते महापालिका

कर्मचाऱ्यांकडून करून घ्यायचे होते. त्यामानाने मी सुदैवी ठरलो कारण सुजितचा जन्म शासकीय रुग्णालयात झाला होता आणि सुजितच्या जन्माचे रेकॉर्ड रुग्णालयातून महापालिकेला गेल्याचा पुरावा उपलब्ध झाला त्याचा उपयोग होऊन तरीही थोडासा हात मोकळा सोडल्यावरच पण काम झाले. !

सुजितच्या मित्राच्या वडिलांना म्हणजे माझ्या सोलापूरच्या मित्राला महापालिकेने बऱ्याच चकरा मारायला लावून शेवटी काही ताकास तूर लागू दिली नाही. त्यांचा लगेचच अमेरिकेस जाण्याचा बेत होता त्यामुळे बरोबरच प्रमाणपत्र घेऊन जायचे त्याने ठरवले होते पण आता ते शक्य नव्हते म्हणून त्यांनी अमेरिकेत गेल्यावर तेथे तसे शपथपत्र (ऍफिडेविट)करायचे असे ठरवले. त्यामुळे अमेरिकेत गेल्यावर अगदी प्रथम ते काम करायचे त्यांनी ठरवले. त्याप्रमाणे त्यांच्या मुलाने नोटरीच्या कार्यालयात फोन करून अशा प्रकारचे ऍफिडेविट करावयाचे आहे त्यासाठी पूर्वसम्मती मागितल्यावर त्याला नोटरीने एका विशिष्ट दिवशी वडिलांना घेऊन येण्यास आणि काही कागदपत्र पुरावा म्हणून घेऊन येण्यास सांगितले. माझा मित्र त्या दिवशी सांगितलेल्या वेळी गेला. नोटरी त्याच्या टेबलावर सर्व कागदपत्र घेऊन वाटच पाहत होते. त्याची जी काही फी होती ती भरून पावती त्यांना दाखवल्यावर त्यांनी माझ्या मित्राच्या सह्या त्या ऑफिसने तयार केलेल्या कागदपत्रावर

घेतल्या हे काम साधारणपणे दहा ते पंधरा मिनिटात झाले आणि भारतात असलेल्या नोटरीच्या अनुभवानंतर देण्याघेण्याच्या वाटाघाटी काय करायच्या या चिंतेत असणाऱ्या मित्राला अधिकाऱ्यानेच "तुमचे काम झाले आहे आता तुम्ही जाऊ शकता" असे सांगितल्यावर आश्चर्याचा धक्काच बसला. त्याने नंतर मला हे सांगितल्यावर आपणही उगीचच महापालिकेच्या चकरा मारल्या असे वाटून गेले.

वरील घटना केवळ अमेरिकेत सामान्य नागरिकांना लहानसहान कामासाठी कसा त्रास होत नाही याचे उदाहरण म्हणून सांगितली. मात्र अशा सोप्या पद्धतीने गोष्टी होत असल्याने जन्माचा दाखला किंवा खोटे पासपोर्टसुद्धा दहशतवादी किंवा आंतरराष्ट्रीय गुन्हेगार कसे मिळवतात याचे वर्णन आर्थर हेली यांच्या “द इव्हिनिंग न्यूज” या कादंबरीत वाचायला मिळाल्यावर (पण तेच आम्हाला व्हिसा देताना कसे काय बदलतात कुणास ठाऊक?) सामान्य नागरिकास त्रास झाला तरी चालेल पण देशाचे नुकसान व्हायला नको केवळ या हेतूने प्रेरित झाल्यामुळेच भारतीय पालिका, पोलिस किंवा पासपोर्ट ऑफिसमधील कर्मचारीही आपले काम एवढ्या बारकाईने करतात हे ध्यानात येऊन त्यांच्या दक्षतेचे कौतुक करावेसे वाटले मात्र त्यांच्या या दक्षतेतून नेमकी नको असलेले (किंवा पोलिसांना हवे असलेले)लोकच कसे

सुटतात हे कोडे मात्र उलगडले नाही. या दक्षतेचा अनुभव परत जाताना मला घ्यायचाच होता

अमेरिकेतील ऑफिसचा आणखी एक अनुभव माझ्या मोठ्या मुलाला मोटर चालन परवाना (ड्रायव्हिंग लायसेन्स) घेण्याच्या वेळी आला. त्याला २००४ मध्ये त्याच्या कंपनीने अमेरिकेत पाठवले त्यामुळे त्यालाही कार चालवण्याचा परवाना घेणे भागच होते. भारतात चारचाकी वाहन चालवण्याचा कायम स्वरूपाचा परवाना त्याचा होताच पण येथील नियम वेगळे शिवाय लेफ्ट हँड ड्राइव्ह असल्यामुळे त्याला येथील आर. टी. ओ. (त्याला येथे डिपार्टमेंट ऑफ मोटर व्हेइकल्स म्हणतात)कडे जाणे आलेच. आमच्या घराजवळील ऑफिसला त्याने भेट दिली तेव्हा ते डी. एम्. व्ही. ऑफिस नसून एकाद्या छोट्या आय. टी. कंपनीचे ऑफिस असावे असे त्याला वाटले. आत शिरताच त्याला एक छोटा फॉर्म स्वागतिकेकडून मिळाला आणि तो भरून दिल्यावर लेखी परीक्षेसाठी एका संगणकाकडे त्याला पाठवण्यात आले. वाहन चालनाच्या नियमांविषयी ३० प्रश्न संगणकावर त्यांना विचारण्यात येतात आणि त्यातील ८०% प्रश्नांची उत्तरे बरोबर येणे आवश्यक होते. माझ्या मुलाने अगोदरच तयारी केल्यामुळे त्याने २४ प्रश्नांची उत्तरे ओळीने बरोबर दिल्यावर त्याला पुढचे प्रश्न न विचारताच तू पास झाला आहेस असे संगणकावर सूचित करण्यात

आले. त्यानंतर प्रत्यक्ष गाडी चालवण्यास सांगतील असे त्याला वाटले पण तसे काही न होता एकदम त्याच्या हातात परवानाच देण्यात आला, कारण त्याला पुणे आर. टी. ओ. कडून चारचाकी वाहन चालवण्याचा कायम परवाना मिळालेला होता आणि बहुधा पुण्यात गाडी चालवणारा जगात कोठेही गाडी चालवू शकेल याचा त्यांना विश्वास असावा. तसा परवाना नसलेल्या त्याच्या बायकोलाही काहीही कटकट न करता परवाना मिळाला मात्र तिला प्रथम शिकाऊ परवाना काढून काही दिवसांनी लेखी (संगणकापुढील) परीक्षा देऊन प्रत्यक्ष गाडी चालवून दाखवावे लागले.

याच ऑफिसने एका स्त्रीला या टेस्टसाठी जवळ जवळ २५-३० वेळा यायला लावले होते आणि इतक्या चकरा मारायला लावल्यावर तिने टेस्ट व्यवस्थित दिल्यावरच तिला परवाना देण्यात आला असे एका बातमीत मी वाचले होते. कदाचित त्या तरुणीने आपले नाव गिनीज बुकमध्ये यावे या हेतूने असे मुद्दामच केले असल्यास न कळे. पण आणखी एक मजेची गोष्ट म्हणजे एकदा मोटर ड्रायव्हिंग स्कूलची फी भरली की परवाना मिळेपर्यंत कोणतीही ज्यादा फी न घेता त्या व्यक्तीला ट्रेनिंग द्यावे लागते म्हणे. आपल्याकडे मात्र एकदा फी भरली की एका महिन्यात तुम्हाला गाडी चालवता येवो अथवा न येवो मोटर ड्रायव्हिंग स्कूल परवाना

मिळवून देण्याची हमीच घेत असते. म्हणजे दोन्हींचा अर्थ एकच उलट आपल्याकडे वेळेची बचत हा उच्च हेतू वाचावि (वाहन चालन विद्यालये)यानी बाळगलेला असतो. काही वेळा तुम्ही टेस्ट न देताही परवाना घरपोच मिळतो इतक्या सुविधा असल्यावर उगीचच आर. टी. ओ. कडे जाण्याची तसदी कशाला घ्यायची?शिवाय असे प्रशिक्षित वाहन चालक अनेक लोकांना स्वर्गवास घडवतात किंवा कमीतकमी नामस्मरणाचे पुण्य त्यांच्या पदरी बांधतात हे आणखी वेगळेच!

अमेरिकन शासकीय कार्यालये जरी सामान्य माणसाचा असा विचार करत असली तरी आपण मात्र काम बारकाईने आणि शक्य तेवढ्या कंटाळवाण्या पद्धतीने करण्याचा भारतीय बाणा अमेरिकेतसुद्धा सोडायला तयार नसतो. याचा अनुभव आपल्या परवान्याचे नूतनीकरणाच्या वेळी माझ्या मुलांना आला. न्यूयॉर्कमधील भारतीय पासपोर्ट ऑफिससुद्धा कोणत्याही भारतीय शहरातील पासपोर्ट ऑफिसच्या तोंडात मारेल इतके गचाळ आणि तितकेच अकार्यक्षम आहे. थोडक्यात आपले भारतीयत्व टिकवून आहे. (आता मात्र पुण्यातले खूपच चकचकीत व व्यवस्थित जाले आहे इतके की न्यूयोर्कमधील पारपत्र ऑफीसमधील कर्मचाऱ्यांनी येऊन पहावे,)न्यूयॉर्कमधील एका जुनाट इमारतीच्या तळघरातील दोन खोल्यांमध्ये हे थाटलेले आहे. पासपोर्ट आणि व्हिसासंबंधित

वेगवेगळी कामे सांभाळण्यासाठी यात आठ खिडक्या किंवा टेबले आहेत, पासपोर्टचीच कामे जास्त असतात कारण भारतात जाण्यासाठी व्हिसा मागायला अमेरिकन नागरिकांची अजून गर्दी व्हायला सुरवात झाली नाही. (मध्ये एका पेपरमध्ये एक कार्टून आले होते त्यात रुपया इतका वधारलाय की भारतात जायला व्हिसा मिळत नाही याबद्दल एक अमेरिकन नागरिक खट्टू झाल्याचे दाखवले आहे`.)त्यामुळे खरे तर पासपोर्टचेच काम महत्त्वाचे असून त्यासाठी तीन खिडक्यांचा वापर करण्यात येतो आणि इतर बिनमहत्त्वाच्या कामासाठी बाकीच्या खिडक्यांचा! त्यामुळे पासपोर्टच्या खिडक्यांसमोर बऱ्याच लांब रांगा असतात बऱ्याच वेळा एवढ्या माणसांना उभे राहायला पुरेशी जागाही त्या ऑफिसात नाही. (मला माझा औरंगाबादमधील पासपोर्ट कार्यालयाचा सुखद अनुबव आठवला.)

पासपोर्टच्या नूतनीकरणासाठी लागणारे सर्व कागदपत्र घेऊन आणि जुना पासपोर्ट घेऊन आपण त्या ऑफिसमध्ये प्रवेश केल्यावर रांग लावायच्या जागेपासून अडचणीस सुरवात होते इतकी ती जागा आकाराने लहान आहे, नेहमीप्रमाणे या खिडकीवर नको त्या खिडकीवर जा असे होऊन एका खिडकीवर कागदपत्र स्वीकारले जाऊन त्याची पावती मिळाल्यावर खास भारतीय पद्धतीनुसार आमच्या चिरंजीवांना एक आठवड्यानंतर पासपोर्ट

न्यायला येण्यास सांगण्यात आले. आता परत एक दिवस रजा काढून येण्याऐवजी त्यातल्या त्यात प्रयत्न करायचा म्हणून त्यांनी सांगितलेल्या दिवशी ऑफिसमधून जरा लवकर निघून पासपोर्ट मिळतो का पाहावे असा त्याने विचार केला.

पासपोर्ट ऑफिसमधील बऱ्याच खिडक्यांपैकी एकावर उभा राहिल्यावर त्याचा नंबर आल्यावर पावती पाहून ही पावती ज्या खिडकीवर मिळाली त्याच खिडकीवर जा असा सल्ला देण्यात आला. त्या खिडकीवर बरीच गर्दी होती शिवाय त्या रांगेतील पहिला क्रमांक खिडकीतून दिसणाऱ्या माणसाशी हुज्जत घालत होता त्याअर्थी आपले काम आज होत नाही अशी चिरंजीवांची खात्री पटली पण तेवढ्यात त्या खिडकीवर जास्त गर्दी आहे असे पाहून त्यावरील काही व्यक्तींनी शेजारच्या खिडकीवर जावे अशी सूचना करण्याचे सौजन्य दाखवण्यात आले खरे पण झटपट ती खिडकी गाठणाऱ्या माझ्या मुलाने ती पावती दाखवताच त्या खिडकीतील कर्मचाऱ्याने मात्र त्या सौजन्याची ऐशी तैशी असे म्हणत हा क्रमांक माझ्याकडे नाही असे म्हणून हात झटकले पण माझ्या मुलाने दोनच मिनिटापूर्वी तुम्हीच अशी घोषणा केली होती असे सांगितल्यावर आणि सुदैवाने शेजारील खिडकीतील व्यक्तीकडे त्या क्रमांकाचा पासपोर्ट होता हे ध्यानात आल्यामुळे त्याला तो मिळाला खरा पण पुढच्या लोकांना मात्र दुसऱ्या

दिवशीच या असे सांगण्यात आले. हा अनुभव ऐकल्यावर आपण भारतातच आहोत असे वाटून गेले. तरीही आपल्याकडे पासपोर्ट नूतनीकरण म्हणजे अगदी पुनश्च हरी ओम् असा जो प्रकार असतो म्हणजे पुन्हा पोलिस चौकशी वगैरे सव्यापसव्यास तोंड द्यावे लागते तेवढा तरी येथे नसतो एवढीच त्यातल्या त्यात जमेची बाब!

# १९. सुजितचा साखरपुडा

अमेरिकेला आल्यावर आमच्याकडून आणखी एक महत्वाची कामगिरी पार पडायची होती. सुजितने अमेरिकेत बोलावले की आपल्याला जावे लागेल अशी अपेक्षा होतीच. शिवाय सेवानिवृत्तीनंतर न जाण्यासाठी काही सबब पण दाखवता येणार नव्हती. आणि तसे काही कारण पण नव्हते. पण मधल्या काळात आम्हाला एक नातू झाला आणि सगळे चित्रच बदलले. माझ्या आजोबा झालेल्या मित्रांच्या ज्या नातूप्रेमाला मी हसत होतो त्याचा आता मला उलगडा झाला म्हटले तरी चालेल. यापूर्वी माझ्या त्या मित्राचा मुलगा अमेरिकेत गेला पण जाताना तो एकटाच गेला त्याचा छोकरा आणि बायको भारतातच राहिले. पण नंतर एक वर्षाने त्यांना न्यायचा विचार त्याने जाहीर केल्यावर माझ्या मित्राने त्याला विरोध करण्याचा बराच प्रयत्न केला शेवटी त्याच्या धाकट्या भावाला मुलगा किंवा मुलगी झाल्यावर त्यांना त्याने घेऊन जावे असे मत त्याने व्यक्त केले अर्थात शेवटी त्याला मुलाचे म्हणणे मान्य करावेच लागले.

त्यावेळी मी त्या मित्राची बरीच खिल्ली उडवली पण आता माझ्यावर जवळ जवळ तसाच प्रसंग आल्यावर मात्र त्याला काय

वाटले याची कल्पना आली. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत मी सौ. ला " अग हा (म्हणजे आमचा नातू) थोडा मोठा झाल्यावर आपण गेलो तर नाही का चालणार? " असे म्हणत होतो पण "रघुकुलरीती सदा चली आयी प्राण जाइ पर बचन न जाई" अशा तिच्या वृत्तीमुळे एकदा ठरवलेल्या कार्यक्रमात बदल घडणे शक्य नव्हते हे मला माहीत होते. यापूर्वीही आमच्या लग्नानंतर सुरवातीच्या काळात जर एकाद्या पिक्चरला जायचे ठरवून काही कारणाने मी तो कार्यक्रम पार पाडू शकलो नाही तर येणाऱ्या गंभीर प्रसंगाला तोंड देण्याचा अनुभव पदरी असल्याने यात बदल घडणे शक्य नाही याची कल्पना मला नव्हती असे नाही आणि झालेही तसेच. मात्र माझ्या मनाविरुद्ध का होईना पण तिच्या मनासारखे केल्यावर झाले ते बरेच असे म्हणण्याची पाळी शेवटी मजवर येतेच आणि यावेळीही तसेच झाले कारण आमच्या जाण्यातच सुजितचे लग्न ठरण्याची बीजे लपलेली होती.

बहुधा अमेरिकेत गेलेल्या मुलांच्या लग्नाची चाकोरीबद्ध रीत म्हणजे आईवडिलांनी बऱ्याच मुलींची पाहणी करून त्यांच्या पसंतीस उतरतील अशा काही मुलींची यादी मुलगा भारतात येण्याच्या सुमारास करून ठेवायची, मग मुलाने भारतात आल्यावर धावता दौरा करून पाहणी करून एकादी मुलगी पसंत करायची आणि लग्न करून तिला घेऊनच किंवा एकही मुलगी पसंत पडली

नाही तर हात हलवत परत जायचे अशी आहे. अशा हातघाईने झालेल्या लग्नात बऱ्याच वेळा फोनवरूनच निमंत्रणे देण्याची वेळ येते. अश्या हातघाईने झालेल्या लग्नात काही फसवणुकीचेही प्रकार घडतात. .

अलीकडे मुलीही फार चोखंदळ झाल्यामुळे बऱ्याच मुलांना असे अनेक वेळा हात हलवत परत जावे लागले आहे. हल्ली मुली अगोदर मुलाचा पगार, तो बरा (म्हणजे त्यांच्या पगारापेक्षा बराच जास्त) आहे का, त्याचबरोबर स्वत:चा फ्लॅट आहे का, घरात फ्रीज, वॉशिंग मशिन वगैरे आहे का आणि मुख्यत्वे आई वडील बरोबर रहाणार आहेत का (त्याना कचरा कुंडी असे म्हणतात म्हणे) एवढ्या चौकश्या करून त्यात उत्तीर्ण होणाऱ्या मुलाचाच विचार करतात.

बेकायदेशीर गर्भजलचिकित्सा करण्याच्या वृत्तीमुळे मुलींचे प्रमाण घटते राहिल्यामुळे हा प्रश्न आणखीच गंभीर बनत चालला आहे. त्यामुळे भारतातच असणाऱ्या राजस्थानातील मुलासाठी वधू आणण्यासाठी केरळात जावे लागू लागले आहे. काही दिवसानी मुलींना स्वयंवर मांडायला लागून अनेक होतकरू मुलांमधून नवरा निवडण्याची संधी मिळू लागेल अशी शक्यता दिसते. तसे पाहता महाभारतकाली वा रामायणकालीही

स्वयंवराची पद्धत होती तिचेच हे पुनरुज्जीवन समजायचे का? पण त्यावेळी मुलींचे प्रमाण कमी नसतानाही ही पद्धत का होती समजत नाही शिवाय द्विभार्याप्रतिबंधक कायदा नसल्यामुळे लग्न झालेल्या पुरुषांनाही स्वयंवरात भाग घेण्यास मज्जाव नव्हता हे वेगळेच. मात्र बऱ्याच दूरदर्शन मालिकांमध्ये अविवाहित मुली विवाहित पुरुषांच्यावरच का कोणास ठाऊक जीव टाकत असतात. म्हणजे स्वयंवराची पद्धत परत सुरू झालीच तर विवाहित पुरुषांनाही संधी दिली तर वाव आहे.

सुजित कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला असतानाच त्याची मुंबईच्या एका कंपनीत निवड झालेली होती आणि त्याच्या अंतीम वर्षाचा निकाल लागल्यावर तो लगेच मुंबईस रवाना झाला आणि त्याच्या पुढील हालचालींची आम्हाला विशेष कल्पना नव्हती. तो यंत्र अभियांत्रिकी शाखेचा पदवीधर असला तरी संगणक क्षेत्राकडे त्याचा ओढा होता त्यामुळे संधी मिळताच त्याची पहिली ग्राइंडवेल नॉर्टन कंपनी सोडून त्याने टी. सी. एस(टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस)मध्ये उडी मारली होती. लगेचच कंपनीतर्फेच त्याला परदेशी जाण्याची संधी प्रदान केली गेली पण त्यासाठी काही काळ कंपनी न सोडण्याचे बंधन होते म्हणून त्याने ती संधी नाकारली होती. मधल्या काळात परदेशी नोकरी मिळवून देणाऱ्या एका मध्यस्थ संस्थेतर्फे त्याची झालेली मुलाखत सफल झाल्यामुळे

त्याला परदेशी जाण्याची संधी प्राप्त झाली त्यावेळी तो लुफ्तान्सा विमानाने वॉशिंग्टनमार्गे बोस्टनला गेला होता आणि तेथील कंपनीने त्याला पिटसबर्गला पाठवले. तेथे तो जवळजवळ पाच वर्षे राहिला.

आम्ही अमेरिकेत जाण्याच्या काही दिवस अगोदर तेही ठिकाण सोडून तो न्यू जर्सीमध्ये नुकताच आला होता आणि कामाला तो क्वांट ट्रेडिंग नावाच्या न्यूयॉर्कमधील कंपनीत जाऊ लागला होता. तो २००१ च्या सप्टेंबरमध्ये तेथे रुजू झाला आणि लगेचच ९/११ चा ट्वीन टॉवरवरील हल्ला झाला, ते दृश्य आम्ही दूरदर्शनवर पाहत होतो, त्यावेळी भारतातले सायंकाळचे सात वाजत होते. ते दृष्य पाहून आमच्या पोटात भीतीने गोळा उठला आणि आम्ही लगेच संपर्क साधण्याचा प्रयत्न केला पण सर्व संपर्कयंत्रणा बंद होत्या शेवटी एका सायबरकॅफेमध्ये जाऊन मी आणि माझा थोरला मुलगा त्याला ई मेल करून घरी येतो न येतो तोच त्याचा फोन आला की तो सुखरूप आहे आणि आमचा जीव भांड्यात पडला. त्यानंतर त्याचा सविस्तर फोन बराच उशीरा आला. त्याच्या ऑफिसपासून पाचच मिनिटाच्या अंतरावर ही घटना घडली असे त्याने सांगितले. तो न्यूयॉर्क स्टेशनपासून ऑफिसला चालत जात असे तेव्हा त्याला दोन विमाने ट्विन टॉवर्सच्या रोखाने जात आहेत असे दिसले आणि विमाने इतक्या

खालून कशी जात आहेत याविषयी आश्चर्य करत तो ऑफिसमध्ये शिरतो तो ऑफिसच्या खिडकीतूनच त्याला ती विमाने ट्विन टॉवर्सवर आदळत असल्याचे प्रत्यक्षच दिसले, त्यानंतर त्याच्या ऑफिसात काम होणे शक्यच नव्हते. सगळीकडे शांतता झाल्यावर ऑफिसकडूनच त्यांया न्यूयॉर्क स्टेशनपर्यंत पोचवण्याची व्यवस्था करण्यात आली आणि केव्हातरी रात्री ते घरी पोचले हे सर्व त्याने फोनवर सांगितले.

क्वांट ट्रेडिंग मधील त्याची नोकरी स्थिर स्वरुपाची होती. पूर्वी ज्या कंपनीत तो नोकरी करत असे ती कंपनी त्याला वेगवेगळया कामावर वेगवेगळया ठिकाणी पाठवत असे या प्रकारास कन्सल्टंट असे म्हणतात त्यामुळे त्याचे आसन स्थिर नसे आता मात्र जोपर्यंत कंपनी बदलली नाही तोवर न्यूयॉर्क सोडण्याची आवश्यकता नसल्याने त्याने न्यू जर्सी येथे स्थायिक व्हायचे ठरवले न्यूयॉर्कमध्ये जागा घेणे आपल्याकडे मुंबईत जागा घेण्याइतकेच किंवा त्याहूनही अवघड होते. आणि आहे. एडिसन(न्यू जर्सी) मधून न्यूयॉर्कला कामावर जाण्यासाठी मेट्रोपार्क स्टेशनवरून ट्रेनने जाणे सोयिस्कर होते, शिवाय भारतीय वस्ती जास्त असल्यामुळे एडिसन हे ठिकाण भारतीय व्यक्तींना राहण्यास अधिक योग्य वाटते. त्याने ज्या गृहसंकुलात सदनिका घेतली त्यापासून मेट्रोपार्क अगदी चालत जाण्यासारख्या अंतरावर होते. त्याने यापूर्वीच एक लाल रंगाची

स्पोर्टस कार घेतली होतीच पण कारमधून दररोज न्यूयॉर्कला जाणे सोयीचे नव्हते म्हणून तो मेट्रोपार्क स्टेशनपर्यंत चालत अथवा कारने जाऊन तेथून ट्रेनने न्यूयोकला जाई. . न्यू जर्सीतील वातावरण आम्हाला मानवेल असे त्याला वाटल्यामुळे आणि त्याच वेळी मी सेवानिवृत्त झाल्यामुळे त्याने आम्हाला त्याच्याकडे येण्याचा आग्रह केला.

आमचे जाण्याचे ठरल्यावर त्याला बऱ्याच गोष्टींकडे लक्ष देणे भाग पडले, कारण तो एकटा असल्यामुळे त्याची सदनिका म्हणजे चार भिंती आणि त्यात त्यांच्याकडूनच मिळालेल्या सोयी म्हणजे फ्रीज, वोशिंग मशीन, गॅस, आणि डिशवॉशर याव्यतिरिक्त काहीच नव्हते. अगदी झोपण्यासाठी पलंग, गादी अशा वस्तूंचाही अभाव त्याच्या मठीत होता. आणखी एक महत्त्वाची गोष्ट त्याच्या दृष्टीने म्हणजे त्याच्या स्पोर्टस कारला पुढील दोनच दरवाजे होते त्यामुळे मागील सीटवर बसण्यासाठी बराच द्राविडी प्राणायाम करावा लागत होता आणि तो आता या वयात आम्हास जमेल का याविषयी त्याला शंका होती म्हणून एक मोठी कारच घ्यावी असा त्याचा विचार होता. नवीन कार घेण्यापेक्षा बऱ्याच वेळा भारतात परत जाणारे लोक आपली कार विकून परत जातात त्यामुळे ती कार स्वस्तात मिळण्याची शक्यता असते म्हणून अशी एकादी कार कोणाची असेल तर सांगण्यासाठी त्याने आपल्या मित्राला सांगून

ठेवले होते. एकदा त्या मित्राकडे कसल्याश्या पार्टीसाठी गेला असता त्याने त्याला अशी एक कार विकाऊ आहे असे सांगितले आणि कारच्या मालकिणीशी त्याची गाठ घालून दिली.

कारची मालकीण संयुक्ता राव या नावाची तरुणी होती. ती पण तीन वर्षापूर्वी अमेरिकेत आली होती आणि ज्या कंपनीत कामास होती तेथे कराराची तीन वर्षे पूर्ण झाल्यामुळे भारतात परत जाण्याचा विचार करत होती, त्यामुळे अमेरिकेत आल्यावर खरेदी केलेली तिची कार विकून जायचा तिचा विचार होता, तिची आणि सुजितची गाठ पडल्यावर कार विकायचा तिचा मनोदय असला तरी तीन वर्षे पुरी होण्यास अजून काही दिवस आहेत हे सांगितले. तिचेही आईवडिल नुकतेच तिच्याकडे येऊन गेले होते त्यामुळे त्यांच्या मुक्कामासाठी तिने ज्या वस्तू खरेदी केल्या त्याची माहिती शिवाय आमच्या प्रवासासाठी लागणाऱ्या गोष्टी यांची माहिती तिला असल्याने त्यासाठी तिच्या पूर्वानुभवाचा फायदा घेण्याच्या उद्देशाने सुजितच्या आणि तिच्या गाठी पडत गेल्या आणि त्याचे पर्यवसान त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेण्यात झाले. त्यामुळे तिचे भारतात परत जाणे तिथेच बारगळले.

त्यांचा विचार केव्हां ठरला हा भाग शेवटी आमच्या दृष्टीने गौणच असल्यामुळे मियाबिबी राजी या तत्त्वानुसार आम्ही त्यांना

आमची सम्मती लगेच देऊन टाकली. उलट आमचे काम हलके केल्याबद्दल मनातून त्या दोघांना धन्यवादच दिले. आमच्या सम्मतीनंतर संयुक्ताच्या आईवडिलांची सम्मती फोनवरूनच घ्यावी लागली आणि तीतर त्यानी दिलीच एवढेच नव्हे तर आम्हीच त्यांच्या अनुपस्थितीत अमेरिकेतच साखरपुडाही करून टाकावा असा प्रस्ताव मांडला. संयुक्ताचे काही नातेवाईक न्यू जर्सीपासून जवळच राहत होते. याशिवाय माझा एक विद्यार्थी आणि त्याचे बायकोही जवळच राहत होते आणि सुजितला भावासारखेच मानत होते. संयुक्ताची एक खास मैत्रीण आणि तिचा नवरा हेही येणार होते आणि सर्वात महत्त्वाची आणि आनंदाची गोष्ट म्हणजे माझ्या सौभाग्यवतीची बहीण, माझे साडू आणि त्यांची मुलगी हेही बरोबर त्या काळातच त्यांच्या व्यवसायाच्या कारणाने अमेरिकेत आल्यामुळे त्या लग्नाच्या साखरपुड्याला भारतात असतानाही जेवढी मंडळी जमली नसती त्यापेक्षा जास्त मंडळींनी एकत्र येऊन हा आनंदाचा सोहळा पार पडला. उणीव होती ती फक्त संयुक्ताच्या आईवडिलांची! अर्थात लग्नसोहळा भारतात बंगळुरूला तिच्या घरी पार पडला त्यावेळी ही उणीव पूर्णपणे भरून काढण्यात आली हे उघडच आहे.

# २०. रुझवेल्ट पार्क

अमेरिकेत आल्यावर इथली महत्त्वाची प्रेक्षणीय स्थळे बघणे हा कार्यक्रम ओघानेच आला. अमेरिकेला गेलो असे म्हणताच प्रथम मग तेथे काय पाहिले हा प्रश्न विचारला जाणार हे उघड होते. पूर्वी तिकडून काय आणले याविषयी पण उत्सुकता असे आता तिकडे मिळणाऱ्या सगळयाच गोष्टी आपल्याकडे मिळत असल्यामुळे ती बाब एवढी महत्त्वाची राहिली नाही म्हणा! तरीही आम्ही परत जाताना भारतातील तपासणी अधिकाऱ्याला मात्र आम्ही काहीतरी आणले असलेच पाहिजे असा कसा काय पण संशय आला होता. आणि त्याने आम्हाला बॅगा उघडायला लावल्या होत्या. माझ्या मागून आलेल्या प्रवाशाने मला नंतर सांगितल्याप्रमाणे मी गुपचुप दहा डॉलरची नोट त्याच्या हातात न ठेवल्यामुळे आमच्यावर हा प्रसंग आला होता. त्यामुळे एकवेळ आम्ही काहीच आणले नाही हे कबूल केल्यावर आम्हाला काही फार नावे ठेवली गेली नसती, पण आम्ही काहीच न पाहता फक्त मुलाकडे राहून परत आलो असे सांगितल्यावर मात्र आमची वेड्यात गणना झाली असती. (अजूनपर्यंत काहीच न पाहता इथले

रस्ते आणि इतर बाबींचेच वर्णन करीत बसल्याबद्दल काहीजणांनी आम्हास वेड्यात काढलेच असेल.)

मला स्वतःला असा पाहण्याचा उत्साह जरा कमीच आहे. आता हा वयाचा परिणाम म्हटले तरी पहिल्यापासूनच अनायासे जमेल ते पहावे त्यासाठी फार दगदग करू नये ही माझी नेहमीची रीत! . शिवाय प्रवासवर्णन लिहिण्यासाठीच प्रवास करून आणि मग प्रवासवर्णनकार अशी ख्याती मिळवून साहित्य सम्मेलनाच्या अध्यक्षपदाच्या मारामारीत उतरण्याएवढी माझी योग्यता नाही याविषयी मला खात्री आहे. जे काही दोन चार मित्र वाचत असतील त्यापलिकडे भारतात कोणी मायमाउली मी लिहिलेले वाचत नाही की ज्यासाठी पाहण्याचा आटापिटा करून त्यावर आपल्याला ती गोष्ट कशी दिसली यावर फार मोठे भाष्य मी करावे. हल्ली तर लोकांना वेळ व्हॉट्सॅपवरील संदेश वाचायलाच पुरत नाही ते त्याबाहेरचे वाचणार केव्हां? माझी मोठी बहिण (आता ती गेली बिचारी) या बाबतीत माझ्याही वरताण म्हणजे आम्ही काही पहायला जाऊ म्हटले तर" कुठ जाताय धडपडत त्यापेक्षा बसा टी. व्ही, बघत सगळ काही त्याच्यावर छान दिसेल. छान स्वयंपाक करते खा प्या आणि आराम करा "अस म्हणून आम्हालाच घरी रहायचा आग्रह करणार. कधीकधी ती मारे मोठ्या सहलीच्या योजना करायची आणि आयत्या वेळी जाण्याचे रद्द करायची

त्यामुळे शेजाऱ्यापाजाऱ्यांनी तिच नाव कॅन्सल आँटी असच ठेवलं होत. तिच्या मते जाण्याची योजना ठरवण्यात जी मजा असते ती प्रत्यक्ष जाण्यात नसते. अशा बहिणीचा भाऊ असल्याने ते गुण माझ्यातही उतरले आहेत.

माझ्या आईची गोष्टच वेगळी! आणि तिचा काळही वेगळाच होता. तिच्या मते आमच्या छोट्या गावातच तिने इतके काही पाहिले होते की दुसरीकडे फार बघण्यासारखे काही उरले आहे असे तिला वाटलेच नाही. तसे छोटे असले तरी ते एक संस्थान होते आणि बऱ्याच मोठ्या शहरातील नागरिकाना पहायला मिळणार नाही असा संस्थानी रुबाब तिला पहायला मिळाला होता ही गोष्ट मात्र खरी! तरी उतार वयात माझ्या धाकट्या भावाबरोबर ती काशीयात्रा मात्र करून आली. याउलट मी मात्र काशीस जाऊन विश्वेश्वराचे दर्शन घेऊन आलो नाही, कारण मी तुकाराम महाराजांचा पक्का भक्त त्यामुळे त्यानी सांगितलेले "देव देहात देहात।कारे जाता देवळात? हे अंगी पक्के भिनलेले.

पण तरीही आपल्या आडगावात येणाऱ्या पाहुण्यालाही गावातले वैशिष्ट्य म्हणून निदान गावातले गणपती वा मारुतीचे मंदीर दाखवल्याशिवाय गाववाल्याला चैन पडतच नाही. न. चिं. ऊर्फ तात्यासाहेब केळकर अशाच आडगावी गेले असता त्यांच्या

यजमानानी गावातील सुप्रसिद्ध गायकाचे गाणे ऐकवण्यासाठी कसा जिवाचा आटापिटा केला, त्यासाठी वाद्ये गोळा करण्यापासून किती अडचणी आल्या आणि त्या पाहुणचारात त्यांची गाडी कशी चुकली याचे अगदी मजेदार वर्णन त्यांच्या "माझी गाडी कशी चुकली " या विनोदी कथेत केले आहे. अर्थातच सुजितला आईवडिलाना अमेरिका दाखवण्याची इच्छा आणि उत्साह होता त्यामुळे काही गोष्टी पाहण्याचा योग आलाच. शिवाय साखरेच खाणार त्याला देव देणार म्हणतात तसा प्रकार होऊन माझ्या बरोबर आलेले माझे मित्र, जे, सान होजेला आपल्या मुलाकडे गेले होते ते मात्र हौशी असल्यामुळे त्यानी निघतानाच आम्हाला बजावून सांगितले होते की नायगारा पहायला जाताना आम्ही त्यांना आमच्याकडे बोलवायचे आणि त्यानी हॉलिवुड डिस्नेलेंड पहायला जाताना आम्ही त्यांच्याकडे जायचे. त्यामुळे आमच्या दोघांच्या मुलांना पूर्वपश्चिम भागाचा दौरा करण्याचे कारण पडले नाही. आणि तरीही पहिल्याच अमेरिका वारीत पूर्वपश्चिम भाग पहाण्याची संधी आम्हास मिळाली.

अगदी सुरवातीला घराजवळील काही स्थळांना आम्ही भेटी दिल्या. त्यात अगदी जवळचे म्हणजे रूझवेल्ट पार्क. भारतातही काही शहरातील बागा प्रेक्षणीय आहेतच. मुघल गार्डन तर जगातील उत्कृष्ट बागेत जमा होते. पण अमेरिकेत जागेचा तुटवडा

नसल्याने येथील बागा आकाराने खूपच प्रचंड आहेत. रूझवेल्ट पार्क लहान म्हटली तरी तिचे क्षेत्रफळ २७१ एकर आहे. आणि अशा बागांची संख्याही भरपूरच आहे. प्रत्येक बागेत मुलाना खेळण्यासाठी घसरगुंड्या झोके असतातच त्याच्यावर खेळणारी मुले पाहून त्यांचा मला हेवा वाटला कारण आता आपल्याकडे बुभुक्षित नगरसेवकांनी मैदाने, बागा यांचा स्वतःच्या फायद्यासाठी बाजार मांडून नव्या पिढीला मुक्त बागडण्याच्या सुखापासून कायमचे वंचित केले आहे. नुसत्या न्यू जर्सी स्टेटमध्ये महत्त्वाच्या १९ बागा आहेत. आणि छोट्यामोठ्यांची तर गणतीच नाही. त्यामुळे या स्टेटला गार्डन स्टेट असेच म्हणतात.

रूझवेल्ट पार्कमध्ये मला आवडलेली गोष्ट म्हणजे बरोबर मध्यभागी असणारा खूपच मोठा तलाव. तो आवडण्याचे कारण म्हणजे आमच्या छोट्या गावात पण अगदी असेच मोठे तळे होते आणि त्या तळयाच्या सभोवताली गुलमोहराची संपूर्ण झाडी होती. त्याची आठवण या तलावामुळे झाली. आणि लहानपणी त्या तलावात मारलेल्या उड्या आठवल्या या तलावाकाठी मोठी शाळा आहे तिचे नावही लेक व्ह्यू स्कूल असेच आहे. आमची लहानपणीची एक शाळाही अशीच तळयाकाठी होती आणि आम्ही तिला तळयावरची शाळा असेच म्हणायचे. आणि शेजारीच एक बागही होती आणि तिचे नाव विशालबाग असे होते पण या

विशाल बागेचा विस्तार जेमतेम एकादा एकर असेल पण त्यावेळी ती विशाल वाटायची हे खरेच. येथील बागांच्या आकारमानापुढे जशा आपल्याकडील बागा कुठे इंद्राचा ऐरावत आणि कुठे शामभटाची तट्टाणी अशा आहेत तीच अवस्था शाळेचीही आहे. आमची शाळा तळयाच्या काठी होती एवढ्यावरच दोन शाळातील साम्य संपते. कारण आमच्या त्या प्राथमिक शाळेत पहिले चार वर्ग भरायचे. आणि प्रत्येक वर्गात मोजून तीस पस्तीस मुले असायची. आता मात्र लोकसंख्यावाढीतील आपल्या विक्रमी वाटचालीमुळे त्या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्याही बरीच वाढली असणार. येथील शाळा अवाढव्य. प्रत्येक वर्गात मुलांची संख्या मर्यादित असली तरी प्रत्येक वर्गाच्या बऱ्याच तुकड्या असल्याने मुलांची संख्या हजाराच्या वरच असते. पुढे माझ्या मोठ्या मुलालाही अमेरिकेत यावे लागले त्यावेळी त्याची सदनिका तर रूझवेल्ट पार्कपासून केवळ पाच मिनिटात पायी जाण्याच्या अंतरावर असल्याने मी दररोज फिरायलाच तेथे जाऊ लागलो.

आमच्या एडिसन मधील वास्तव्याचा पहिला काही काळ चि. सुजितचा साखरपुडा व माझी प्रकृती ठीक करणे यातच गेला, त्यामुळे जवळपास फिरणे हीच आमची मर्यादा होती. आम्ही ८ मेला पोचलो होतो व २५ तारखेपर्यंत या दोन्ही गोष्टी संप(व)ल्या व आता थोडे भटकू असे विचार सुरू झाले, त्यात सुजितला

संयुक्तावर भाव मारायचा होताच. २५ व २६ शनिवार रविवार सुट्टी असल्यामुळे त्यावेळी सुजितने पिट्ट्सबर्गला जाण्याचा बेत जाहीर केला, कारण एडिसनला येण्यापूर्वी तो काही दिवस पिट्ट्सबर्गला होता. त्यामुळे माझी प्रकृती यथा तथाच असली तरी केवळ तेवढ्यामुळे इतरांच्या आनंदावर विरजण नको हा विचार मी केला.

# २०पिट्सबर्ग

पिट्सबर्गला आम्ही एका मोठ्या हॉटेलमध्ये उतरलो अर्थात भारतात कोठेही गेलो तरी ओळखीच्या किंवा नात्यातल्या माणसांकडे उतरणे ही परंपरा पाळणाऱ्या आम्हाला कोणतेही हॉटेल मोठेच वाटणार होते पण अमेरिकेतील हॉटेल्सना किमान काही दर्जा राखणे आवश्यकच असल्याने आम्ही उतरलो ते हॉटेल त्याच दर्जाचे होते व आमच्या वातानुकूलित खोलीला असलेल्या बाल्कनीतून पिट्सबर्गचे विहंगम दृष्य दिसत होते. पिट्ट्सबर्ग हे सुजितचे माहेरच असल्यामुळे व आम्ही कारने आलो असल्यामुळे आम्ही थोडी विश्रान्ती घेऊन लगेचच बाहेर पडायचे ठरवले.

पिट्सबर्ग मध्ये बालाजी मंदीर प्रेक्षणीय आहे व तेच पहायचे असे आम्ही ठरवले होते पण तेथे गेल्यावर प्रथमग्रासे मक्षिपात: असे झाले म्हणजे त्या दिवशी त्या मन्दिराचा रौप्य महोत्सव असल्यामुळे मन्दिरापर्यंत कार नेता येत नाही असे कळले व आपली कार बऱ्याच अन्तरावर उभी करून तेथून संस्थानच्या बसेस सोडतात त्यात बसून जावे लागेल असे समजले आता तो कारथाम्बा शोधून तेथून जायचे शिवाय आज रौप्यमहोत्सवामुळे चिक्कार गर्दी असणार हे उघडच होते त्यामुळे आम्ही दुसरे एक जैन

मंदिर पहायचे ठरवले. भारतात मी तिरुपति बालाजी दर्शन तंत्रनिकेतनाच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहलीमध्ये त्यांचा शिक्षक म्हणून गेलो असताना १९६४ मध्ये गेलो होतो त्याची आठवण यावेळी झाली. तेथेही एका विशिष्ट ठिकाणावरून संस्थानच्या बसेसमधूनच जावे लागते. त्याचे कारण मंदिराकडे जाणारा रस्ता घाटाचा असल्यामुळे संस्थानचे प्रशिक्षित चालकच तो मार्ग व्यवस्थित पार पाडू शकतात, आता सांगितले तर विश्वास बसणार नाही की ३०-३५ विद्यार्थ्यांच्या बरोबर बालाजी दर्शन घेऊन चार पाच तासातच आम्ही आमच्या सहलीच्या पुढच्या टप्प्याला लागलोसुद्धा!

अमेरिकेत आपल्या इकडच्या सारखी रस्तोरस्ती मन्दिरे जेथे लोकांना रस्त्यावरून जाता जाता नमस्कार करून पुण्य पदरात पडते अशी परिस्थिति नाही. जसे भक्त तसेच देव! रस्त्यावरील एकाद्या खांबावरही एकादा दत्तप्रभू आपल्या श्वान व गोमातेच्या गोळक्यासह उभा असतो. अर्थात ख्रिश्चन धर्माचा प्रभाव असल्यामुळे मन्दिरांचा भारतीय प्रकार येथे असणे शक्यही नव्हते पण ख्रिश्चन प्रार्थनामंदिरेही भव्य, आजूबाजूस भरपूर जागा व आतही प्रशस्त सभागृह असते. भारतातही चर्चेस भव्य व प्रशस्त सभागृह असणारी असतात. भाविकांची सोय आपल्या इतकी कोठेच पाहिली जात नाही मात्र दर्शनाव्यतिरिक्त इतर सोयींचा

आपल्याकडे जसा अभाव असतो तसा मात्र तेथे नसतो. मंदिरात शिरण्यापूर्वीच स्वच्छतागृह असते व तेथे जाऊन आपली पादत्राणे ठेवून शारिरिक शुद्धी करून मंदिरात आपण शिरतो. परिसर व मंदिराचा गाभाराही भव्य, सुंदर व विशेषत: स्वच्छ असतो हे वैशिष्ट्य या मंदिरातही होते, शिवाय हिन्दु जैन मन्दिर असल्यामुळे एकीकडे महावीराची मूर्ती होती तर दुसरीकडे राम, लक्ष्मण, सीता, विष्णु लक्ष्मी यांच्या मूर्ती होत्या. बहुतेक सगळया मंदिरात मुख्य देवाबरोबर इतरही देवांच्या मूर्ती असतात. गाभाऱ्यात प्रमुख देव म्ह. बालाजी मंदिर असेल तर बालाजी किंवा साईमंदीर असेल तर साईबाबा व गाभाऱ्याच्या बाहेर बाहेर मोठ्या प्रेक्षागृहात प्रदक्षिणामार्ग व त्यावर बाजूस इतर सर्व देवांचे छोट्या आकाराचे देवालयाकार. जागा प्रशस्त असल्याने भाविक कितीही आले तरी गर्दी होत नाही. रौप्य महोत्सव किंवा विशेष दिनानिमित्त मात्र होणाऱ्या गर्दीने मंडप ओसंडून वहात असतो. .

त्याचा अनुभव दुसऱ्या दिवशी बालाजी मंदिरात गेलो तेव्हां आला. आम्ही सकाळी लवकर म्हणजे ८-३० ला निघालो. आमच्या गाडीच्या पार्किंग साठी कम्युनिटी कॉलेजजवळ जागा नियुक्त केली होती व तेथून संस्थानच्या बसेस होत्या. अर्थात ही व्यवस्था रौप्य महोत्सवात होणाऱ्या गर्दीमुळे होती. इतर वेळेस आपले वाहन घेऊन मंदिरापर्यंत जाता येते. बसव्यवस्था चांगली

होती. मंदिरात ९-३० ला पोहोचलो. . सकाळी लवकर गेल्यामुळे गर्दी कमी होती. रौप्यमहोत्सवानिमित्त यज्ञयाग चालू असलेल्या मंडपात गर्दी होती पण आम्हास फक्त दर्शनच घ्यायचे असल्यामुळे आम्ही रांगेत उभे राहून आमची नावे नोंदवली व काही दक्षिणा देऊन प्रत्येकास एक प्रवेशपत्र मिळाले व ते घेऊन आम्ही रांगेत उभे राहिलो. आमचा क्रमांक आल्यावर आमचे नाव, गोत्र वगैरे विचारणा झाली. अश्या प्रकारे गाभारा पूर्ण भरल्यावर आत अधिक लोक न सोडता आलेल्या सर्व लोकांच्या वतीने पुजाऱ्याने संकल्प सांगितला व प्रत्येकास एक केळ व बदाम असा प्रसाद देण्यात आला. बाहेर अल्पोपहाराची सोय खुप प्रशस्त सभागृहात होती. दाक्षिणात्य लोकांचेच मंदीर असल्याने त्यांचाच भरणा होता व अल्पोपहार अर्थातच उपमा, इडली, इमली भात अश्या प्रकारचा होता. खाद्यपदार्थ अतिशय सुंदर रीतीने पॅक केले होते.

आणखी एक प्रेक्षणीय जागा म्हणजे डक्युसने उतरण. पिट्सबर्ग हे फारच उंचसखल भूमीवर वसलेले आहे व त्यातील त्यातल्या त्यात सखल जागा वेगवेगळया उद्योगानी व्यापल्या, शेवटी काही उंच जागी वस्ती करणे सुरू झाले. तेथे पूर्वी कोळश्याच्या खाणी असल्यामुळे त्या भागास कोळसा टेकडी असेच म्हणत पुढे त्याचे नामकरण वॉशिंग्टन टेकडी असे झाले. वर रहाणाऱ्या लोकांना येवढी उन्च चढण चढून जाणे त्रासदायक वाटे.

शेवटी १८७७ मध्ये मे महिन्यात सॅम्युएल डीशर या अभियंत्याने वर चढण्याचा लोहमार्ग तयार करून त्यावरून धावणारी आगगाडी असा मार्ग तयार करून २० मेला त्याचे उद्घाटन झाले त्यावेळी असे चार लोहमार्ग तयार करण्यात आले.

- पूर्वी कोळश्याच्या खाणि असलेल्या या जागी कोळश्याची नेआण करण्यासाठी अश्या बऱ्याच उतरणी व त्यावरून जाणाऱ्या आगगाड्या धावत असत. अर्थात त्यावेळी त्या वाफेवर चालत. पुढे या खाणी बन्द पडल्या. त्या भागात वस्ती वाढत चालली त्यामुळे चांगले रस्ते तयार झाले व त्यामुळे हे लोहमार्ग बन्द करण्याचे ठरले, पण डक्युसनेच्या नागरिकांनी आपल्या विभागाचे हे वैसिष्ट्य म्हणून ते राखावे यासाठी स्वयंसेवी संस्था स्थापन करून वर्गणी जमा करून तो मार्ग चालू ठेवण्याचे ठरवले व आता हा उतरण लोहमार्ग पिट्स्बर्गमधील एक महत्वाचे पर्यटनस्थळ बनले आहे, पाच फूट रुंदीच्या (हो अजुनही अमेरिकेत फूटच चालू आहे) या लोहमार्गाची लांबी ७९३ फूट आहे व चढण ४०० फुटांची आहे. या चढणीचा जमिनीशी ३० अंशाचा कोन होतो. एका वेळेस त्यातून एका वेळी २५ प्रवासी प्रवास करू शकतात. त्यावेळी तिकिट माणशी एक डॉलर ६० पेन्स चढण्याचे व तेवढेच उतरण्याचे होते. त्या रेल्वेत बसून ती चढण चढणे व उतरणे असे दोन्ही अनुभव आम्ही घेतले.

आता आपल्या भारतातही अगदी चक्क महाराष्ट्रात नाशिक सप्तशृंगी येथे ५१० पायऱ्या चढाव्या लागतात त्या ऐवजी त्या फक्त दीड मिनिटात ओलांडून आपल्याला वर व पाहिजे तर खाली नेणारी ट्रेन झाली आहे असे नुकतेच अर्थात व्हॉट्स ऍपवर विडिओ सह वाचण्यात आले तेव्हां पिट्सबर्गच्या उतरणीचे उगीच कौतुक नको. ह कुछ कम नही!

# २१. लॉन्गवुड गार्डन

एडिसनपासून एका दिवसाची दुसरी आमची सहल लॉन्गवुड गार्डनची होती. हे पण एक अतिशय भव्य वानस्पत्योद्यान (बोटॅनिकल गार्डन)आहे. पेन्सिल्वानियामधील हे भव्य म्हणजे ४३६ हेक्टर एवढ्या क्षेत्रावर ते पसरलेले आहे व तिला हजारो वर्षांचा इतिहास आहे. त्यात अनेक वेगवेगळ्या प्रकारची झाडे असून अमेरिकन नागरिकांसाठी एक भेट देण्याची जागा म्हणून मालकाने विकसित केली पण त्याच्या वारसांना त्यात रस न उरल्यामुळे ती हस्तांतरित होऊन १९०६ मध्ये सर्व झाडे तोडून त्या लाकडांचा वापर निरनिराळ्या कामासाठी करता येईल अशी काही व्यापारी डोक्यातून कल्पना आली, कदाचित एकादा कल्पक भारतीयही त्याना भेटला असावा. पण पिअरी डू पॉन्ट या प्रसिद्ध उद्योजक आणि पर्यावरणाचे भान असणाऱ्या प्रसिद्ध डु पॉन्ट कुटुंबातील व्यक्तीस हे पाहवले नाही व त्यने ती जागा खरेदी करून आजच्या सुंदर व प्रेक्षणीय स्थळात ती विकसित केली. त्या बागेचे वर्णन करण्यासाठी स्वतंत्र पुस्तकच लिहावे लागेल. एक दिवसाच्या मर्यादित वेळेत जे सौंदर्य डोळ्यात साठवणे शक्य आहे, जे विविध दर्शनीय उपक्रम चालू होते त्यातील जमतील तेवढे

पाहिले व रात्री रंगांची उधळण असलेले जलनृत्य पाहून आम्ही घरी परतलो. त्या दिवशी योगायोगाने मी औरंगाबादच्या कॉलेजात व्याख्याता म्हणून नुक्ताच प्रवेश केला त्याच वेळी तेथे काही काळ दुसऱ्या विभागात काम करणारे प्राध्यापक भेटले. अर्थात ४० वर्षानंतर आम्ही भेटल्याने एकमेकास ओळखणे शक्यच नव्हते पण केवळ मराठी बोलणारे कुटूंब म्हणून आम्ही त्यांची विचारपूस केल्यामुळे हे कळले तेही आमच्यासारखेच आपल्या मुलाकडे किंवा मुलीकडे आले होते.

# २२. बोस्टन

आमचे एक स्नेही श्री. देउस्कर यांचा मुलगा (हो तोच ज्याचा जन्मतारीख दाखला अमेरिकेतच माझ्या मित्राने प्रतिज्ञापत्र करून मिळवले होते) पराग बोस्टनस्टेट्मधील क्रोटन येथे रहात होता. सुजितच्या घरापासुन त्याचे रहाण्याचे ठिकाण यामधील अंतर कारने जाण्यासारखे होते त्यामुळे त्याच्याकडे. जून महिन्यात २० तारखेला जावे असे ठरले, आम्हाला थोडे जास्त रहाता यावे म्हणून आम्ही काही दिवस अगोदर जावे व मागून सुजित संयुक्ता यानी यावे असे ठरले. पण त्यामुळे आम्हाला दोघांना रेल्वेने जाणे भाग पडले.

आतापर्यंत अमेरिकेत रेल्वे प्रवास करण्याचा अनुभव घेतला नव्हता. तसे मेट्रोपार्क स्टेशन सुजितच्या घरापासून चालत जाण्याच्या अंतरावर होते त्यामुळे तो दररोज न्यूयॉर्कला जाण्यासाठी मेट्रोपार्कला चालातच जात असे व बरेच वेळा संह्याकाळी तो परत येताना आम्ही स्टेशनवर येऊन बसत असू व संयुक्ताही जवळ जवळ त्याच वेळी येई व आम्ही चौघे तिच्या गाडीतून घरी जात असू अर्थात आता ती आमची गाडी झाली होती. (तशी सुजितची लाल स्पोर्ट्स कार अजून होतीच.) हा रेलवे

मार्ग न्यू जर्सी ट्रॅन्झिट (N. J. Transit)ही कंपनी चालवते. ती कंपनी न्यूजर्सी मध्ये अन्तर्गत बससेवा पण चालवते. त्यामुळे न्यू जर्सीतील मेट्रोपार्कपासून न्यूयॉर्कपर्यंत जाणारी बससेवा पण त्या कंपनीच्याच अखत्यारीत आहे. पण आम्ही क्रोटनला जाणारी रेल्वे सेवा ऍमट्रॅक होती. आपल्याकडे जशी मध्य रेल्वे, दक्षिण रेल्वे अश्या विभागीय रेल्वेज आहेत तश्याच या वेगवेगळया कंपन्याच आहेत. स्वातन्त्र्य मिळण्यापूर्वी भारतात एम. एस. एम. बी. बी. सी. आय, जी. आय. पी. अश्या वेगवेगळया कंपन्या होत्या पण नंतर त्यांचे राष्ट्रीयीकरण होऊन भारतीय रेल्वे व विभागीय रेल्वेज या तिच्या शाखा बनल्या तसे येथे नाही. अजूनही त्या आपले स्वतंत्र अस्तित्व व वैशिष्ट्य टिकवून आहेत.

सुजितला एन जे ट्रॅन्झिट्चा अनुभाव दररोज येतच होता व तो काही फारसा उत्साहवर्धक नव्हता. एकदा तो घामेघूम होऊन घरी आला तेव्हां एन. जे. ट्रॅन्झिटने मध्येच मुक्काम घेतला होता व त्यात वीजही गेल्यामुळे आणि गाडीचे दरवाजे बंद असल्याने सगळया प्रवाशांची उकडहंडी कशी झाली होती हे त्याच्याकडून ऐकायला मिळाले. एकदा तर न्यूयॉर्क स्टेशनवर पोचल्यावर ट्रेन रद्द करण्यात आली आहे अशी सूचना व प्रवाश्यांनी त्या बदल्यात एन जे ट्रॅन्झिटच्याच बसने प्रवास करण्याची मुभा देण्यात आली.

स्टेशनच्या बाहेर आल्यावरही ती बस कोठे उभी केली होती याचा पत्ताच नव्हता, थोडक्यात आपल्याकडे म. न. पा. जितका गोन्धळ करू शकतात तेवढा गोंधळ त्यानी करून दाखवला.

पण ऍम्ट्रॅकविषयी ती चांगली आहे असे कळले होते व आम्हाला खरेच चांगला अनुभव आला. येथे स्वत:च्या वाहनानेच किंवा अंतर जास्त असेल तर विमानाने प्रवास करणेच लोक पसंत करत असल्याने आगगाडीने प्रवास करणाऱ्यांची संख्या खूपच कमी असते त्यामुळे गाडीत गर्दी मुळीच नव्हती. अर्थात त्यामुळे भाडे खूपच जास्त असते. व्यवस्था मात्र उत्तम होती. सर्व गाडी वातानुकूलित, आरामशीर बैठका, प्रत्येक स्टेशनवर वाहक नावाची घोषणा करत असे त्यामुळे आरामशीर प्रवास होऊन सकाळी ९वा. ४५ मि, निघून दुपारी ३-१५ ला आम्ही बोस्टनला सुखरूप पोचलो. परागची बायको आम्हाला न्यायला स्टेशनवर आली होती व तिच्याबरोबर व तिच्या छोकरीबरोबर ५वा, १५ मि. घरी पोचलो. मधल्या प्रवासात त्या छोकरीने त्या भागाचे संपूर्ण मार्गदर्शन आम्हाला घडविले.

दुसऱ्या दिवशी सकाळी थोडे फिरायला मी एकटाच गेलो तेव्हा परागची शेजारीण भेटली तिने”Good Morning”म्हणून अभिवादन केले व “तुम्ही परागचे पाहुणे आहात ना? मग माझ्या

घरी अवश्य या असा आग्रह केला, व "एक बेपत्ता देश" खरच सुधारलाय याची ग्वाही दिली. त्यादिवशी आम्ही सकाळी दहा वाजता परागच्या कुटुंबियांसह बाहेर पडलो. त्याचा मामेभाऊ पण त्याच्याकडे अला होता त्यामुळे परागच्या मोठ्या गाडीतून सर्वजण रेल्वे स्टेशनला जाऊन तेथून अंतर्गत (आता आपल्याकडे ज्याची पुणेकर आतुरतेने वाट पहात आहेत त्या मेट्रो)आगगाडीने प्रसिद्ध हारवर्ड्ला गेलो.

शैक्षणिक क्षेत्रावर अधिक लक्ष देणे देशाची प्रगती साधण्याचे महत्वाचे कर्तव्य आहे याची जाणीव ठेवून इ. स. १६३६ पासून ५०७६ एकर इतक्या भव्य क्षेत्रावर तीन वेगवेगळ्या विभागात हारवर्ड हे विद्यापीठ पसरलेले आहे. आपल्याकडील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे क्षेत्र ४११ एकर तर १८५७ मध्ये स्थापन झालेल्या मुम्बई विद्यापीठाच्या सर्वत्र पसरलेल्या वेगवेगळ्या भागांचा एकूण विस्तार २५० एकर, , तर डॉ. जयन्त नारळीकर यांनी शिक्षण घेतलेल्या व १९१६ मध्ये स्थापन झालेल्या बनारस हिंदू विद्यापीठाचा विस्तार १३०० एकर, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचा विस्तार ८५३ एकर या आकड्यांचाच नुसता विचार केला तरी शैक्षणिक क्षेत्रात आपले आज काय स्थान आहे हे समजते, आणि हे त्या देशात जेथे जगातील लोक अज्ञानाच्या अन्ध:कारात चाचपडत असताना नालंदा, तक्षशिला अशी

विद्यापीठे नांदत होती व परदेशातील लोक तेथे येऊन शिक्षणाचा लाभ घेत होते! आपण तेव्हां काय पराक्रम केले याचेच गोडवे गाणार! हल्लीच्या पिढीतील मुले मात्र बारावीपर्यंत कसे बसे भारतात कळ काढतात आणि पुढच्या सिक्षणासाठी अमेरिकेत पळ काढतात, त्यामुळे परीक्षा नको म्हणणाऱ्या पालकांचीच मुले भारतीय विद्यापीठात शिक्षण घेऊन भारताचे भावी शैक्षणिक धोरण ठरवणार असे दिसते. हारवर्ड एवढ्या प्रचंड विद्यापीठाच्या ज्ञानसागरात डुंबण्यासाठी आम्हास वेळ नव्हता व आता आमच्या आयुष्यातील ती वेळही निघून गेली होती. त्यामुळे आम्ही आमचा मोर्चा आणखी एका प्रेक्षणीय स्थळाकडे म्हणजे म्यूझियम ऑफ नॅचरल हिस्टरी कडे वळवला.

या संग्रहालयात अगणित वनस्पतींच्या व त्याचे निरनिराळ्या कोनातून घेतलेले छेद यांच्या प्रेक्षणीय काचेच्या प्रतिकृती, वनस्पतिशास्त्राच्या अभ्यासकास तर उपयुक्त तर आहेच पण आपल्यसारखा सामान्य माणूसही ते पाहून अगदी आचंबित होतो. त्याशिवाय जगातील सर्व प्रकारच्या प्राण्यांचे पेंढा भरलेले नमुने, विविध खडकांचे नमुने अश्या प्रकारचे ज्यावर अनेक ग्रन्थ लिहिता येतील अश्या वस्तूंचे ते संग्रहालय पहाणे हे एक दीड तासाचे काम नव्हते. अश्या संग्रहालयाला आपण भेट दिली एवढेच सांगण्यासारखे असते. हैद्राबादचे सालारजंग किंवा अगदी

आमच्या औन्ध (सातारा जिल्हा) संस्थानच्या औन्ध या राजधानीतील वस्तुसंग्रहालय या गोष्टी पाहून विस्मयचकित होणे व आपण ते पाहिले येवढेच ध्यानात ठेवणे शक्य असते. दोन अडीच तास तेथे घालवून पाय दुखू लागले व आम्ही पोटपूजा करून

सायन्स पार्क कडे वळलो.

सायन्स पार्कही तसेच भव्य आहे कारण त्यात तर भव्य कृत्रिम तारामंडळ, तसेच विज्ञान संग्रहालय आहे. तारामंडळात बसलेल्या व्यक्तीस आपण खरोखरच अंतराळात विहार करतोय असा भास होतो. नेहमीसारखे केवळ आकाशदर्शन असे त्याचे स्वरूप नाही तर त्यात वेगवेगळे तारामंडल चित्रपटच असतात. त्या दिवशी Mountains of Kilimanjaaro हा शो होता ती फ़िल्म पहाणे हा एक रोमहर्षक अनुभव होता. सायन्स पार्कही असेच भव्य व प्रेक्षणीय आहे, येवढेच पुरे. येता जाता भुयारी रेलवेचा अनुभव मजेशीर होता. त्यात एकदा एक डॉलरचे तिकिट काढा आणि कितीही कुठेही फिरा. पूर्वी मुंबईला ट्रॅम अश्याच प्रकारे चाले म्हणे त्यात एकदा तिकीट घेतले की कितीही फेऱ्या मारता येत. मी मुम्बईला १९५९ मध्ये गेलो तेव्हां ट्रॅमने प्रवास करण्याचा अनुभव घेतला आहे पण तरीही तेथे ट्रॅम बदलता येत नसे पण येथे एकदा तिकीट घेतल्यावर वेगवेगळ्या गाड्यातून प्रवास करता येतो. एक

डोलर दिल्यावर आपल्याला एक नाणे मिळते व प्रवेशद्वारावळील स्लोटिन्ग मशीनमध्ये ते सरकवल्यावर प्रवेशद्वार उघडते व आत शिरता येते. आत शिरल्यावर आपल्याला हवी असेल त्या ट्रेनमध्ये चढायचे, सर्व प्रवासी आत शिरल्यावर दरवाजे बंद होतात. आणि नंतरच ट्रेन सुरु होते. ही गोष्ट सर्वच रेलवेजना लागू आहे, त्यामुळे तुमचे एकादे अंग बाहेर असेल तर दरवाजा बंद होत नाही अर्थातच पायठ्यावर लोंबकळत उभे रहाण्याची व्यवस्था यात नाही त्यामुळे डब्यात कोंबून जितके प्रवासी बसतील तेवढेच प्रवास करू शकतात आपल्यासारखे डब्याबाहेरून किंवा छपरावरून प्रवास करणाऱ्या धाडसी मंडळींना येथे वाव नाही. ज्यामधून आम्ही परागकडे आलो होतो, त्या ऍमट्रॅकमध्ये तर वाहक सर्व प्रवासी आत शिरल्याची खात्री करून वाहक दार बंद करतो व मगच गाडी सुरू होते.

तिसऱ्या दिवशी मत्स्यालयाची भेट ठरली होती. त्यासाठी ALEWIFE या स्टेशनला तासाभरात पोचून तेथून लाल, हिरव्या व निळया अश्या वेगवेगळया रंगाच्या आगगाड्या वापरून मत्स्यालयाला गेलो. भुयारी मार्गाच्या गाड्यांना असे रंगवैशिष्ट्य आता आपल्याकडील भुयारी मार्गासही आहे म्हणे. दिल्लीतील भुयारी रैल्मार्गावरील गाड्यांना हे रंग आहेत आणि पुणेकर ज्याची आतुरतेने वाट पहात अहेत त्य मेट्रोलाही कदाचित असतील. मेट्रो

झाल्यावर कार न वापरता मेट्रोनेच कामावर जाणार असे माझ्या मुलाचे स्वप्न आहे ते तो सेवानिवृत्त होईपर्यंत पुरे व्हावे! अर्थात हे फार अलीकडले.

आम्ही Parkstreet पर्यंत रेड लाइनने नंतर Government स्टेशन पर्यंत हिरव्या व तेथून निळया गाडीने Acquerium या स्टेशनला पोचलो. मत्स्यालयाचा विस्तार व प्राणी पाहून थक्क झालो. तोपर्यंत आम्ही फक्त पुण्यातील संभाजी उद्यानातील मत्स्यालय पाहिले होते. त्यामुळे त्यात काय विशेष मासे तर पहायचे या आमच्या समजुतीला हादरा बसला, भारतातील सर्वात मोठे तारापोरवाला मत्स्यालय १९५१ मध्ये स्थापन झले असून तेथील मोठ्यात मोठा हौद २२, ००० लिटरचा व त्यात ४०० जलप्रजाती आहेत.

बोस्टनमधील या मत्स्यालयात टाकीची क्षमता ७, ६०, ००० लिटर व त्यात ६०० प्रजातींचे २०, ००० जलचर आहेत. त्याशिवाय त्याच बरोबर सायमन्स आयमॅक्स चित्रपट गृह व व्हेलदर्शन ही अणखी दोन आकर्षणे आहेत. शिवाय पेंग्विन प्राण्यांचा एक विभाग आहे व सी टायगर वॉलरस सील सारख्या दिसणाऱ्या प्राण्याचा खेळ प्रेक्षणीय होता. हा प्राणी फारच हुशार किंवा त्याला तसे तयार केले असावे त्यामुळे त्याच्या

मार्गदर्शकाच्या आज्ञेबरहुकूम पाण्यात कोलांट्या उड्या आणखीही अनेक खेळ करत होता.

अश्या खेळांच्या बाबतीत लक्षात घेण्याची गोष्ट म्हणजे वेळापत्रकानुसार अगदी वेळेत सुरू होतात आणि थोडा वेळ होणार असेल तर तेवढा वेळही प्रेक्षकांना बोलावून त्यानाही त्यात गुंतवून उगीचच बसून राहिलो असे वाटून देत नाहीत.

# २३. न्यूयॉर्क

सुजित दररोजच न्यूयार्कला जात असल्याने त्याला न्यूयॉर्कची नवलाई नसली तरी आम्हाला मात्र न्यूयॉर्क शहर बघण्याची इच्छा होतीच आणि या वास्तव्यात ती बऱ्याच वेळा पूर्ण झाली. या शहराच्या काही भागात फिरताना मुंबईच्या फ़ोर्ट भागाची आठवण होते, पण न्यूयॉर्क स्टेशन मात्र भलतेच मोठे आहे तेथे योग्य खिडकीजवळ जाऊन तिकिट काढणे हे सुद्धा मोठे अवघड काम वाटले, शिवाय आपल्याला हवी असलेली गाडी कोठे, केव्हां येणार याच्या घोषणा ऐकून पलापळ करत तेथे पोचणे म्हणजे मोठे अवघड काम. मुंबईत सी. एस. टी. खूप प्रचंड वाटले तरी त्यामानाने अगदीच किरकोळ म्हणावे लागेल. न्यूयॉर्कला आम्ही बरेच वेळा गेलो. एकदा तर खास दोन तीन दिवस जाऊनच राहिलो होतो. एकदा सुजितला रविवारी त्याच्या वरिष्ठानी काही कामासाठी बोलवले होते तेव्हां त्याच्याबरोबर आम्ही पण गेलो होतो. वरिष्ठाची बायकोही आली होती. ते मराठी भाषकच असल्याने सुजित व त्यांचे काम चालू असताना त्याच्या बायकोने तिच्या गाडीतून आम्हाला सेन्ट्रल पार्क या मोठ्या उद्यानाची सहल घडवली.

सेन्ट्रल पार्क असे एका भेटीत पाहून पूर्ण होण्यासारखे नाही. त्यानंतर आम्ही पुन्हा एकदा दोनदा गेलो होतो. न्यूयॉर्कमध्ये एम्पायर स्टेट इमारत, पाडले गेलेले ट्विन टॉवर्स, सुजितच्या नव्या कार्यालयाची इमारत, निरनिराळे मॉल्स व चायना टौन असे पहावे तितके थोडेच आहेव आपण पाहिले हे सांगण्यापुरतेच आमच्या लक्षात रहाण्याचे हे वय असल्याने त्याचे वर्णन करणे अवघड आहे. पण अमेरिकन म्हातरे म्हाताऱ्या मात्र अगदी चाक खुर्चीत बसून का होईना या सगळ्या गोष्टी पहाण्याचा आनंद घेतात, मत्स्यालयात किंवा इतर सर्व ठिकाणी आमच्यापेक्षा अधिक उत्साहाने ती मंडळी खुर्च्या दामटत होती,

एम्पायर स्टेट ही इमारत १०२ मजली आहे व आम्ही भेट देताना ती अमेरिकेतील सर्वात उंच इमारत होती. अर्थात आम्हाला हे श्रेय मिळण्याचे कारण ओसामा बिन लादेन होता कारण तिच्याहून अधिक उंच असणारी इमारत एकच वर्ष अगोदर म्हणजे २००१ मध्ये ११ सेप्टेंबर या दिवशी त्याने पाडली होती. अमेरिकेतील जागतिक व्यापार केंद्र (World Trade Centre) या इमारतीचे दोन भव्य मनोरे ओसामा बिन लादेनच्या आदेशानुसार पाडले गेले, त्याच वेळी सुजित पिट्सबर्ग सोडून न्यूयॉर्कच्या कंपनीत कामाला लागला होता व तो न्यूयॉर्क स्टेशनवरून काही अंतर चालत कचेरीत जात असतानाच त्याला अगदी खालच्या

पातळीवरून विमाने जाताना दिसली व इतक्या खालून ती कशी जातात याचे आश्चर्य करत तो ऑफिसमध्ये पोचला तर त्याच्यासमोर खिडकीतून ती विमाने त्या दोन मनोऱ्यावर आदळली व ते एकाद्या पत्याच्या बंगल्याप्रमाणे खाली आलेले त्याने पाहिले. त्यावेळी आम्ही भारतात होतो व त्याचे ऑफिस त्याच भागात असल्याची अंधुक कल्पना असल्याने काळजीत पडलो पण दुसऱ्या दिवशी सकाळी त्याचा संदेश आला व आमची काळजी दूर झाली. पण त्यामुळे आम्हाला फक्त ते मनोरे ज्या जागेवर होते तेथील खड्डे पहायला मिळाले.

आम्ही भेट दिल्या दिवशी एम्पायर स्टेट इमारत अमेरिकेतील सर्वोच्च इमारत होती तर आज मितीला तिच्याहून उंच इमारती न्यूयॉर्कमध्येच सहा, तर अमेरिकेत आठ आणि जगात तर अठ्ठेचाळीस झाल्या आहेत तरी त्यामुळे एम्पायर स्टेट इमारतीचे महत्व कमी होत नाही. एम्पायर स्टेट हे नाव पूर्वी न्यूयॉर्क शहराचे टोपण नाव असल्यामुळे इमारतीचे हे नाव. १८९३ मध्ये मूळ वॉल्डोर्फ़ ऍस्टोरिया या नावाचे होटेल एम्पायर स्टेट इनकार्पोरेटेड कंपनीने विकत घेऊन त्याजागी १९३०-३१ या वर्षात ती उभारण्यात आली. ती उभारताना तिचा आराखडा पंधरा वेळा ती जगातील सर्वोच्च इमारत ठरावी म्हणून बदलण्यात आला होता. जरी आज जगातील सर्वोच्च इमारत नसली तरी तिच्या

वैशिष्ट्यांमुळे दररोज जवळ जवळ ४० लाख लोक तिला भेट देतात. आम्हाला १०२ व्या मजल्यावर जाता आले व तेथून दुर्बिणीतून शहराचे दर्शन घेता आले. अर्थात आत प्रवेशासाठी तिकिट व दुर्बिणीतून पहाण्यासाठी वेगळी दक्षिणा, अर्थात सर्वत्र दक्षिणा आमच्या खिश्यातून जात नसल्यामुळे ती किती आहे याविषयी आम्ही बेपर्वा होतो. आजच्या घटकेला आम्ही इमारत पाहिली म्हणण्याइतकेच श्रेय घेऊ शकतो, सध्या ४५ मिनिटात इमारतीच्या धावत्या दर्शनासाठी ३, ४९९ रुपये म्हणजे साधारणपणे $50 मोजावे लागतात.

# २४. नायगारा

आमचे पश्चिम किनारस्थ मित्र आल्यावर आम्ही नायगारा पहाण्यास गेलो व त्यासाठी मुहूर्त अमेरिकन स्वातंत्र्यदिनाचा म्हणजे ४ जुलैचा काढण्यात आला होता. आमचे मित्र आधल्या दिवशी आमच्याकडे आले व ४ जुलैला संध्याकाळी आम्ही नायगारा शहरात पोचलो. आपल्याकडे उन्हाळयात दिवस मोठा होतो तसा जगाच्या इतर भागातही होतो, त्यामुळेच मध्यरात्रीचा सूर्य हा चमत्कार नॉर्वे देशात जास्त काळ पहावयास मिळतो व त्यासाठीही लोक नॉर्वेची सफर करतात. आपल्याकडे मात्र पहाटेचा सूर्य हाही काही लोकांसाठी चमत्कार असतो. तर सांगायचे कारण म्हणजे अमेरिकेतही या काळात आठ आठ वाजेपर्यंत सूर्य मावळत नाही आणि उगवतोही खूप लवकर त्यामुळे या दिवसाच्या दीर्घत्वाचा उपयोग येथे या काळात एक तास वेळच बदलून म्हणजे सकाळी सात वाजता आठ वाजले म्हणायचे व तसेच वागायचे म्हणजे कार्यालये एक तास लवकर उघडतात अर्थात एक तास लवकर बंदही होतात. याला तेथे डे लाइट सेव्हिंग म्हणतात. कारण दिवसाच्या उजेडाचा उपयोग कामासाठी होतो.

नायगारा पहायला आम्ही चार जुलैला म्हणजे अमेरिकेच्या स्वातंत्र्यदिनी गेलो होतो त्यामुळे तेथे त्या दिवशी रात्री बरीच रोषणाई केलेली दिसली अशी रोषणाई इतरही बऱ्याच दिवशी करतात म्हणे! आणि अक्षरशः हजारोंच्या संख्येने पर्यटकांचे तांडे तेथे आले होतें. . नालाच्या आकाराचा हा धबधबा कॅनडाच्या बाजूने अधिकच चांगला दिसतो असे ऐकले होते पण त्यासाठी व्हिसा काढावा लागणार असल्यामुळे तो उपद्व्याप न करण्याची आम्ही काळजी घेतली. त्या दिवशी आम्ही संध्याकाळी नायगारा शहराजवळ पोचलो तेव्हा संध्याकाळचे आठ वाजले होते पण संधिप्रकाश अगदी आपल्याकडे संध्याकाळी सहा वाजल्यासारखा होता. आमचे पूर्वनियोजित उतरावयाचे ठिकाण म्हणजे बॉर्डर इन या नावाचे एक गुजुभाईचे मोटेल होते. तेथून धबधबा अगदी जवळ म्हणजे अर्ध्या तासाच्याच अंतरावर होता. पण रात्री रोषणाई पाहून परत येताना काहीतरी चूक होऊन सुजितचा मार्ग चुकला. तरी त्याने बरोबर नकाशा घेतला होता. आजकाल मार्गदर्शक जी. पी. एस. (ग्लोबल पोझिशनिंग सिस्टिम)मिळते तसे त्यावेळी नव्हते त्यामुळे जाताना अर्ध्याच तासात गेलेलो आम्ही परत येताना तब्बल दोन तासानी मोटेलवर आलो.

उन्हाळ्याचे दिवस असल्याने हवा बरीच गरम होती अर्थात याचा जास्त अनुभव दुसऱ्या दिवशी धबधब्याखालून नावेतून

जाताना परिधान करायच्या रेनकोट आणि बूट या वस्तूंसाठी कडक उन्हात रांगेत उभे रहायला लागले तेव्हा आला. दोन ठिकाणी रेनकोट घालण्याची वेळ आली. मेड ऑफ मिस्टच्या (Maid of Mist) धबधब्याखालून जाताना निळा रेनकोट परिधान करावा लागतो आणि धबधब्याजवळून लाकडी मार्गावरून पायी फिरतानाही उडणाऱ्या तुषारांपासून कपडे भिजू नयेत म्हणून घालावा लागणारा पिवळा! त्यातला निळा रेनकोट काहीजणांनी आठवण म्हणून ठेवूनही घेतला होता. रेनकोटसाठीच्या व एकूणच सर्व ठिकाणी रांगांचे नियंत्रण सुट्ट्यांवर असलेली चौदा पंधरा वर्षे वयाची शाळेतील मुलेच करत होती ही बाब उल्लेखनीय!

एकदा धबधब्याजवळील लाकडी पायऱ्यांवरून चालताना चष्मा न काढण्याची चूक मला चांगलीच भोवली, कारण चष्म्यावर उडणाऱ्या त्या तुषारांमुळे मला काही दिसेनासे झाले म्हणून गडबडीत चष्मा उतरवून माझ्या अंदाजाने रेनकोटच्या आत असणाऱ्या शर्टाच्या खिशात म्हणून टाकला पण प्रत्यक्षात मात्र तो सरळ खाली जाऊन पडला अर्थातच त्यानंतरचा प्रवास मला चष्म्याशिवायच करावा लागला. अमेरिकेत डोळयाच्या डॉक्टरकडे जाऊन डोळयाचा नंबर काढणे आणि चष्मा तयार करून घेण्याचा उपद्व्याप टळावा म्हणून अगोदरच मी दोन चष्मे नेले होते म्हणून बरे पण तो दुसरा चष्मा पण असाच गहाळ होण्याची वेळ पुढे आली

होती. पण त्याची कहाणी पुढे कधीतरी! नायगारा धबधबा पाहून झाल्यावर तेथील एक संग्रहालय व एक फ़िल्म शो पाहिला.

# २५. स्वतंत्रतादेवीचा पुतळा

.

दुसऱ्यादिवशी स्वतंत्रतादेवीच्या पुतळ्याचे दर्शन घेण्यासाठी न्यूयोर्क बंदरावरील लिबर्टी बेटावर जावे लागले. पूर्वीपासून पुतळे हा आपल्या संस्कृतीचा मानदंड आहे त्यामुळे पुतळयांच्या संख्येबद्दल आपला जगात पहिला क्रमांक असेल. आता तर वल्लभभाई पटेल यांचा सर्व जगातील सर्वोच्च पुतळा Statue of Unity आपल्याकडे नर्मदाकाठी गुजरात राज्यत उभारला गेला आहे त्यची उंची १८२ मीटर आहे. अमेरिकेतील स्टॅच्यू ऑफ़ लिबर्टी या नावावरूनच हे नाव दिले असावे फक्त या युनिटीचा अनुभव आपण केव्हां घेणार येवढाच प्रश्न आहे.

स्वतंत्रतादेवीच्या पुतळ्याकडे जाण्यासाठी खूपच कडक सुरक्षाव्यवस्था येथेही होती. सर्व तपासण्या करून बोटीने आम्ही लिबर्टी बेटावर पोचलो. येथे पुतळा पहाण्यासाठी तिकीट नाही पण फेरी बोटसाठी मात्र बरेच तिकिट होते व त्या बोटी तेथे नियुक्त केलेल्याच होत्या, पुतळ्याच्या चर पायऱ्या चढून जायला तिकीट होते व त्याचे आरक्षण करावे लागते व वर जाऊ शकणाऱ्या व्यक्तींची संख्या मर्यादितच असते.




पुतळा तर केव्हांपासून दिसत होता पण त्याच्या पायथ्याशी जाऊन त्याचे दर्शन घडल्यावर एकदम वेगळाच उत्साह अंगात भरल्यासारखे वाटले. हा भव्य पुतळा ४६ मीटर उंच असून तांब्याचा उपयोग करून बनवला आहे. . स्वतंत्रतादेवीचा पुतळा लिबर्टा या रोमन स्वातंत्र्य देवीचा वस्त्राधारी पुतळा आहे व तिच्या उजव्या हातात धरलेली स्वातंत्र्यज्योत तिने आपल्या डोक्याच्या वर उंचावून धरली आहे. तिच्या डाव्या हातात एक पुस्तकाकार चौकट असून तीवर रोमन भाषेत JULY IV MDCCLXXVI (July 4, 1776) अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसारित केला तो दिनांक कोरलेला आहे, तसेच त्या मूर्तीच्या पायाशी तुटलेली साखळी व बेड्या पडलेल्या दाखवून स्वातंत्र्याचा आविष्कार केला आहे.

हा पुतळा “स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व” या त्रिसूत्रीचा प्रथम उच्चार करणाऱ्या फ्रेंच जनतेने अमेरिकेला प्रदान केला आहे व फ्रेड्रिक ऑगस्ट बार्थोल्डी या फ्रेन्च मूर्तिकाराने फ्रेन्च

प्राध्यापक व राजकारणी एड्वर्ड लेबुले यांच्या १८६५ मध्ये “अमेरिकेच्या स्वातंत्र्याचे प्रतीक असणारे कोणतेही शिल्प फ्रेन्च व अमेरिकन लोकांच्या सहकार्याने व्हायला हवे “ या उद्गारातूम स्फूर्ति घेऊन त्यासाठी प्रयत्न सुरू केले. लेबुलेने पुतळ्याचा खर्च फ्रान्सने करावा व उभारणीचा अमेरिकेने असे सुचवले. त्यानंतर मूर्तीचे डोके व स्वतंत्रताज्योतधारी हात बार्थोल्डिने तयार करून फिलाडेल्फिया येथे १८७६ मध्ये प्रदर्शित केला, पुढील कामासाठी पैसा उभा करणे अवघड बनले होते. . जोसेफ पुलित्झर या प्रकाशकाने त्यासाठी जनतेला आवाहन केले व एक डॉलरसुद्धा देणारे असे १, २०, ००० देणगीदारांकडून पैसे जमा केले.

फ्रान्स मध्ये पुतळ्याचे भाग तयार करून त्यावेळी बेडलोज या नावाच्या बेटावर वायुमार्गे आणून तेथे त्यांची जुळणी करून तेथे तयार केलेल्या चबुतऱ्यावर त्याची स्थापना करण्यात आली. त्यानंतर पुतळ्याच्या बाबतीत अनेक घटना घडल्या. दुसऱ्या महायुद्धात त्याला संरक्षण देण्यात आले तरी तो पहाण्यासाठी उपलब्ध होता फक्त रात्रीची प्रकाशयोजना बंद ठेवण्यात आली

होती. १९५६ मध्ये बेड्लो बेटाचे ‘‘स्वतंत्रता बेट ‘‘असे नामकरण करण्यात आले. आपल्याकडे नागरिकांना दुष्काळ, पूर, भूकंप वा करोनासारख्या राष्ट्रीय आपत्तीसाठी देणग्या देण्याचे आवाहन करण्यात येते. कारण पुतळे किंवा मंदिरे उभारणे अश्या अधिक महत्वाच्या कामासाठी शासनाचा पैसा कारणी येतो अर्थात तोही कराच्या रूपाने नागरिकांनीच दिलेला असतो हेही आहेच!

आमचे मित्र आमच्याकडे येऊन नायगारा आणि न्यूयॉर्क पाहून परत जाताना आम्हाला पुन्हा एकदा त्यांच्याकडे येण्याची आठवण करून गेले आणि आम्ही पण येण्याचे आश्वासन त्यांना दिले. पण आपण जाऊच अशी मला खात्री नव्हती, कारण माझा नेहमीचाच बाहेर जायचा निरुत्साह. शिवाय तेही पुणेरी असल्यामुळे त्यांचा आग्रहही एकदा आमच्याकडे या की राव अशा पुणेरी थाटाचाच असण्याची शक्यता नाकारता येत नव्हती पण पुणे सोडून बरेच दिवस राहिल्यामुळे की काय त्यानी पुणेरीपणाही सोडून दिला असावा. कारण एक दिवस खरोखरच त्यांचा दूरध्वनी आला आणि त्यानी आम्हाला त्यांची हॉलिवूड, युनिव्हर्सल स्टुडिओला भेट देण्याची तारीख ठरत आहे आणि ती

आम्हा जमण्यासारखी आहे किंवा नाही असे विचारले. असे त्यानी विचारल्यावर मात्र या विषयावर गंभीर विचार करणे आलेच

आम्ही नेहमीप्रमाणे या विषयावर चर्चासत्र सुरू केले. आमच्या घरात कोणतीही गोष्ट चर्चा केल्याशिवाय ठरत नाही. (वा ठरवून मग बहुतेक वेळा रद्दही होते) बरीच साधक बाधक चर्चा झाली. सुजितचे मत अर्थातच आम्ही जावे असेच होते. चर्चेचे मुख्य कारण आम्हाला अमेरिकेत एकट्याने विमानाचाच काय पण कसलाच प्रवास जमेल की नाही याची शंका होती आणि खरोखरच आम्ही अमेरिकेच्या भूमीवर पाय ठेवल्यापासून पायी फिरण्यापलीकडे स्वतंत्रपणे कोठेही जाण्याचा प्रयत्न केला नव्हता. त्यात त्यांच्याकडे सानहोजेला जाण्यासाठी एकदा विमान बदलावे लागत होते हीसुद्धा महत्त्वाची अडचण होती. तरीही आता इतक्या लांब आलोच आहोत तर एकदा हाही अनुभव घ्यावा असा शेवटी निश्चय करून आम्ही येत असल्याचे त्यांना कळवले आणि सुजितने आमची सानहोजेची तिकिटे खरेदी केली. अमेरिकन एअरलाइन्सचे हे विमान पिटसबर्गला बदलावे लागत होते.

# २६. नेवार्क ते सॅन होजे

नेवार्कहून ते विमान संध्याकाळी साडेसहाला सुटून पिटसबर्गला साडेसातला पोचणार होते आणि तेथून आठ वाजता सुटणारे विमान आम्हाला पकडायचे होते. आमचा संपर्क सतत राहावा म्हणून सुजितने एक भ्रमणध्वनी आम्हाला दिला होता आणि त्यावरून संपर्क कसा साधायचा याविषयी सूचना पुन्हापुन्हा दिल्या होत्या कारण उघडच होते. यापूर्वी आम्ही भारतातही भ्रमणध्वनी वापरला नव्हता. शिवाय प्रत्येक यंत्राचे वापरण्याचे तंत्र वेगवेगळे असते. अमेरिकेत तर काही बोलायलाच नको. साधा बाथरूममधला नळसुद्धा कधीकधी उघडायला जमत नाही. एकदा खरोखरच एका हॉटेलमध्ये आम्ही उतरलो असताना अंघोळ करण्यासाठी कपडे काढून शॉवरखाली उभा राहिलो आणि पाणी सोडण्याचा प्रयत्न केला पण कितीही वेगवेगळ्या प्रकारे नळाची आराधना केली तरी तो मुळीच दाद द्यायला तयार नाही. अखेर त्याचा नाद सोडून कपडे पुन्हा चढवून बाथरूमबाहेर येवून मुलाला तो नळ कसा उघडतात हे विचारावे लागले(त्यालाही त्यासाठी बरीच कसरत करावी लागली होती) तेव्हाच अंघोळ करणे शक्य झाले. असो! विमानतळावर आम्हाला सोडायला संयुक्ता आली

होती कारण सुजितला तो गुरुवार असल्याने कामावरून घरी लवकर येणे जमणार नव्हते. तिने जितक्या आतपर्यंत आम्हाला सोडणे शक्य होते तेथपर्यंत आम्हाला सोबत केली. पुढे अंग आणि बॅगझडती होऊन आम्ही आत गेलो. ज्या गेटमधून विमानात प्रवेश करायचा तेथे जाऊन बसल्यावर त्याला भ्रमणध्वनीवरून संदेश पाठवल्यावर ती आणि आम्हीही निर्धास्त झालो. या प्रवासात भ्रमणध्वनीचा फारच उपयोग करावा लागणार आहे याची तेव्हा कल्पना नव्हती.

बोर्डिंग पासवर उल्लेखलेल्या गेटमधून आत प्रवेश करण्याची सूचना लगेचच मिळाली आणि सहा वाजता आम्ही विमानात स्थानापन्नही झालो आणि तसा संदेश भ्रमणध्वनीवरून पाठवून विमानकर्मचाऱ्यांच्या सूचनेनुसार तो बंद करून सौ. वतीच्या पर्समध्ये आम्ही त्याची प्रतिष्ठापना केली. आता पिटसबर्गला पोचल्यावरच त्याला कळवायचे तोपर्यंत त्याची आवश्यकता नाही असे वाटले होते. पण तसे घडायचे नव्हते. साडेसहा वाजले तरी विमान उडण्याचे चिन्ह दिसेना उलट पायलटने सूचना दिली की "खराब हवामानामुळे विमान निघायला उशीर होत आहे पण आम्ही वेळेत विमान पिटसबर्गला न्यायचा प्रयत्न करू. " असे ऐकल्यावर आता आपण पिटसबर्गला काही आपण वेळेत पोचत नाही आणि पुढची फ्लाइट काही आपल्याला मिळत नाही अशी

भीती मला वाटू लागलीच. म्हणून मी लगेचच पर्समध्ये स्थानापन्न केलेला भ्रमणध्वनी बाहेर काढून सुजितला परिस्थितीची कल्पना दिली.

माझ्या शेजारी एक अमेरिकन प्रवासी होता त्याला पुढची फ्लाइट चुकली तर काय असे विचारल्यावर बहुतेक ते दुसऱ्या फ्लाइटमध्ये बसवण्याचा प्रयत्न करतात असे गुळमुळीत उत्तर त्याने दिले. म्हणजे तो अमेरिकन असला तरी या अडचणीला नवखाच असावा. मला एकदम नेहमीच्या एस. टी. च्या प्रवासाची आठवण झाली. बऱ्याच वेळा आम्ही बसलेल्या एशियाड गाडीचा टायर नेमका पंक्चर होतो आणि गाडीत ज्यादा टायर नेहमीप्रमाणेच नसतो. कंडक्टरला असे का विचारल्यावर तो त्रासिकपणे काहीतरी उत्तर देतो कारण सगळेच प्रवासी तोच प्रश्न विचारत असल्यामुळे तोही वैतागलेलाच असतो आणि मागून येणाऱ्या लाल डब्याच्या गाडीत कसेबसे आम्हाला कोंबून पुढे रवाना करून आपली जबाबदारी पार पाडतो. विमानात क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी भरल्यामुळे अतिओझ्याने विमान कोसळले अशी बातमी कधी वाचलेली नसल्यामुळे विमानप्रवासात तसे काही असणार नाही याची खात्री नसली तरी अंदाज होता, पण विमानतळावर असेपर्यंत प्रवासी ही विमानसेवेची जबाबदारी असते असे पुढील अनुभवावरून समजले.

सात वाजले तरी हवामान सुधारत नव्हते आणि पुढची फ्लाइट चुकण्याची दाट शक्यता मला दिसू लागली. सुजितचा परत फोन आला की त्याने पिटसबर्गला असलेल्या त्याच्या मित्राला फोन करून आम्हाला रात्र तेथेच काढावी लागली तर आमची राहण्याची सोय करावयास सांगितले होते. फ्लाइट चुकण्यापेक्षा पुढे आमच्या मित्राने दुसऱ्या दिवशी पहाटेच त्याच्या घरून निघून डिस्नेलँड आणि युनिव्हर्सल स्टुडिओजवळील आमच्यासाठी आरक्षित केलेल्या हॉटेलची व्यवस्था वाया जाणार की काय याची मला जास्त काळजी पडली होती. साडेसात वाजले आणि पुन्हा हवा खराब असल्याचीच सूचना देण्यात आली. शेवटी आठला पाच मिनिटे कमी असताना हवा सुधारल्याची खात्री पायलटला झाल्यामुळे त्यानी उड्डाण करायला सुरवात केली.

पायलटने अजूनही आम्हाला पुढील फ्लाइट मिळवून देण्याचा आशावाद दाखवला होता आणि खरेच आम्ही नेवार्क विमानतळ सोडतो न सोडतो तोच पिटसबर्ग विमानतळावर आपण उतरण्याची तयारी करत आहोत अशी सूचनाही झाली. म्हणजे हा प्रवास जेमतेम वीस पंचवीस मिनिटांचाह होता एस. टी. च्या प्रवासाचे गणित माझ्या डोक्यात इतके घट्ट बसले होते की आतापर्यंत दोन वेळा विमानात प्रवेश करण्याचा अनुभव असूनही आता पिटसबर्गला जर पुढची फ्लाइट निघायच्या तयारीत असली

तर आपण धावत जाऊन सुटणाऱ्या एस. टीच्या मागील वा पुढील दरवाज्यावर थाप मारावी तसा विमानाचा दरवाजा खडखडावयाचा आणि तो उघडायला लावून आत प्रवेश करायचा असे मी ठरवूनही टाकले. या बेताला सर्व गोष्टी विचारपूर्वक करणाऱ्या सौ. ने कशी मान्यता दिली हे आस्चर्यच!

पिटसबर्गला उतरतानाच ज्या प्रवाशांना पुढची फ्लाइट पकडायची असेल त्यांना अगोदर उतरू द्यावे अशी सूचना होऊन आम्हाला बाहेर पडून लगेच कोणत्या गेटकडे जायचे याची सूचनाही मिळाली. आम्ही दोघे जमेल तितक्या वेगाने सामानासह बाहेर पडलो. विमानतळावर एका गेटमधून प्रवेश करून पिटसबर्गहून सानहोजेला जाणाऱ्या फ्लाइटच्या गेटकडे जाऊन त्या विमानात प्रवेश करायचा होता. प्रवेशद्वारावरील विमानकंपनीच्या कर्मचाऱ्याने आम्हाला हवे असलेल्या गेटकडे कसे जायचे याचे मार्गदर्शन केल्यावर आम्ही अगदी पळतच आमच्या वयाला न शोभणाऱ्या इतक्या वेगाने त्या गेटकडे गेलो की आम्ही त्या गेटकडे जाऊन खरोखरच गेटचा बंद दरवाजा खडखडवीत आहोत की काय अशी शंका बाहेर बसलेल्या कर्मचारी स्त्रीला येऊन तिने मला बोलावले आणि"Hay man what are you doing? " असे विचारल्यावर मी तिला आमची फ्लाइट कशी उशीरा आली आणि त्यामुळे आम्ही किती घाईघाईने आलो याविषयी खुलासा

करण्याचा प्रयत्न केल्यावर "Hi what are you doing?Do you think you can enter the plane like this? " असे विचारून माझ्या अडाणीपणाची जणू कीवच केली आणि अजून तुमच्या फ्लाइटची अनौन्समेंटही झाली नाही असे बजावून सांगितले तेव्हां तिच्या बोलण्याचा राग न येता किंवा आपल्या अडाणीपणाचे प्रदर्शन झाल्याची लाज न वाटता आता पुढील प्रवास पदरात पडला या कल्पनेने आमचा जीव भांड्यात पडला आणि मग भ्रमणध्वनी बाहेर काढून आम्ही सुजितला संदेश पाठवून त्याचीही काळजी दूर केली. मग नेहमीच्या पद्धतीने आम्ही सॅन होजेला जाणाऱ्या विमानात स्थानापन्न झालो.

पिटसबर्गपर्यंतचा प्रवास अगदीच छोटा असल्याने आणि आम्ही वेगळ्याच काळजीत असल्याने प्रवासात पेयपान अथवा इतर काही गोष्टींकडे आमचे मुळीच लक्ष नव्हते पण आता प्रवास तीन-चार तासांचा असल्यामुळे त्या गोष्टी व्यवस्थित सुरू झाल्या मात्र या प्रवासात येता जाता दोन्ही वेळा फूटबॉलवर आधारित एकाच इंग्लिश पिक्चरने आमची पाठ पुरवली. दुसरी गोष्ट म्हणजे यावेळी एअर इंडियासारखे श्रवणयंत्र (हेडफोन) फुकटात नसून त्यासाठी चक्क पाच डॉलर मोजावे लागणार होते, आणि ते लावूनही आम्हाला ऐकू येणाऱ्या शब्दांपैकी कितीसे कळणार होते हाही प्रश्नच होता त्यामुळे आम्ही तिकडे लक्ष न देता एकादी डुलकी

काढता येतेय का याकडेच लक्ष देणे पसंत केले. अमेरिकेच्या अतिपूर्वेकडून अतिपश्चिमेकडे आम्ही जात असल्यामुळे वेळेत तीन तासांचा फरक होता त्यामुळे नेवार्कहून आठ वाजता निघूनही आम्ही सान फ्रन्सिस्कोला रात्री साडेदहालाच पोचलो. आम्हाला न्यायला विमानतळावर आमचे मित्र आपल्या चिरंजीवांना घेऊन आले होतेच त्यांच्याबरोबर फ्रीमोन्टला अमरच्या निवासस्थानी पोचलो.

# २७. डिस्नेलॅन्ड

डिस्नेलँड आणि युनिव्हर्सल स्टुडिओसाठी लॉस एंजेलिसजवळ एका होटेलमध्ये आमच्या सर्वांच्या वास्तव्याचे आरक्षण मित्राच्या मुलाने केले होते. तो प्रवास बराच मोठा होता आणि गाडी चालवण्याचे काम त्याला एकट्यालाच करावे लागणार असल्यामुळे पहाटे लवकरच निघण्याचा त्याचा विचार होता. त्यामुळे मित्राच्या घरी पोचून थोडेबहुत स्थिरस्थावर होऊन कशीबशी दोन तीन तास झोप काढली की लगेच आमची बाहेर पडायची वेळ झाली.

दुसऱ्या दिवशी पहाटेच आम्हाला निघावे लागले. अर्थात कुठेही दुसरीकडे काही बघण्याच्या दृष्टीने जावयाचे म्हटले की कमीतकमी वेळ झोपेत घालवणे आवश्यक असते तरच काही बघायला वेळ मिळतो. आमच्या मित्राचे कुटुंबीय म्हणजे ते स्वतः, त्याच्या सौभाग्यवती, त्यांचे चिरंजीव अमर आणि नात आर्या आणि आम्ही दोघे असे आम्ही सर्व लोक असल्यामुळे त्यानी एक मोठी कार भाड्याने घेतली होती. अमरच्या बायकोला सध्या पूर्ण बेडरेस्ट सांगितल्यामुळे ती येणार नव्हती. कार चालन अर्थात अमर करणार होता. अशा प्रवासाला निघताना सुजित बहुधा रस्त्याचा

नकाशा अगोदर आंतरजालावरून छापून घ्यायचा आणि तो बरोबर घेऊन सॅमी त्याला मार्गदर्शन करायची. अमरने तसे काही केले नव्हते तो मोठे अमेरिकन मार्गदर्शक नकाशाचे पुस्तक घेऊन गाडीत बसला होता आणि माझा मित्र त्याला त्या पुस्तकावरून मार्गदर्शन करणार होता. अलिकडे जी. पी. एस्. (ग्लोबल पोझिशनिंग सिस्टिम) निघाले आहेत. हे उपकरण गाडीत बसवल्यास आपले निघण्याचे आणि गंतव्य स्थान याची माहिती पुरवल्यावर त्या उपकरणात आपल्या मार्गाचा नकाशा दाखवला जातो एवढेच काय त्यातून मार्गदर्शक सूचनाही ऐकवल्या जातात. त्यामुळे चालकाला गाडी चालवणे अतिशय सोपे जाते. आपण मार्गात थोडा बदल केला की लगेच ते उपकरण तसा बदल केल्याचे आपल्याला सुनावून पुन्हा त्याप्रमाणे योग्य मार्गबदल करून आपले सूचना देण्याचे काम चालू ठेवते असे ते फार उपयुक्त उपकरण आहे आणि आता ते आपल्याकडेही दिसू लागले आहे. काही काही भ्रमणध्वनीतही ते बसवलेले असते आणि परक्या शहरात वावरायला ते फार उपयुक्त असते. त्यावेळी हे उपकरण इतके प्रचारात आले नसावे आणि आंतरजालावरून मिळणारा नकाशाही बरोबर घेतला नसल्यामुळे त्या मोठ्या पुस्तकात पाहून आमच्या मित्राच्या मार्गदर्शनावर गाडी चालवणे अमरला भाग होते.

प्रवासाला निघण्यापूर्वी अमरच्या आईने दोन दिवसाच्या प्रवासाची भक्कम तयारी केली होती. तामुळे खाण्यापिण्याची चंगळ निघाल्यापासूनच सुरू झाली होती पण त्यामुळे मित्राचे लक्ष मार्गदर्शक पुस्तकापेक्षा खाण्याकडेच जास्त लागल्यामुळे त्याचा परिणाम त्याच्या मार्गदर्शनावर होऊ लागला आणि बऱ्याच वेळा अमरची गाडी भलत्याच दिशेने भरकटू लागली. एकादी खूण गेली का हे त्याने विचारल्यावर ती यायची आहे असे आत्मविश्वासाने सांगितल्यावर थोड्या वेळाने ती पूर्वीच गेल्याचे मित्राच्या ध्यानात यायचे अशा वेळी आपली बाजू सावरण्यासाठी "अरे मी तर तुला मागेच सांगितले होते "असे मित्राने म्हणावे आणि अमरबाबूना गाडी थांबवून पुस्तक आपल्या हातात घेऊन सगळा नकाशा आणि मार्गदर्शक खुणा तपासून पाहाव्या लागावे असे बऱ्याचदा घडत होते. . थोडक्यात मार्गदर्शना ऐवजी मित्राकडून मार्ग चुकवण्याचेच काम मोठ्या प्रमाणात चालू होते.

पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकत असताना बोटक्लबवर नौकानयन हा आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या एक आवडता छंद असे त्या काळात मीही थोडाबहुत या नौकानयनाचा आनंद उपभोगला त्यात टब्फोर या बोटीचा समावेश होता. त्यात चार जण वल्हे मारायचे. आणि एक सुकाणुधारक नावेचा मार्ग योग्य राहील याची दक्षता घ्यायचा. त्या

सुकाणुधारकाला कॉक्स म्हणतात. माझ्या नौकाचालन कारकीर्दीत या सुकाणुधारकाचे काम माझ्याकडे असे. त्याचे कारण मार्गदर्शन हे काम म्हणजे केवळ नाव फार वाकडी तिकडी जाऊ न देणे येवढ्याप्र्रतेच मर्यादित असे. कारण त्यातून आम्ही जगप्रवास करणार नव्हतो. वल्हे मात्र जोरात न मारल्यास शर्यतीत हरण्याची शक्यता असे. त्या अनुभवाच्या जोरावर आताही मित्राला बाजूस सारून आपण मार्गदर्शकाचे काम करावे असा मोह क्षणभर मला झाला पण त्यामुळे अमरचे काम मी फार सोपे केले असते की अवघड याविषयी मला जरा शंका होती. माझ्या चुका दाखवून द्यायलाही त्याला जरा संकोच वाटला असता. शिवाय पितापुत्रांच्या प्रेमळ (सं)वादाचा जो आनंद आम्हाला उपभोगायला मिळत होता त्याला आम्ही मुकलो असतो!

यापूर्वी आमचा सगळा प्रवास पूर्व किनाऱ्यावरील रस्त्यावर झाला होता आणि त्या रस्त्यांवर अतिशय दाट झाडी दुतर्फा होती आता मात्र अमेरिकेच्या पश्चिम भागात आम्ही आलो होतो आणि जुलै महिना असूनही रस्तांवर झाडी जवळजवळ नव्हतीच म्हटले तरी चालेल. हा प्रदेश एकदम रुक्ष वाटला. रस्त्याच्या कडेला असलीच तर बारीक बारीक झुडुपे असायची. डोंगर सगळे उघडे

बोडके असा एकूण या प्रदेशाचा रागरंग होता. प्रवासात गाडीतून बाहेर पाहण्यासारखे काही नव्हते त्यामुळे गाडीतील प्रवासी गप्पा मारण्यातच काळ घालवीत होते त्यामुळेही मित्राला रस्ता चुकवण्याला अधिक वाव होता. असे चुकतमाकत आम्ही दुपारी बाराच्या सुमारास आमच्या वास्तव्याच्या ठिकाणाजवळ पोचलो पण मार्गदर्शक कोळून पिऊनही अमरला त्याने आरक्षित केलेले हॉटेल सापडायला तयार नव्हते. बहुधा हॉटेल न सापडल्यामुळे आपल्याला असेच परत जावे लागते की काय अशी शंका माझ्या मनात नेहमीप्रमाणे लगेच आलीच. अमर आणि माझा मित्र दोघांच्या सु(वि)संवादातून अखेर कधीतरी योग्य रस्ता मिळाल्यामुळे अचानक होटेल फेअरफ़िल्ड दिसले आणि युरेका म्हणत आम्ही सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

अमेरिकेतील होटेल्स आम्ही पाहिलेली तरी चांगलीच वाटली. यापूर्वी पिट्सबर्ग च्या होटेलचा अनुभव घेतला होता. त्यापेक्षा हे जरा अधिक चांगले वाटले. आत प्रवेश केल्यावर लगेचच एका मोठ्या प्रशस्त हॉलमध्ये सर्व प्रकारच्या चहाच्या पुरचुंड्या(टीबॅग्ज), कॉफीपूड, मध, लिंबूरस अशा गोष्टी एका मोठ्या टेबलावर ठेवल्या होत्या. आपल्याला हवे तेव्हा हवे तेवढे घ्यावे. सकाळी न्याहारीच्या वेळी इतर खाद्यपदार्थ असत. आम्ही जेवणाचे पदार्थ बरोबर घेऊन गेलो होतो. आमच्या खोल्या

चांगल्या प्रशस्त असून त्यात दोन मोठे पलंग जाडजूड गाद्या त्यावर थंडीचा पुरेसा बंदोबस्त होण्याइतकी पांघरुणे, ए. सी. फ्रीज, मायक्रोवेव्ह ओव्हन, दोन टेबले चार पाच खुर्च्या असत. सोबत प्रशस्त बाथरूम, त्यात स्वच्छ चार चार टर्किश टॉवेल्स. तेवढेच नॅपकिन्स, गरम गार पाण्याचे नळ तसेच वॉश बेसिन्स त्यातही गरम थंड पाण्याचे नळ, तीच गोष्ट शॉवरची खाली मोठा टब अशी सर्व व्यवस्था होती. आम्ही सोबत आणलेले पदार्थ शीतकपाटात ठेऊन नंतर मायक्रोवेव्हमध्ये ते गरम करून खाऊ शकत होतो. आम्ही ज्या ज्या होटेलांमध्ये राहिलो ती बहुतांश अशीच होती.

दुपारी लॉसएंजेलिसला पोचल्यावर लगेचच डिस्नेलेंडला जावयासाठी आम्ही निघालो आणि दुपारी तीन वाजताच तेथे पोचलो. वॉल्टर एलियास ऊर्फ वॉल्ट डिस्ने १९०१ मध्ये शिकागोला जन्माला आला आणि व्यंगपटाच्या क्षेत्रात काहीतरी धडपड करीत असताना अनेक अपयशानंतर मिकी माउस या पात्रात त्याला यशाची वाट सापडली आणि मग त्याने मागे वळून पाहिलेच नाही. अनेक व्यंगचित्रपट आणि बोलपट त्याने काढले. १९५५ मध्ये त्याने पहिली डिस्नेनगरी कलिफोर्नियामध्ये निर्माण केली २००१ मध्ये त्याच्या शेजारी दुसरी अशीच निर्मिती त्याने केली. याव्यतिरिक्त फ्रान्समध्ये पॅरिस, जपानमध्ये टोकियो आणि हॉंगकॉंग येथेही डिस्नेनगरी निर्माण केल्या.

डिस्नेनगरीत आम्ही पोचलो तेव्हा लगेचच मिकी माउस, डोनाल्ड डक, निरनिराळ्या पऱ्या अशा डिस्नेच्या कार्टून्समधील सर्व पात्रांची जी मोठी मिरवणूक निघते ती बघायला रस्त्याच्या दुतर्फा लोकांची गर्दी शिस्तीत उभी राहून वाट पहात होती. अशा गर्दीत दिसणारा आनंद, उत्साह तेथे शिगोशीग भरून वहात होता पण आरडाओरडा, धक्काबुक्की, खाद्यपदार्थ खाऊन त्यावरील आवरणे किंवा उरलेले खाद्यपदार्थ फेकणे अशा गोष्टींचा मात्र अभाव होता. जो तो कटाक्षाने त्या गोष्टी कचराकुंडीत टाकायचा, आणि त्यासाठी कचराकुंड्या पण अगदी सोयिस्कर ठिकाणी ठेवलेल्या. आम्ही कॅमेरे सज्ज करून कार्टून पात्र फेरीची वाट पहात होतो. प्रथम सुमधूर संगीताचे सूर ऐकू यायला लागले आणि पाठोपाठ हळूहळू एकामागून एक चित्ररथ दिसू लागले. त्याच्यावर एक अथवा दोन पात्रे आरूढ झालेली असत. निरनिराळ्या प्रकारच्या वाहनातून, रथातून अथवा चालत निरनिराळी पात्रे मिरवणुकीने येत होती. डोळ्याचे पारणे फेडणारी सुखद आनंदयात्राच होती ती जणु. आम्ही निरनिराळ्या जागांवरून जास्तीतजास्त छायाचित्रे काढण्याचा प्रयत्न करून त्या यात्रेचे काही क्षण परत जाताना सोबत नेण्यासाठी गोळा करण्याचा प्रयत्न करू लागलो.

मिरवणूक संपल्यानंतर निरनिराळ्या सवाऱ्यां(राइड्स)चा आस्वाद घेण्यासाठी आम्ही निघालो. डिस्ने लॅंडमध्ये प्रवेश करतानाच आम्ही प्रवेशपत्र खरेदी केलेले असल्यामुळे नंतर आतील सर्व ठिकाणी आम्हाला मुक्तप्रवेश होता. अडचण होती पुरेसा वेळ मिळण्याची आणि त्या सवाऱ्या आमच्या प्रकृतीस सहन होण्याची. ! कारण प्रत्येक ठिकाणी लांबचलांब रांग असायची या सवाऱ्या लहान मुले आणि तरुण स्त्रीपुरुषांच्यासाठी तयार केल्या होत्या आणि या दोन्ही वर्गात आमच्यापैकी फक्त अमर आणि आर्याच बसू शकत होते. लहान मुलेही काही वेळा अशा गोष्टींचा उपभोग घेण्यास घाबरण्याची शक्यता होती. अलिस इन वंडरलॅंड, सिंड्रेला, हिमगौरी आणि सात बुटके अशा निरनिराळ्या परी किंवा भूतकथांच्या पार्श्वभूमीवर या सवाऱ्या बेतलेल्या होत्या. त्यातून जाताना लहान मुलांना काही भीतिदायक आभास होत आणि मग ते किंकाळ्या फोडत. एकदम अंधार, आग, भुते, वेताळ असे भास होणे किंवा मधूनच पाण्यातून तर कधी आगीच्या ज्वाळातून आपण जात आहोत असे आभास होते. कधी एकदम उंचावर जाऊन एकदम खोल गुहेत प्रवेश होई. काही सवाऱ्याच्या प्रवेशाजवळ हृदयरोग, स्पॉंडिलायटिस अशी दुखणी असणाऱ्यांनी स्वतःच्या जबाबदारीवर सवारी घ्यावी असा इशाराही लिहिला असे. तरीही धाडस करून मी आणि माझे मित्र (आमच्या बायकांनी केव्हाच

माघार घेतली होती)दोघानी एक धाडसी सवारी पार पाडली आणि त्यातून कोणतेही हाड अथवा अवयव न मोडता सुखरूप बाहेर पडल्यावर सुटकेचा निःश्वास टाकला. आर्यासाठी भुताखेताच्या काही सवाऱ्या आम्ही सहजपणे पार पाडल्या त्यात सर्वांनाच भाग घेता आला.

रात्री लेसर शो व फायर वर्क्स अतिशय प्रेक्षणीय होते. लेसर शोमध्ये लेसर किरण, पाण्याची कारंजी, प्रत्यक्ष नृत्य यांचा वापर केलेला होता. त्यातही डिस्नेच्या काही पात्रांचा समावेश होता. निरनिराळ्या पार्श्वभूमीवर डिस्नेच्या काही कथांतील प्रसंगही दाखवण्यात आले होते. फायर वर्क्समध्ये शोभेचे दारूकाम होते त्यातूनही मिकी माउस वगैरे निरनिराळे आकार तयार करण्याचा प्रयत्न केला होता. रात्री बराच उशीरापर्यंत हे नेत्रदीपक शोभानृत्य चालू होते.

रात्री होटेलवर उशीरा पोचल्यामुळे दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम उशीरा सुरू झाला. त्यात आम्ही नेहमीप्रमाणे रस्ता चुकवल्यामुळे पुढच्या गोष्टी पहायला आम्ही दुपारी दोनच्यानंतरच सुरवात केली. त्यादिवशीचा कार्यक्रमही खूप धावपळीचा होता कारण ॲडवेंचर पार्क, सी वर्ल्ड, आर्क्टिक राइड, डॉल्फिन शो, सी

लायन शो, पिरेट चतुर्मिती(four D show) शो, आणि शामुज शो एवढ्या गोष्टी पहायच्या होत्या.

शामुज शो, डॉल्फिन शो आणि सी लायन शो या तिन्हीमध्ये सागरी प्राण्यांकडून निरनिराळया कसरती करून घेतलेल्या पहिल्या. शामुज शोमध्ये किलर व्हेल्सचा बराच मोठा ताफा होता तर सीलॉयन म्हणजे सील हा एकच प्राणी सगळया कसरती करत होता. हा प्राणी इकडील समुद्रात मोठ्या प्रमाणात आढळतो आणि अतिशय बुद्धिमान असतो नाकावर चेंडू तोलणे अथवा झेलणे, शिड्या चढणे, शिंग फुंकणे अशा कसरती ते लीलया करतात. त्यांचा उपयोग यू. एस्. नेव्हीमध्ये पण करतात म्हणे! सी डायव्हर्सना वाटाडे म्हणून अथवा शत्रूच्या डायव्हर्सना जाळयात अडकवणे अशी कामे त्यांच्याकडून करून घेतात.

डॉल्फिन शोमध्ये अर्थातच अनेक डॉल्फिन माशांच्या कसरती पहावयास मिळाल्या. अशा प्राण्यानी ज्या कसरती करून दाखवल्या त्या पाहून त्यांच्या प्रशिक्षकाचे कौतुक करावे वाटले. असे शोज अतिशय प्रभावीपणे सादर करण्यात या मंडळींचा हातखंडा आहे. वेळेच्या बाबतीत अतिशय काटेकोर, म्हणजे एकादा शो ५-३० ला सुरू होणार असे जाहीर झाले की एक मिनिटही मागेपुढे नाही. तयारीला थोडा वेळ लागणार असेल तरी

वेळेवर एकादे गिटारीसारखे वाद्य वाजवण्यास सुरवात करणार आणि प्रेक्षकापैकी काही जणांना बोलावून त्यांच्या फिरक्या घेणार, त्यामुळे प्रेक्षकांनाही सहभागी झाल्यासारखे वाटते. मध्ये मोठा तलाव त्याच्या एका बाजूस प्रेक्षक आणि दुसऱ्या बाजूस शो सादर करणारी/रा प्रशिक्षक, कधी एक अथवा कधी दोघे. तलावाच्या अगदी जवळच्या बैठकांवर बसणाऱ्या प्रेक्षकांना काही अवखळ डॉल्फिम्सनी वा व्हेल्सनी उडवलेल्या पाण्यात भिजण्याची संधी असते आणि काही प्रेक्षकही त्यासाठी मुद्दाम पुढे बसतात आम्ही मात्र ते चुकवण्याच्या उद्देशाने पूर्वीच्या शोमध्ये पाणी कोठवर उडाले आहे हे पाहून आमच्या बैठका पकडत असू.

पिरेट्स फोर डी शो एका छोट्या चित्रपटगृहातच दाखवतात, त्या शो मध्ये काही चाच्यांची कथा गुंफली होती कथा साधारणच होती महत्वाचा भाग म्हणजे नेहमीच्या दोनच लांबी रुंदी या मितीबरोबर खोलीचा आभासही होतो. यात रानात गुणगुणणारी माशी आपल्या कानाजवळून गेल्याचा भास होतो तर काही अशाच गोष्टी अगदी आपल्या पुढ्यात घडत असल्याचा आभासही होतात. पाऊस पडत असेल तर थेंबही अंगावर पडतात किंवा काही सुगंधी फुले पाहिल्यास त्यांचा गंध येतो यालाच त्यानी चतुर्थ मिती असे नाव दिले आहे. यापूर्वी याहून भव्य त्रिमिती शोज बघितले असल्याने यात विशेष काही वाटले नाही

# २८. युनिव्हर्सल स्टुडिओ

तिसऱ्या दिवशी आम्ही बरेच लवकर म्हणजे नऊ वाजता निघून युनिव्हर्सल स्टुडिओला भेट दिली. तेथील वातावरण एकदम रंगीबेरंगी, चमकदार असे होते. जिकडे पहावे तिकडे रंगांची उधळण होती. प्रवेशापाशी अतिशय मोठा पृथ्वीचा गोल हे युनिव्हर्सल स्टुडिओचे चिन्ह(लोगो) होते त्याचेसभोवती मोठे कारंजे होते. त्यातून उडणाऱ्या पाण्याशी खेळणाऱ्या लहान मुलांमध्ये एक थेट आमच्या नातवासारखा दिसतो असे माझ्या मित्राने माझ्या निदर्शनास आणल्यावर त्याला उचलून घेण्याचा मोह झाला पण अमेरिकन लोकांना ते आवडेल की नाही असे वाटून तो टाळला. मात्र पुढच्या वारीत अमेरिकन लोक आमच्या नातवालाही गोंजारून त्याला जवळ घ्यायचे हे पाहिल्यावर लहान मुलाचे कौतुक कोणत्याही देशातील सहृदय माणसाला असतेच हे ध्यानात आले. विस्ताराचे दृष्टीने हा स्टुडिओ अतिभव्य आहे. कदाचित इकडचे इतर स्टुडिओही असेच भव्य असतील अनेक मजली सरकते जिने आहेत आणि त्यावरून निरनिराळे भाग पहाताना अगदी दमछाक होते. संपूर्ण स्टुडिओ दाखवणारी बस असून त्यात बसवून सर्व स्टुडिओचे महत्वाचे भाग दाखवतात. हैद्राबादचा

रामोजी फिल्मसिटी याच धर्तीवर उभारण्यात आला आहे असे नंतर तो पाहिला तेव्हा वाटले. .

या स्टुडिओत बऱ्याच इंग्लिश चित्रपटांमध्ये वापरलेले सेट्स ठेवण्यात आले होते, . त्यात हिचकॉकच्या काही चित्रपटाचे मला ओळखू आले. अर्थात त्या सेट्ससमोर ते कोणच्या चित्रपटातील आहेत त्यांची नावे लिहून ठेवली होती. नुकतेच २जून १९९८ ला या स्टुडिओला लागलेल्या आगीच्या भक्षस्थानी काही सेट्स पडले अशी बातमी वाचली पण त्याच बरोबर सर्वांची एक प्रतिकृति ठेवण्यात आली आहे असे व्यवस्थापकांचे निवेदन पण वाचले म्हणजे मवीन भेट देणाऱ्यांना काही कमी झाल्याचे जाणवणार नाही. कदाचित पूर्वी ज्यांनी पाहिला होता ते अमेरिकन नागरिक स्टुडिऑवर फसवणुकीचा दावा करतील या भीतीने त्या प्रतिकृती आहेत असा उल्लेख असावा कारण असे दावे करून लढायला लावणारे वकीलच अमेरिकेत आहेत त्यांना टोर्ट्स असे म्हणतात.

येथेही वेगवेगळ्या सवाऱ्या(राइड्स)होत्या त्यात काही चित्रपटावर आधारित दुनियेची सफर अंतर्भूत करण्यात आली होती पण त्याचबरोबर प्रवाशांना मधूनमधून आश्चर्याचे आणि शारीरिक धक्के पण होते. ज्युरासिक पार्कच्या सवारीत बोटीतून प्रवास होता आणि ती वेगवेगळ्या डोंगर गुहा अरण्यातून नेताना ज्युरासिक

पार्कमधील प्राणी मधून मधून डोकावत होते. या सवारीत शेवटचा हादरा अनपेक्षित असल्यामुळे माझी मान लचकली, सगळे कपडे ओले झाले आणि सर्वात वाईट गोष्ट म्हणजे माझा चष्मा उडून गेला आणि आता या दुसऱ्या चष्म्यासही मुकावे लागून (पहिला नायगाऱ्याला अर्पण केला होता)एक तर आता वाचन बंद करावे लागेल किंवा अमेरिकेतील महागडा चष्मा घ्यावा लागेल अशी भीती वाटली. पण सुदैवाने तो उडून आमच्या पायालगत नावेतच पडला होता हे मित्रवर्यांनी निदर्शनास आणून दिले. आणि माझा जीव भांड्यात पडला. (चष्मा म्हटल्यावर आठव्ले की त्यानंतर एकदा मॉलमध्ये काही चष्मे विकायला ठेवलेले दिसल्यावर सहज म्हटले की काय किंमती आहेत बघाव्या आणि त्याखाली लिहिलेले आकडे वाचून मी बुचकळ्यात पडलो कारण ते आकडे अगदी दोन(२)पासून होते आणि मनात म्हटले एवढी का किंमतीची भीती बाळगतात हे. पण नंतर मुलाशी बोलताना कळले ते आकडे किंमतीचे नसून चष्म्याच्या नंबरचे होते (किंमतीचे आकडे मला न सांगण्याची खबरदारी माझ्या मुलाने घेतली.). या शेवटच्या हादऱ्यात पाणीपण जोरात उडून नावेत त्याचा फवारा उडून आम्ही सर्व ओलेचिम्ब झालो आणि आमचे ॲडवेंचर पार्कमध्ये टाळलेले भिजणे अनपेक्षितपणे होऊन गेले. आता परत होटेलला जायचे नव्हते. ते आम्ही सकाळीच निघताना सोडले होते त्यामुळे

युनिव्हर्सल स्टुडिओपासून निघून थेट मित्राच्या घरीच पोचलो त्यावेळी रात्रीचे बारा वाजले होते.

# २९. गोल्डन गेट ब्रिज

शेवटच्या म्हणजे चौथ्या दिवशी आम्ही आमचा मित्र आणि अमर एवढेच सानफ्रान्सिस्कोला गेलो कारण आमच्या मित्राचे वास्तव्यच तेथे असल्यामुळे वहिनीनी बऱ्याच वेळा तो भाग पाहिला होता. शिवाय घरात नात आणि सुनेची काळजी त्यांना घ्यायची होती. सान फ्रान्सिस्कोला गोल्डन गेट ब्रिजवर गेलो. हवा छान होती. स्वच्छ ऊन पडले तरी हवेत सुखद गारवा होता.

गोल्डन गेट ब्रिज सान फ्रान्सिस्को आणि पॅसिफिक महासागर यांना जोडणाऱ्या भागावर १९३७ मध्ये उभारण्यात आला आणि त्यावेळपर्यंत जगातील सर्वात मोठा झुलता पूल होता. आता मात्र त्याच्याहून अधिक मोठे झुलते पूल झाले आहेत पण तरीही आधाराशिवाय येवढी लांबी असणारा हाच सर्वात मोठा पूल आहे. आपल्या भारतात या प्रकारचे लक्ष्मण झूला, राम झूला असे पाच पूल असून त्यातील गोकाक नदीवरील पुलाला मी लहानपणी भेट दिली होती. त्यावेळी मी सातवी आठवीत होतो आणि आमच्या शाळेची सहल गोकाकला गेली होती. त्यावेळची आठवण्यासारखी गोष्ट म्हणजे गोकाकला गेल्यावर नेमकी माझी दाढ दुखू लागली आणि अशा वेळी ताबडतोब इलाज करणे

त्याठिकाणी शक्य नव्हते, पण आमचे मित्रमंडळ याबाबतीत भलतेच तयार त्यापैकी एकाने मला एक औषध देतो म्हणून त्याच्या पुरचुंडीतील तंबाकूची गोळी करून मला दाढेत धरावयास सांगितले आणि त्याच बरोबर धोक्याचा इशाराही दिला होता की तोंडात तयार झालेला रस लगेच थुंकून टाकायचा एक थेंब ही पोटात जाऊ द्यायचा नाही. या बाबतीत मी अगदीच नवशिका असल्यामुळे त्याच्या सूचनेची कडक अंमलबजावणी करणे शक्य न झाल्यामुळे थोड्याच वेळात झुलत्या पुलापेक्षा अधिक वेगाने मी झुलू लागलो. असो!

गोल्डन गेट पुलावर गौरी गोविल ही दोन वर्षाची छोटी मुलगी २१ डिसेंबर १९९७ या दिवशी घसरून पुलाच्या रेलिंगला असलेल्या दहा इंचाच्या फटीतून सरळ १७० फूट खाली कोसळून जागच्या जागीच मरण पावली, त्या जागेवर तिच्या नावाने एक खांब उभा केलेला आहे आणि त्यावर या अपघाताचे वर्णन लिहिले आहे. पूल उभारल्यानंतर साठ वर्षात असा अपघात झालेला नाही असे म्हणून अधिकारी वर्ग अपघाताचे खापर त्या छोट्या मुलीवर किंवा एकमेकावर फोडत बसले नाहीत तर ताबडतोब कार्यवाही करून अशा प्रकारचा अपघात पुन्हा होणार नाही अशी दक्षता घेण्यात आली. पुण्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडे जाणाऱ्या पुलाच्या अतिअरुंद पदपथावरून

चालताना त्याच्या कठड्याचा भाग एका ठिकाणी पूर्ण नाहीसाच झाला आहे त्यातून पडून लहान मूलच काय मोठा माणूससुद्धा दगावू शकतो असे मला वाटते पण आपल्या नगरपालिका अधिकाऱ्यांना धन्यवाद अशासाठी द्यायला हवेत की सर्वच रस्ते वा पूल अशी ठिकाणे धोकादायक करून सर्वच नागरिकांना त्यांनी इतके तयार केले आहे की कोणत्याही सर्कशीत झूल्यावरील कसरती ते सहज करू शकतील त्यामुळे अशा किरकोळ दुरुस्त्या करून आपला अमूल्य वेळ वाया घालवण्यात त्यांना स्वारस्य नाही.

गोल्डन गेट पूल प्रेक्षणीय तर निश्चितच आहे. त्याच्या शेवटच्या भागात छोटी बाग आणि बसण्याची जागा आहे आणि अमेरिकेतील पद्धतीप्रमाणे बागेत काही प्रेक्षणीय पुतळे बसण्यास छान बाके वगैरे आहेत. त्यावर बसून आम्ही विश्रांती घेतली आणि बागेत काही फोटो काढणे हे ओघाने आलेच. हा पूल दोन मजली आहे. जाताना वरून जावे लागते तर परतताना खालून

सान फ्रन्सिस्कोत आणखी एक पहाण्यासारखी गोष्ट (खरे म्हणजे पाहण्यासारख्या अजून पुष्कळ आहेत पण आम्ही पाहिलेली) म्हणजे लोंबार्ड स्ट्रीट. अतिशय उतरता आणि वळणावळणाचा हा रस्ता क्रूकेड स्ट्रीट या नावानेच प्रसिद्ध आहे.

काही लोकांच्या मते सान फ्रन्सिस्कोमधीलच व्हेर्मौंट स्ट्रीट याहून अधिक क्रुकेड आहे पण त्याला आम्ही भेट दिली नाही. याचा उतार जवळजवळ क्षितिजाशी ५० अंशाचा कोन करणारा आहे आणि त्यात ४०० मीटर अंतरात आठ वळणे आहेत, हा रस्ता फक्त एका दिशेने म्हणजे पूर्वेकडे खाली जाण्यासाठी वापरतात आणि त्यावर वेगमर्यादा ताशी ५ मैल अथवा ८ किलोमीटर इतकी कमी आहे. अशा रस्ताच्या दोन्ही बाजूस घरे आहेत हे विशेष.

त्या दिवशी संध्याकाळी आमच्या दुसऱ्या एका मित्राच्या मुलीकडे जायचे असल्यामुळे दुपारी घरी आलो आणि संध्याकाळी ती आम्हास घेऊन गेली. अमरच्या कुटुंबाचा त्याच वेळी आम्ही निरोप घेतला कारण आम्ही तिच्या घरी रात्र काढून परतीच्या वाटेला लागणार होतो. तिच्या घरी जाणे हा पूर्णपणे घरगुती कार्यक्रम होता त्यामुळे गप्पा आणि खाणेपिणे यात पुढचा वेळ निघून गेला आणि आम्ही दुसऱ्या दिवशी पहाटे चार वाजताच उठून पहाटे पाच वाजता परतीच्या प्रवासासाठी सान फ्रान्सिस्को विमानतळावर जायला निघालो.

# २९. मुक्काम पिट्सबर्ग

आमच्या मित्रकन्यकेने आणि तिच्या नवऱ्याने व्यवस्थित बोर्डिंग पास मिळेपर्यंत आम्हाला सोबत करून अगदी प्रवेशद्वारापाशी सोडले आणि आमचा निरोप घेतला. यावेळी पिट्सबर्गला जाणारे विमान अगदी वेळेत म्हणजे सात वाजून दहा मिनिटांनी सुटले आणि तसा भ्रमणध्वनी आम्ही सुजितला केला. पिट्सबर्गला आम्ही दुपारी ३ वाजता पोचणार होतो आणि तेथून पुढची फ्लाइट दुपारी ४-३० वाजता होती. त्याप्रमाणे आम्ही पिट्सबर्गला अगदी योग्य वेळी पोचलो आणि पुढच्या उड्डाणाची वाट पाहू लागलो. पण आमच्या उड्डाणदारापाशी अगदी शुकशुकाट दिसत असल्यामुळे मला जरा शंका यायला लागली आणि म्हणून फ्लाइट शेड्युल्डचा तक्ता मी पाहू लागलो आणि माझ्या पोटात गोळा आला कारण आमची फ्लाइट रद्द झाल्याचे त्यावर नमूद केले होते.

अशा वेळी काय करावे लागते याविषयी आम्ही अनभिज्ञ होतो तेव्हा सोपा उपाय म्हणजे तेथील कोणालातरी विचारणे. आमच्या फ्लाइटच्या गेट्पाशी असणाऱ्या आसनापैकी एकावर एक महिला कर्मचारी बहुधा त्या विमानकर्मचाऱ्यांपैकीच एक

असेल म्हणून तिला विचारू लागल्यावर ती कर्मचारी नसून एक प्रवासी स्त्रीच होती असे समजले पण तिने माझे विचारणे मनावर न घेता मला US Airways special service counterवर जाण्यास सांगितले. तेथे थोडी रांग होती पण माझा नंबर लवकरच लागला आणि तेथील खिडकीतील महिलेने माझा बोर्डिंग पास पाहून दुसरा एक तिकिटवजा कागद मला दिला पण त्यावर फ्लाइट क्रमांक वगैरे काही लिहिले नव्हते त्यामुळे आम्ही कोणत्या विमानातून पुढचा प्रवास करणार याविषयी काही उलगडा होत नव्हता म्हणून सरळ सुजितला भ्रमणध्वनी केला आणि आमची परिस्थिती त्याच्या कानावर घातली. त्याने पुन्हा त्याच खिडकीजवळ जाऊन सर्व गोष्टींची खात्री करून घेण्यास सांगितले आणि मग मी पुन्हा त्याच खिडकीधारिणीला जाऊन टोकले आणि यावर सीट नंबर नाहीत असे सांगितल्यावर तिने नवीन बोर्डिंग पासच तयार करून दिले तेव्हां आमचा जीव भांड्यात पडला. . मात्र ते पासेस चक्क रात्री ११-३० च्या फ्लाइटचे होते म्हणजे आम्हाला तेथे अजून सात तास मुक्काम करायचा होता. .

त्यादिवशी इतक्या फ्लाइट्स रद्द होत होत्या की ही तरी जाणार की नाही याविषयी शंकाच होती. येऊन जाऊन आम्ही आमच्या गंतव्य ठिकाणापासून बरेच जवळ असल्याने अगदी तशीच वेळ आली तर सुजित आम्हाला गाडीनेही घेऊन जाईल

अशी खात्री होती. पिट्सबर्ग विमानतळाची मात्र अगदी खडान खडा माहिती झाली. अर्थात त्या माहितीचा उपयोग पुन्हा कधी पिट्सबर्गवरून जावयाचे असेल तरच होणार अणि तोपर्यंत ती माहिती लक्षात रहाण्याची शक्यता नाही. पिट्सबर्ग विमानतळ बराच मोठा पसरलेला आहे आणि त्यात सर्व गोष्टी एकाच मजल्यावर आहेत हा एक मोठा फायदा मला वाटला. बरेच मोठे अंतर जाण्यासाठी सरकते रस्ते आणि छोट्या मोटारगाड्या पण आहेत. मी बोर्डिंग पास काढून आल्यावर एका गुर्जर भगिनीची गाठ पडली ती तर इंडियानापोलिसहून साडेबारालाच तेथे येऊन बसली होती. पुढे मधली सर्व उड्डाणे रद्द झाल्यावर तिलाही आमच्याच उड्डाणातून यायचे होते आणि तरी तिने बोर्डिंग पास काढलाच नव्हता. रात्री फ्लाइटची घोषणा झाली तेव्हाही बऱ्याच रद्द उड्डाणांचे प्रवासी येणार असल्यामुळे जे प्रवासी स्वतः आपले गमन रद्द करतील त्यांना रात्री उत्तम होटेलमधील वास्तव्य आणि दुसऱ्यादिवशीच्या उड्डाणाने फुकट प्रवासाचे आमिष दाखवण्यात आले होते त्याचा लाभ घेण्यास ती गुज्जु महिला तयार होती, याबद्दल तिचे कौतुक करावे वाटले. कदाचित आम्हीही त्याच वर्गातले असू असे पहिल्यांदा तिकीटवजा कागद देताना त्या खिडकीधारिणीने केला असावा, शेवटी रात्री साडेअकराच्या उड्डाणात स्थानापन्न होऊन सुजितला भ्रमणध्वनी केल्यावर

हायसे वाटले. पिट्सबर्गला विमानात बसून विमान चालू होणे हे नेवार्कला पोचण्यासारखेच होते. आणि तसेच झाले. विमानतळावर सुजित आलाच होता. घरी पोचून जेवण करून झोपलो तेव्हा रात्रीचे तीन वाजले होते.

# ३०. काही इतर भेटी

पश्चिम किनारादर्शन झाल्यावर काही दिवस फारसे काही बघणे झाले नाही. भारताचा स्वातंत्र्यदिन अमेरिकेतच साजरा केला अर्थात घरात बसूनच! श्री. लोणकरांनी तेथील एका मैदानावर ध्वजारोहण होते त्यासाठी बोलावले होते पण सुजितला सुट्टी नसल्यामुळे इतक्या लांब चालत जाणे शक्य नव्हते. पुढील एका वारीत जाण्याचा योग अला होता त्यावेळी एडिसनचे महापौर पण आले होते व जवळ जवळ सगळा समारंभ गुजराती मंडळींनीच आयोजित केला आहे, असे वाटत होते, हे कौतुकास्पद होते. हळू हळू एडिसन मिनिगुजरात होणार असे वाटते. आता तर नेवार्क विमानतळावर गुजराती पाट्या दिसू लागल्या आहेत. कदाचित काही दिवसांनी स्पॅनिशप्रमाणेच तिसरी भाषा म्हणून गुजरातीला मान्यता मिळायला हरकत नाही. .

स्वातंत्र्यदिनानंतर दोन दिवसांनी 6 Flag Park मध्ये सफारी पहाण्यास गेलो. हे एक अभयारण्यच आहे सर्व प्राणी मोकळेपणाने हिंडत होते त्यामुळे माणसांवरच फिरण्याची बंधने होती. त्या प्राण्यांमध्ये सिंह, पांढरा व पट्टेदार पिवळा वाघ, जिराफ, झेब्रा, हत्ती, गवे, सांबरे, हरणे, अस्वले, एमू. हंस, काळा व पांढरा शहामृग,

कांगारू असे प्राणी होते. एक शहामृग आमच्या गाडीच्या शेजारी येऊन आमच्याकडे डोकावून पहात होता. बहुधा ‘‘मेरे अंगनेमे तुम्हारा क्या काम है’’

म्हणत असावा.

पुढच्या आठवड्यात कनेक्टिकटला आमच्या मित्राचा मुलगा व तसा सुजितचाही मित्र श्रीधर रहात होता, त्याच्याकडे गेलो होतो त्याच्या मुलीचा फ्ल्यूटचा कॉन्सर्ट त्यादिवशी त्याच्याकडेच होता. येथील त्याच्या मुलीच्या शाळेत विद्यार्थ्यांना कुठले तरी एक वाद्य शिकावे लागते. रश्मी (त्याची मुलगी)ज्या शाळेत शिकत होती तिथे ज्या वाद्यांचा शिक्षणक्रमात समावेश होता त्यातील फ्ल्यूट हे वाद्य तिच्या बापाने निवडले. आणखी ड्रम, कीबोर्ड अशी पण वाद्ये शिकवली जात होती म्हणे! त्या शाळेच्या संचालकानी ते वाद्य म्हणजे फ्ल्यूट तो विकत घेणार की भाड्याने घेणार असा प्रश्न विचारल्यावर भाड्याने घेण्याच्या कल्पनेचा विचारही त्याच्या मनात आला नाही कारण भारतात त्यावेळी पंचवीस तीस किंवा जास्तीत जास्त पन्नास- शंभर रुपयापर्यंत मिळणारा फ्ल्यूट अमेरिकेत फारफार तर दहा पंध्रा डोलरला मिळेल या कल्पनेने त्याने विकत घेणार असे ठामपणे सांगितले आणि तो विकत घ्यायला गेल्यावर मात्र त्या फ्ल्यूटची किंमत ७९९ डॉलर्स

आहे हे ऐकल्यावर त्याचे डोळे पांढरे झाले. अर्थात त्याने मग तो विकत घेण्याचा विचार रद्द केला. हा फ्ल्यूट आपल्या बासरीसारखा अगदी साधा नसतो, तर क्लॅरोनेट या वाद्यासारखा तो धातूचा असून त्याला बरीच छिद्रे असतात आणि त्यातील काही वाजवताना बंद करावी लागतात तर काही उघडावी लागतात हे तो पाहिल्यावर कळले. फ्ल्यूट भाड्याने (महिन्याला १० डोलर्स) घेऊनच तिने मग सराव सुरू केला. तो सराव कसा चालला आहे हे सर्वांसमोर दाखवण्याच्या या कार्यक्रमाला कॉन्सर्ट म्हणजे आपण ज्याला बैठक म्हणतो तसा हा प्रकार. मुला/लीला छंद जोपासण्यासाठी एक प्रकारचे उत्तेजन म्हणाना! त्यासाठी शेजारी मित्रमडळींना त्याने प्रेक्षक म्हणून बोलावले होते. त्याची मुलगी सहावीत होती व तिचा फ्ल्युट्चा कोन्सर्ट दुसऱ्या दिवशी होता. मागे उल्लेखलेला $799 चा फ्ल्यूट ती वाजवणार होती, अर्थात तो विकत घेतलेला नव्हता. बोस्टनहून परागही त्याच्या कुटुंबासमवेत आला होता त्यामुळे छान कौटुंबिक मेळा व संगीत कार्यक्रम त्यादिवशी झाला.

# ३१. आणि परत

आम्हाला जरी अमेरिकेत सहा महिने राहण्याचा शिक्का आमच्या पासपोर्टवर मारून मिळाला तरी आम्ही निघताना ठरवल्याप्रमाणे चारच महिन्यात परत जायचे ठरवले कारण आता सुजितच्या लग्नाची तयारी करायची होती. थोडक्यात आमचे अमेरिकेत जाणे त्याच्या लग्नाच्या निश्चितीला कारणीभूत ठरले तसेच परतणेही त्यामुळेच आवश्यक ठरले. अर्थात मधल्या काळात आमचे अमेरिका दर्शन, काही मित्रांच्या गाठी भेटी हे कार्यक्रम व्यवस्थित पार पडले आणि मे महिन्यात तेथे गेलेले आम्ही सप्टेंबरम्ध्ये परतण्याची तयारी करू लागलो. यावेळी आमचे परतीच्या उड्डाणाचे वेळापत्रकही ठरलेलेच होते त्यामुळे फक्त एअर इंडियाकडून त्या दिवशी उड्डाण निघण्याची आणि आमच्या आसनव्यवस्थेची निश्चिती करणे तेवढे आवश्यक होत आणि ते केल्यावर आम्ही न्यूयॉर्क विमानतळावरून उड्डाण केले.

यावेळी मात्र लंडनला विमान थांबल्यावर आम्हाला विमानतळावर उतरू देण्यात आले. आमचे एक मित्र त्याचवेळी भारतात परत चालले होते पण ते वॉशिंग्टनवरून निघाल्यामुळे त्यांची आणि आमची गाठ लंडनला आम्ही विमानतळावर

उतरल्यावर पडली. त्यांना आमच्या नंतरच्या एअर इंडियाच्या उड्डाणातून यायचे होते पण आमच्या विमानातच बरीच जागा रिकामी असल्याने त्यानाही त्यातच बसवण्यात आले अशा रीतीने त्यांचा आणि आमचा प्रवास लंडनच्यापुढे बरोबरच झाला. मुंबई विमानतळ रात्री १२ वाजता दिसू लागला. यावेळी जातानाच्या बरोबर उलटी परिस्थिती होती, म्हणजे आम्ही जाताना सकाळी सात वाजता निघालो आणि आमचा सगळा प्रवास दिवसाच झाला कारण वेळेतील बदलामुळे आम्ही जेथे पोचू तेथे दिवसच होता त्यामुळे निघाल्या दिवशीच संध्याकाळी चार वाजता आम्ही न्यूयॉर्कला पोचलो होतो आता परत येताना मात्र संध्याकाळी आठला निघाल्यामुळे लंडनला आम्ही उतरलो तेव्हां सकाळचे दहा वाजले होते होती आणि मुंबईला आम्ही चक्क रात्री बाराला पोचलो.

विमानातून उतरून दीर्घमार्गातून बाहेर पडल्यावर उतरताना भरायचे फॉर्म एका खिडकीपाशी परत करण्याचे काम केले आणि नंतर आमचे सामान पट्ट्यावरून फिरत होते ते हस्तगत केले, बाहेर पडताना नेहमीप्रमाणे एक रांग आमच्यासारख्या अमेरिकेतून काही घेऊन न येणाऱ्यांची आणि दुसरी असे काही आणले असल्याची माहिती ज्यांना द्यावयाची असते आणि कस्टम अधिकाऱ्यांच्या परवानगीने ते बाहेर घेऊन येणाऱ्यांची! बहुतेक सगळे लोक

पहिल्या प्रकारात मोडणारे म्हणजे हिरव्या दिव्याच्या रांगेत असतात, आणि आम्ही पण त्याच रांगेतून जाणार होतो पण यावेळी कधी नव्हे ते कस्टमने त्याच कामासाठी आणखी एक कस्टम अधिकाऱ्याला लावलेले दिसले. आणि तेथे गर्दी कमी म्हणजे फक्त एकच कुटुंब आहे असे पाहून आम्हाला तिकडे जाण्याचा मोह झाला. त्या कुटुंबाचे सामान बाहेर गेल्यावर आम्ही पुढे झालो तर तो मार्ग फक्त सुप्रसिद्ध गायक श्री. सुरेश वाडकर यांच्या कुटुंबियांसाठीच उघडला होता आणि आता तो बंद करण्यात आला आहे अशी सुवार्ता आमच्या कानावर घालण्यात आली. त्यावेळपर्यंत सौ. ने सुरेश वाडकरांशी गप्पा मारायला म्हणजे, " आपण सुरेश वाडकर ना? " या स्वरुपाच्या सुरू केले होते त्यावरून आम्ही सुरेशजीना ओळखत होतो तरी ते आम्हास ओळखत होते असे काही सिद्ध होत नव्हते नाहीतर आमच्या साठी पण तो मार्ग खुला राहिलाही असता. सुरेशजीही तेवढ्यात निघून गेले नाही तर सौ. च्या गप्पांमधून काहीतरी ओळख निघून आम्ही सुरेशजींच्या परिवारातलेच आहोत असे तिने सिद्धही केले असते.

पण तेवढ्यात तेथील अधिकाऱ्यास आमची दया येऊन त्याने तपासणी करणाऱ्या जवानास "ठीक आहे यांचे तेवढे तपासून टाक आणि मग बंद कर" असे सांगितल्यावर आम्हाला तात्पुरते बरे वाटले कारण त्या जवानाने आमचे सामान चाळणीतून पलीकडे

गेल्यावर "तुमच्या सामानात कॉस्मेटिक्स आहेत असे दिसते " असे म्हणून आम्हाला बॅगा उघडायला सांगितले. मी त्याला "तसे काही नाही मी एक प्राध्यापक आहे मी असे करीन असे तुला का वाटते? "अशी त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ! मला एकदम मागे श्री. लक्ष्मण देशपांडे (हो तेच वऱ्हाडकार)यांना आलेल्या अनुभवाची आठवण झाली. त्यांना एकदा अमेरिकेत कस्टमच्या तपासणीत अडवले होते पण ते प्राध्यापक आहेत हे कळल्यावर त्याना अडवल्याबद्दल अमेरिकन कस्टम अधिकाऱ्याने त्यांची माफी मागितली होती. त्यानंतर त्यांना भारतात येताना मात्र, "अरे ही मास्तरडी ही काय आणणार आहेत" असे म्हणून त्यांना सोडण्यात आले होते. यापैकी कोणत्याही पर्यायाने का होईना मला सोडून दिले असते तरी माझी काही हरकत नव्हती पण आता कस्टमवाल्याने त्याला केवळ आमच्याच सामानाची तपासणी करायची असल्याने भरपूर वेळ आमच्यावरच खर्च करायला हरकत नाही असा विचार केला असावा. किंवा आता एकच गिऱ्हाईक (कारण सुरेशजी व्ही. आय. पी. असल्याने त्यांच्याकडून काही अपेक्षा करण्यात अर्थ नव्हता) घावले तर आता तरी बघावे काही प्राप्ती होते का असाही विचार केला असावा. त्यामुळे मी प्राध्यापक आहे हे सांगितल्यावर अमेरिकन कस्टमवाल्याप्रमाणे माझी माफी मागून किंवा भारतीय अधिकाऱ्याप्रमाणे मास्तरडा

म्हणून का होईना मला सोडण्यात देईल हा माझा अंदाज खोटा ठरवला. शेवटी मी एक बॅग उघडायला सुरवात केली आणि आमच्या (म्हणजे सौ. च्या) कडेकोट बंदोबस्तातून योग्य किल्ल्या शोधून ती योग्य त्या बॅगला लावून ती उघडायला लागलो आणि एक बॅग कशीबशी उघडून ती त्याला दाखवल्यावर त्यात आमच्या नातवासाठी आणलेली केळ, पेरू, सफरचंद अशी प्लास्टिकची फळे बाहेर पडली तेव्हा त्याने, "अहो ह्या गोल वस्तू दिसल्यावर मला कॉस्मेटिक्स आहेत असे वाटले " असे म्हणून बाकीच्या बॅगा उघडायला मला लागणाऱ्या वेळेचा अंदाज घेऊन, " अहो साहेब आम्हाला अशी नीट तपासणी करावी लागते" असे सांगून जायला सांगितले, एकूण बॅग बंद करण्यातील सौ. च्या व ती उघडण्यातील माझ्या कौशल्याचा असा फ़ायदा झाला मग मीही त्याला "अशीच कडक तपासणी करत जा, म्हणजे देश अतिरेक्यांपासून वाचेल" अशी शाबासकी देत उघडलेली बॅग तेवढ्याच वेळात बंद करून बाहेर पडलो.

त्यावेळी आमचे लांबलचक रांगेत उभे राहिलेले मित्र केव्हाच बाहेर पडून आमची वाट पाहत उभे होते, आम्हाला पाहून, " काय इतका वेळ का घेतला, काय कॅमेरा, व्ही. सी. आर. वगैरे आणलेय की काय? " असे चेष्टेच्या सुरात विचारू लागले. पण मी त्यापैकी काहीच आणले नसून इतका वेळ का लागला हे सांगून त्यांची

करमणूक केल्यावर ते ज्या एका ट्रॅव्हलच्या बसने पुण्यास जाणार होते त्यात येणार का असे त्यानी विचारल्यावर आमचा मुलगा दुसऱ्या ट्रॅव्हलची गाडी घेऊन आल्याचे त्यांना सांगितल्यावर ते निघून गेले. आमचे चिरंजीव बाहेर वाट पाहतच होते. आमच्या चिरंजिवानी आणलेल्या क्वालिस गाडीतील चौथा प्रवासी लुफ्तान्साने येणार असल्याने आम्हाला त्याच्यासाठी थांबावे लागले. तो आला तेव्हा त्याच्याकडे काहीच सामान नसताना त्याला बाहेर पडताना दहा डॉलर द्यावे लागले असे तो सांगू लागला त्यावरून मी दिलेला सल्ला कस्टम अधिकाऱ्याने काही पाळलेला दिसला नाही किंवा त्याचा अर्थ माझ्या मेहनतीची किंमत दहा डॉलर्स होती.

# ३२. दुसरी वारी

अमेरिकेच्या पहिल्या वारीहून परत आल्यावर आता शांतपणे पुण्यातच रहायचे आणि सुजितकडून दुसऱ्या नातवंडाची वर्दी मिळाल्यावरच परत जायचे असा ठाम निश्चय मी केला पण आपल्या ठरवण्यावर गोष्टी घडत नसतात. खरे तर आपल्या देशाचे सुख दुसरीकडे नाही, अश्या अर्थाची कविताही मी करून टाकली होती.

आमच्या पुण्यातील मुलाला-जयवंतला तो काम करीत असलेल्या टी. सी. एस्. या कंपनीने अमेरिकेत पाठवायचे ठरवले आणि त्याला कमीतकमी तीन वर्षे तरी जावे लागेल असे समजल्यावर सून भाग्यश्री आणि नातू प्रथमेश यांना घेऊनच जाणे त्याला आणि आम्हालाही योग्य वाटले. अर्थात आमचे त्याच्याबरोबर जाणे आवश्यक होते अशातला भाग नव्हता पण त्याच वेळी त्यानेच दुसरे नातवंड येण्याची वर्दी दिली. त्याचा जन्म अमेरिकेत व्हावा असा निर्णय आम्ही नेहमीप्रमाणे सर्वानुमते घेतला आणि मग त्याच्या आगमनाचे वेळी आम्ही अमेरिकेत असावे असे ठरले. त्यामुळे आम्हाला परत वारीवर निघणे भाग पडले. मात्र जयवन्तला कंपनीच्या कामामुळे तातडीने जावे लागले व तो

सहकुटुंब गेल्यानंतर आम्ही मात्र मागील सगळे सोपस्कार करून निघायची तयारी करू लागलो.

या वेळी आम्हाला जायची तयारी मागील वेळेप्रमाणे शेंडीपासून म्हणजे पासपोर्ट व्हिसा या गोष्टीपासून करायची नव्हती पण मागील वेळी घर जयवंत भाग्यश्रीवर सोडून गेलो होतो तसे आता करायचे नव्हते. जयवंतला घाईने जावे लागल्यामुळे आणि आम्ही आणलेल्या बॅगा त्यानी नेल्यामुळे पुन्हा एकदा बॅगांची जमवाजमव करणे आले. यावेळी दोन नवीन बॅगा घेऊन दोन मात्र पूर्वी अमेरिकेला जाऊन आलेल्या आमच्या मित्रांकडून आणल्या. ते आता अमेरिकेत जाण्याची शक्यता नव्हती. त्यामुळे घरातील जागा अडवणारे हे सामान आनंदाने त्यांनी आम्हाला दिले.

मागील वेळी फोन वीजबिल या गोष्टींची आम्हाला काळजी करण्याचे कारण नव्हते पण यावेळी जाण्यापूर्वी टेलिफोन आणि महावितरण यांच्याबरोबर झुंज घेणे आवश्यक होते. आपल्याकडे काही गोष्टी मिळण्यासाठी झगडावे लागले हे समजू शकते पण त्या काही काळ नको असल्या तर केवळ त्या त्या खात्याना कळवून चालत नाही. टेलिफोन खात्याने जाताना तुमचा फोन आमच्या कस्टडीत ठेवा आणि तो सांभाळण्याची जबाबदारी स्वीकारल्याबद्दल २५०/- दरमहा भरा असा किंवा सरळ सरेंडर

करा असे दोन पर्याय दिले. आल्यावर लगेच फोन परत मिळेल याची खात्री त्यावेळी नसल्याने पहिला पर्याय स्वीकारावा की काय असे मला वाटू लागले कारण त्यावेळी आजच्यासारखे फुकटात भ्रमणध्वनि देणाऱ्या प्रेमळ अंबानींनी या क्षेत्रात प्रवेश केला नव्हता व टेलिफोन निगमचीच मक्तेदारी चालू होती. पण टेलिफोन खात्याला सहा महिने फोन न वापरल्याबद्दल ३०००/- रु. दान करण्यापेक्षा सरेंडरच करू आल्यावर बघू असे ठरवले.

महावितरणने वीजबिल कोणालातरी दुसऱ्याला भरायला सांगा कारण त्या काळात कमीतकमी येणारा ३०/- रु. दरमहा विजेचा आकार भरावाच लागेल असे सांगितले. मी आगाऊ पैसे भरतो असे म्हटल्यावर आमच्याकडे तशी पद्धत नाही असे सांगण्यात आले. थोडक्यात ग्राहकाची कसलीही सोय शक्य असेल तरी करायची नाही ही वृत्ती, शेवटी आगाऊ पैसे घेण्यात महावितरणचे काही नुकसान नाही उलट थोडे पैसे आगाऊच मिळणे फायद्याचे आहे हे त्याना पटवून द्यावे लागले. आता मात्र महावितरण ग्राहकांना आगाऊ रक्कम भरा व बिलात सूट मिळवा असा सल्ला देऊ लागले आहे. त्यानंतर पुढच्या वेळेस जयवंतला सांगून ऑनलाइन वीजबिल भरण्याची सोयच मी करून घेतली.

याशिवाय सामानखरेदी बॅगा भरणे आणि त्यांचे वजन करून बघणे या गोष्टी चालू होत्याच. यावेळी जाताना एकावेळचा अनुभव जमेस असला तरी प्रवासाचा ताण घेण्याचा नेहमीचा स्वभाव उचल खात होताच. आमच्याच संकुलातील एका सदनिका धारकाने गाड्या भाड्याने देण्याचा व्यवसाय सुरू केल्याचे सौ. ने पाहून ठेवले होते त्याच्यावरच मुंबईस आम्हाला सोडण्याचे काम सोपवून मग मी निर्धास्त झालो.

सुजितने तिकीट पाठवले असे कळवल्यावर आणि आम्ही दोघेच घरात असल्याने आम्ही घरात नसतानाच तिकीट घेऊन पोस्टमन आला तर काय घ्या म्हणून बरेच दिवस आम्ही कोणीतरी एकजण घरात सदैव राहील याची दक्षता घेत होतो, बरेच दिवस झाले तरी तिकिटाचा पत्ता नाही. पण अमेरिकेतून रजिस्टर पोस्ट केले असले तरी त्याची पावती अमेरिकेत परत पाठवायची नसल्यामुळे की काय पोस्टमनने आमच्या सदनिकेच्या टपालपेटीतच एक दिवस तिकिटे टाकलेली आढळली. आमच्या सुदैवाने आम्ही पाहीपर्यंत ती सुरक्षित राहिली हे आमचे भाग्य!

या वेळीही आमची वारी एअर इंडियानेच व्हायचा होता. आणि वेळही तीच त्यामुळे आधल्या दिवशी रात्री झोप न लागता उरलेली रात्र विमानतळावर काढून पुढचा दिवस विमानात

घालवला. या वेळी विमानप्रवासाची नवलाई राहिली नव्हती, पॅरीसला दोन तास विमानाचा मुक्काम होता पण आम्हाला खाली उतरू न देताच विमानाची सफाई करण्यात आली, त्यावेळी एस. टी. स्टॅन्डवर बसल्याचा अनुभव आला आम्ही नेवार्कला सोमवारी संध्याकाळी पाचच्या सुमारास पोचलो आणि या वेळी आमच्या स्वागताला दोन्ही मुलगे सहकुटुंब हजर होते विशेषत: ज्याला पहायला मी अगदी उत्सुक होतो तो नातू प्रथमेशही आला होता. गेल्यावर या मुक्कामात त्याच्याइतका किंवा त्याच्यापेक्षाही अधिक निरुद्योगी मीच राहणार असल्यामुळे त्याने मला ताब्यातच घेतले.

# ३३. निवडणुकीचे दिवस

आम्ही पहिल्या वेळी ज्या जागेत राहिलो होतो त्या हिडन व्हॅलीमध्येच ही त्याची नवी जागा होती फक्त मधल्या काळात सुजितने इमारत बदलली होती. पहिल्या वेळी तो एका बेडरूमच्या जागेत राहत होता तर इथे दोन बेडरूम्स होत्या आणि मुख्य म्हणजे ही तळमजल्यावर होती त्यामुळे प्रथमेशने कितीही पाय आपटले तरी शेजारी तक्रार करणार नव्हते. उलट पुढे त्याने आरडाओरडा सुरू करताच आम्हालाच पोलिसाना बोलावतो अशी धमकी त्याला द्यावी लागू लागली

या वेळी आम्ही गेलो ते अध्यक्षीय निवडणुकांचे दिवस होते. बहुतेक आमचे जाणे आणि निवडणुकांचा संबंध असावा. पण आमच्यासारख्या बाहेरच्या लोकांनाच काय पण अमेरिकेतील लोकांना तरी ते समजत होते की नाही कुणास ठाउक. कुठे काही आवाज नाही, पताका नाही माळा नाहीत तोरणे नाहीत, कमानी नाहीत रस्त्यावर पोस्टर्स नाहीत. ढोल नाहीत ताशे नाहीत कशी या देशाची प्रगती होणार? येथील छापखान्यांना, चित्रकारांना, घोषणा रचणाऱ्याना आणि देणाऱ्यांना कसे काम मिळणार? आमच्याकडे साधा गल्लीतील पुढाऱ्याचा वाढदिवस असला की त्या भागातील

सगळ्या रस्तांवर कटऔटस, पोस्टर्स यांचा खच पडतो आणि इकडे एक साधी पोस्टर्स नाहीत की जाहिरात नाही. फक्त येऊन जाऊन दूरदर्शनवरील निरनिराळ्या वाहिन्यांवर त्यांच त्या मिळमिळीत चर्चा. त्यामुळे नंतर त्या वाहिन्यांच्या ऑफीसवर हल्ले नाहीत. त्यात ना कसला आवेश ना दंगा धोपा ना रस्ते बंद असे सगळे शांत आणि म्हणे हे जगाचे नेतृत्व करणार. अरेरे यांना प्रशिक्षणासाठी आपल्याकडेच बोलवायला हवे असे वाटून गेले. थोडक्यात काय आमची वृत्ती म्हणजे अगदी " घरकी मुर्गी दाल बराबर".

त्या काळात निवडणुकीचा हंगाम आहे हे फक्त दूरदर्शनवरील जॉन केरी या डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवारच्या व बिल क्लिन्टन, हिलरी वगैरे त्याच्या पाठिराख्यांची भाषणे ऐकूनच कळत होते खरे तर आम्ही उपकाराची जाणीव ठेवून बुशसाहेबांना पाठिंबा द्यायला हवा होता. अर्थात आमच्या पाठिंब्याचा काही उपयोग नव्हता हे अलाहिदा! कारण आमच्यापैकी कोणीही अमेरिकेचे नागरिक नव्हतो. पण एकूण निवडणुकीचा रागरंग अगदीच मिळमिळीत! आमच्या घरात डेमोक्रेटिक पक्षासच पाठिंबा होता, त्यामुळे जॉन्सन व त्याच्या पाठिराख्यांची भाषणे ऐकायला मिळाली नाहीत. काही भारतीयांचा रिपब्लिकनांना पाठिंबा असतो असे मोठ्या चिरंजीवांकडून कळले तो बहुधा मा. मोदीजींच्या “अबकी बार ट्रम्प सरकार” या घोषणेचा परिणाम असावा. तसे पहायला गेले तर

कोणत्याही पक्षाचे अध्यक्ष आले तरी भारताला जेवढी द्यायची तेवढीच किंमत देतात. आपल्याकडेही कोणाचेही सरकार आले तरी सामान्य माणसाचे हाल संपत नाहीतच! मात्र अमेरिकेतील एक गोष्ट चांगली की निदान निवडणुकीचा त्रास तरी सामान्य माणसाला होत नाही. अर्थात अतिसामान्य माणसास थोडीबहुत अर्थप्राप्ती सभा व मिरवणुकीत सामील होण्यामुळे

आपल्याकडे जी होते तिलाही येथील जनता मुकत असणार अरेरे!

# ३४. प्रथमच सगळे एकत्र.

या दुसऱ्या वारीतला महत्वाचा अनुभव म्हणजे आमच्या कुटुंबातील आम्ही सर्व सभासद प्रथमच एकत्र राहिलो. कारण मुलांची शिक्षणे होऊन ते नोकरीला लागल्यावर म्हणजे गेली दहा वर्षे आम्ही दोन्ही मुलांबरोबर कधीच राहिलो नव्हतो. कधी लग्नाकार्यानिमित्त एकत्र जमलो असू तेवढेच. बाकी सुजित अमेरिकेत, जयवंत पुण्यात आणि आम्ही औरंगाबादला असे आमचे तिघांचे तीन संसार होते आम्ही आता पहिल्यांदाच अगदी सास बहू मालिकासारखे दोन मुले सुना आणि नातवासह एकत्र राहू लागलो. आजकाल लग्न झाले की मुलाला वेगळा फ्लॅट घेऊन देण्याच्या जमान्यात आमचा बरोबर उलटा प्रवास झाला म्हटले तरी चालेल. आणि तो खूप आनंददायक पण होता.

एकत्र कुटुंबपद्धती फायदेशीर असते असा निष्कर्ष एका (की दोघा) चिनी समाजशास्त्रज्ञानी काढल्याचे वाचनात आहे. त्यात त्यानी ऊर्जा बचत होते असा एक मुद्दाही मांडला आहे. आंतरजालावर शोध घेतला असता एकत्र कुटुंब, लग्नानंतर मुलाने वेगळे राहणे वा वेगळे राहून आपल्या आईवडिलाशी चांगले संबंध ठेवणे या तीन पर्यायांपैकी पहिल्या आणि तिसऱ्या पर्यायाला

अधिक पसंती देण्यात आलेली असली तरी प्रत्यक्षात पहिला पर्याय कमी प्रमाणात अस्तित्वात आहे असे आढळते. फक्त मराठी किंवा हिंदी दूरदर्शन मालिकांमध्ये मात्र भली मोठी कुटुंबे व त्यातील अनेक सदस्यांचे हेवेदावे, रुसवे व भांडणे दाखवून एकत्र कुटुंबपद्धती किती हानिकारक आहे हे उत्तम तऱ्हेने दर्शकांच्या मनावर बिंबवण्यात येते. माझ्या अगदी जवळच्या मित्रांची मुले लांब राहून चांगले संबंध ठेवणेच पसंत करतात असे निदर्शनास आले आहे.

बरेचदा मुलांना वेगळे राहणे अपरिहार्य होते कारण बहुतेक मध्यम वर्गीयात जागा मोठ्या कुटुंबास एकत्र राहता येण्याइतक्या मोठ्या नसतात. आणि दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे शिक्षणानंतर मुले मूळ गावीच राहतील याची निश्चिती नसते. अगदी माझेच उदाहरण घेतले तर औरंगाबादला घर बांधताना मी अगदी मुलांच्या लग्नानंतरही सर्वांना एकत्र राहता यावे म्हणून तीन शयनगृहे असलेले घर बांधून घेतले इतका विचार करून की पुढे घराची वाटणी करण्याची पाळी आली तरी ती व्यवस्थित करता यावी. पण कसचे काय इंजिनियर होताच दोघे दोन दिशांना पळाले आणि आम्हाला दोघानाच घरात एकमेकाला शोधण्याची वेळ आली.

या दुसऱ्या वारीत आम्हा सर्व कुटुंबियांना अनेक वर्षानंतर एकत्र राहण्याची संधी मिळाली पण या संधीचा जास्तीतजास्त फायदा प्रथमेशनेच लाटला. आता तो चार वर्षाचा होता. त्याने या काळात आपले भरपूर लाड पुरवून घेतले. तो आता दादा होणार असल्याने त्याने सगळयांवरच दादागिरी गाजवायला सुरवात केली. मी तर त्याच्या लेखी त्याच्या बरोबरीचा (किंवा कदाचित लहानच)होतो त्यामुळे फिरायला जाताना मला त्याला बरोबर घेऊन जावे लागे किंवा तोच मला फिरायला घेऊन जात असे. बहुतेक आमच्या फिरण्याचा मार्ग आमच्या सदनिकेच्या आसपास असणाऱ्या शॉपराइट, ड्रगफेअर, या मॉलमधून जात असे. तेथील खेळ आणि निरनिराळया वस्तू पाहण्यात त्याला खूप मजा यायची. आमच्या घरात पैसे आणण्याचे काम माझे आणि ते खर्च करण्याचे त्याच्या आजीचे ही विभागणी पहिल्यापासूनच आहे आणि तिला मी अमेरिकेत असतानाही धक्का लावला नाही त्यामुळे आजोबांच्याकडे पैसे नसतात अशी त्याची ठाम समजूत असण्याचा मला फायदा असा झाला की कोणतीही वस्तू वा खेळ मी घेउन देऊ शकणार नसल्याने फक्त ते पाहण्यात किंवा ते आजीकडून घेऊन देण्याच्या आश्वासनावर मी त्याची बोळवण करू शकत होतो.

बऱ्याचदा या खेळण्यांचा कारखानाच काढण्याचे स्वप्न तोच रंगवत असे आणि ती सर्व खेळणी त्यातच बनवण्याचे मनोराज्य करीत असे. असा उद्योगी नातू असण्याचा मला होणारा फायदा म्हणजे त्याला खेळणे घेऊन देण्याचे माझ्यावरील संकट टळत असे. शॉपराइटमध्ये त्याला आणखी एक आकर्षण म्हणजे तेथली पिकअप व्हॅन! ती खरेतर एक प्रकारची ट्रॉलीच होती. तिच्या केबिनमध्ये मुलाना बसवून खरेदी करून घेतलेल्या वस्तू मागील ट्रॉलीत टाकता यायच्या. बाकी इतर ट्रॉलीजनाही मूल ठेवण्याची सोय असायची पण यात त्या मुलाला गाडीत बसण्याचा आनंद मिळायचा त्यामुळे ती प्रथमेशला फार प्रिय होती. शॉपराइटमध्ये गेल्यावर त्यामध्ये त्याला बसवणे हा एक माझा महत्वाचा कार्यक्रम असे. बऱ्याच वेळा इतर कोणीतरी ती नेली असेल तर ती बाहेर आणून ठेवेपर्यंत आम्हास तेथे थांबावे लागे. पूर्वी ज्या माणसाने ती नेली असेल त्याने जर मूळ जागी आणून ठेवली नसेल तर हा पठ्ठ्या पार्किंगमध्ये जाऊन बरोबर ती शोधून मला दाखवायचा की मग त्याला तिच्यात बसवून काही खरेदी करायची असो वा नसो मला फिरवावे लागेच.

हे त्याच्या दृष्टीने खरे तर दुधाची तहान ताकावर भागवण्याचा प्रकार होता. कारण त्याच्या वाढदिवसाला त्याला दुचाकी घेऊन देण्याचा आमचा विचार होता आणि त्यानेही घरात होतो तो पर्यंत

या गोष्टीला मान्यता दिली होती. पुण्यात त्याला तीनचाकी सायकल घेतलेली होतीच. आता तो दुचाकी चालवेल आणि शर्यतीत भाग घेऊन पहिला नंबर मिळवेल असे स्वप्न त्याच्यापुढे आम्ही रंगवले होते. पण आम्ही फिरत असताना काही मुलांच्या खेळातील मोटारगाड्या बाहेर ठेवलेल्या त्याने पाहिल्या होत्या आणि त्याच्या मनात तशी गाडी घेण्याचे स्वप्न साकार होत होते. बऱ्याच वेळा तो त्या बाहेर ठेवलेल्या गाडीत बसण्याचा हट्ट करायचा. संकुलात अशी खेळणी उघड्यावर पडली तरी ती चोरीला जाण्याची भीती नसे त्यामुळे घरात अडचण नको म्हणून लोक अशी अवजड खेळणी बाहेरच ठेवत. विशेषत: वरच्या मजल्यावरील लोकांना ती खाली राहू देणेच परवडायचे आणि प्रथमेशच्या मते ती त्यानी त्याच्यासाठीच तेथे ठेवलेली होती.

त्यामुळे वाढदिवसाला आपल्याला तशी मोटरगाडी मिळावी अशीच त्याची इच्छा होती. त्यानंतर आम्ही प्रत्यक्ष त्याच्या वाढदिवसाच्या दिवशी सायकल घ्यायला खेळण्यांच्या दुकानात गेलो त्यावेळी आणखीच अवघड प्रकार झाला. येथील खेळण्याची दुकाने म्हणजे तेथे येणाऱ्या पालकाला कोठून येथे येण्याचा मूर्खपणा केला असे वाटायला लावणारी, कारण त्या दुकानात खेळण्यांचा येवढा मोठा साठा मुलांच्यासमोर दिसत असे की त्यांना आणि त्यांच्या हट्टाला तोंड देता देता त्याच्या पालकांना वेडच

लागावे. शिवाय कुठलेही खेळणे हाताळण्याचा मुक्त परवाना असल्यामुळे सगळी पोरे हवे ते खेळणे खेळून पहायची. आम्ही प्रथमेशसाठी सायकल खरेदी करण्याच्या उद्योगात गुंग होतो त्या काळात हा पठ्ठ्या हमर गाडीत चढून बसला होता आणि तेथील विक्रेत्याने ती कशी चालवायची याचे तेवढ्यातल्या तेव्ढ्यात प्रशिक्षणही देऊन त्याला त्याच्या बापा, काका पेक्षाही गाडी चालवण्यात तज्ञ करून टाकले आणि आम्हाला मोठ्या संकटात टाकले कारण आता त्याला वाढदिवसाची भेट म्हणून ती हमर गाडीच हवी होती. ती अजून तरी त्याच्या बापाच्या अंदाजपत्रकात बसत नसल्यामुळे शेवटी त्याला सायकलवरच आनंद मानावा लागला होता. ते त्याचे दु:ख वेळीअवेळी फणा काढत असे.

रस्त्यावर ज्या शेकडो गाड्या लावून ठेवलेल्या असत त्यांच्या मेकची नावे जाता जाता सांगणे हा एक त्याच आवडता उद्योग होता. मग आमची फेरी सुरू झाली की प्रत्येक गाडीकडे बोट दाखवीत ही होंडा सिविक ही फोर्ड ही टोयाटो ही करोला(करोना नाही) अशी त्याची उजळणी सुरू होत असे. लहानपणी सगळीच नातवंडे आपल्या आजीआजोबांची अशीच करमणूक करून स्वत: ही आनंद मिळवीत असतात. आणि प्रत्येक आजी आजोबाला आपले नातवडच काय ते जगात सगळयात शहाणे आहे असे वाटत असते. याचा अनुभव मला नेहमीच येत असे कारण माझ्या

मित्रासमोर किंवा त्याच्या पत्नीसमोर मी प्रथमेशचे गुणवर्णन सुरू केले की लगेचच त्यांचे आपल्या नातवंडाचे गुणवर्णन सुरू व्हायचे आणि मग मला गप्प बसून ते ऐकून घ्यावे लागायचे. याला अपवाद फक्त अजून जे आजी आजोबा झालेले नाहीत असे मित्र. हे वाचणारे कोणी आजी आजोबा असतील तर त्यांनाही लगेच आपल्या नातवंडाचे गुणवर्णन करण्याची स्फूर्ती आलीच असणार.

त्याची स्मरणशक्ती चांगलीच तीव्र होती असे म्हणावे लागेल. मुलांना आवडणाऱ्या गोष्टी बरोबर ध्यानात राहतात हे खरेच. पण या त्याच्या स्मरणशक्तीमुळे त्याने एकदा एका मोठ्या अडचणीतून मला वाचवले. आमच्या दररोजच्या प्रभातफेरीत आम्ही मॉलयात्रा करतो हे माहीत असल्याने येताना दोनतीन वस्तू घेऊन यायला त्याच्या आजीने मला सांगितले. मी नेहमीच्याच पद्धतीने ते ऐकल्यासारखे करून पिशवी आणि पैसे घेऊन प्रथमेशसह बाहेर पडलो. नेहमीचा फेरा संपल्यावर मी वस्तू खरेदी करण्याचा विचार करू लागलो तर एकाही वस्तूचे नाव काही केल्या आठवेना. मोबाइल बरोबर नेत नसल्यामुळे तीही सोय नव्हती. नाहीतर सुजित वा जयवंत एकेकटे खरेदीला गेले तर त्यांची संपूर्ण खरेदी मोबाइल कानाला लावूनच होत असते. आता घरी जाऊन पुन्हा विचारून यावे असा विचार मी करू लागलो पण एक गोष्ट त्याचवेळी आठवली की त्या वस्तूंची नावे तिने प्रथमेश च्या समोरच

सांगितली होती(कदाचित मी विसरलो तरी प्रथमेश बरोबर लक्षात ठेवील अशी तिला खात्री असेल) म्हणून एक चान्स घ्यायचा म्हणून त्याला विचारले, "अरे आजीने कायकाय वस्तू आणायला सांगितले आठवते का? " त्याने ताबडतोब होकार देऊन सगळी यादी मला म्हणून दाखवली आणि मी त्या वस्तू घेऊन घरी आलो आणि आजीच्या शाब्दिक माऱ्यातून वाचलो. .

घरातील कॅसिओ, व्ही. सी. आर. टी. व्ही. या सगळ्या वस्तूवर पहिला हक्क त्याचा असा त्याचा दावा होता, त्यामुळे तो सकाळी उठण्याच्या वेळी मी जर हरिप्रसाद चौरसिया वा रविशंकर यांची सी. डी. लावलेली असेल तर तो जागा होताच "हे कुणी लावलेय? " असे एकाद्या मोठ्या माणसाच्या आविर्भावात म्हणून ते खटकन बंद करून तो टी, व्ही. वर कार्टून लावायचा. मी कॅसिओ वाजवू लागलो की या पठ्ठ्यालाही तोच वाजवण्याचा उत्साह येत असे. येऊनजाऊन अजून संगणकावर त्याने हक्क दाखवायला सुरवात केली नसल्यामुळे मी त्यावर काही काम करत असलो तर त्याचा इलाज चालत नसे. वादविवाद करण्यात तर त्या वयातही त्याने आजीचा कित्ता गिरवला होता आणि तिच्याकडील मोठे अस्त्र तर त्याच्याजवळचा हुकुमी एक्का होतेच. त्यामुळे त्याला एकादी गोष्ट नाकारताना तो लहान आहे असे म्हटल्यावर तो आपण मोठा असल्याचा दावा करायचा आणि त्याचा आधार घेऊन आता

तू मोठा झालास ना मग ही गोष्ट करू नको म्हटल्यावर त्याने एक युक्तिवाद शोधून काढला होता तो म्हणे, "मी लहान झालेला मोठा आहे" आता यावर काय बोलणार?

एकदा तर त्याने फारच कमाल केली. तेथे असतानाही मी मधून मधून काहीतरी लिहीत असे. त्याच काळात त्याच्या आजीचा वाढदिवस होता म्हणून मी एक विनोदी भाष्य आमच्या संसारावर करून रात्री घरातील सर्वांना वाचून दाखवले त्यातील विनोदाला सर्व जण हसून दाद देत होते. ते पाहून यालाही अचानक स्फूर्ती आली आणि माझे वाचून झाल्यावर एक कागद घेऊन माझ्यासारखाच खुर्चीवर बसून वाचण्याचे नाटक करून सगळयाच्याकडे पाहून"जोक" म्हणून स्वत:च हसू लागला. म्हणजे मी काहीतरी जोक केला असावा असा त्याने अंदाज केला होता.

पुण्यात असताना तो ज्यू. के. जी. त जात होता त्यामुळे आता त्याला सीनिअर के. जी. त घालणे आवश्यक होते. जवळच्याच शाळेत घालणे बंधनकारक नसले तरी आवश्यक होते कारण या शाळांच्या बसेस नसतात, पालकांनाच पाल्याच्या शाळेत नेण्या आणण्याची सोय करावी लागते. जवळच्या म्हटले तरी कारमधून पंधरा मिनिटात जाता येइल अशा अंतरावरील शाळेत त्याला घालण्याचा निर्णय घेण्यात आला. शाळा छान होती आणि त्याच्या

वर्गात फक्त अकरा विद्यार्थी होते. त्यात दोन तीन भारतीय होते पण मराठी नव्हते. त्याला शाळेत नेण्या आणण्यासाठी हितेशभाई या गुजराती गृहस्थाला सांगण्यात आले. त्याचा हाच व्यवसाय होता. फक्त तो खाजगी पद्धतीने चालवत होता. हितेशभाई त्याच्या गाडीतून जास्तीतजास्त फायदा मिळवण्याच्या उद्देशाने धंदा करत असल्यामुळे प्रथमेश हे त्याच्या दृष्टीने अगदी किरकोळ गिऱ्हाईक होते. त्यामुळे त्याच्या नेण्या आणण्याविषयी जरा बेफिकीरच होता. त्यामुळे काही वेळा शाळेत त्याला न्यायला उशीर होई आणि शाळेचे व्यवस्थापन वेळेविषयी काटेकोर असल्याने शाळेची दारे बंद करत आणि मग त्याची पंचाइत होई.

नेण्या आणण्यासाठी त्याला बारा डॉलर्स दररोजचे ठरले होते आणि ते प्रत्येक आठवड्याच्या शेवटी म्हणजे पाच दिवसाचे साठ डॉलर्स द्यायचे ठरले होते. पण त्यातही तो नाखूषच होता. शिवाय शाळेची वेळ संभाळावी लागायची असल्यामुळे त्या काळात मोठे भाडे मिळण्याचा योग आला तरी तो त्याला सोडावा लागे. त्यामुळे तो पहिल्यापासून जरा कुरकुरतच होता. तरी दुसऱ्या दिवशी त्याच्या सोयीनुसार शाळेची वेळ आम्ही बदलून घेतली होती. एक दिवस प्रथमेशला त्याने शाळेत सोडले पण परत आणायच्या वेळेस त्याचा फोन आला की तो ट्रॅफिक जॅममध्ये अडकला तेव्हां अर्थातच त्याला घरी आणायला आम्हालाच टॅक्सी करून जावे

लागले. आणि त्यासाठी पंचवीस डॉलर्स मोजावे लागले. येथे टॅक्सीसुद्धा आपल्याकडे रिक्षा जशी रस्त्यावर मिळते तशी मिळत नाही. त्यांच्या एजन्सीला फोन करावा लागतो. त्याचा असा आम्हाला अनुभव आला.

या सगळ्या गडबडीत एक गोष्ट तेवढी बरी झाली होती ती म्हणजे प्रथमेश शाळेवर खूष होता आणि त्याने इंग्रजी बोलता आले नाही तरी तेथे बऱ्यापैकी जम बसवला होता. पहिल्या दिवशी शाळा लवकरच सुटणार होती आणि अजून त्याच्या आईची तब्येत तशी बरी असल्याने ती शाळेत पूर्ण वेळ थांबली होती पण दुसऱ्या दिवसापासून त्याने स्वतंत्रपणे जाणे अंगवळणी पाडून घेतले होते इतके की तो जाता येता हितेशभाईशी बऱ्याच गप्पा मारायचा असे त्याने आम्हास सांगितले. लगेचच त्याचा वाढदिवसही झाला आणि त्याच्या मित्रांनी त्याला शुभेच्छापत्रे दिली. त्या दिवशी भाग्यश्री शाळेत चॉकोलेटस घेऊन गेली होती. शनिवारी घरी पण आम्ही त्याचा वाढदिवस आजूबाजूच्या लहान मुलांना बोलावून साजरा केला. प्रथमेशमुळे आमच्या आजूबाजूच्या बऱ्याच लोकांच्या ओळखी झाल्यामुळे त्याच संकुलात पाच सहा महाराष्ट्रीय कुटुंबे राहतात हा शोध आम्हाला लागला. खरे तर ही मंडळी मागील वेळीही तेथेच होती पण त्यांचा पत्ता आम्हास नव्हता.

# ३५, लिबर्टी राष्ट्रीय संग्रहालय

या वेळी जयवन्त, सौ. भाग्यश्री व प्रथमेश असल्यामुळे व सौ. भाग्यश्रीला फार दगदग सोसणार नसल्यामुळे स्थलदर्शन करणे अवघड होते तरी सुरवातीस तिच्या प्रकृतीला मानवेल अश्या काही स्थलांना भेटी दिल्या. आठच दिवसांनी लिबर्टी नॅशनल म्यूझियम पहायला आम्ही गेलो. लोकांमध्ये विज्ञानाची गोडी निर्माण व्हावी या उद्देश्यानेच ही उभारलेली होती त्यामुळे जादुगार ज्या क्लुप्त्या करतात त्यामागील विज्ञान काय आहे उदा: खुर्चीसह माणूस उचलला जाणे, गळ्यापासून वरचा भाग व धड अलग होणे हे आरश्याच्या सहाय्याने कसे होते याचे दिग्दर्शन किंवा लेसर, दूरदर्शन, इलेक्ट्रॉनिक्स या क्षेत्रातली प्रगती दाखवणारे प्रयोग होते. आपल्या स्पर्शेंद्रियांची क्षमता एका अंधाऱ्या बोळकंडी मार्गातून जाऊन पहाण्याची मुभा होती अर्थात आपल्या जबाबदारीवर. मी ते धाडस करताना बोळकंडीच्या मध्ये आल्यावर आता काही जमत नाही असे वाटले तरी मागे फिरणे शक्यच नव्हते कारण मागचा माणूस आणि मीही चेंगरलो असतो. त्यामुळे कसाबसा बाहेर पडलो तेव्हां हायसे वाटले, आमचे आतले धडपडणे बाहेरील पडद्यावर दिसत होते आणि प्रत्यक्ष बोळकंडीतून चालणाऱ्यांपेक्षा

बाहेरून पहाणाऱ्यानाच अधिक मजा येत होती असे नंतर बाहेरील आमच्या कुटुंबियांनी सांगितले.

श्री. लोणकर जे मागील वारीत परिचित झाले होते त्यानी काही वस्तू दिल्या होत्या त्य न्यायला त्यांचा मुलगा विजय आला. त्याचेबरोबर असलेल्या व्यक्तीचा आपले श्वशुर म्हणून त्याने परिचय करून दिला. त्याचवेळी कनेक्टिकटचा श्रीधर अत्रे आलेला होता त्याला पाहून या सासरेबुवांनी “अहो तुम्ही पोलिटेक्निक मधील प्रोफ़ेसर अत्रे यांचे चिरंजीव का?” असे विचारले त्याने हो म्हणून त्याला घाई असल्याने तो निघून गेला. मी मात्र बुचकळ्यात पडलो कारण हे विचारणारी व्यक्ती औरंगाबाद पोलिटेक्निक मध्ये असली पाहिजे हे सरळच होते म्हणून मी त्याना विचारले, ”अहो तुम्ही अत्रे यांना कसे ओळखता?” तर त्याने “मी औरंगाबाद पोलिटेक्निकमध्येच शिकलो” असे उत्तर दिले यावर मी जरा घुश्श्यातच म्हटले तरी चालेल, विचारले, ”मग तुम्ही मला कसे ओळखत नाही?” त्यावर ओशाळवाणे होत त्याने “मी तुम्हाला पहाताच ओळखले होते पण सरांना कसे विचारावे असे वाटले “ मग उठून पाया वगैरे पडला पण याला नम्रता म्हणावे की संकोचाचा अतिरेक कळले नाही. अर्थात मधल्या काळात त्याच्यात जसा बदल झाला तसा माझ्यातही झाला असणार, असो! काही अपेक्षा पूर्ण होत नाहीत तर काही अनपेक्षितपणे पूर्ण होतात, कारण पहिल्या

वारीत शेजारच्या घरात आलेला विद्यार्थी मी तेथे आल्याचे कळल्यावर सहकुटुंब येऊन भेटला होता.

# ३६. सदनिकांची तपासणी

हिडन व्हॅलीच्या आमच्या या वास्तव्यातच सदनिकांची तपासणी करण्यात येणार आहे असे समजले. त्या काळात संकुलाचे कार्यकारी सभासद शिवाय फायर ब्रिगेड, वीजमंडळ इत्यादींचे काही सभासद यांची एक समिती प्रत्येक सदनिकेची पाहणी करून आगीच्या, विद्युतजोडणीच्या दृष्टीने सदनिकेच्या सुरक्षिततेची पाहणी करतात. याशिवाय सदनिका व्यवस्थित ठेवली आहे अथवा नाही, अडगळ कोठेही साठवत नाहीत याची कसोशीने पाहणी करतात. सदनिकेच्या बांधकामात लाकडाचा वापर जास्त असल्याने आगीचा धोका मोठ्या प्रमाणात संभवतो त्यामुळे इतकी कडक तपासणी केली जाते. तरीही आगीची जराही शक्यता असेल तर धूर दर्शक (स्मोक डिटेक्टर) लगेच शिट्टी वाजवतात. आणि थोड्याच वेळात आगीचे बंब घटनास्थळावर धाव घेतात. त्यामुळे सौ. ला भाकरी करण्यात बरेच कौशल्य वापरावे लागे किंवा नवरात्रामध्ये दिवसरात्र दिवा लावणे अवघड काम झाले होते. कारण त्यामुळे काही कारण नसताना आगीचे बंब घरासमोर यायची भीती!

याशिवाय सदनिकेत किती व्यक्तींनी राहावे याविषयीही नियम आहेत. त्यानुसार एक शयनकक्ष असणाऱ्या सदनिकेत नवराबायकोचे एक कुटुंब आणि त्यांचे एक मूल एवढ्याच व्यक्ती राहू शकत होत्या. एक आणखी मूल झाले की दोन शयनकक्ष आवश्यक! पण न्यू जर्सी मध्ये भारतीय आणि त्यातही गुजराती बहुसंख्य असल्यामुळे हे नियम थोडे शिथिल झाले आहेत. व्हरांड्यात कपडे वाळत घातलेले चालत नाही मात्र आमच्या या सदनिकासंकुलाशेजारीच गुजरातीबहुल संकुलात कपडेच काय पण घरी लाटलेले पापडही बाहेर वाळत घातलेले असत त्यामुळे आमच्या घरात सध्या नियमापेक्षा जास्त व्यक्ती राहत असल्या तरी (त्यातील आम्ही पाहुणे असल्यामुळे) त्याकडे काणाडोळा करण्यात येईल असे आम्हाला वाटत होते, तरीही या समितीच्या भेटीच्या वेळी शक्यतो जास्तीत जास्त व्यक्ती घराबाहेर वेळ काढून घरात नियमाएवढ्याच व्यक्ती राहतात असा आभास निर्माण करण्याचा आम्ही प्रयत्न केला.

प्रत्यक्षात पाहणी समितीने मात्र आग आणि वीज यांच्या दृष्टीने सुरक्षितता आणि अडगळ या गोष्टींच्या पाहणीकडे अधिक लक्ष दिले. त्यादृष्टीने वॉशिंग मशीनच्या खोलीतील अडगळ काढण्याची सूचना त्यानी केली कारण मशीनमध्ये तपमान जास्त असते पण बाकी घरातील व्यक्तींची मोजणी काही त्यांनी केली

नाही. सदनिकेच्या तपासणीसाठी दिलेल्या वेळी ती उघडी ठेवणे बंधनकारक असते. ज्या सदनिकेतील नवराबायको नोकरी करतात त्यानी सुद्धा त्या वेळी कोणाकडे किल्ली ठेवून का होईना तपासणी करून घेणे आवश्यक असते. अर्थात सदनिकेच्या तक्रारनिवारणाचे बाबतीतही मंडळ दक्ष असते. याचा अनुभव आमच्या वास्तव्यातही आला.

# ३७. अमेरिकेत घर खरेदी

त्याच काळात सुजितने घरच विकत घेण्याचा विचार सुरू केला, कारण दरवर्षी भाड्यापोटी बारातेरा हजार डॉलर्स घालवण्यापेक्षा एकदाच बरेच पैसे घालवून ते विकत घेणेच जास्त फायदेशीर होण्याची शक्यता वाटली. शिवाय आता त्याला ग्रीन कार्ड असल्यामुळे त्याला कर्ज मिळू शकत होते. घर विकणे आणि विकत घेणे ही कामे येथे बहुतांशी पूर्णपणे एजंटांमार्फतच केले जाते. (आपल्याकडेही हाच प्रघात आहे म्हणा) काही भारतीय व्यक्तीही या व्यवसायात आहेत. काही एजंट अतिशय माहीतगार असतात आणि विक्रेता आणि ग्राहक दोघांनाही फायदा होईल अशा पद्धतीने ते व्यवहार करतात. एजंटामार्फत विकल्या जाणाऱ्या घरासमोर एका पाटीवर त्या एजंटचे किंवा एजन्सीचे नाव व फोन नंबर लिहिलेला असतो. मालकच घर विकणार असेल तर फॉर सेल बाय ओनर अशी पाटी असते. सेंच्युरी २१ ही एक मोठी एजन्सी आहे आणि सुजितचे घर त्याच एजन्सीच्या एका एजंटकडून आम्ही घेतले.

अमेरिकेत गेल्यावर सुरवातीचे बरेच दिवस सेंच्युरी २१ ही काय भानगड आहे हे मला माहीत नव्हते त्यामुळे एकदा माझी

फजिती झाली होती. मी फिरायला जाताना नवे नवे मार्ग धुंडाळायचा प्रयत्न करायचो तेव्हां काही खुणा लक्षात ठेवायचो. एके दिवशी जरा नवीन मार्ग पकडून एक खूण म्हणून मी सेंच्युरी २१ ही पाटी लक्षात ठेवली आणि माझा घात झाला कारण तशा पाट्या जी घरे विक्रीस होती अशा बऱ्याच घरापुढे होत्या आणि परतीच्या वाटेवर मी त्याच प्रकारच्या दुसऱ्या पाटीचा वेध घेतल्यामुळे मी भलत्याच रस्त्यावर गेलो. मात्र फार दूर गेलो नसल्यामुळे मी योग्य मार्गाला फारसा न भटकता लागलो. त्यावेळी मला लाहानपणी वाचलेली “रातोरात लंबी दाढी” या गोष्टीची आठवण झाली.

सुजितने प्रथम जवळच्याच एका एजंटाकडे आपल्याला घर पाहिजे असल्याची मागणी केल्यावर त्याने काही घरे सुचवली. खरी पण त्याचबरोबर सुजितने थोडाकाळ थांबावे असा सल्लाही त्याने दिला ह्या एजंटाला सुजित घर घेईल याविषयी शंका असल्यास नकळे! कदाचित दोघांची वेव्हलेंग्थ जुळली नसावी. शिवाय सुजितने घरासाठी आपली खर्च करण्याची जी मर्यादा सांगितली तिला अगदी घट्ट पकडून तो घरे दाखवत होता. आम्हीही सुजितबरोबर काही घरे पाहवयास गेलो. काही घरात अजून मालक राहत असल्याचे दिसले पण एजंटाबरोबर आम्ही गेल्यावर मालक

मध्ये काही लुडबुड न करता एजंटास आमच्यासमवेत घराची पाहणी करू देई.

काही घरे मात्र ओपन हाउस अशी पाटी लावलेली असत तेथे वेगवेगळे एजंट आपआपल्या गिऱ्हाइकाना त्या विशिष्ट वेळेत घेऊन येताना दिसत त्यामुळे त्या काळात त्या घराला एकाद्या म्यूझियमचे स्वरूप येत असे. काही घरांच्या चाव्या एजंटांकडे असत आणि ते घर विकत घेऊ इच्छिणाऱ्या आमच्यासारख्या व्यक्तीस फोन करून त्यांना योग्य वाटणाऱ्या वेळी पत्ता देऊन बोलावून घेत आणि ते घर उघडून त्यातील सर्व सुखसोयींची कल्पना पूर्णपणे देत. आमच्या परत निघण्याच्या काळातच अशी बरीच घरे आम्ही पाहिली. बहुतेक घरात गॅस वॉशिंग मशीन. फ्रीज, ओव्हन, मायक्रोवेव्ह, ए. सी. व हीटर या गोष्टी असतच. मग त्यांच्यात काही कमी ज्यादा सोयी असत आणि सामान ठेवण्यासाठी कपाटे, माळे या गोष्टी कमी अधिक प्रमाणात असत. काही घरांना तळघर असे

आपल्याकडेही अलीकडे फर्निचरसह घरे विकण्याची पद्धत निघाली असली तरी बहुधा आपल्याला विकत घ्यावयाचे घर हे केवळ भिंती, दारे, खिडक्या आणि छत एवढ्याच ऐवजानिशी मिळते कारण घर विकणारा आपला सुतळीचा तोडादेखील घरात

राहणार नाही याची काळजी घेतो. मीसुद्धा घर विकताना हेच केले. सरकारी सामान हलवण्याची अथवा विकण्याची " आहे तेथून आणि आहे तशा परिस्थितीत" जशी निविदा मागवण्यात येते तसेच येथील घराबाबतीत विकणाऱ्याचे धोरण असते.

त्यामुळे घर विकताना सर्व फर्निचरसह आणि शक्यतो सुस्थितीत आणून विकण्याची प्रथा आहे. अर्थात काही मोडकळीला आलेली घरे विकत घेऊन ती व्यवस्थित सुस्थितीत आणून परत चांगल्या किंमतीस विकणारेही काही लोक येथे आहेत, त्यांचा तोच व्यवसाय असतो आणि त्यातून प्राप्ती पण चांगली होते. आपल्याकडे आता बंगला हा प्रकार मोठ्या शहरात हळूहळू लुप्तच होत आहे आणि सदनिका घेणेच इष्ट ठरत आहे. याचे एक महत्वाचे कारण बंगल्याची देखभाल करणे जिकिरीचे होत आहे. आमच्यासारख्या ज्यानी बंगले बांधून हौसेने बाग केली त्यांना बागेत काम करण्यासाठी अंगात त्राण नाही आणि त्या बागेकडे दुर्लक्ष होऊन झाडे वाळत चाललेली पाहवत नाही. बंगल्याभोवती आपण हौसेने केलेल्या बागेकडे लक्ष द्यायला नव्या पिढीला फुरसत आणि उत्साह नाही. एकीकडे हरित क्रांतीचा नारा लावायचा आणि घरात मात्र त्याच्या उलट परिस्थिती, त्यामुळे कित्येक लोकांनी नाइलाजाने बंगले विकले आणि ते सदनिकेत राहू लागले असे आढळते. शिवाय राहण्याच्या जागेचे क्षेत्र जसजसे

आक्रसू लागले तसे बंगल्यांभोवती उंचउंच इमारती उभ्या राहून बंगल्यांची हवाच बंद होऊ लागली.

अमेरिकेत अजून तरी जागेचा दुष्काळ जाणवू न लागल्यामुळे बंगल्यांच्या रांगा दिसतात. पण पहिल्या एजंटाने बऱ्याच जागा दाखवूनही आम्हास एकही पसंत पडली नाही. सुजितच्या सुदैवाने लवकरच एका चांगल्या एजंटाचा पता त्याला लागला. ती एजंट आंटोनिओ ही अतिशय उत्साही बाई होती ती मूळ इटालियन. मूळ देश सोडून येथे स्थायिक झाल्यावर इंग्लिश शिकून तिने हा व्यवसाय सुरू केला. प्रथम संयुक्ता तिच्याकडे गेली. तिच्याकडे गेल्यावर लगेचच तिने एक घर दाखवायलाच तिला नेले. हे घर खरे तर एका गिऱ्हाइकाला पटले होते. तसे पटले की लगेच खरेदीदार आपला किंमतीचा आकडा मालकाला कळवतो, आणि तो मालकाला पटल्यास पुढील कार्यवाही सुरू होते. दोघतिघानी जर घर पसंत असल्यामुळे आपले आकडे कळवले तर जास्तीतजास्त बोली करणाऱ्यास बहुधा मालक पसंत करतो. जर दोघांचा आकडा सारखाच असला तर जो अगोदर मालकाला कळवतो त्यालाच प्राधान्य द्यावे लागते. या घराचे बाबतीत पहिल्या खरेदीदारास कर्ज मिळण्यास अडचण उत्पन्न झाल्यामुळे ते घर पुन्हा बाजारात आले होते.

अंटोनिओचे वैशिष्ट्य हे की तिला आमची अपेक्षा काय आहे याचा बरोबर अंदाज आला होता त्यामुळे तिने आमच्या मर्यादेपेक्षा बरीच जास्त किंमत असलेले हे घर आम्हाला दाखवले. . तिच्या मते हे भारतीय कुटुंबाला योग्य घर होते. घराचे स्थान ही गोष्ट महत्वाची होती. न्यू जर्सी मधील एडिसन भाग शिक्षणाच्या दृष्टीने प्रसिद्ध होता, येथील शाळा सगळयाच उत्तम होत्या त्यामुळे या भागातील घरांचे भावही जास्त होते. त्यामुळे सुजितच्या मर्यादेपेक्षा जवळजवळ एक लाख डॉलर अधिक किंमत असलेले हे घर आम्हाला पसंत पडले. अर्थात आम्हा दोघांना त्या किंमतीशी काही देणे घेणे नव्हते पण सर्वांना पसंत पडल्यावर किंमतीबाबत सुजितला हात आखडता घेणे अवघड गेले. १० हेदर ड्राइव्ह या घराच्या प्रथमदर्शनीच आम्ही प्रेमात पडलो. या घराचा दरवाजा पश्चिमाभिमुख होता. १०, ००० चौरस फुटाच्या प्लॉटवर हे घर उभे होते. खालच्या मजल्यावर मोठा हॉल, स्वयंपाकघर, भोजनासाठी जागा, अधिक थोडी मोकळी जागा आणि अर्धी बाथरूम, तर वरच्या मजल्यावर तीन शयनगृहे आणि दोन पूर्ण स्नानगृहे अशी रचना होती. अर्ध्या स्नानगृहात फक्त कमोड आणि बेसीन असते. जिना लाकडी आणि हॉलमधून वर जाणारा होता.

घरमालकाने अगदी हौशीने निरनिराळ्या सोयी करून घेतल्या होत्या आणि त्याची पूर्ण कल्पना अंटोनिओला होती, त्यामुळे

आम्हाला घर दाखवताना त्या सर्वांचे यथायोग्य प्रदर्शन तिने केले. नोकरीसाठी मालकाला टेक्साससारख्या बऱ्याच दूरच्या भागात जावे लागल्यामुळे त्याला हे घर विकावे लागत होते. ज्या दिवशी संयुक्ता अंटोनिओकडे गेली त्याच दिवशी हे घर परत बाजारात आले होते आणि ते लगेच विकले जाईल याची खात्री असल्याने तिने घर दाखवण्याची घाई केली. त्यावेळी सुजित नव्हता तेव्हा त्याला त्याच दिवशी रात्री घर दाखवून मालकाला आपला आकडा कळवण्यास ऍंटोनिओने जवळजवळ भागच पाडले. हे घर महाग असले तरी या भागात तुमच्या सर्व अपेक्षा पूर्ण करणारे असे घर मिळणार नाही असे तिने त्याला बजावून सांगितल्यामुळे त्याचाही नाइलाजच जणू झाला आणि त्याने त्याची बोली मालकाला कळवली आणि खरेच अंटोनिओचा अंदाज बरोबर होता कारण दुसऱ्याच दिवशी आणखी एका व्यक्तीस ते घर पसंत पडले आणि त्याचा देकार सुजितपेक्षा थोडा जास्तच होता पण अंटेनिओने काय जादू करून मालकाला पटवले कुणास ठाउक पण त्याने सुजितचा देकार मान्य केला.

त्यापुढील पायरी म्हणजे दोन्ही बाजूंनी आपापले वकील नेमून त्यांनी घराविषयी बोलणी करायची यात कायदेशीर बाजू संभाळल्या जातात. याशिवाय घराची पाहणी इन्स्पेक्टर करतात आणि पाहणीचा अहवाल खरेदीदारास देऊन घरात कायकाय त्रुटी

आहेत याची माहिती देतात. आश्चर्य म्हणजे हे इन्स्पेक्टर दोन्ही बाजूकडून पैसे घेऊन हवा तसा अहवाल सादर करणारे नसतात. ते खरोखरच बारकाईने पाहणी करतात. इन्स्पेक्टरने पाहणी करायला जातो असा सुजितला फोन केल्यावर सुजित घराकडे उशीरा गेला पण इन्स्पेक्टर मात्र आलेला होता आणि अगदी बारकाईने पाहणी करत होता. या पाहणीनुसार घरातील त्रुटी त्याने दाखवल्या आणि त्या मालकाने पूर्ण करून द्यायच्या असतात किंवा सुजितला त्यासाठी योग्य तेवढी भरपाई मिळावी असे त्याने सांगितले. या भ्ररपाईविषयी वकील चर्चा करतात आणि तसे मालकाला कळवले जाते.

येथे घराचे पूर्ण वर्णन येथील नगररचना कार्यालयात उपलब्ध असते त्यामुळे त्या जागेची भूकंपप्रवणता, जमिनीतून पाणी येण्याची शक्यता इ. गोष्टींचे पूर्ण ज्ञान ग्राहकास अगोदरच मिळते. काही घरांवरून उच्चदाब विद्युत्वाहक तारा जात होत्या, त्याचा परिणाम आत राहणाऱ्या व्यक्तींवर विशेषत: लहान मुलांवर होण्याची शक्यता असल्यामुळे अशी घरे कमी किंमतीत उपलब्ध होत असूनही आम्ही टाळली. या बाबतीत एकूणच जागरुकता असल्यामुळे अशी घरे अनेक दिवस For sale च्या पाट्या लावलेल्या असून मोकळीच पडलेली आढळली. माझ्या फिरायच्या मार्गावरील एक घर असे विक्रीसाठी असल्याची पाटी

लावलेले मी भारतात येऊन परत पुढच्या वेळी गेलो तरी तसेच मोकळे पडलेले दिसले.

# ३८. एअर इंडिया झिन्दाबाद!

सुजितच्या घराचा व्यवहार आम्ही तेथे असेपर्यंत पूर्ण झालाच नाही. पण तो पुरा होऊन ताब्यात आल्याचे आम्ही पुण्यात जाऊन स्थिरस्थावर झाल्यावर आम्हाला समजले. आमचे ओपन तिकीट असल्याने आणि इमिग्रेशन अधिकाऱ्याने दिलेल्या तारखेपूर्वी केव्हाही आम्ही निघू शकत असल्याने सर्व जण जरा जास्तच निश्चिंत होते, पण त्यामुळे मी तगादा लावूनही परतीचा दिवस ठरवून त्याची एअर इंडिया कडे बोलून निश्चिती करण्याकडे मुलांचे म्हणजे त्यातही सुजितचे जरा दुर्लक्षच झाले, त्याला बऱ्याच आघाड्या संभाळाव्या लागत असल्याचा परिणाम! जयवंत तसा सध्या पाहुणाच होता. शेवटी ज्यावेळी प्रत्यक्ष निश्चिती करण्याची वेळ आली तेव्हां काही ठराविक तारखांनाच जागा उपलब्ध होत्या शेवटी १० जानेवारीच्या उड्डाणात जागा उपलब्ध असल्याचे एअर इंडियातर्फे सांगण्यात आले आणि आमचे त्या दिवसाचे तिकीट निश्चित झाले.

नेवार्क विमानतळ आता परिचित झाला होता आणि आज त्याचा अधिकच परिचय होणार होता. कारण नेहमीचे उपचार पटकन व्यवस्थित पार पडले. पण मी दारातून आत शिरताना

संकेतध्वनी झाल्यामुळे माझ्या बॅगेत काहीतरी आक्षेपार्ह वस्तू असल्याचे सुरक्षा पाहणी करणाऱ्याच्या बरोबर लक्षात आले, निघण्याच्या घाईत एक चूक माझ्याकडून झाली होती ती म्हणजे दाढी करून ब्लेडचे पाकीट मी केबीन बॅगमधील पाउचमध्येच ठेवले होते आणि तेच कारण त्या बझर होण्यामागे होते. पण मला मात्र आपण खात्रीने काही घेतले नाही असे वाटत असल्याने मी माझ्याकडे आक्षेपार्ह काही नाही असे सांगू लागलो पण माझी केबिनबॅग उघडल्यावर त्यातून ब्लेडचे पाकीट बाहेर पडल्यावर मात्र मी ओशाळलो, पण तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्याने मात्र त्याचे भांडवल न करता अशा चुका होतातच असा उलट मलाच धीर दिला एवढेच नव्हे तर मला ते पाकीट बरोबर आलेल्या कोणाला द्यायचे असेल तर ते देण्याचीही परवानगी दिली पण आम्हाला सोडायला आलेल्या व्यक्तींना सोडून जवळजवळ ३-४ शे मीटर इतके अंतर परत चालत जाऊन आमच्या मुलांना उपयोगी नसणारे पाकीट त्यांच्या हवाली करण्याऐवजी ते तेथेच फेकून देणे मी पसंत केले. पुढे मात्र काहीही अडथळा न होता आम्ही पुढे गेलो आणि तेथून फक्त विमानातच चढायचे बाकी असताना मुलांना फोन करून सगळे व्यवस्थित आहे आता तुम्ही घरी जायला हरकत नाही असे सांगितले. थोड्याच वेळात रांग आणि क्रमांकानुसार

विमानाच्या आत आम्हास सोडण्यात आले आणि आम्ही आत जाऊन स्थानापन्न झालो.

थोड्या वेळाने नेहमीप्रमाणे सर्वांना मोसंबीचा रस देण्यात आला. हा इतका आंबट रस एअर इंडियावाले कोठून पैदा करतात कोणास ठाऊक. त्यानंतर येणाऱ्या शीतपेयात बरेच पर्याय असतात पण या रसाला मात्र तो न घेणे हा एकच पर्याय असतो. विमान सुटण्यापूर्वी समोरील पडद्यावर कठिण प्रसंगात सुरक्षातरतुदी कशा वापरायच्या याविषयी माहिती देण्याचे काम सुरू झाले. हल्ली त्याचबरोबर एक कर्मचारीही त्याचे प्रत्यक्ष दिग्दर्शन करतो. विमान सुटण्यापूर्वी हा भाग पूर्ण झाल्यावर बेल्ट बांधणे. मोबाइल बंद करणे, वगैरे सूचना न होताच एकदम विमान हलू लागले आणि मी आश्चर्यचकित झालो पण नंतर ती हालचाल थांबली ध्वनिक्षेपकातून विमानातील बिघाडामुळे विमान सुटण्यास विलंब होत असल्याचे सांगून प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल त्यांची क्षमा मागून झाली आणि तरीही इंजिनाची दुरुस्ती शक्यतो लवकर करून लवकरच निघू अशी आशा पण दाखवण्यात आली. तासाभरात निघू असा दिलासा देण्यात आला. पहिल्यांदा विमान हलू लागण्याचे कारण वेगळेच होते आणि ते नंतर समजले.

आमच्या शेजारी एक फ्रेंच युवती पॅरिसला उतरणारी बसली होती. आत शिरल्यावर लगेच तिच्या लॅपटॉपवर काम करण्यात गुंगून गेली तिला या घोषणा ऐकू गेल्याच नाहीत. पण थोड्या वेळाने तिला जाग येऊन ती अजून विमान का सुटत नाही असे मला विचारू लागली त्यावर मी तिला दिलेल्या उत्तरावर तिचा विश्वास बसला नाही बहुधा एअर इंडियाच्या विमानात प्रवास करण्याचा हा तिचा पहिला अनुभव असावा. त्यामुळे ती विमानकर्मचाऱ्यापैकीच एकाला विचारण्यासाठी त्यांच्या बसण्याच्या जागेवर गेली, ते तिला काय सांगतात या उत्सुकतेने मीही तिच्या पाठोपाठ गेलो आणि त्यांच्या सांगण्याचा मतितार्थ ऐकून मी गारच झालो. त्यांच्या सांगण्यानुसार प्रवाशांचे सामान विमानात चढवणाऱ्या ट्रकनेच विमानाला जोरदार धडक दिल्यामुळे इंजिन नादुरुस्त झाले आहे हे ऐकल्यावर विमान अचानक हालण्याचे कारण कळले व त्याचबरोबर माझ्या अभियांत्रिकी शिक्षणानुसार तासाभरात आपल्याला निघता येईल हा त्यानी प्रवाशांना दाखवलेला आशावाद खरा ठरण्याची शक्यता मला कमी वाटू लागली. कारण रस्त्यावर कार बंद पडली तर ती पुम्हा सुरू करण्यास चार पाच तास लागतात असा आमचा अनुभव! आमच्य घरातील प्रत्येक लग्नात वर्हाडी मंडळींची बस किंवा ट्रेनसुद्धा बंद पडून वऱ्हाडी कार्यस्थळी पोचतात की नाही हा अबुभव गाठीशी असल्यामुळे अशा

दुरुस्तीला कमीतकमी १५ ते २० तास लागतील असा माझा अंदाज! शिवाय नादुरुस्त होऊन बंद पडून बदलावे लागणे हा म. रा. वि. प. मंडळाचा अनुभव भारतीय महाराजा विमानाच्या बाबतीतही आम्हाला करून देईल ही माझ्या पहिल्या वारीतील अपेक्षा आता पुरी करण्याची संधी त्याने साधली.

मागे पिटसबर्गला आम्हाला विमानतळावर मुक्काम करण्याची एक संधी आली होती त्याची भरपाई आता होणार की काय असे बाटू लागले तेवढ्यात घोषणा झाली, " विमान उद्या चार वाजेपर्यंत निघू शकणार नाही. (म्हणजे त्यानंतर केव्हा निघू शकेल याचा नेम नाही) प्रवाशांना विमानात जेवण करून हॉटेलमध्ये नेण्यात येईल. ज्यांना हॉटेलमध्ये जेवायचे असेल त्यांना जेवण्याचे तिकिट देण्यात येईल. ज्यांना घरी जायचे असेल त्यांनी आपले संपर्क दूरध्वनी एअर इंडिया च्या खिडकीवर देऊन घरी जावे. " थोडक्यात आमच्यासारख्या घर जवळ असणाऱ्यांना आमचा मुक्काम वाढवण्याची संधी(की सक्ती?) आता निर्माण झाली.

आम्ही आपल्या केबीन बॅगा घेऊन खाली उतरलो आणि मी घरी फोन करून ही सुवार्ता सांगितली. आम्हाला सोडून ते नुकतेच घरी पोचून जेवायला बसले होते. आमचा फोन मिळाल्यावर सुजितने तुम्ही तेथेच थांबा मी तुम्हाला न्यायला येतो असे

सांगितले. टिकेटिंग कौंटरवर जाऊन आमचे बोर्डिंग पासेस परत केले आणि त्याना आमचे संपर्क दूरध्वनी देऊन सुजितबरोबर घरी परत आलो. आमचे मुख्य सामान विमानतळावरच राहू देण्यात आले कारण आमचे सर्व सामान विमानात चढवल्यानंतर विमानात बिघाड झाला होता. आम्हाला पुढे मिळणाऱ्या उड्डाणात सामान चढवले जाईल अशी अपेक्षा होती.

आम्ही घरी आल्यावर खरा खूष झाला असेल तर तो प्रथमेश. कारण आम्ही विमानतळावर त्याला घेऊन गेलो नव्हतो त्यामुळे आम्ही असेच कुठेतरी खरेदी करावयास गेलो असू असा त्याचा गैरसमज झाला होता किंवा करून देण्यात आला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी आपल्याला एअर इंडियाच्या ऑफीसकडून फोन येईल अशी अपेक्षा होती पण ती पूर्ण न झाल्यामुळे आम्हीच फोन लावल्यावर त्यांनी उत्तरादाखल एक ध्वनिफीतच लावून ठेवली होती आणि त्यावर " दहा जानेवारीची एअर इंडियाचे संध्याकाळी सहा वाजता होणारे उड्डाण विमान नादुरुस्त झाल्यामुळे पुढे ढकलण्यात आले आहे आणि प्रवाशांशी संपर्क साधण्यात येईल. " अशी उद्घोषणा ध्वनिमुद्रित करून ठेवली होती. त्यामुळे आम्हाला दिवसभर तीच ऐकण्याचे काम करावे लागले. मध्येच एकदा त्यांचा फोन आला, वाटले चला निघावे लागणार पण त्याच्याकडून विचारणा झाली की आमची ग्रीनकार्डे आहेत का.

बहुधा लंडनमार्गे जाणाऱ्या उड्डाणात आम्हाला समाविष्ट करण्याचा त्यांचा विचार असावा. पण ती नाहीत असे कळल्यावर तो विचार त्यांनी रद्द केला. अशा रीतीने तो दिवस काहीच न होता गेला. आता मानसिक तयारी निघण्याची झाल्याने आणि महत्वाचे सामानही बरोबर नसल्यामुळे (अगदी ज्ञानेश्वरीही मुख्य सामानात गेली होती.) आमची अवस्था त्रिशंकूसारखी झाली होती. अकरा जानेवारीचा दिवस असाच गेला.

१२ तारखेस सकाळपासून काहीच हालचाल नाही, आम्ही बेचैन. मुलांना कामावर जाणे भागच होते. ते गेल्यावर जर अचानक एअर इंडियाला जाग आली तर काय करायचे म्हणून एका टॅक्सीच्या एजन्सीला फोन करून ठेवले. तशात एकदम दुपारी फोन आला की लुफ्तान्साने जाण्यास तयार आहात का, फ्लाइट संध्याकाळी ५-४५ ला होती. आम्ही सुजितचा फोन नंबर देऊन त्याच्याशी बोलायला सांगितले. त्याचा नंतर तयार राहा असा फोन आल्यावर आम्ही पुन्हा तयार झालो. नेवार्क विमानतळावर पोचलो तेव्हां दुपारचे ४ वाजले होते. सामानाचे काम नसल्याने वेळ कमी लागेल असे वाटत होते पण तेथे सगळा सावळा गोंधळ होता. एअर इंडियाच्या कौंटरला अगदी एकाद्या एस. टी. स्टॅंडची कळा आली होती. त्या उड्डाणाने मुख्यत्वे १४ जानेवारीच्या संक्रांतीसाठी जाणाऱ्या गुजराती बंधू भगिनींची गर्दी होती. त्यातले बरेच ग्रीन

कार्डधारक कालच लंडनमार्गे उडून गेले होते पण अजूनही त्यांच्यापैकी बरेच शिल्लक होते. त्या सर्वांचा गुजराती कलकलाट चालू होता आणि सगळयात वाईट गोष्ट म्हणजे आपआपले लगेज ताब्यात घ्या अशी उद्घोषणा झाली आणि आमच्या पायातले अवसानच गळाले. म्हणजे सामान ताब्यात घेऊन पुन्हा चेकिंग होणार होते आणि ते सामानही विमानतळाच्या तळमजल्यावर ट्रकमधून आणून टाकण्यात (अक्षरश: टाकण्यातच येत होते हे पुढे कळले) येत होते. ते आपले आपले शोधून घ्यायचे, ते घेऊन तीन मजले वर येऊन मग त्याचे चेकिंग व्हायचे आणि त्यानंतर आम्ही विमानात चढायचे म्हणजे आमच्यासारख्या पैलतिरी नेत्र लागलेल्यांना ते मिटण्याचीच वेळ होती.

सुजित सामान आणण्यासाठी ट्रॉली घेऊन गेला. वरचा भाग वातानुकूलित होता पण तळमजला अगदी उघडाच होता आणि तो जानेवारी महिना होता त्यामुळे तेथे कडाक्याची थंडी होती त्यामुळे तेथे उभे राहून त्याचे पाय गारठून गोठण्याची वेळ आली, तरी सामान ट्रकने हळूहळू येतच होते. आणून ते गॅसची सिलिंडरे ज्या पद्धतीने मजूर ट्रकमधून वाटेल तशी फेकत असतात तसेच सामान फेकण्यात येत होते, काही प्रवाशांच्या बॅगांची दोन भागात विभागणी होऊन सामान बाहेर डोकावू लागले. असा एक प्रवासी संतापाने एअर इंडियाच्या अनेक कुळांचा उद्धार करत होता आणि

याविषयी तक्रार करणार असा दम भरत होता पण त्याचा परिणाम त्या फेकणाऱ्यांवर जवळजवळ होतच नव्हता म्हटले तरी चालेल. सुजितचे पाय गोठून जाण्याची पाळी आली तरी आमचे सामान येतच होते. शेवटी त्याने जयवंतला फोन करून लवकर येण्याचा आग्रह केला आणि तो आल्यावर त्याला तेथे उभा करून तो वर आमची परिस्थिती काय आहे पाहण्यास आला.

वर आम्ही आमच्या मूळ तिकिटाच्या ऐवजी बदललेल्या उड्डाणाचे तिकीट किंवा बोर्डिंग पास यापैकी जे काही मिळेल ते घेणाऱ्यांच्या रांगेत उभे राहण्याचा प्रयत्न करत होतो आणि शेवटी कंटाळून बसकण मारून बसलो होतो तरी रांग पुढे सरकत नव्हती. उड्डाण संध्याकाळी ५-४५ चे होते आणि पाच तर वाजून गेले आणि त्या उड्डाणातील जागा संपल्याचे घोषित करण्यात आले. अजून आमचे सामानही आमच्या ताब्यात मिळाले नव्हते. तेवढ्यात खालच्या मजल्यावरून जयवंतचा मोबाइल वाजला तो आमच्या बॅगा सारख्या दिसणाऱ्या बॅगा आमच्याच आहेत किंवा नाहीत ही विचारणा करत होता. त्यावर चर्चा होऊन त्या आमच्याच आहेत असा निष्कर्ष निघाल्यावर सुजितने इकडे घुसखोरी करत एअर इंडियाच्या कौंटरवरील कर्मचाऱ्याला बराच दम दिल्यावर शेवटी दुसऱ्या दिवशीच्या उड्डाणात जागा मिळवली. ते उड्डाण फ्रॅंकफर्टवरून जाणारे होते. जे मिळेल ते घे

असा निर्वाणीचा सूर मी काढला आणि दुसऱ्या दिवशीच्या त्या उड्डाणाचे तिकीट मिळवले.

तोपर्यंत आमचे सामान ट्रॉलीवर घालून हलवण्यासाठी जयवंतने त्याचा धावा केला आणि तिकिटाबदली दिलेला कागद आमच्या ताब्यात देऊन सुजित खाली गेला. संयुक्ता आमच्यासोबत होती. अशा प्रकारे १२ तारखेचाही दिवस वाया गेला होता तरी आता निदान १३ ला तरी निघण्याची निश्चिती झाली या विजयानंदात आम्ही आमचे वीर सामानाच्या गाड्या घेऊन वर आल्यावर विमानतळावरील खानपानसेवेचा लाभ घेत आमचा विजय साजरा केला. जयवंत ऑफीसमधून तडक आलेला होता आणि सगळेच दमलेले होतो. सर्वांनी थोडीफार पोटपूजा करून आमच्या बॅगा बऱ्याच सुरक्षित राहिल्याबद्दल आमच्या भाग्याचे मनात व उघडपणेही कौतुक करत आमची वरात पुन्हा एकदा हिडन व्हॅलीत तोंड खरोखरच लपवायला आली व हिडन व्हॅली हे नाव सार्थ केले.

त्या तिकिटाचीही जरा भानगडच होती म्हणजे नेवार्कपासून फ्रँकफर्टपर्यंत ते लुफ्तान्साचे होते. तेथे आम्ही १४ तारखेस सकाळी सात वाजता पोचणार होतो आणि तेथून एअर इंडियाचे विमान १४ तारखेस संध्याकाळी चार वाजता सुटून पुढे मुंबईस जाणार होते

शिवाय या पुढच्या प्रवासाचा बोर्डिंग पास आम्हाला फ्रॅंकफर्टलाच मिळणार असे फक्त आश्वासन देण्यात आले होते. त्यामुळे आम्ही फ्रॅंकफर्टला नऊ तास निराधार अवस्थेत लटकणार होतो. त्या काळात विमानतळावरून मुलांशी संपर्क साधता यावा म्हणून त्यांनी एक प्रिपेड कार्ड घेऊन त्या क्रमांकाशी संपर्क साधण्याचे प्रशिक्षण इंटरनेटच्या सहाय्याने आम्हाला (म्हणजे मला) दिले आणि काही अडचण आली तर किंवा न आली तरी तेथून संपर्क साधावा असे आम्ही ठरवले कारण त्यानाही आम्ही पुढे बरोबर जात आहोत की नाहीत याची माहिती मिळणे आवश्यक होतेच.

. १३ तारखेचा दिवस बॅगांची डागडुजी करण्यात गेला कारण फेकाफेकीत आमच्या बॅगा थोड्याफार जायबंदी झाल्या होत्या. एका बॅगेचे कुलुप तुटले होते. या वेळी मात्र आम्ही सर्व बॅगांना अगदी मौजे खबालवाडी किंवा वाकळवाडीचे लोक वळकटी बांधतात तसे सर्व बाजूनी बळकट नाड्यानी बांधून टाकले हो पुन्हा फेकाफेकी झालीच तर बॅग द्विभाजित व्हायला नको. शिवाय आपल्या बॅगा ओळखू याव्यात म्हणून त्यावर लेबलांशिवाय पुन्हा क्रेयॉनच्या कांड्यांनी नावे लिहिली होती त्यात प्रथमेशनेही आपले हात साफ करून घेतले. अशा प्रकारे दहा तारखेस निघालेले आम्ही प्रत्यक्षात १३ तारखेस संध्याकाळी मुंबईस जावयास निघालो.

१३ जानेवारीच्या संध्याकाळी तिसऱ्यांदा आम्ही नेवार्क विमानतळावर गेलो. पुन्हा सामानाची तपासणी, बोर्डिंग पास मिळवणे आमची तपासणी या सर्व गोष्टींना तोंड देऊन आम्ही एकदाचे लुफ्तान्सा विमानकंपनीच्या विमानात शिरलो. त्यात एक गोष्ट बरी झाली होती ती म्हणजे ही फ्लाइट अहमदाबादला १५ तारखेस म्हणजे अगदी संक्रांतीच्याच दिवशी पोचणार असल्यामुळे पतंगोत्सवात भाग घेणाऱ्या बऱ्याच गुजराती बंधूनी आपले उड्डाण आदल्या दिवशी मिळवण्याचा प्रयत्न केला होता आणि ज्याना तो जमला नव्हता त्यांनी आपला जाण्याचा बेतच रद्द केला होता त्यामुळे या विमानात बरेच कमी प्रवासी होते आणि त्यामुळे विमानकर्मचाऱ्यांनी पहिला पेयपान वगैरे उपचार झाल्यावर जादा बैठका अडवून खुशाल झोप काढा असा प्रेमळ सल्ला दिला. विलंबाची भरपाई! अर्थात उद्या आपल्याला बोर्डिंग पास मिळतो की नाही या चिंतेत मग्न असणाऱ्या मला जागा भरपूर मिळाली तरी झोप लागली नाहीच. सौ. ने मात्र या संधीचा पुरेपूर उपयोग करून घेतला.

लुफ्तान्सा जर्मन कंपनी असल्यामुळे उद्घोषणा प्रथम जर्मन भाषेत आणि नंतर इंग्रजीत होत होत्या. सिनेमाही जर्मन भाषेतील आणि अगदीच टाकाऊ होता. उड्डाण सुरू होताच विमान गदगदा हालू लागले आणि आता याचे काय होते या चिंतेने मला ग्रासले

पण या वेळी कारण वेगळे होते म्हणजे जोराच्या वाऱ्याने ते हालत होते असे सांगण्यात आले पण शेवटी त्याने हालणे थांबवून थोडेसे माझ्या छातीचे ठोके सामान्य स्थितीत आणले आणि रात्र कशीबशी पार पडून फ्रॅंकफर्ट विमानतळावर आमचे विमान सकाळी सात वाजता पोचले.

फ्रॅंकफर्ट विमानतळ बराच मोठा होता पण तेथे नऊ तासाचा मुक्काम असूनही जर्मनीचा व्हिसा नसल्यामुळे आम्हाला बाहेर पडणे शक्य नव्हते. अर्थात व्हिसा असता तर लगेच आम्ही शहरात फेरफटका मारला असता असे नाही पण निदान विमानतळाबाहेरील भाग कसा आहे याचा तरी थोडा अंदाज आला असता. सुजित पहिल्यांदा गेला त्या वेळी त्याने असा फेरफटका मारला तो इतका लांबला की तो परत आला तेव्हां त्याच्या नावाने विमान सुटत आहे तरी लवकर आपली जागा घ्या असा कंठशोष चालू होता. भाग्यच त्याचे की तो येण्यापूर्वी विमान हलले नाही. आमच्यापैकी निम्मेअधिक गुजराती प्रवासी होते त्याना अशा प्रवासाचा बराच अनुभव असल्याने त्यांच्या मागोमाग राहून पुढे जे काय करायचे ते ठरवू असा आम्ही विचार केला. प्रथम पुढील प्रवासाचा बोर्डिंग पास मिळण्यासाठी एअर इंडियाचा कौंटर हुडकू लागलो तो एका कोपऱ्यात पण बंद अवस्थेत दिसला आणि तेथील कर्मचारी केव्हा

येईल (किंवा येणार का नाही) याचा जवळच्या कौंटरवरील कोणालाच माहीत नव्हते.

आम्हाला मुलांना फोन करायचा होता म्हणून आम्ही फोनचा अड्डा शोधू लागलो. सुदैवाने तो रेस्ट रूमच्या बाहेरच सापडला आणि मी मुलांनी दिलेला नुंबर हुडकून फोन करण्याचा प्रयत्न करू लागलो. निघताना केलेल्या सरावानुसार मी सगळे क्रमांक फिरवले तरी तो मला चार आकडी कसलातरी क्रमांक मागू लागला आणि तो काही आमच्याकडे नव्हता अर्थातच फोन करण्याचा विचार रद्दच करावा लागला कारण त्या फोनशेजारी लिहिलेल्या सगळ्या सूचना जर्मन भाषेत होत्या. आशर्य म्हणजे आमच्या सहप्रवाशांपैकी कोणालाही या फोनवरून फोन कसा लावायचा याचे ज्ञान नव्हते, त्यामुळे बऱ्याच जणांना विचारूनही काही फायदा झाला नाही. त्यावेळी मोबाइलचा प्रसारही इतका झाला नव्हता.

अगोदरच धास्तावलेल्या मला या दूरध्वनीतील अपयशाने अधिकच खचल्यासारखे झाले आणि घशास कोरडही पडली. एवढ्या मोठ्या एअरपोर्टमध्ये पिण्याच्या पाण्याचा फौंटन मात्र कोठेही दिसत नव्हता. अमेरिकेतच काय पण भारतातही पाणीसुद्धा मिळत नाही अशी परिस्थिती कधीच निर्माण झाली नव्हती पण

इतक्या पुढारलेल्या देशाने मात्र माझ्या तोंडचे पाणी पळवले. तेवढ्यात मला तेथे संगणक केंद्र दिसले आणि तेथून मुलांना मेल करून आपला ठावठिकाणा कळवता येईल आणि आपल्या अडचणींची त्याना कल्पना देता येईल म्हणून एका टर्मिनलवर जाऊन पाहिले तर त्यात मेल करण्यासाठी तीस युरो सेंटस लागतील अशी सूचना होती आणि त्यात पाच मिनिटाचा संगणक अवधी उपलब्ध होणार होता. माझ्याकडे असलेल्या डॉलरचे युरोत रूपांतर करण्यासाठी विनिमयकेंद्र मात्र जवळच उपलब्ध झाले आणि आता आपल्याला पाणीही विकत घ्यावे लागणार याचा अंदाज येऊन मी पाण्यातही काही युरो घालवण्यासाठी डॉलरचे रूपांतर करून घेतले आणि पाच डॉलरचे रूपांतर करण्यात एक डॉलर वटणावळ घालवून जवळजवळ अडीच युरो डॉलर्स मिळवले पण नंतर आपण ही चूक केली असे वाटले कारण पाण्याची बाटली अमेरिकन डॉलरमध्ये पण विकत मिळत होती पण तिच्यावर लिहिलेल्या किंमतीपेक्षा विक्रेतीने काही सेंटस ज्यादा घेतले असे वाटून मी विचारणा केल्यावर रिकामी बाटली परत केल्यास ते परत मिळतील असे सांगण्यात आले. रिकामी बाटली इतकी मौल्यवान असते हे प्रथम कळले पण नंतर प्रवाशांनी रिकाम्या बाटल्या कोठेही फेकून विमानतळावर घाण करू नये यासाठी ही तरतूद असल्याचे कळले.

मिळालेले युरो सेंटस वापरून मी मेल करण्याचा प्रयत्न केला पण माझा कंजूसपणा नडला म्हणजे मी फारच आत्मविश्वासाने तीस सेंटमध्येच काम होईल म्हणून तीस सेंट वापरले पण मिळालेल्या वेळात मला मेल करणे जमले नाही कारण येथील कीबोर्ड थोडा वेगळा होता त्यामुळे माझा मिळालेला वेळ एक ओळ कशीबशी लिहिण्यातच खर्च झाला आणि वेळ संपला असा संदेश आला. मग नंतर जरा जास्त सेंटस वापरून अधिक वेळ विकत घेतला यावेळी मात्र वेळ पुरला एवढेच नव्हे तर उरलाही म्हणून दुसरा मेल करायला घेतला पण तो मात्र पूर्ण होऊ शकला नाही. पण एकदा अंदाज आल्यावर नंतर मेल करणे सोपे झाले.

बरोबर आणलेले खाद्यपदार्थ खाऊन विकत घेतलेल्या पाण्याने तहान भागवली. या सर्व प्रकाराने वैतागून मी " हाणकाबिगार पुन्हा अमेरिकेत पाऊल टाकणार नाही" अशी प्रतिज्ञा केली पण माझ्या प्रतिज्ञेत किती भीष्म आहे हे माहीत असणाऱ्या माझ्या सहधर्मचारिणीने त्यावर भाष्य करण्याचे टाळले. विमानतळ इतका दरिद्री की बसायला सुद्धा चांगली जागा नव्हती. खाद्यपेयांचे स्टॉल्स जेमतेम उभे राहण्याइतकीच जागा ठेवलेले होते. पुढे त्या विमानतळावरून अनेक वेळा प्रवास करणाऱ्या व्यक्तीकडून उच्च वर्गाचे लाउंज चांगले असते आणि इतर प्रवाशानाही तेथे बसता येते अशी माहिती मिळाली पण त्यावेळी ते माहीत नव्हते आणि

त्यानंतर या माहितीचा खरेपणा पडताळून पाहता न आल्यामुळे फ्रॅंकफर्ट विमानतळाविषयीचे माझे मत अजून सुधारले नाही.

आम्हाला विमानतळावर येऊन पाच सहा तास झाले तरी एअर इंडियाचा कौंटर बंदच होता. शेवटी एका सहप्रवाशाने बातमी आणली की बोर्डिंग पासेस संध्याकाळच्या उड्डाणासमयीच मिळतील आणि आम्ही कसाबसा वेळ घालवण्याचा प्रयत्न करू लागलो. शेवटी आमच्या उड्डाणाची घोषणा होऊन अडकलेल्या प्रवाशांनी कोणत्या क्रमांकाच्या गेटमधून जावे हे सांगण्यात आले आणि आनंदाची गोष्ट म्हणजे प्रवेशद्वारापाशीच उभ्या असणाऱ्या कर्मचारिणीने आमच्याकडे असणारा कागद पाहून आम्हाला पुढील एअर इंडियाच्या उड्डाणाचे बोर्डिंग पासेस दिले आणि आम्ही लाउंजमध्ये जाऊन बसलो.

चार वाजण्यास अर्धा तास असताना विमानात प्रवेश देण्यात आला आणि याही वेळी प्रवाशांची संख्या बरीच कमी असल्याने आम्हाला प्रत्येकाला झोपायला जागा मिळाली. हवाई कर्मचाऱ्यांनीच आम्हाला गुपचुप झोपून जा असा सल्ला दिला आणि या वेळी मात्र मी चिंतामुक्त होऊन खरोखरच तीन आसनांची जागा अडवून झोपी गेलो ते सकाळी एकदम मुंबईतच पहाटे पाच वाजता जागा झालो. अशा रीतीने आमची दुसरी वारी तब्बल पाच

दिवस घेऊन समाप्त झाली. आमच्याबरोबर एक हैद्राबादचे नवरा बायको आणि मूल असणारे कुटुंब होते त्यांना मुंबईतही पुढचे उड्डाण लगेच नव्हतेच ते त्या दिवशी संध्याकाळी होते त्यामुळे त्यांच्या तीन आठवड्याच्या सुट्टीतील एक आठवडा त्यांना प्रवासातच घालवावा लागला. एअर इंडिया झिंदाबाद!

# ३९. तरीही पुन्हा!

दुसऱ्या अमेरिका वारीनंतर परत भारतात येताना एअर इंडियाने इंगा दाखवल्यामुळे फ्रॅंक्फर्ट विमानतळावरच नऊ तास घालवताना मी यापुढे झेल्या (पहा:माणदेशी माणसे) च्या भाषेत आता हाणकाबगार अमेरिकेत जानार न्हाय असे पुटपुटत असलेले सौ. ने गंभीर चेहरा करून ऐकून घेतले असले तरी मनातल्या मनात ती आणि तिच्याबरोबर नियतीही निश्चितच हसली असणार.

त्या घटकेला तरी मी याबाबतीत अगदी ठाम होतो. पण असे मोठे निश्चय करण्यात जितका मी प्रवीण होतो तितकाच ते पार पाडायला जो ठामपणा लागतो त्याचा मात्र माझ्याकडे पूर्णपणे अभाव आहे. आणि आपण काहीही ठरवले तरी शेवटी परिस्थिती आपल्याला काही विशिष्ट प्रकारे वागायला भाग पाडते तसेही झाले असावे त्यामुळे २००५ च्या जानेवारीत भारतात परत आल्यावर मार्च २००६ पर्यंतच काय ते आम्ही भारतात थांबू शकलो. सुजितलाही डिसेंबर २००५ मध्ये एक छोकरा झाला. त्यावेळी आलेले संयुक्ताचे आई वडील मार्च ३१, २००६ ला परत जाणार होते एअर इंडियाच्या (हो हो एअर इंडियाच्याच अहो कशीही झाले तरी ती आपली हवाई सेवा) ज्या उड्डाणाने ते भारतात जाणार होते

तेच विमान भारतातून आम्ही घेऊन आलो (वा तेच विमान आम्हाला घेऊन आले) म्हणजे त्यांची आणि आमची नेवार्क विमानतळावरच गाठ पडली. शासकीय सेवेत असताना चार्ज हॅंडिंग आणि टेकिंग ओव्हरचा जो प्रकार असतो तो आम्ही अगदी विमानतळावर पार पाडला, आणि त्यांच्या लेकीची आणि नातवंडाची जबाबदारी घेऊन आता सुखाने घरी जा असे त्यांना सांगितले अर्थात लेकीला आणि नातवाला सोडून जाताना जे वाईट वाटायचे ते त्यांना वाटलेच असणार.

या वेळी आमचे दोन्ही चिरंजीव एडिसनमध्येच पण वेगळया ठिकाणी रहात होते. सुजित त्याच्या नव्या घरात १० हेदर ड्राइव्ह येथे तर जयवंत टॉल ओक रोडवरील एव्हरग्रीन अपार्टमेंट मध्ये. मागील वर्षी प्रथमेश नर्सरी म्हणजे प्रीस्कूलमध्ये जात होता. ती खाजगी शिक्षणसंस्था होती आणि तेथील फी पण भरपूर होती पण आता पहिल्या वर्गासाठी येथील पब्लिक स्कूलमध्ये प्रवेश घेतला होता. या शाळेत फी नसतेच पण पालकाचे वास्तव्य त्या विभागात असणे आवश्यक असते त्यामुळे जयवंतला स्वत:च्या नावावर घर असणे आवश्यक होते. या परिस्थितीमुळे प्रथमेश मात्र जाम वैतागला होता. आजी आजोबा एडिसनमध्ये असताना ते आपल्या जवळ न रहाता काकाकडे रहातात हे त्याला पटत नव्हते. मधूनमधून जरी आम्ही प्रथमेशकडे राहिलो तरी त्याचे समाधान

तेवढ्याने न झाल्याने आमचे तिकिट वाया गेले असे तो म्हणायचा. काकाकडे आल्यावर त्याला परत जायचेही जिवावर यायचे. तेथे आम्ही तर होतोच शिवाय घरातच झोका, घसरगुंडी ही साधने असल्याने त्याला खेळायला आवडायचे. सुमित(सुजितचा मुलगा) अजून लहान असल्याने ही साधने वापरण्यात तो त्याचा स्पर्धकही नव्हता.

आम्ही अमेरिकेत पोचलो तेव्हां उन्हाळा नुकताच सुरू झाला होता त्यामुळे अजून झाडांवर पानांचा पत्ता नव्हता, पण आम्ही गेल्यावर पालवी फुटू लागली. या नव्या भागात सर्व रस्त्यांना हेदर, लव्हेंडर, पेरिविंकल, हनिसकल अशी निरनिराळया फुलझाडांची नावे दिली आहेत आणि त्या त्या रस्त्यांवर खरोखर तशी झाडे होती. विंटरग्रीन हा रस्ता या सगळया गल्ल्या जोडत पुढे ग्रोव्ह ऍव्हेन्युला मिळतो. त्या भागात सगळी स्वतंत्र घरेच आहेत, आणि बहुतेकांची रचना बरीचशी सारखी म्हणजे तळमजल्यावर मोठा हॉल, किचन डायनिंग व लिव्हिंग रूम आणि वरच्या मजल्यावर तीन बेडरूम. शिवाय वर दोन आणि खाली अर्धी बाथरूम. काही घरांना तळघर होते पण सुजितच्या घरात ते नव्हते. या भागात अपार्टमेंट जवळजवळ नाहीतच म्हटले तरी चालेल.

# ४०. ज्येष्ठ नागरिक मेळावा

ग्रोव्ह ॲव्हेन्यु आणि इनमन ॲव्हेन्यु असे दोन मुख्य रस्ते त्या भागाकडे येणारे आहेत. या दोन रस्त्यांच्या जोडणाऱ्या कोपऱ्यावर एक ज्येष्ठ नागरिक गृह (Senior's home)आहे त्याला इनमनग्रोव्ह असेच नाव आहे. त्यात रहाणारे ज्येष्ठ नागरिक बहुधा स्वत:च्या कार चालवणारे आहेत. त्यामुळे या इमारतीसमोर भली मोठी जागा गाडीतळ म्हणून राखून ठेवलेली आहे याशिवाय सभोवती इमारतीच्या क्षेत्रफळाच्या अनेक पट मोठी मोकळी जागा आहे. अशा जागा पाहिल्या की पुण्यात फिरायला जाऊ इच्छिणाऱ्या आमच्यासारख्या ज्येष्ठ मंडळींना मोकळा रस्ता शोधणे किती कठीण जाऊ लागले आहे याची आठवण होऊन परत गेल्यावर तीच कसरत आपल्याला करावी लागणार या कल्पनेने अगदी दाटून कंठ आला.

इनमन ग्रोव्हच्याच बाजूला एक शॉपिंग कॉम्प्लेक्स आहे त्यात खरेदी करण्यासाठी फक्त रस्ताच ओलांडावा लागतो. ज्येष्ठ नागरिक संकुलातून ज्येष्ठ नागरिक रस्ता ओलांडून मॉलमध्ये जातात त्यांना सोयिस्कर व्हावे म्हणून मध्ये आडवा पट्टा त्यांच्यासाठी रेघा मारून सुरक्षित ठेवलेला आहे त्यावर सीनिअर्स

क्रॉसिंग असे लिहिलेले त्याचेवर एकादा/दी ज्येष्ठ चालत असेल तर गाडी/ड्या खरोखरच थांबतात. आपल्याकडेही सिंहगडरस्त्यावर एका ठिकाणी असा पट्टा मारून ठेवला आहे पण इतर वेळी तर सोडाच पण वाहनांसाठी लाल दिवा असला तरीही मी जीव मुठीत धरूनच त्यावरून रस्ता ओलांडायला सुरवात करतो.

आपल्याकडे ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढत चालली असली तरी त्यांच्यासाठी रेल्वे अथवा एस. टी. त भाड्यात आणि आयकरात थोडी सवलत दिली की त्यांची योग्य ती काळजी घेतली असे शासनाला वाटते. अर्थात शासनाला दोष देण्यात काय अर्थ?कारण घरातील पुढच्या पिढीलाही ज्येष्ठ मंडळी शक्यतो नकोच असतात. नुकतेच अमेरिकेत गेलेल्या एका मुलाने अमेरिकेत नेण्याचे आपल्या आईवडिलांना कबूल करून त्यांना रहाते घर विकायला लावले आणि त्या सर्व पैशासह विमानतळावर नेऊन त्यांना तेथेच सोडून तो एकटाच अमेरिकेत गेल्याची हृदयद्रावक घटना वाचण्यात आली होती. अमेरिकेत वा पाश्चिमात्य राष्ट्रात ज्येष्ठ नागरिकांना आपली मुले वा नातवंडे सांभाळतील अशी वेडगळ कल्पनाच बाळगली जात नाही त्यामुळे काही म्हातारी माणसे आपल्या मुला नातवंडांसमवेत रहात असली तर तो अपवाद समजण्यात येतो आणि त्यामुळेच बहुधा ज्येष्ठांना योग्य त्या सवलती देण्याचा प्रयत्न केला जातो. याउलट आपल्याकडे

मुलाने अथवा मुलीने आपल्या आईवडिलांचा सांभाळ केला पाहिजे असा कायदा केला की आपले कर्तव्य संपले अशी शासनाची समजूत असते. त्यानंतर त्या तरतुदीचे पुढे काय होते याकडे कोण लक्ष देणार?

या भागात आम्ही प्रथमच आल्यामुळे रस्त्यांची नीटशी माहिती नसल्याने मी सकाळच्या फिरण्याची सुरवात जरा बिचकतच केली. पण नंतर लक्षात आले की हा भाग ग्रोव्ह अव्हेन्यू. इनमन अव्हेन्यू, आणि विंटर ग्रीन या रस्त्यांनी असा वेढला गेला आहे की त्यावर चुकणे शक्यच नाही. त्यामुळे माझे फिरणे अगदी मोकळेपणी होऊ लागले. फिरता फिरता एक दिवस एक भारतीय गृहस्थ समोरून येताना दिसले. तसे बरेच भारतीय या रस्त्यावर दिसत आणि त्यातील बहुतांश गुजराती असल्याने "केम छो " नेच सुरवात करत कारण जगात फक्त गुजराती भाषाच चालते असा त्यांचा ठाम समज असतो. मग गुजरातमध्ये गेल्यावर तर बोलायलाच नको. मी एकदा बडोद्याच्या एम. एस. युनिव्हर्सिटीत एका शिक्षण शिबिरासाठी गेलो असताना तेथे प्रशिक्षण देणारे प्राध्यापकही समोरील सगळे प्रशिक्षणार्थी गुजरातीच आहेत अशा समजुतीत बेदिक्कतपणे आपल्या भाषणात गुजरातीचा सढळ वापर करत त्यावेळी मला उठून त्यांना तेथील निम्मे लोक गुजरातच्या बाहेरून आलेले आहेत याची जाणीव करून द्यावी लागली.

याउलट महाराष्ट्रात विशेषतः मुंबईत घराबाहेर पडले की हिंदी किंवा इंग्रजीच चालते असा मराठी माणसाचा दाट समज असतो मग अमेरिकेत गेल्यावर तर प्रश्नच नाही. त्यामुळे यांनी प्रथम इंग्रजीत सुरवात केल्यावर ते गुजराती नाहीत याची खात्री झाली आणि त्यांच्या उच्चारावरून बहुधा द. भारतीय नसावेत असे वाटले आणि खरेच ते आमचे आडनावबंधूच निघाले आणि मग एकदम मराठीत बोलायला सुरवात झाली. त्यांना मग इतकी आपुलकी वाटली की ते आपले घरच दाखवायला मला बरोबर घेऊन गेले. विंटर ग्रीन रस्त्याच्या शेवटी असणाऱ्या बॉक्सवुड कोर्ट या भागात ते रहात होते आणि त्यांच्या मुलाकडे ते आले होते. त्यानंतर त्यांची व माझी इतकी दोस्ती झाली की ते दररोज मला फिरायला बोलवायला यायचे किंवा मी त्यांच्याकडे जाऊन मग आम्ही फिरायला जात असू. पुढे भारतात गेल्यावरही ही दोस्ती टिकून आहे.

आम्ही दोघे फिरायला जाऊ लागल्यावर व आम्ही निरनिराळे रस्ते पहात जात असतानाच वाटेत आम्हास चन्द्रशेखर हे हैद्राबादकर भेटले, त्याच वेळी आमच्यासारखेच आलेले एक

मुम्बईकर श्री. आया सिंग, आमच्याच भागात रहाणारे श्री. पटेल, नैनितालहून आलेले श्री. बडोनी, आमच्या घराच्याच शेजारी रहाणाऱ्या भारतीय मुलीचे वडील श्री. सुर्वे, असा सात आठ भारतीय ज्येष्ठ नागरिकांचा एक छान मेळावाच तयार झाला त्यामुळे आम्ही सर्व ज्येष्ठ नागरिकासाठी बांधलेल्या इनमन ग्रोव्ह समोरील बाकावर बसू लागलो व हा आमचा जणु नित्यक्रमच झाला. पण एक दिवस आम्हा ज्येष्ठ नागरिकांना तेथील व्यवस्थापिकेने परवानगीशिवाय असा समुदाय करून येथे बसणे हे खाजगी जागेवर अतिक्रमण समजले जाईल असे बजावल्यामुळे (आणि तेथील सूचनाफलकानुसार कैद किंवा दंड होणे शक्य असल्यामुळे व थोडीशी चिरिमिरी देऊन त्यातून सुटका होण्याची शक्यता नसल्यामुळे)आमचा मुक्काम शेजारच्याच बागेत हालला, तेथेही बसण्यास बाके होती शिवाय टेबल टेनिस, बॅडमिन्टनसारखे खेळ खेळण्याची सोयही होती, अर्थात आमच्यापैकी सिंगच काय ते थोडेफार खेळणारे होते, पण आमचा गप्पांचा अड्डा तेथे बसू लागला. पुढे आमच्या घरच्या गणेशोत्सवासाठी या सर्वांनी हजेरी लावली. त्यानंतरच्या आमच्या अमेरिका भेटीत त्यांच्यापैकी त्यावेळी त्यांच्या मुलांकडे आले असले तर आमच्या गणपतीसमोर आवर्जून हजरी लावायचे.

# ४१. शुभ वर्तमान

सकाळी फिरताना वेगवेगळे रस्ते शोधण्याचा मी प्रयत्न करत असे. अर्थात रस्ता न चुकण्याची दक्षता घेऊनच! इनमन अव्हेन्यू या मुख्य रस्त्याला मिळणारे बरेच रस्ते पुढे ग्रोव्ह अव्हेन्यूला मिळतात असे मला आढळून आले. या रस्त्यावरून फिरताना माझ्यासारखेच फिरणारे क्वचित काही लोक दिसायचे त्यातील काही चिनी असायचे त्याव्यतिरिक्त काही भारतीय आणि तेसुद्धा गुजरातीच असायचे. एका दिवशी माझ्या प्रात:फेरीत एक नवीन रस्त्याचा शोध घेताना अचानक एक कार माझ्याशेजारून गेली ती थोडी पुढे जाऊन थांबली आणि पुन्हा मागे येऊन माझ्या शेजारी थांबली आणि त्यातून एक मध्यमवयीन स्त्री उतरली. तिच्या चेहऱ्या आणि पेहेरावावरून ती भारतीयच आहे हे समजले त्यामुळे कदाचित मी पण भारतीय म्हणून ती उतरली असावी अशी माझी समजूत झाली. नेहमी अमेरिकन करतात तसे अभिवादन "हाय हेल्लो"झाल्यावर तिने प्रथम मी गुजराती आहे का याची चौकशी केली आणि मी नाही म्हटल्यावर इंग्रजी भाषेत बोलायला सुरवात केली, आणि म्हणाली "Sir I have a good news for you! "

मी एकदम आश्चर्यचकित झालो कारण या परक्या देशातच काय भारतात देखील मला एकादी चांगली बातमी घरातल्या लोकांकडून किंवा फार झाले तर मित्राकडून ई मेलने, पत्राने अथवा दूरध्वनीवरून कळण्याची शक्यता होती पण ही परकी बाई अचानक गूड न्यूज देते म्हणजे फारच झाले. कदाचित हा जाहिरातीचा प्रकार असावा असेही वाटले कारण भारतात असतानासुद्धा बऱ्याच वेळा असे फोन येत, " You have been selected by our company " अशा थापा मारून फोन घेणाऱ्याकडून पैसे उकळण्याचे बरेच प्रकार होत असतात असाच हा प्रकार असावा असे वाटले. पण तिने एक पुस्तकाचे पान उघडून मला वाचायला सांगितले तिने अशी माझी वाचनाची चाचणी घ्यायचे कारण मला समजेना पण त्यावेळी मी चष्मा घातला नसल्यामुळे मला वाचता येणार नाही अशी असमर्थता व्यक्त केल्यावर तिनेच वाचायला सुरवात केली आणि मग माझ्या डोक्यात प्रकाश पडला की ते "येशूचे शुभवर्तमान "होते. मग मीही तिला मला न समजलेले, ब्रह्म, निर्वाण, नियति वगैरे गोष्टी सांगायला सुरवात केली. त्यामुळे हा आपल्यापेक्षही वरचढ दिसतोय असे वाटून माझा नाद सोडून परत आपल्या गाडीत बसून पुढे जाणे पसंत केले. अश्या रितीने मी तिच्या तावडीतून सुटका करून घेतली आणि अशी कार आपल्याकडे परत येताना दिसली

तर तिच्यापासून पळ कसा काढायचा याची मनात आखणी करून ठेवली. त्यामुळे मदर तेरेसाच्या आत्म्यास जरा वाईट वाटले असण्याची शक्यता होती.

यावेळी आम्ही मार्चमध्ये आल्यामुळे आमचा मुक्काम सेप्टेंबरमध्येच संपला. आम्हाला हुबळीकर कुलकर्णी मुक्काम वाढवण्याचा आग्रह करत होते पण शक्यतो गोष्टी यदृच्छया घडतील तशा घडू देणे इष्ट असे मला वाटत असल्यामुळे ज्या तारखेची मोहर इमिग्रेशन अधिकाऱ्याने उमटवली होती त्याच्या आठ दिवस अगोदरच आम्ही निघायचे ठरवले. शिवाय भारतात जाऊन नवरात्र पार पाडण्याची निकड सौभाग्यवतीला होती त्यामुळे त्या अगोदर निदान आठ दिवसतरी पोचले तर घराची साफसफाई करून नवरात्र व्यवस्थित पार पाडता येईल असा तिचा बेत होता.

त्याप्रमाणे आम्ही १६ सेप्टेंबरला नेवार्क विमानतळावरून संध्याकाळी निघून नेहमीचा एअर इंडियाचा पॅरिसचा थांबा बाहेर न उतरता घेऊन भारतात १७ तारखेच्या रात्री पोचलो तेव्हा १२ वाजून गेले असावेत. कस्टम वाल्यांनी पहिल्यावेळी आम्हाला बॅगा उघडायला लागणारा वेळ पाहिला होता आणि एवढे करून त्यातून काहीच निष्फन्न झाले नव्हते त्यामुळे अशा अनुत्पादक कामात वेळ न घालवण्याचे ठरवून त्यांनी आमची मुळीच दखल

घेतली नाही. आम्हाला न्यायला आमच्या साडूंनी गाडी पाठवली होती आणि चालक मारुती हनुमानाने रामाची वाट पहावी तसा प्रवेशद्वारापाशी आमची वाट पहात असल्यामुळे मुळीच त्रास न होता आम्ही त्यांच्या घरी पोचलो. मुंबईहून एकच दिवस थांबून लगेचच घरी पुण्यास जायचे होते कारण नवरात्र घटस्थापना लगेचच होणार होती त्यामुळे सौ. ला घरी जाण्याची घाई होती. तिने मुंबईहूनच आमच्या कामवालीस फोन करून आमच्या येण्याची वेळ कळवून त्यावेळेस हजर रहाण्याचे आदेश दिले होते.

# ४१. आणि अशुभ वर्तमान

नेहमीप्रमाणे टूरिस्ट टॅक्सी करून २० तारखेस सकाळी आम्ही निघून अगदी वेळेवर म्हणजे दुपारी १२ वाजताच घराच्या दारापाशी पोचलो. इतका सगळा प्रवास कुठलाही अडथळा न येता पार पडल्यामुळे मी आनंदाने घर उघडताउघडता सौ. ला "चला कुठलेही विघ्न न येता सुखरूप घरी पोचलो " असे म्हणालो. हे वाक्य कलीच्या कानावर पडले असावे कारण दार उघडून आत प्रवेश करतो तो काय एकदम नाक बधिर करणारा दुर्गंध नाकात शिरला. त्याचबरोबर घराच्या हॉलमधील पांढऱ्याशूभ्र फरशीवर काळे काळे मध्येच पांढरे पण असे असंख्य डाग पडलेले दिसत होते. हा काय प्रकार आहे काही लक्षात येत नव्हते. टॅक्सीचा चालक आमच्याबरोबर आला होता तो म्हणाला, "बहुतेक कबुतरांनी घाण केलेली दिसते. " पण दारे खिडक्या बंद असताना कबुतरे आत येण्याची शक्यता नव्हती किंवा आमची सदनिका सर्वात वरच्या मजल्यावर नसल्याने छताला भोक पाडून येण्याचीही शक्यता नव्हती. पण तेवढ्यात माझ्या पायाजवळून काहीतरी जोरात सरकत गेले आणि मी उडी मारून खाली पहातो तर एक टोलेजंग उंदीर. आणि मग त्याच्यामागून अनेक उंदरांचे लेंढारच

पळाले. टी. व्ही. आम्ही जाताना त्यावर चादर टाकून झाकून ठेवला होता ती बाजूला करताच त्यातून पाच पंचवीस उंदरांची टोळी बाहेर पडली. आमची कामवाली तिला फोन करून ठेवल्यामुळे बरोबर त्याच वेळी आत आली आणि तिचे स्वागत उंदरांच्या एका टोळीने केले. मी संगणकाच्या कपाटाकडे पाहिले तर त्यात एका मूषक कुटुंबाने वास्तव्य केलेले दिसले. आम्हाला पहाताच त्यांची पळापळ सुरू झाली. स्वयंपाकघरातील कपाटात त्यांच्या अनेक कुटुंबांनी वास्तव्य केले होते. हॉलमधील बिछाइतीचा पुरा निकाल लागलेला होता. सुदैवाने बेडरूमचे दरवाजे बंद होते त्यामुळे त्यांचा मोर्चा तिकडे वळला नव्हता. फ्रीज आम्ही बंद करून ठेवला होता पण मागील कॉंप्रेसर वरील जाळीत काही उंदरांनी बिऱ्हाड थाटले होते.

गाडीच्या चालकाला पैसे देऊन मी वाटेला लावले आणि त्यानंतर मी, सौ. आणि आमची कामवाली अशा तिघा जणांनी प्रथम घरावर धाड घालणाऱ्या सर्व अतिरेक्यांची हकालपट्टी करण्याचे काम सुरू केले. त्यांना दरवाजातून बाहेर काढणे शक्य नव्हते कारण इतरांच्या घरात शिरून त्यांनी त्यांचेही नुकसान केले असते आणि त्यांचे शिव्याशाप आम्हाला मिळाले असते. म्हणून सर्व दारे बंद करून फक्त संडासचा दरवाजा उघडा ठेवून सर्व उंदरांचा शोध व पाठलाग सुरू केला. इतके दिवस घरात राहून

त्यांनी बराच पाहुणचार घेतल्यामुळे अगदी चांगले पोसून ते गलेलठ्ठ झाले असल्यामुळे ते आमच्यावरच हल्ला करतात की काय अशी भीती वाटत असली तरी मोठ्या धाडसाने तिघांनीही हात धुवून त्यांच्या पाठीमागे लागून त्यांना प्रथम घरातून संडासमार्गे बाहेर पाठवले. त्यात आमचे जवळजवळ दोन तास गेले.

त्यानंतर घरात त्यांनी जी घाण करून ठेवली होती त्याची सफाई करण्याचे काम सुरू केले. सगळया घरात एक अतिशय घाणेरडा वास भरून राहिला होता तो कितीही सफाई केली तरी जाणे अवघडच होते. . आमच्या कामवालीला यापूर्वीच्या आमच्या दौऱ्यानंतर ती साफसफाई करायला आली तेव्हा तासाभरात सफाई होते असा अनुभव असल्यामुळे ती बिचारी जेवणही न करता आली होती. आम्ही बरोबर जे खाद्यपदार्थ आणले होते ते त्या दुर्गंधी वातावरणात खाणेही शक्य नव्हते त्यामुळे आम्ही आणि आमच्याबरोबर तीही उपाशी राहूनच संध्याकाळी चार वाजेपर्यंत स्वच्छता करीत राहिलो. मध्ये मी एकदा बाहेरून चहा घेऊन आलो आणि त्या दोघींनाही प्यायला दिला तेवढाच काय तो पोटाला आधार.

संध्याकाळी पाच सहा वाजेपर्यंत आम्ही केवळ आवश्यक तेवढीच सफाई करू शकलो. . टी. व्ही. लावून पाहिला आणि

आश्चर्य म्हणजे तो शाबूत होता. बहुधा दररोज रात्री मूषकसेना कार्यक्रम पहात असावी. फ्रीज वॉशिंग मशीन मी चालू केलेच नाही न जाणो कोठे शॉर्ट सर्किट झाले असेल तर आग लागायची. दुसऱ्या दिवशी आमचे एक माहीतगार तंत्रज्ञ मित्र आले आणि त्यानी पहाणी केल्यावर फ्रीज ठाकठीक आहे असा निर्वाळा दिला आणि मग तो चालू केला. वॉशिंग मशीनची मागील एक दोरी उंदरांनी कुरतडून ठेवली होती ती बदलल्यावर ते चालू झाले.

उंदरांनी संगणकाच्या छपाई यंत्राचा निकाल लावला होता. सगळ्या तारा तोडल्या होत्या. प्रोसेसरची काय गत आहे हे पहाण्यासाठी तज्ञाला बोलावून पाहिले. उंदरांनी सर्व उपकरणांना आपले स्वच्छतागृह बनवले होते तसेच संगणकालाही केल्यामुळे त्याला हात लावायलाच तो तयार होईना. शेवटी तो सुटा करून आम्ही दिल्यावर आपल्या केंद्रात नेऊन पहाण्याचे व दुरुस्त होत असेल तर करण्याचे त्याने मान्य केले.

सुदैवाने मायक्रोवेव्ह ओव्हन व त्यासाठीचा इन्व्हर्टर दोन्ही शाबूत होते. उंदरांनी, हॉल आणि स्वयंपाकघर यामधील विभाजक पडदा आणि खिडक्यांचे पडदे यावर ताव मारला होता त्यामुळे ते ताबडतोड उतरून ठेवणे भाग पडले. त्यानंतर कित्येक दिवस सौ ु ला घरात जेवण जात नव्हते.

खरेतर आम्ही यापूर्वीही एकदा घर पूर्णपणे बंद करून अमेरिकेस सहा महिने गेलो होतो पण त्यावेळी असा प्रकार झाला नव्हता मग याच वेळी असे कसे झाले याचा शोध घेता मध्यंतरी आमची पुतणी जी त्यावेळी पुण्यात शिकत होती. तिच्यासाठी आम्ही किल्ली शेजाऱ्यांकडे ठेवून गेलो होतो ती आपल्या मैत्रिणींना घेऊन एक दिवस आमच्या घरात मुक्कामास होती. त्या मैत्रिणी परत जाताना स्वच्छतागृहाचे दार उघडे राहिले आणि त्यातून या उंदरांनी प्रवेश केला होता असा अंदाज आला. . त्याशिवाय या वेळी पुण्यात पाऊस जोरदार पडला होता आणि आमच्या सदनिकासंकुलाला लागून असलेल्या एका मोठ्या शेताचा ताबा घेऊन तेथे एका नव्या मोठ्या संकुलाचा आरंभ आम्ही अमेरिकेत जायला निघताना झाला होता त्या शेतातील निर्वासित झालेल्या उंदरांपैकी काहीनी आमच्या सदनिकेची निर्वासित छावणी केली होती. त्यांच्या शेतावर आम्ही आक्रमण केल्यावर त्यांना तरी दुसरा काय पर्याय होता? वाघांच्या अरण्यावर माणसाने अतिक्रमण केल्याने तेही आता घरात शिरू लागले आहेतच ना. या अनुभवावरून बोध घेऊन पुढच्यावेळी स्वच्छतागृहाची दारेच काय पण भोकेही बंद ठेवायची आणि तशी सूचना कोणी घरात रहावयास येणार असेल तर त्यांना करायची

दक्षता आम्ही घेऊ लागलो. आमच्या तिसऱ्या वारीची सांगता ही अशी झाली.

# ४२. अग अग म्हशी!

पूर्वीच्या काळी अनेक बाळंतपणाऩा तोंड देणारया स्त्रिया प्रत्येक वेळी आता पुन्हा नको ग बाई म्हणत पुन्हा पुन्हा त्या आपत्तीस तोंड देत, (अर्थात त्या बिचारया त्या आपतीला कारणीभूत नसत.) तशीच काहीशी अवस्था माझी प्रत्येक अमेरिकेच्या खेपेनंतर होते म्हणजे प्रत्येक वेळी मी आता पुन्हा नाही म्हणतो आणि वर्षभरातच पुन्हा "अग अग म्हशी(अर्थात असे कुणाकडे पाहून म्हणायची काय बिशाद आहे!)म्हणत जायच्या तयारीला लागतो. यावेळी मात्र अगदी निक्षून मी तरी जाणार नाही असा कृतनिश्चय जाहीर केला त्याबरोबर "ठीक आहे तर मी एकटीच जाईन? " असा आमच्या झाशीच्या राणीने पुकारा केल्यावर मात्र "अब तेरा क्या होगा काल्या? "असे गब्बरने विचारल्यावर काल्याची जी स्थिती झाली तीच माझी झाली. अर्थात निश्चयाच्या महामेरूपुढे आम्हाला नेहमीप्रमाणे हार खावी लागली. आणि आम्ही आपले ट्रॅव्हल कंपनीला फोन करून तिकिट कुठले उपलब्ध आहे याचा शोध घेऊ लागलो. मात्र सध्या फारच गर्दी आहे कारण अमेरिकेहून आलेले सगळे लोक ऑगस्ट महिन्यातच परततात शिवाय सेप्टेंबरमध्ये शाळा कोलेजे उघड़त

असल्याने विद्यार्थ्यांचीही गर्दी असते असे कळल्यावर कदाचित तिकिटच न मिळाल्याने जाणे रहित होईल अशी आशा वाटू लागली पण प्रवासी कंपनीलाही माझ्यापेक्षा सौ, चीच काळजी जास्त असल्याने त्यानी जमवाजमव करून आम्हाला १० ओगस्टच्या डेल्टा विमानकंपनीचे तिकिट उपलब्ध करून दिलच आणि मग रड़तराव घोड्यावर बसायला निघाले.

ठरल्याप्रमाणे नऊ ओगस्टला दुपारी चार वाजता आम्ही एडिसनला प्रयाण करण्यासाठी घरातून केके ट्रॅवेल्सच्या गाडीतून निघालो. यावेळी आमचे चिरंजीव व सूनबाई आणि नातवंडेही घरात असल्याने गॅस, विजेचा मेनस्वीच व सगळयात शेवटी घराचे दार नीट बंद केले की नाही याविषयी दक्ष राहूनही शेवटी खरोखरच आपण बंद केले की नाही याविषयी एकमेकावर संशय व्यक्त करण्याचा त्रास वाचला. आणखी दोन प्रवासी आमच्याच गाडीतून मुंबई हवाई अड्डयावर यायचे होते त्या बाजूला गेल्यावर त्या घराकडे जाणारा रस्ता बंद होता असे कळले त्यामुळे चालकाला आजूबाजूच्या लोकांच्या शिव्या खात गाडी रस्त्यावर उभी करावी लागली. थोड्या वेळात त्या घरातील गृहस्थ कुठुनतरी येऊन उभे राहिले व त्यांच्या दिग्दर्शनाखाली गाडी घराजवळ नेता आली. सुदैवाने सामान बाहेर काढून प्रवासी ललना आपल्या छकुल्यासह बाहेरच उभी होती. आम्हाला दिग्दर्शन करणारे गृहस्थ तिचे सासरे

असावेत तेही तिला व नातवाला सोडायला येणार होते. थोडावेळ निरोपसमारंभ होऊन गाडी रस्त्याला लागली.

आम्ही घरातून निघताना छत्री घ्यावी की नको या विषयावर चर्चा झालीच होती कारण पुण्यात मधूनमधून पाऊस चालू होता व मुंबईत असेलच असे वाटत होते. पण त्याचबरोबर एडिसनला मुलाकडे अनेक छत्र्या असताना आणखी एका छत्रीचे ओझे कशाला न्यायचे हा दुसराही विचार होता. छत्री घेण्याची कल्पना माझी होती पण तिचे ओझे होईल असे मलाच वाटत होते तरीही नेहमीप्रमाणे निर्णय घेण्याची प्रक्रिया दुसऱ्या पक्षाकडे पक्षी आमच्यातील अधिक व्यवहारचतुर व्यक्तीकडे सोपवण्याची प्रथा पाळून मी गप्प राहिलो. कोथरूड सोडल्यावर पाऊस पडू लागल्यावर मग मला छत्रीची आठवण झाली. व त्यावेळी छत्री घेतली नाही हे माहीत असूनसुद्धा जणू मला हे आताच लक्षात येतय अशा थाटात "शेवटी दोघांच्या ही छत्री घेण्याचे लक्षात राहिलेच नाही की " असे म्हणून मी दोषाच्या अर्ध्या वाट्यातून तरी मुक्तता मिळते का हे पाहिले पण हा प्रयत्न यशस्वी झाला नाही कारण "तुम्ही म्हणत होता म्हणजे घेतलीच असणार म्हणून मी लक्ष दिले नाही " असा प्रतिसाद मिळाल्यावर वाल्याकोळयाचीच गत माझी झाली. शिवाय कधी नव्हे ते एक काम तुमच्यावर सोपवले तर तेवढेही धड करता येत नाही ना? या मुद्रेने माझ्याकडे दृष्टिक्षेप

टाकण्यात आल्यावर बाहेर पडणारया पावसाच्या पाण्यात बुडून जायचेच काय तो मी बाकी राहीलो. चुल्लूभर पानीमे डूब मरना म्हणजे काय ते अशा वेळी कळते.

यानंतर मुंबई विमानपत्तनवर पाऊस आला आणि आमच्यावर भिजण्याची पाळी आली तर माझी काय दशा होईल याची कल्पनाही करण्याचे धाडस मी केले नाही कारण अशा कल्पना करणे हा माझ्या हातचा मळ आहे. आणि त्या कल्पनानी बेचैन होऊन उगीचच समोर आलेला गोड घासही कडू होऊन जातो. उदा. ऍम्स्टरडॅम ला पोचेपर्यंत आपल्याला पुढचे विमान पकड़ता येईल की नाही ही काळजी मला कुरतडत असते, (जणू काही विमान पकड़णे म्हणजे आगगाडीच पकड़णे आहे,) तर तेथे चांगला तीन तास बसून कंटाळून विमानात चढल्यावर आता नेवार्क विमानतळावर आपल्या हाताच्या बोटांचे ठसे जुळतील की नाही की तेथूनच आपल्याला परत हाकलून देतील अशा चिंतेचा भुंगा मला कुरतडून टाकत असतो. कारण अशा गोष्टी आमच्या काही परिचितां (इतकेच काय पण जोर्ज फर्नांडिस, शाहरुख खान अशा महनीय व्यक्तींच्याही)बाबतीत घडलेल्या त्यानीच (म्ह. परिचितानी, फर्नांडिस व शाहरुख खान यानी नाही)केव्हातरी कानावर घातलेले असते.

गाडी जरा पुढे गेल्यावर चालकाने महामार्गावर आंदोलन चालू आहे आणि त्यात गोळी बार झाला चार लोक मेले असे सांगून आमच्या सगळयांची झोप उडवली. आता आपण मुंबईलाच पोचतो की नाही अशी सगळयांना भीती वाटू लागली सुदैवाने तसे काही झाले नाही. शीवच्यापुढे मुंबईची वाहतूक अतिशय संथ गतीने चालू झाली. आम्ही पहाटे एकच्या उड्डाणासाठी इतक्या लवकर म्हणजे दुपारी चार वाजता म्हणजे तब्बल नऊ तास अगोदर निघाल्याबद्दल आम्हाला हसणाऱ्या लोकानी(हो वाटेत आमच्या मेहुणीचा फोन आला होता आणि आम्ही इतक्या लवकर निघालयाबद्दल तिने आम्हाला अगदी वेड्यातच काढले होते) वाहतुकीचा तो वेग पाहून उलट आम्हाला शाबासकीच दिली असती. त्यामुळे आम्हाला विमानतळावर आत प्रवेश न मिळता काही काल बाहेरच थांबावे लागेल हा आमचा अंदाजही खोटा ठरला.

गाडीतून सामान काढून ढकल गाडी म्ह. ट्रॉली वर लादून थोडावेळ प्रतीक्षा कक्षात बसण्याचा विचार आम्ही करत होतो कारण मागील वेळेचा अनुभव तसा होता व पहाटे एकच्या उडदाणासाठी रात्री दहा वाजण्यापूर्वी आत सोडणार नाहीत असा सर्वांचा इशारा होता. आमच्या डेल्टा विमानकंपनीचे नाव कोणत्याच द्वारावर नव्हते पण विमानतळावर शिरताना रस्त्यावर

लावलेल्या एका फलकावर द्वार क्रमांक ८ असे लिहिलेले आमच्या बरोबरच्या तीक्ष्ण नजरानी पाहिले होते. आमच्या बरोबरच्या सहप्रवासिनीला लुफ्तांसा विमानाने जायचे होते व तिचा द्वार क्रमांक ६ होता पण त्याचबरोबर चालकाने ढकलगाड्या ८व्या द्वाराजवळ आहेत हे हेरल्यामुळे गाडी त्या द्वारावर थांबवली व तातडीने जाऊन आमच्यासाठी दोन व आमच्या सहप्रवासिनीसाठी एक ढ. गाडी आणली व आमचे सामान केकेच्या गाडी बाहेर काढून त्यावर लादले.

आता आमचा स्वतंत्र प्रवास सुरू झाला. ८ क्रमांकाच्या द्वारावर चौकशी करता डेल्टा विमानासेवेसाठी तेच द्वार होते असे द्वार पालानी सांगितले एवढेच नव्हे तर आतापासूनच आत सोडण्याचीही तयारी दाखवली त्यामुळे आमचा बरोबर आणलेले खाद्यपदार्थ खाऊन मग आत शिरण्याचा बेत बारगळला व आम्ही लगेचच पासपोर्ट व तिकिटे फडकवत आत शिरलो. मुंबई हवाई अड्डयात आमच्या पहिल्या म्हणजे २००२ च्या उड्डाणा नंतर बराच चांगला बदल होत जात आहे असे जाणवले यावेली तर प्रवेशद्वारातून आत शिरल्यावर समोर स्वयंचलित दार आम्हास पाहून उघडताना पाहून खरोखरच दर्जा सुधारत असल्याची जाणीव झाली.

आपोआप उघडलेल्या दरवाजातून सामानासह प्रवेश केल्यावर लगेचच डावीकडे डेल्टा विमानकंपनीचा फलक दिसला व तेथून आत शिरल्यावर तर आश्चर्याने आणखीनच थकक होण्याची पाळी आमच्यावर आली कारण एका सुटाबुटातील कर्मचाऱ्याने Welcome Mr. and Mrs. Kulkarni" असे आमचे स्वागत केले. आमची सौभाग्यवती तर आपली व आपल्या नवऱ्याची ख्याती इथपर्यंत पोचल्याचे पाहून इतकी प्रभावित झाली की थोडावेळ काय बोलावे तिला सुचेचना. खरतर ती घरात जा. जा. (जानकी जासूस) म्हणून प्रसिद्ध होती कारण आमच्या मुलानी किंवा मीही एकादी गोष्ट कितीही तिला नकळत केलेली असली(मुलांच्या बाबतीत म्हणजे चोरून वस्तू खाणे किंवा माझ्या बाबतीत चुकून माकून मी तिच्या अनुपस्थितीत चहा करून घेण्याचा प्रयत्न केल्यास दुधाचे भांडे सांडून ते परत जसेच्या तसे ठेवण्याचा प्रयत्न करणे वगैरे) तरी ती त्यांची चोरी पकडायचीच अशी जिची ख्याती तिला इतके प्रभावित झालेले पाहून अर्थातच तो कर्मचारी प्रसन्न झालाच कारण तिने आपले आश्चर्य गुप्त न ठेवता " आपको कैसे पता चल गया " असा सवाल करून झाकली मूठ सव्वालाखाची ठेवण्याचे आपले नेहमीचे कसब दाखवले नाही मग तर आणखीच उत्तेजित होऊन त्या कर्मचाऱ्याने "फ्रॉम पुणे ' असे म्हणून तिला अधिकच चकित केले. तोपर्यंत त्याचा सहकारी पुढे

आला व त्यानेही "अब्दुल्लाको सब जानकारी रखनी पड़ती है "असे म्हणून तिला आणखीच कोडयात टाकले. मग मात्र थोडावेळ जाऊ देऊन त्यानी शेरलोक होम्सप्रमाणेच "Its very simple तुमच्या बॅगेवर एवढ्या मोठ्या अक्षरात तुमचे नाव व पत्ता लिहिला आहे की फक्त आंधळ्याला किंवा निरक्षर माणसालाच काय ते तुम्ही कोण हे कळणार नाही " असे म्हणून तिला आपले गुपित उघड करीत जमिनीवर आणले.

तरी डेल्टा विमानकंपनीने इतर कंपन्यांच्या पार्श्वभूमीवर आम्हाला प्रभावित केले यात वादच नाही, कारण त्यापुढे अब्दुल्लानेच प्रथेनुसार आम्ही कोणी इतरांचे सामान आपल्या बेगेत घेतले नाही ना व बेगा इतर कोणाच्या हवाली केल्या नव्हत्या ना हे आमच्या बेगेत बोंब वगैरे नाही याची खात्री करून घेण्यासाठी विचारले. इतर बऱ्याच कंपन्या आता एकच बॅग न्यायला मोकळीक देत असताना डेल्टा विमानसेवेत प्रत्येकी २३ किलो वजनाच्या २ बॅगा नेण्याची परवानगी अजूनही आहे हे विशेष आणि त्यावरही कड़ी म्हणजे आमची एक केबीन बॅगसुद्धा विमानात ती ठेवायला कदाचित अडचण होईळ म्हणून चेक इन बॅगा बरोबरच पाठवायचा सल्ला त्याने दिला, आम्हीही तो मानला, तोवर आमचे सामान विमानकर्मचारी एका कौंटरवर घेऊन गेलाही, तिकिट काढताना आम्हाला जे बैठक क्रमांक दिले होते तेच

आम्हाला देण्यात आले. आरक्षण करताना आम्ही व्हील चेअर मागितली होती पण मला ते फारसे आवडत नव्हते म्हणून ती न घेण्याचा मी निर्णय घेतला होता पण कौंटरवरील युवतीने मात्र तुम्ही मागितली आहे तर घ्याच असा आग्रह धरला व मी आढ़ेवेढ़े घेतले तरी तिने बळेबळे मला खुर्चीत बसवलेच, नंतर मात्र ही गोष्ट फायदेशीर झाली असे दिसले कारण इमिग्रेशनसाठी बरीच मोठी रांग होती पण आमच्या खुर्चीचालकाने शिवाजीच्या मावळयाच्या थाटात आम्हास एकदम रांगेच्या पुढे नेऊन इमिग्रेशानाधिकाऱ्याच्या पुढ्यातच नेऊन सोडेले. त्या माणसाने आमचे कागदपत्र पाहून उगीचच काहीतरी विचारायचे म्हणून मागच्या वेळी भारतात परत येताना कोणत्या विमानसेवेने व कोणत्या क्रमांकाच्या विमानाने आला होता असे विचारले कदाचित आमच्या खुर्ची चालकाने फारच चपळाईने आम्हाला त्याच्या पुढ्यात आणून उभे केल्याच्या धक्क्यने तोच गांगरून गेला असावा! अर्थात मला ते आठवत नव्हते व तसे मी कबूल केले व असे पूर्वी विचारत नव्हते असेही त्याला सांगितले तर आता त्याची आवश्यकता आहे म्हणून त्याने आम्हाला सोडून दिले. (पण नंतर कधी हा प्रश्न अम्हास विचारला गेला नाही) त्यावेली पु. ल. देशपांडे यानी तिकिट जपून ठेवायला सांगणाऱ्या कंडकटऱला जे

उत्तर दिले ते देण्याचा मोह मी टाळला कारण त्या अधिकारयाला तेवढी विनोदबुद्धी नसली तर उगीचच आम्हाला अडकवायचा.

खुर्ची चालकाने मग आम्हास आमच्या जवळील सामान व आमची खुर्ची screening करण्याच्या रांगेत नेले तेथेही खुर्चीवर बसण्याचा फायदा मिळून आमच्याबरोबर असलेले खाद्यपेयही चाळणी तून सुखरूप आत पोचले व त्यापाठोपाठ आम्हीही, या वेळी आमच्या सामानातून वा आमच्या शारीरिक तपासणीतून काहीच निष्पन्न झाले नाही व त्यानंतर एकदम आमच्या प्रवेशद्वारा शीच चालकाने आम्हास नेऊन सोडले, त्यावेली १२ ही वाजले नव्हते त्यामुळे आम्हाला अगदी आरामात खाद्यपेयाचा समाचार घेता आला शिवाय खुर्चीचालक तुम्हाला आत सोडायला परत येतो असे सांगून गेला त्याने आणखी काही प्रवाशांचाही भार घेतला होता. . १-१० ची वेळ विमान सुटण्याची होती व तसे ते सुटलेही! आता जरा झोप घ्यावी असा विचार होता कारण दिवसभर झोप घेणे जमले नव्हते पण त्या आडवेळीसुद्धा डेल्टा विमानसेवा आपल्या आदरातिथ्यपरंपरेत खंड पडू द्यायला तयार नव्हती आणि त्यानी तशाही वेळी अगदी यथासांग आम्हाला शाकाहारी व इतरांना सामिष जेवणाचा घाट घातलाच त्यामुळे नुकताच घरातून आणलेल्या धपाटयां चा आस्वाद घेतला असून

या जेवणास तोंड द्यावे लागलेच अर्थात मला जमला तेवढाच त्या भोजनास मी न्याय दिला.

त्यानंतर मात्र मी थोडीफार झोप घेण्याचा प्रयत्न केला. नेवार्कच्या या प्रवासात एक थांबा ॲमस्टरडॅमचा होता. तेथे उतरण्या पूर्वीही पुन्हा एकदा खानपानाचा लाभ घ्यावा लागला. आरक्षणाच्या वेळी येथे अगदी मामूली थोड़ा वेळ थांबेल असे सांगितले गेले होते प्रत्यक्षात मात्र तेथे तब्बल तीन तासांचा मुक्काम होता. येथे आमचे विमानतळावर उतरण्याचे द्वार क्र. ६ व परत चढ़ावयाचे द्वार क्र. ३ यात अंतर अगदीच कमी असल्याने मी खुर्ची न घेता चालत जाणेच पसंत केले. तीन तास बाहेर बसल्यावर आत सोडल्यावर पुन्हा एकदा तपासणीला तोंड द्यावे लागले. खरे तर विमानतळ सोडत नसताना अशी पुन्हा पुन्हा तपासणी करण्याचे काय कारण असते ते कळत नाही, अर्थात त्यांचीही काही कारणे असतील विमानतळ बराच मीठा आहे म्हणे पण त्याच्या विस्ताराची कल्पना येण्यासाठी फिरण्याचे बळ व कारण दोंहींचा अभाव असल्याने एवढ्या माहितीवरच समाधान मानावे लागले. विमानतळावर बराच वेळ बसल्यामुले की काय बरेच ताजेतवाने झाल्यामुळे पुढील वेळ बरा गेला त्यातही दोनदा खानपान झालेच. यावेळी बसल्यावर लगेचच अमेरिकेच्या इमिग्रेशन विभागात द्यायचे फॉर्म्स दिले व ते नंतर चुका होतात म्हणून मी शांतपणे भरले.

तरी एक चूक झाली होती पण मागच्या वेळी जेटच्या कर्मचाऱ्याने एकादी चूक किंवा खाडाखोड चालते असे सांगितले होते म्हणून दुसरा फ़ॉर्म न घेता गप्प बसलो. पुढचा टप्पाही नऊ तासांचा होता व तोही शेवटीशेवटी घड्याळाकडे पाहत संपवला. म्हणजे तो संपला त्यासाठी आम्हाला बसून राहण्यापलिकडे काही करावे लागले नाही.

आता मात्र खरच नेवार्क आलं  तेव्हा आता उतरायचं. येथे मी काही चाकाची खुर्ची घ्यायची नाही असे ठरवले. इमिग्रेशनची राँग बरीच लांब असली तरी खूपच कौंटर्स असल्यामुळे फारसा वेळ लागला नाही. सुदैवाने आमचे बोटाचे ठसे जुळले. मात्र आम्ही सहा महीने राहणार म्हटल्यावर समोरील आफ्रोअमेरिकन युवतीने आमचे टिकिट पाहण्यास मागितले व आम्ही खरच पाच महिन्यातच परत जाणार आहोत हे पाहून सहा महिन्याचा शिक्का मारून दिला, आता एकच काम राहिले होते ते म्हणजे सामान ताब्यात घेणे व नंतर तपासणी फारशी न होता बाहेर पड़णे. त्यासाठी अगोदर ट्रॉली घेणे आलेच. दोन ट्रोल्या घेण्यासाठी सहा डॉलर्स आम्ही घट्ट मुठीत धरून ठेवले होते. तेथे पोचल्यावर आम्ही तीन डॉलर्स मशीनच्या आत सरकावले पण ट्रोली काही निघता निघेना तेव्हां तेथील माणसाने अजून दोन, अजून दोन असे म्हटले पण आमच्या डोक्यात तीनचा आकडा इतका घट्ट बसला होता की तो

आम्ही पुन्हा पुन्हा तीच ट्रोली सोडवायचा प्रयत्न करू लागल्यावर त्याने त्या मशीनवर लावलेली पाटी दाखवली त्यावर एका ट्रॉलीला पाच डॉलर असे लिहिलेले पाहिल्यावर कुठे आमच्या हातून आणखी दोन डॉलर्स सुटले.

अमेरिकेची आर्थिक स्थिती बिघडल्याचे कानावर आले होते पण ओबामाना इतके दात कोरून पोट भरावे लागेल असे वाटले नव्हते मग त्यावर मात म्हणून आम्ही एकाच ट्रॉलीवर भागवून ओबामाचेच एक डॉलरचे नुकसान करण्याचा निर्णय घेतला. सामानाचे पट्टे फिरत होते तेथे पोचलो पण डेल्टाचा पट्टा कोठेच दिसेना, तो पट्टा बराच दूर होता व विचारत विचारतच तिकडे पोचावे लागले सुदैवाने आमच्याच बॅगा आशाळभूतपणे आमची वाट पाहत त्यावर फिरत होत्या, त्यावर आपल्या छाव्याना पाहिल्यावर झडप टाकणाऱ्या वाघिणीच्या आवेशात सौ. ऩे झेप घेतली. सामान ताब्यात घेतले व अर्थातच एका ट्रॉलीवर लादून मला एकट्यालाच ढकलावे लागले. कारण मी एक डॉलर वाचवला होता ना! पण फारसा त्रास न होता आम्हाला सरळ बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला बाहेर चिरंजीव आमची वाट पाहत उभा होतेच तेथून पुढे काय करायचे याविषयी विचार करण्याचे मी सोडून दिले

# ४३. करायला गेलो गणपती

"व्हेन इन रोम बिहेव लाइक रोमन" असे म्हणतात. पण आपण भारतीय मात्र कुठंही गेलो तरी आपला भारतीय बाणा सोडत नाही. उलट दुसरीकडे गेल्यावर तर त्याला आपण अधिकच जपतो. आणि अमेरिकेत तर आपला तो हक्कच आहे कारण कोलंबस जरी अमेरिकेला आला तरी आपण इंडियातच आलो असेच तो अगदी मरेपर्यंत समजत होता.

त्यामुळे आमच्या घरातील गौरी गणपती व नवरात्र हे कुळाचार बंद पडता उपयोगाचे नाही असे हे घरातल्या (खरं तर पूर्वीचा कर्ता पुरुष हा वाक्प्रचार आता बदलायला हवा) कर्त्या स्त्रीने ठाम ठरवल्यावर व दोन मुलांना ते अमेरिकेत असोत वा जगाच्या पाठीवर कोठेही असोत प्रत्येकी एक कुळाचार चालू ठेवला पाहिजे असा दम भरल्यावर काय बिशाद आहे मुलांची आणि सुनांची त्यावर काही हरकत घेण्याची! बिचारे निमूटपणे आईची आज्ञा पाळतात, बापाचा आदर्श आहे ना त्यांच्यासमोर. ! आणि ज्या सुनेकडे गौरीगणपतीच्या सणाची जबाबदारी तिने सोपवली होती तिलाच तिने गणपती बनवावा लागेल असे बजावले होते. पहिल्या वर्षी दोन्ही सुनांनी गणपती बनवण्याचा प्रयत्न केला त्या परीक्षेत

त्या पासही झाल्या. त्यामुळे त्यांनी हातानेच गणपती बनवावा व त्याचेच विसर्जन करावे व एक मोठा गणपती विसर्जन न करता घरात राहू द्यावा असे ठरले व या आदेशाचीच अंमलबजावणी दोन तीन वर्षे करण्यात आली. त्यासाठी भारतीय मातीच वापरण्याचा आग्रह असल्याने प्रत्येक वेळी अमेरिकेत जाताना इतर वस्तूंबरोबर मातीचीही एक पुरचुंडी असते.

आम्ही अमेरिकेत आल्यामुळे या वेळच्या गौरी गणपतीच्या सणाचा ताबा अर्थातच कर्त्या स्त्रीकडेच असणार होता त्यामुळे भारतातून निघतानाच इतर गोष्टींबरोबरच अमेरिकेत गणेशमूर्ती बनवण्याची जय्यत तयारी तिने केली होती. निघतानाच पुण्यात गणपती बनवणाऱ्या काही लोकांना गाठून कोठल्या प्रकारची माती ते वापरतात याची केवळ माहितीच नव्हे तर साच्यातील गणपती बनवणाऱ्यांना तिने कसे पटवले कोणास माहीत पण एक साचाही तिने पैदा केला. मातीचेही दोन प्रकार एक लवकर घट्ट होणारी तर दुसरी जरा वेळ घेणारी तिने बरोबर घेतले. अशा जय्यत तयारीनिशी आलेल्या तिच्या जय्यत तयारीकडे पाहून व त्यातही गणपतीचा साचा आणला हे पाहून मलाही जरा या उत्सवात आपलाही हातभार लागावा अशी बुद्धी गणरायाने दिली मला माझ्या बालपणीच्या कसबाची आठवण झाली व मी साच्यातील का होईना गणपती बनवण्याचा निश्चय जाहीर केला.

माझ्या या निर्णयावर कोणत्याच दिशेने कोणतीच प्रतिक्रिया न आल्याने मी जरा बुचकळ्यात पडलो. कारण "राहू दे की उगीच कशाला त्रास करून घेता तुमची सूनबाईच करेल" असा अभिप्राय मुलाकडून किंवा "लहानपणी तुम्ही केलेले गणपती लावलिजाव असायचे असे तुमच्याच आईसाहेब म्हणायच्या ना?" असा प्रतिसाद अपेक्षित दिशेने न आल्याने मी जरा हिरमुसलोही कारण नियोजित कार्याला विरोध झाल्यावर कार्यपूर्तीचा जो आनंद मिळतो तो काही औरच! .

सौ चा लावलिजाव हा शेरा खरं तर आमच्या मातोश्रींचा होता. आमच्या मातोश्रींचा सुनेवर इतका विश्वास की आमच्या लग्नानंतर तिने मी आता चुलीपाशी फिरकणारही नाही फक्त बाहेर बसून मुले सांभाळीन असे सांगितलेच पण इतर स्त्रिया "मेरे बनेकी बात ना पूछो मेरा बना हरियाला है "असे आपल्या कुलदीपकाचे कौतुक करतात तर हिने मात्र कौतुकानेच पण आपल्या मुलाचे सगळे दोषसुद्धा किंवा मुख्यत्वे दोषच अगदी तिखटमीठ लावून सुनेच्या कानावर घातले. आणि त्यामुळे बायकोच्या कोणत्याही दोषावर बोलण्याचा कसला हक्क तर मला उरलाच नाही पण वेळोवेळी "हो माहीत आहे तुमच्या आईनेच सांगितले"असे म्हणून मला डिवचण्याची एकही संधी ती दवडत नसे. या बाबतीत तिची स्मरणशक्ती इतकी तीव्र की माझ्याच आईने मला सांगितलेल्या

गोष्टीही माझ्यापेक्षा तीच अधिक अधिकारवाणीने सांगू लागली. त्यातच हा लावलिजाव गणपतीचा प्रकार!

इतर मुलांप्रमाणे मीही गणपती बनवावा अशी आईची इच्छा असे या बाबतीत (केवळ माझे नावच श्याम म्हणून नाही) तर अगदी खऱ्या अर्थाने ती श्यामची आई शोभत होती. त्यामुळे रडत खडत का होईना तिची ही इच्छा पुरी करण्याचे मी मनावर घेई. श्रावण निम्मा संपला की या कामा मागे मला लागावे लागे. आमच्या गावाबाहेर एक माळ होता त्यावर शाडूच्या मातीचा एक बराच मोठा पट्टा होता. तेथे जाऊन शाडू आणणे हा या कार्यक्रमाचा पहिला भाग असे नुकताच पाऊस पडून गेलेला असल्यामुळे गावाबाहेरचा तो रस्ता चिखलाने भरलेला तर असेच पण त्याचबरोबर शाडूचा पट्टा तर अगदी डिंक घातल्यासारखा चिकट असे त्यातून मातीचा गणपती तयार होईल इतक्या प्रमाणात शाडू गोळा करणे हे मोठ्या कसबाचेच काम असे. त्या चिखलातून चालून शाडू गोळा करून परत येईपर्यंत माझ्या अंगावर चढलेल्या शाडू व चिखलाच्या लेपामुळे माझाच जणू गणपती झालेला असे. शाडू घराच्या मागे व्यवस्थित ठेवल्यावर या कामातील पहिला हप्ता पार पडायचा.

यानंतरचा दुसरा हप्ता म्हणजे ती मूर्ती तयार करण्यासाठी त्यात कापूस मिसळून ती माती कुटणे हा भाग तितकाच महत्त्वाचा असे कारण मातीत कापूस जितका एकजीव होत असे तेवढीच मूर्ती एकसंघ होण्याची शक्यता वाढत असे. नाहीतर मूर्तीचे अवयव एकमेकांशी सहकार्य करीत नसत व त्यातल्या त्यात सोंड व हात मूळ शरीरापासून अलग होऊन पुन्हा त्यांना एकत्र आणणे अवघड होत असे. माती कुटण्याचा माझा आळस नेहमीच माझ्या मूर्तीच्या कारागिरीत आडवा येत असे. आणि कितीही प्रयत्न केले तरी मूर्तीचे हात व सोंड अलग होऊन खाली लोळण घेत. आई माझ्या गणपतीला लावलिजाव गणपती म्हणे. कारण तुटलेले अवयव मी धातूच्या तारा वापरून जोडून ते पुन्हा एकमेकापासून फारकत घेणार नाहीत असा प्रयत्न करत असे व या प्रयत्नास दाद न देता ते पुन्हा पुन्हा खाली लोळण घेत. गणपती लावलिजाव असल्यामुळे त्याचे हात पाय विशेषतः सोंड कोणत्याही क्षणी शंकरांची वाट न पाहता आपोआपच तुटण्याची शक्यता जमेस धरून माझे वडील एक चांगली मूर्तीही विकत आणत व प्रतिष्ठापना त्याच मूर्तीची करत.

अशा प्रकारे माझ्या लावलिजाव गणपतीचीच प्रसिद्धी जास्त झालेली असल्यामुळे कदाचित माझा हा निर्णय नेहमीप्रमाणेच अल्पकालीनच ठरेल याची सर्वांनाच खात्री असावी. पण जेवण झाल्यावर खरोखरच मी साचा घेऊन बसल्यावर निमूटपणे

सौभाग्यवतीने मातीचे तीन पुडे माझ्यासमोर आणून ठेवले. त्या सगळ्या मातीचे गणपती बनवले असते तर बहुतेक अख्ख्या अमेरिकेला नाहीतरी एडिसनला तरी गणपतींचा पुरवठा करण्याइतके गणपती तयार झाले असते. त्या पुड्यातील मातींचे वेगवेगळे प्रकार होते म्हणे. एक माती ताबडतोब घट्ट होत असे तर दुसरी घट्ट होण्यास बराच वेळ घेते तर तिसरी या दोहींच्या मिश्रणाने तयार झालेली कारण दोन्ही पुडकी फुटल्यामुळे त्यातून जी माती गळाली त्या दोन्हींच्या एकत्रीकरणाने हे पुडके बनले आहे अशी माहिती मला देण्यात आली. त्यामुळे त्यातील कोणती माती वापरावी हाच मला प्रश्न पडला. कारण दुसऱ्या दिवशीपर्यंत गणपती वाळणे आवश्यक होते. शिवाय जिने हा सगळा प्रपंच केला होता तिच्याही लक्षात त्यातली कोणती माती लवकर घट्ट होते ही गोष्ट नव्हती. तेव्हा मी अंदाजाने एक पुडा वापरण्याचे ठरवले.

सौने आणलेला साचा रबरी होता व तो एका बाजूने पेटीसारखा उघडता येत होता. तो बंद करून माती अगदी सरसरीत पातळ करून त्यात खालच्या बाजूने ओतायची व त्यावर दाब देण्यासाठी त्याचबरोबर दिलेले लाकडी तुकडे त्यावर दाबून वरून घट्ट सुतळीने बांधून ठेवायचे की दोन तासात ती माती घट्ट होते व साचा उघडून गणपती बाहेर काढता येतो अशी माहिती मला देण्यात आली.

माती अगदी पातळ करून ती साच्यात ओतण्याचीच आज्ञा श्रीमतीजींनी केली होती तरीही मातीच्या घट्ट होण्याच्या गुणधर्माविषयी मी जरा साशंक होतो त्यामुळे ती साच्यात भरणे शक्य व्हावे इतपतच पाणी त्यात टाकून साच्याच्या खालच्या भागातून मी साच्यात भरून तो अगदी शिगिशीग भरल्याची खात्री करून साच्यावरील लाकडी आवरणाचे तुकडे ठेवून सुतळीने ते घट्ट बांधून टाकले. बऱ्याच काळानंतर गणपतीच्या तयारीला हातभार लागल्याच्या आनंदात मी हातावरील मातीचा चिखल धुऊन टाकला. माती विकणाऱ्याने दीड ते दोन तासातच गणपती घट्ट होतो व बाहेर काढता येतो असे सांगितले होते. पण आम्ही उगीच घाई न करण्याचे ठरवून दुसऱ्या दिवशी सकाळीच काढून ताजा ताजा गणपतीच बसवायचा असे ठरवले. या गणपतीस फक्त कपाळावर कुंकुमतिलक तेवढाच काय तो लावायचा बाकी रंगाचे काही कारण नाही मातीचा शुभ्र वर्णच गणपतीस चांगला दिसतो असे अगोदरच ठरले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर अर्थातच गणपतीदर्शनाची उत्कंठा होती. अशी उत्कंठा बरेच दिवसात अनुभवली नव्हती. अर्थात मी उठण्यापूर्वीच आमच्या अपयशावर शिक्का मोर्तब करायला श्रीमतीजी उठल्याच होत्या माझ्या अपयशाविषयी तिला इतकी खात्री कशी होती याचे मला नवल

वाटले नाही कारण तिच्या मते अशी खात्री मला कोणतेही काम सांगताना तिला असेच. पण या वेळचे कारण मला नंतर कळले. ते म्हणजे यावेळी साचेवाल्याने जी माती दीड तासात वाळते अशी खात्री दिली होती त्या मातीचे पुडके मागेच राहिले आणि घट्ट न होणाऱ्या मातीचेच पुडके मला देण्यात आले होते असे नंतर तिच्याकडूनच कळले. त्यामुळे कोणीही गणपती केला असता तरी निर्णय हाच लागणार होता. मात्र सुरवातीला मातीचा गोंधळ झाल्याचे न सांगता तिने निर्विकार मुद्रेने माझा प्रयत्न फसल्याचे माझ्या कानावर घातले "म्हणजे झाले तरी काय?" असे मी विचारल्यावर "गणपती चांगला झाला होता पण पुरेसा वाळला नाही त्यामुळे साच्यातून काढताना काही भाग आतच राहिला "असे उत्तर मिळाल्यावर आपली लावलिजाव गणपतीची परंपरा खंडित न झाल्याचे दुःख मला झाले व त्याचबरोबर आता गणपती कोणता बसवायचा हा प्रश्नही अनुत्तरित राहिला.

तरीही तिच्या मुद्रेवर कुठल्याही प्रकारचे चिंतेचे लक्षण दिसले नाही. त्यामुळे आश्चर्य वाटून मी विचारले "मग आता गणपती कोणता बसवायचा? की पुन्हा दुसऱ्यांदा दुसरी माती वापरून करायचा? ""त्याची काही आवश्यकता नाही. काल तुम्ही गणपती करायला घातला तेव्हाच एक स्टँड बाय गणपती सूनबाईला हाताने बनवायला सांगितला होता मी "असे उत्तर मिळाल्यावर आणि

त्यावर सूनबाईने संगणकीय भाषेत "एक बॅक अप गणपती तयार ठेवला होता"असे असे सांगितलेले ऐकल्यावर माझी काळजी मिटली.

एकूण काय तर "करायला गेला गणपती आणि झाला मारुती " अशी म्हण असली तरी माझ्या हातून मात्र गणपतीच काय पण मारुतीही झाला नाही इतकेच खरे!

परंतु यावेळी या गोष्टीस खरे तर मी जबाबदार नव्हतो व जबाबदार व्यक्तीस तसे म्हणण्याची सोयच नव्हती!

# ४४. आयरिन आणि आम्ही

मराठीत जे आपण सरळ सरळ "आगीतून फुफाट्यात" म्हणून मोकळे होतो त्यासाठी एक मजेशीर सस्कृत श्लोक आहे.

***खल्वाटो दिवसेश्वरस्य किरणै: संतापितो मस्तके***
***वाञ्छंदेशमनातपं विधिवशाद् तालस्य मूलं गतः।***
***तत्राप्येकफलेन मूर्ध्नि पतता भग्नं सशब्दं शिरः***
***प्रायो गच्छति यत्र भाग्यरहितस्तत्रापि यांत्यापदा॥***

एका टकल्याचे उन्हातून चालताना डोके गरम झाले आणि त्यामुळे वैतागून बिचारा जरा थंडावा मिळावा म्हणून समोर दिसलेल्या झाडाखाली सावलीत जावे म्हणून जे झाड निवडतो ते बरोबर नारळाचे झाड निघते आणि तो त्या झाडाखाली जायला आणि वरून एक नारळ सुटून त्याच्याच डोक्यावर पडायला एकच गाठ पडते आणि मग काय झाले असावे याची कल्पना येतेच. थोडक्यात दुर्दैवी माणूस कोठेही गेला तरी आपत्ती त्याची पाठ सोडत नाही हेच खरे. याचाच अनुभव आम्हाला यायचा होता

म्हणायचा. कारण पुण्यात पावसाने धुमाकूळ घातल्यामुळे अमेरिकेत मुलाकडे एडिसनला आल्यावर छान हवा असल्यामुळे बरे वाटले पण दोनच दिवसात आयरीन नावाचे चक्री वादळ (हरिकेन आयरीन) येणार आणि ते काय भयानक प्रलय घडवून आणणार याच्या बातम्या यायला लागल्या आणि पुण्यातच बरे होते अस वाटायला लागल. बरं अमेरिकेतील माहितीचे स्रोत म्ह. दूरदर्शनवाहिन्या इतक्या तत्पर की निरनिराळे नकाशे वगैरे दाखवून आयरीन काय धुमाकूळ घालणार याच्या सांगोपांग चर्चा दाखवायला केव्हांच सुरवात झाली होती. . पूर्वी केव्हां व काय झाले होते आता नागरिकानी काय काळजी घ्यायला पाहिजे व शासन काय काळजी घेत आहे याचे पुन्हा पुन्हा दळण दळले जात होते. हो नाहीतर एकादा वादळानंतर कोर्टात दावा ठोकून शासनाने मला या वादळाची पूर्वकल्पना दिली नाही म्हणून कोट्यावधी डॉलर्सची नुकसान भरपाई मागायचा.

अर्थात केवळ तेवढ्याच कारणाने नव्हे तर खरोखरच शासनास लोकांची काळजी आहे म्हणून हे सगळे चालले आहे असे जाणवत होते कारण ज्या भागातील लोकांना स्थलांतर करावे लागणार होते त्याना अगोदरपासूनच त्यानी कोणत्या ठिकाणी संपर्क साधायचा याची माहिती देण्यात येत होतीं. नाहीतर आपल्याकडे पावसाने रस्ते वाहून पाणी घरात (की घरे पाण्यात?)

शिरू लागल्यावर नागरिकांनी घराबाहेर पडू नये असा इशारा (आणि तोसुद्धा पुणे हवामानखात्याकडून मुंबई अथवा पुणेवासी जनतेच्या जनहितार्थ जारी)दिला की काम भागले (खरे तर नागरिक बाहेर पडूच शकत नाहीत त्यामुळे या इशाऱ्याची आवश्यकता तरी काय?) असा प्रकार नव्हता.

एडिसनमध्ये आम्ही जातो तेव्हां आमच्यासारखेच आपल्या मुलांकडे अथवा मुलींकडे आलेले ज्येष्ठ नागरिक दिसतात व आपोआपच त्यांची मैत्री जमते. अमेरिकेत न्यू जर्सी त्यातल्या त्यात एडिसन म्हणजे मिनि इंडियाच आहे म्हटले तरी चालेल. म्हणजे रस्त्यावर अमेरिकन दिसला तर हा कोण परका आलाय बुवा इथे असे सगळे टवकारून पहायला लागतात. आता तर या भागातली घरे विकून अमेरिकन जायला लागलेत आणि त्यांची घरे घेणारे सगळे भारतीयच आहेत. अमेरिकेत जेवढे भारतीय आहेत त्यात निम्म्याहून अधिक गुजराती आहेत आणि त्यात निम्म्याहून अधिक पटेल आहेत. युगांडामधून इदी अमिनने परदेशी लोकांना पळवून लावले त्यात अंगावरच्या वस्त्रानिशी अमेरिका गाठलेले असे एक पटेल आमच्या गटाला म्होरके म्हणून लाभले होते. अर्थातच अमेरिकनापेक्षाही ते इथल्या परिस्थितीचे अधिक जाणकार होते. त्यामुळे आधल्या दिवशी संध्याकाळी आम्ही एकत्र जमलो

असताना या चक्री वादळास तोंड देण्यासाठी काय काळजी घेणे आवश्यक आहे याविषयी त्यानी बरेच काही आम्हाला सांगितले

हरिकेन हा प्रकार अमेरिकेतल्या लोकांना फारसा नवीन नाही. फ्लोरिडात तर अगदी नियमितपणे अशी चक्री वादळे येतात. फ्लोरिडासारख्या समुद्रकिनाऱ्याच्या भागात त्याची तीव्रता जास्त असते. तेथे तर चक्री वादळ येऊन गेल्यानंतर तेथे वस्ती होती का नव्हती असेच वाटते अशी सगळी माहिती पटेल सांगत होते. ते चाळीसपेक्षाही अधिक वर्षापूर्वी अमेरिकेत आलेल्या भारतीयांपैकी एक होते त्यामुळे आमच्यासारख्या आपल्या सुनांना चार दिवस सासूचे(हे मालिकेसारखे न संपणारे नसतात) काय असतात हे दाखवण्यासाठी येणाऱ्या लोकांना अनुभवामृताचे घुटके पाजणे हे आपले कर्तव्य आहे अशी त्यांची समजूत होती. . आता आपल्याकडेही बरीच मोठी मोठी वादळे येऊन लोकवस्तीस हादरवू लागली आहेत, येवढेच काय दरडी कोसळून गावेच्या गावे गिळू लागली आहेत पण त्या वेळपर्यंत आम्ही अश्या वादळास सरावलेले नव्हतो.

यावेळी जे हरिकेन येऊ घातले होते त्याचे नाव आयरीन असे होते. 'मागे केव्हां तरी आलेल्या हरिकेनला कत्रिना असे नाव होते त्यावरून नटनट्यांची नावे त्यांच्या वादळी व्यक्तिमत्वामुळे

हरिकेनला नावे देत असावेत असा मी अंदाज केला. पण मग. एका हरिकेनचे नाव हिलरी असे (आणि एकाचे बिल सुद्धा) असल्याचे लक्षात आले व आपला तर्क चुकीचा आहे हे ध्यानात आले.

त्यासाठी आंतरजालावर शोध घेता दिसून आले की अगदी सुरवातीच्या काळात अमेरिकेतील हवामानखाते या वादळांना त्यांच्या उत्पत्तिस्थानाच्या अक्षांश रेखांशावरून नावे देत. पण ती किचकट व त्यामुळे समजण्यास अवघड व कधीकधी स्थानबदलामुळे चुकीचीही वाटत त्यामुळे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात लष्करी हवामानतज्ञानी स्त्रियांची नावे वापरण्यास सुरवात केली. आणी ती मात्र समजण्यास व लक्षात राहण्यास (तर फारच) सोपी वाटू लागली त्यामुळे १९५३ पासून अटलांटिक महासागरावर निर्माण होणाऱ्या चक्री वादळांना नावे देण्यास तीच पद्धत वापरण्यात आली आणि या नावांमुळे (सहाजिकच आहे)जनतेचीही या वादळाविषयीची जागृती वाढली. १९७८ पासून पूर्वोत्तर पॅसिफिक महासागरावरील वादळांना नावे देताना मात्र पुरुषांच्यावर अन्याय होत आहे याची जाणीव होऊन पुरुषांचीही नावे देण्यास सुरवात झाली. सम वर्षात म्हणजे (उदाः१९७८) विषम क्रमांकाच्या वादळास पुरुषाचे तर सम क्रमांकाच्या वादळास स्त्रीचे नाव (तर विषम वर्षात याच्या उलटे) देण्याचा प्रघात सुरू झाला.

दर वर्षी नावे देताना इंग्रजी मुळाक्षरांच्या पहिल्या अक्षरापासून सुरवात करतात व प्रत्येक मुळाक्षरापासून सुरू होणारे एक नाव वापरले जाते तरी दर वर्षी जवळजवळ सगळी मुळाक्षरे वापरावी लागतात इतकी वादळे येतात. तरी त्यात अटलांटिक सागरावरील व पॅसिफिक सागरावरील यादी वेगळी केलेली असते. अटलांटिकवरील चक्री वादळांना नावे देण्यासाठी फक्त Q, U, X, Y Z ही पाच अक्षरे तर पॅसिफिकवरील चक्री वादळांसाठी फक्त Q, U, ही फक्त दोनच अक्षरे वापरली गेली नाहीत. म्हणजे प्रत्येक वर्षी अटलांटिकवरून २१ तर पॅसिफिकवरून २४ चक्रिवादळे येतात. या सगळयांना वेगवेगळी नावे देण्यासाठी लागणारी आपल्या लोकांना लाभलेली कल्पकता या अमेरिकनांना नसल्यामुळे काही नावे पुन्हा पुन्हा वापरली जातात तरीही काही नावांना निवृत्तही करण्यात आले आहे कारण ती चक्री वादळे अगदी लक्षणीय रीत्या धोकेबाज व हानिकारक होती. २००५ मध्ये आलेले कत्रिना हे त्यापैकी एक. त्यावेळीही आम्ही अमेरिकेत होतो. पण ते पॅसिफिकवर आलेले असल्यामुळे त्याच्याशी आमचा संबंध नव्हता मात्र त्याच वेळी आयरीन याच नावाचे चक्रिवादळही अटलांटिकवर आले होते आणि ते आमच्या भागाशी संबंधित होते. पण तेही आम्हाला फक्त चाटून गेले. होती. आपल्याकडे अशी वादळे आलीच असती तरी त्या सर्व वादळांना पुरून उरतील

इतकी नावे शोधण्याची स्पर्धाही आयोजित करता आली असती व त्या नादात तेवढीच माणसेही वाहून गेली असती तरीही नवीन नाव शोधून जितं मया म्हणून आपण आपली पाठ थोपटून घेण्यातच धन्यता मानली असती.

या वेळेस आम्हाला वादळाचे महत्त्व एवढ्याचसाठी की कधी नव्हे ते आमच्याही भागात कोसळणार होते. न्यू जर्सीच्या चक्री वादळांच्या इतिहासात १८६६ पासून आजवर आलेल्या चक्री वादळात जीवितहानी फक्त १६ वेळा झाली आहे न्यू जर्सी च्या स्थान वैशिष्ट्यामुळे हवामानतज्ञांच्या मते वादळाचा हल्ला होण्याची शक्यता फक्त ०. ५% इतकी कमी असल्यामुळे फारच थोडी चक्री वादळे या राज्यावर प्रत्यक्ष चाल करून आलीत. या वेळी मात्र न्यू जर्सीला बराच मोठा चक्री वादळाचा झटका बसणार असल्याच्या हवामानखात्याच्या अंदाजामुळे आम्हा एडिसनकरांची पण झोप उडवली होती. खरे तर तसे व्हायला नको होते कारण अलीकडे अमेरिकेतील हवामानखातेही भारतीय हवामानखात्याकडून धडे गिरवीत असल्याची शंका आम्हाला येऊ लागली होती कारण हमखास पाऊस हा अंदाज त्यानी आम्ही आल्यापासून दोन वेळा चुकवला होता. तरीही चक्री वादळाबाबत कोणताही धोका घेणे योग्य नव्हते.

१९०३ पासून मोठ्या प्रमाणात नुकसान करणारे हे पहिलेच चक्री वादळ होते. आणी त्यामुळे अटलांटिक सिटीमधील कॅसिनो सुरू झाल्यापासून बंद करण्यास भाग पाडण्याची ही तिसरीच खेप होती. बऱ्याच किनारी भागातील लोकांना हलवण्यात आले होते. आपल्याकडे नेमेची येतो पावसाळा या उक्तीस अनुसरून रस्त्यावर व घरातही पाणी शिरण्याचे प्रकार दर पावसाळ्यात घडत असल्याने अगदी गळ्याशी आल्यावरच माणसांना हलवण्याचा प्रकार घडतो. आम्ही पुण्यात रहात असलेल्या सिंहगड रस्त्यावरही काही भागात लोकांना हलवावे लागल्याच्या बातम्या आम्ही वाचत होतो पण आता तिकडे नसूनही आपल्यावर ती पाळी येणार की काय अशी भीती आता वाटू लागली. वादळ २८ ऑगस्टला रौद्र स्वरूप धारण करेल असे भाकित करण्यात आले होते आणि तो रविवार होतात्यामुळे शनिवार रविवार आणीबाणीच जाहीर करण्यात आली होती. त्यामुळे सावधगिरी म्हणून न्यू जर्सी ट्रॅझिटच्या ट्रेन्स, बसेस शनिवार रविवार दोन दिवस बंद ठेवण्यात आल्या होत्या. सुदैवाने शनिवार रविवारच असल्याने कुणाला बाहेर पडण्याचे कारण नव्हते. येऊन जाऊन सुट्टीसाठी बाहेर पडणारांची पंचाईत होणार होती.

हरिकेन २८ तारखेस रौद्र रूप धारण करणार होते म्हणजे तेव्हां काहीही घडू शकणार होते, म्हणजे माझ्यासारख्या कल्पना

करण्यात पटाईत असणाऱ्याला आमचे घर उडून जाण्यापर्यंत कल्पना ताणणे सहज शक्य होते. आणि आदल्या दिवशी पटेल यांनी जे सविस्तर वर्णन केले होते त्यावरून तसे घडणे अगदी अशक्य नव्हते. त्यांनी वीज व पाणी पुरवठा बंद होण्याची शक्यता असल्याने अन्न पाणी इतकेच काय पण मेणबत्त्यांचाही भरपूर साठा करून ठवण्याचा उपदेश केला होता. त्यावेळी अण्णांचे आंदोलन भारतात जोरात होते त्यामुळे तिकडल्यासारखाच मेणबत्त्यांचा तुटवडा येथे पण भासणार असे दिसू लागले. अगदी घर उडून नाही गेले तरी घराबाहेरील वस्तू उडण्याची शक्यता होती. त्यात कार उडतील असे काही गृहित धरले नव्हते तरी घराबाहेरील कुंड्या ज्या नुकत्याच गौरी गणपतीच्या सणासाठी सौं. ने मोठ्या हौसेने येथील होम डॅपो तून आणल्या होत्या त्या फुलझाडांसकट उडणे शक्य होते.

शुक्रवारी सर्व कचेऱ्या, शाळा कॉलेजेस सगळे काही लवकर सोडण्यात आले होते त्यामुळे चिरंजीवही घरी आले होते त्यामुळे त्याला कुंड्या घरात आणण्याचा आग्रह सुरू झाला. खरे तर आमच्या कुंड्या उडून शेजाऱ्याच्या डेकवर गेल्या असत्या तर दुसऱ्या शेजाऱ्याच्या इतकेच काय पण होम डेपोतल्याही कुंड्या उडून आमच्या डेकवर येण्याची शक्यता आहे असा दिलासा देण्याचा प्रयत्न मी केला असता. पण माझ्या सूचनेमुळे कुंड्यांच्या

ऐवजी माझीच गच्छंती गराजमध्ये होण्याची शक्यता निर्माण झाली असती म्हणून मी स्वतःला आवरले. . त्या कुंड्या घराच्या मागील डेकवर होत्या त्या उचलून गॅरेजमध्ये न्यायचा विचार होता. पण त्याने घरी येताच दुसराच प्रस्ताव मांडला त्याच्या मते वादळामुळे वीज पाणी बंद पडण्याची शक्यता असते शिवाय त्या काळात आणि कदाचित पुढेही काही काळ सगळी दुकाने बंद असणार त्यामुळे प्रथम पोटापाण्याची व्यवस्था करून ठेवायला हवी त्यामुळे अगोदर अपना बाजार, सब्जीमंडी सारख्या भारतीय दुकानांवर हल्ला करणे आवश्यक. आमच्या अनुभवी पटेलांनी हाच उपदेश केल्याचे मलाही आठवले.

सूनबाई त्यावेळी नातवाला शाळेतून आणायला गेली होती व ती तिकडूनच येताना काही खरेदी करणार होती. मला खरेदी या गोष्टींचा कंटाळा असल्यामुळे जाण्याची काही इच्छा नव्हती पण अशा अवघड प्रसंगी प्रत्येकाने आपला वाटा उचलायला हवा असे वाटून मीही चिरंजीव व सौ. यांच्या बरोबर येण्याची इच्छा व्यक्त केली व आम्ही तिघे निघालो. अपना बाजारवर जणू एडिसनवासी भारतीय या नावाच्या चक्री वादळाने हल्लाच केल्याचा भास होत होता. यावेळी एक तारखेस गणपती येत असल्याने ती खरेदीही याच वेळी करणे आवश्यक होते. त्यामुळे नेहमीच आठवड्या अखेरीस असणारी गर्दी तिपटीने वाढली होती. सामान घेण्यासाठी

ढकलगाडी देखील उपलब्ध नव्हती. तेवढ्यात एका तरुणाला आपले सामान ढकलगाडीवरून आपल्या गाडीत उतरवताना आमच्या चिरंजीवांनी हेरले व त्याने ताबडतोब ती गाडी त्याच्याकडून हस्तगत केली.

अपना बाजारमध्ये अक्षरशः हातघाईची जणू लढाईच चालू होती. प्रत्येकजणाचे दोन्ही हात प्लॅस्टिकच्या बॅगांच्या गुंडाळीतून बॅगा तोडणे व दुसऱ्या हाताने त्यात सामान भरणे याच उद्योगात मग्न होता. अशा हातघाईच्या लढाईचे रणांगण पाहिल्यावर आमच्या झाशीच्या राणीला स्फुरण न चढेल तरच नवल. ती प्लॅस्टिक बॅग केव्हां तोडत होती आणि त्यात दोडके, भोपळे केव्हां भरत होती हे हे मला तर कळतच नव्हते तिची तुलना बाजीप्रभूच्या हातघाईच्या लढाईशीच काय ते करता येईल. मी आपला हातगाडीच्याच लढाईत धन्य मानत होतो. जरी हातगाडी ढकलण्याचे काम निरुपद्रवी होते तरी त्या गर्दीतून ती फिरवणे हे तितकेच अवघड काम होते त्यामुळे एका कोपऱ्यात ती उभी करून सौभाग्यवतीने हस्तगत केलेला माल तिच्याइतक्या नाही तरी जमेल तेवढ्या चपळाईने त्यात नेऊन टाकण्याचे काम मी करत होतो. चिरंजीवांना इतर काही वस्तू शोधून हातगाडीत टाकण्याच्या कामी जुंपण्यात आले होते हातगाडी भरली तरी त्यांचे वस्तू गोळा करण्याचे काम चालूच होते.

तेवढ्यात आपल्याला बाहेर पडताना चेक इन कौंटर या एका महत्त्वाच्या अडथळयास तोंड द्यावे लागणार आहे याची कल्पना आल्यावर सामान घेऊन बाहेर पडणाऱ्यांच्या रांगेत मी उभे राहावे असे ठरले आणि पाहतो तो काय मी जेथे उभा होतो अगदी त्याच जागेपर्यंत ती रांग येऊन पोचली होती त्यामुळे फक्त हातगाडीचा रोख बदलून आपण रांगेतच उभे आहोत हे इतरांना कळेल याची काळजी घेणे एवढेच काय ते मला करायचे होते. अर्थात माझ्या रांगेत उभे राहण्यामुळे हातगाडीत सामान येऊन पडण्याची क्रिया काही प्रमाणात मंदावली असली तरी थांबली होती अशातला भाग नव्हता. मी मात्र अमेरिकेत येण्यापूर्वी बॅगा भरल्या जात असताना माझ्या बॅगेव्यतिरिक्त इतर तीन बॅगात व माझ्या कपड्याव्यतिरिक्त माझ्याही बॅगेत काय सामान टाकले जात आहे याविषयी जितका नि: संग असतो तेवढाच हातगाडीत पडणाऱ्या सामानाविषयी होतो. अगदी तुकारामांच्या भाषेत फोडले भांडार धन्याचा हा माल मी तो हमाल भारवाही अशीच माझी भूमिका होती.

सामान भरण्याची ही प्रक्रिया अगदी मी वस्तूंचा हिशोब करणाऱ्या ललनेच्या टेबलपर्यंत पोचल्यावरही चालू होती. ती युवतीही तितक्याच चपळाईने त्या वस्तू किंमतमापक यंत्राखाली नेऊन गणकयंत्रावर बेरीज करण्याचे काम करत होती. या वेळी तिच्या मदतीस आम्ही आणलेले सामान भराभर मोठ्या

प्लस्टिकच्च्या पिशव्यात टाकण्यासाठी एक मदतनीस देण्यात आला होता. त्यामुळे आम्ही तासाभराने अपना बाझार च्या बाहेर आमच्च्या हातगाडीसह पडून आमच्च्या कारपर्यंत कसे बसे पोचलो व गाडीच्च्या डिकीत सामन टाकून हातगाडी मोकळी करण्याची वाटच बघत असल्यासारखा एक तरुण पुढे येऊन आमची हातगाडी पळवत घेऊन गेला. काही वस्तू न मिळाल्याचा अहवाल भ्रमणध्वनीवरून आमच्च्या सूनबाईंपर्यंत पोचला होता व त्यांच्च्या रस्त्यावर असणाऱ्या दुसऱ्या अशाच मॉलमध्ये त्या वस्तू त्यांनी मिळवल्या होत्या.

इतकी हातगाडीभर खरेदी करूनही पाणी व दूध घ्यायचे राहिलेच होते कारण त्या वस्तू तेथे मिळतच नव्हत्या, त्यामुळे परत येताना घराजवळच असलेल्या थांबा आणि विकत घ्या (Stop and Shop) या नावाच्च्या मॉलमध्ये शिरलो. तेथेही तितकीच गर्दी असेल असा अंदाज होता पण त्या मानाने ते बरेच मोकळे होते व हातगाड्या थोड्याफार शिल्लक होत्या. आत शिरल्यावर दाराजवळच अगदी छोट्या म्हणजे एक लिटरच्च्या पाण्याच्च्या बाटल्या दिसल्या. खरे तर वीस पंचवीस लिटर पाणी बसणारे कॅन विकत मिळतात त्यामुळे अशा छोट्या तीस चाळीस बाटल्या घ्यायच्च्या की नाही असा विचार मनात आला पण चिरंजीवानी आता घेऊ आणि आत मोठा कॅन असेल तर ह्या तेथेच ठेवू असा

शहाणपणाचा विचार केला कारण आत मोठा कॅन नव्हताच उलट दोघा तिघाजणांनी आम्हालाच या बाटल्या कुठून मिळवल्या असे विचारले व त्यामुळे आम्ही आपली पाठ थोपटून घेतली. येथे दूध आणि पिठीसाखर घेतली. अशी साखर केकसाठी वापरतात त्यामुळे ती येथेच मिळते हा शोध अर्थातच सौ. चा! असो अशा प्रकारे जवळ जवळ एक क्विंटलभर माल आम्ही घेऊन घरी आलो. अशी क्विंटलने खरेदी आम्ही औरंगाबादमध्ये सर्वजण एकत्र राहत होतो त्यावेळी तेथील मोंढ्यावर जाऊन करत असू. पण त्यावेळी मोंढ्यावरून सामान बैलगाडीतूनच किंवा हातगाडीवरून आणावे लागे.

आजचा सगळा वेळ खरेदीत गेल्यामुळे बाहेरील सामान आत आणून टाकण्याचे काम उद्यावर ढकलावे लागले. पण त्याच्यापेक्षा अधिक लांबवणे शक्य नव्हते त्यामुळे दुसऱ्या दिवशी म्हणजे शनिवारी सकाळी सगळेच घरी असल्यामुळे सामन गराजमध्ये आणून टाकण्याच्या कामात सौं नेच आघाडी घेतली म्हटल्यावर इतरांना आणि मलाही गप्प राहणे शक्य नव्हते. सर्वांनी आपल्या आपल्या कुवतीनुसार सामान आत आणून टाकले. शनिवारी संध्याकाळी पाऊस थोड्याफार प्रमाणात चालू होताच तरीही मला इषारा देणारे पटेल छत्री घेऊन फिरायला येणार का म्हणून

विचारायला आलेच होते. त्याना त्यांच्याच इषाऱ्याची आठवण करून देऊन मी घरी पिटाळले.

त्या दिवशीची रात्र म्हणजे "राजा रात्र वैऱ्याची आहे जागा राहा "अशा इशाऱ्याची होती. रात्री काहीही होऊ शकते म्हणजे घरावर झाड पडण्यापासून ते घर उडून जाण्यापर्यंत त्यामुळे अशा परिस्थितीत रात्री आम्हालाही स्थलांतर करावे लागलेच तर एका बॅगेत आवश्यक कपडे व पर्समध्ये पासपोर्ट वगैरे कागदपत्रे, आवश्यक औषधे असे सामान भरून ठेवून धड्धडत्या अंत:करणाने झोपलो. वादळ अतिशय जोरात येणार व झाडे पण उन्मळून पडतील असे भाकित होते त्यामुळे आम्ही संध्याकाळी आमच्या मागील व पुढील झाडाकडे पाहून बहुतेक ती पडणार नाहीत व अगदी पडलीच तर घरावर पडणार नाहीत असा अंदाज केला होता. त्याशिवाय बार्बेक्यू सारख्या अगदी जड वस्तू घरात नेणे शक्य नसल्यामुळे दोराच्या सहाय्याने त्या डेकला बांधून ठेवल्या. इतर काही करता येणे शक्यच नव्हते.

सगळी अशी जय्यत तयारी करून झोपायला गेलो. मला बराच काळ झोपच लागली नाही मध्येच जोरात वारा सुटल्याचा भास् झाला पण नंतर एकदम सकाळी सात वाजताच जाग आली तेव्हां त्यावेळी घर तर जाग्यावर होतेच पण त्याचबरोबर घराबाहेर

डोकावून पाहिले तर सगळी झाडे जागच्या जागी होती. त्यामुळे झाड पडले नाही हे उघड झाले. रात्री १२ ते २ जोरात हवा वहात असल्याचा सौ. ने हवाला दिला तर चिरंजीवांच्या मते रात्री २ नंतर जोरात वारे सुटले होते. त्या काळातच बरोबर मला गाढ़ झोप लागली असावी त्यामुळे त्यावर काही मत व्यक्त करणे शक्य नव्हते पण सकाळी फिरायला मात्र घरच्यांनी नको नको म्हणत असताना गेलो तर फिरण्याच्या रस्त्यावर काही झाडे पडल्याचे दिसले पण अपेक्षेच्या मानाने हा किरकोळ मामला होता. दूरदर्शनवर मात्र बातमीदार अगदी उडून जातील की काय अशा वाऱ्यात किंवा गुडघाभर पाण्यात उभे राहून इतरत्र किती नुकसान झाले याच्या बातम्या देत होते. अनेक ठिकाणी घरे उड़णे, झाडे पड़णे असे प्रकार झाले होते. व वादळात सापडून जीवितहानी पण झाली होती. शेवटी १० लोक मरण पावल्याचा अधिकृत आकडा कळला. . तेव्हां आता वादळ ओसरले म्हणून आम्ही स्वस्थचित्त झालो तरीही त्यानंतर दोन दिवस रेल्वेगाड्या व बसेस बंद असल्यामुळे चाकरमान्यांचे थोडेफार हाल झालेच. तरी त्याना संगणकाच्या सहाय्याने घरून काम करता येत असल्यामुळे रजा वाया घालवावी लागली नाही. काही भागातील वीज गेली होती त्यामुळे त्या भागातील माझ्या मुलाच्या मित्रांनी अगोदर आणलेले दुधासारखे पदार्थ आमच्या घरातील फ्रीजच्या आश्रयास आणून ठेवले होते.

आयरीन वादळाच्या तडाक्यातून आम्ही मात्र बालंबाल बचावलो होतो.

त्यानंतर आपल्याकडेही म्हणजे भारतातही अशी वादळे येऊन गेली होती व या दोन वर्षात त्याचा अनुभव चिपळूणकरांनी व समुद्रकिनाऱ्यावरील अनेक शहरांनी घेतला आहे हे कळू लागले आहे, अगदी याच वर्षभरात हिन्दी महासागरावर आतापर्यंत पाबूक, फणी, वायू, बॉब. हिक्का, लॅंड आणि क्यार अशी सात मोठी वादळे येऊन गेली. १९६५ ते २०१७ या कालावधीत अतिविध्वंसक अशी ३९ वादळे पूर्व किनारपट्टीवर येऊन गेली. फक्त औरंगाबाद, पुणे अश्या देशाच्या अगदी मध्यभागात रहात असल्याने त्यांचा अनुभव आम्हास आला नाही इतकेच!

# ४५. हसरी हजामत

सध्या अमेरिका जगातील कोणत्याही राष्ट्राची हजामत करण्याचा आपल्याला हक्कच आहे अशा समजुतीत आहे. चीन इराणसारखी राष्ट्रे त्यांना भीक घालत नाहीत ही गोष्ट वेगळी. पण अमेरिकेच्या हजामतीला तोंड कसे द्यायचे या चिंतेत असलेल्या राष्ट्राच्या माझ्यासारख्या नागरिकास मात्र चिंता वेगळीच असते ती म्हणजे अमेरिकेत गेल्यावर आपली हजामत कशी व्हायची? खरे तर ए पी जी सारख्या भरघोस केस राखून हसत हसत तो केशसंभार संभाळणाया आदरणीय राष्ट्रपुरुषाचा आदर्श मी समोर ठेवायला हरकत नाही पण डोक्यावर निम्मेच केस उरल्यावर ह्या प्रश्नाचे स्वरूप बदलते. परवाच सलूनमधून बाहेर पडल्यावर माझे एक मित्र समोर आले व माझ्याकडे पाहून "काय कटिंग केले वाटते? " असा प्रश्न विचारते झाले. यावर मी "हो आहेत थोडेफार केस त्यामुळे जावे लागते कधी कधी " असे म्हटल्यावर ते म्हणाले " खरे आहे. खरे तर आपली कटिंग निम्म्या दरातच करायला हवी ""हो बरोबर "असे मी उत्तर दिल्यावर ते पुढे म्हणाले "अहो कसचे काय मी माझ्या कारागिराला तसे म्हणाल्यावर तो्च उलटा म्हणाला काका तुम्हाला दुप्पट आकार घ्यायला हवा"मी आश्चर्यचकित होऊन

म्हणालो, " बराच दिसतोय की. असं का म्हणाला? "त्यावर ते मित्र म्हणाले "अहो तो म्हणाला काका तुमची कटिंग करायला आम्हाला केस शोधून शोधून कापावे लागतात " यातील विनोदाचा भाग सोडला तरी अमेरिकेत कटिंग करण्यातील अडचणी आणखीनच वेगळ्या असतात हे खरेच!

अमेरिकेत हजामत करून घेण्यातील मला येणारी पहिली अडचण खरे पाहता क्षुल्लक आहे ती म्हणजे तेथील हजामतीचा दर आपल्याकडील तुलनेत फारच आहे अर्थात आता आपल्याकडेही काही पार्लर्सनी त्यांच्या तोडीस तोड भाव वाढवण्यास सुरवात केली असली तरी माझी मजल तेथपर्यंत जात नसते उलट आमच्या घराच्या बाहेर पडले की प्रथम दिसणाऱ्या कटिंग सलूनला मी आश्रय देतो, ते सलून घरापासून पाच मिनिटाच्या अंतरावर आहे. सध्या मी कमीतकमी अंतर चालायला लागावे याविषयी फारच दक्ष आहे कारण मायबाप सरकारने कितीही निर्बंध जनहितार्थ जारी केले तरी वाहनचालक आपल्या मर्जीनुसार कोणत्याही दिशेने व पद्धतीने वाहने चालवत असल्यामुळे त्या वाहनचालकांच्या तडाक्यातून वाचणे हा महत्त्वाचा उद्देश असतो. त्यामुळे पाच मिनिटाच्या अंतरावरील सलूनच्याही अगोदर दिसणाऱ्या एका झाडाखाली बसलेल्या कारागिराला आश्रय द्यावा की काय असाही विचार कधीकधी

माझ्या मनात डोकावतो पण त्यानंतर घरात होऊ शकणाऱ्या हजामतीचा विचार करून तो मोह मी टाळतो. त्या कारागिराच्याच काय पण कोणत्याही महागात महाग (कदाचित माझी कल्पनाशक्तीची कुवतच तेवढी!) सलूनचाही विचार केला तरी अमेरिकेतला कटिंगचा दर रुपयात रूपांतरित केल्यावर यापुढील भारतातील त्यातही पुण्यातीलसुद्धा सलूनमध्ये माझी जन्मभराची हजामत तेवढ्या पैशात होऊ शकेल हा विचार मनात आल्याशिवाय राहत नाही.

पण कटिंगसाठी डॉलर्स मुलगाच देणार असल्याने हा प्रश्न त्याला गंभीर वाटत नाही पण दुसरा एक गंभीर प्रश्न मात्र उरतोच तो म्हणजे येथे जसे मनात आले की कटिंगला बाहेर पडता येते तसे तेथे थोडेच जमणार आहे? तेथे थोडेच हाकेच्या अंतरावर सलून आहे आणि सलूनपयंत जायला वाहन कोण चालवणार? थोडक्यात लहानपणी मुलांना गाडीवर घेऊन कटिंग करायला मी जात असे त्या ऐवजी त्याच मुलांना आता मला गाडीत घालून कटिंगसाठी घेऊन जावे लागते आणि त्यासाठी त्यांच्या कार्यमग्नतेतून त्यांना वेळ मिळायला हवा. त्यांना जो काही वेळ मिळणार तो आठवड्याच्या साचलेल्या कामासाठी वापरावा लागणार. त्याची कटिंग तर तो ऑफिसला जाताना किंवा येतानाच उरकून येतो त्यामुळे आमच्या दोघांच्या वेळा जुळणे कठीणच.

अर्थात हा प्रश्न कधीतरीच उपस्थित होत असतो आणि यावेळी माझ्या मुलाने अनेक गोष्टींची सांगड घालत माझी, त्याची व आमच्या नातवाचीही कटिंग करणे आणि मॉलमधील खरेदी या दोन्हींतिन्ही कर्तव्यांचा एकत्र मेळ घातला म्हणजे यावेळी आम्ही कटिंगसाठी सहकुटुंब गेलो. माझ्या जावळानंतर माझ्या कटिंगसाठी सर्व कुटुंब उपस्थित असण्याचा हा पहिलाच योग. त्यात वेळेच्या नियोजनामुळे मॉलमधील खरेदी आमची सौ. व सूनबाई यांनी नातवास बरोबर घेऊन करावी तोपर्यंत मी व आमचे चिरंजीव यांनी कटिंग करावी, खरेदी आटोपून त्या दोघींनी नातवास घेऊन तेथे यावे व त्यानंतर त्याची कटिंग करून आम्ही सहकुटुंब घरी परतावे असा एकूण बेत होता.

ठरलेल्या बेतानुसार खरेदीपथकास मॉलमध्ये सोडून आम्ही दोघे सलूनमध्ये शिरलो. सलून म्हणजे एक प्रशस्त हॉलच असतो व अनेक आरामशीर खुर्च्या व त्याहूनही आकर्षक मुली हातात कात्र्या घेऊन आपल्यावर हल्ला करण्यासाठी वाट पाहत असतात. त्यांच्यातील प्रमुख तरुणी आपल्या रजिस्टरमध्ये आपल्या येण्याची नोंद घेऊन योग्य त्या खुर्चीकडे आपली रवानगी करते. नेहमीची गिऱ्हाईके आपल्या विशिष्ट कारागीर स्त्रीकडेच जाण्याचा आग्रह धरतात. भारतात सुद्धा आमचे काही मित्र ठराविकच सलूनमध्ये ठराविकच कारागिराचा आग्रह धरणारे आहेतच. माझ्या

बाबतीत भारतातही असा काही प्रकार उद्भवत नाही तर अमेरिकेत तर तो प्रश्नच नाही शिवाय अमेरिकेच्या प्रत्येक भेटीत जास्तीतजास्त दोनच वेळा आणि तोही वेगवेगळया सलूनमध्ये कटिंग करणाऱ्यास एका विशिष्ट स्त्रीवरच (त्यातही आणखी एका स्त्रीची कडक नजर आपल्यावर आहे ही जाणीव असताना) लोभ जडण्याची शक्यता आता कुठली? त्यामुळे आम्हाला त्या प्रमुख स्त्रीच्याच दिग्दर्शनाखाली आपली कारागीर निवडावी लागली. विशिष्ट कारागिराचा आग्रह धरणे अगदीच चूक नव्हते हे आमच्या लवकरच लक्षात येणार होते.

त्यावेळी सर्वच कारागिरिणी व्यग्र असल्याने उपलब्ध असलेल्या एकाच कारागीर तरुणीकडे प्रथम मुलाची रवानगी झाली. मी माझा वेळ तेथे पडलेल्या फेमिनासारख्या मासिका साप्ताहिकातील छायाचित्रे पाहण्यात घालवत बसलो थोड्याच वेळात मुलाचे कटिंग आटोपले आणि त्याच कारागीर तरुणीकडे जाण्यासाठी मला त्या प्रमुख स्त्रीने पाचारले. मुलाकडे पाहिल्यावर त्याच्या अगदीच बारीक कापलेल्या केसांकडे माझे लक्ष गेले व त्याच्या उजव्या बाजूच्या कानाजवळ बराच मोठा चट्टा उमटल्यासारखे जाणवले व जरा बारीक निरीक्षण केल्यावर तो त्या केशकर्तन कलावतीचाच प्रसाद असल्याचे जाणवले पण माझा मुलगाही माझ्यासारखाच सहनशील (लग्नानंतर हा गुण प्रामुख्याने

अंगी बाणवणे आवश्यक असते) असल्यामुळे ही बाब त्याने नजरेआड केली असावी म्हणून मीही त्यावर बोलण्याचे टाळले.

तेवढ्यात आमचे खरेदीपथक आपले काम आटोपून सलूनमध्ये प्रवेश करते झाले आणि मी चहा पिताना चुकून माझ्या हातातील कपातून एकादा चहाचा थेंब शर्टावर पडला असला तर "दाग अच्छे होते है"जाहिरातीतील मुलगाच मी आहे अश्या मुद्रेने माझ्याकडे पाहणाऱ्या सौ. ला लगेच आपल्या मुलाच्या सौंदर्याचा इतका अधिक्षेप झालेला पाहावयाला कसे आवडणार? तिने लगेचच आपल्या तीक्ष्ण स्वरात "हे काय उजव्या बाजूला असे (केसांच भूत करून घेतलेले)काय दिसतेय? "असा प्रश्न विचारला पुढील वादळात माझा समावेश होण्याची शक्यता व तेवढा उत्साह मला नसल्यामुळे मी माझ्या खुर्चीचा व तेथील त्याच कलावतीने माझ्या डोक्याचा ताबा घेतला.

माझी कटिंग तशी फारच सोपी असल्याने व त्याचबरोबर त्या कलावतीकडे बऱ्याच केशकर्तनयंत्रांचा साठा असल्याने पण त्यांचा उपयोग कसा करावा याचे यथातथ्य ज्ञान तिला तर त्याहूनही मला नसल्याने तिने दहा पंधरा मिनिटातच मला मोकळे केले तोपर्यंत आमची सूनबाईही तेथे आल्यामुळे माझा मुलगा आता दुहेरी संकटात सापडला होता. त्याच्या उजव्या बाजूचा कानच

(विन्सेंट वॅन वॉगसारखा?) कोणीतरी कापला असावा इतका गहन प्रसंग कोसळल्याचा भास त्या दोघींना झाल्यासारखे दिसले व तसाच वाद सुरू झाला होता तो सोडवण्याची जबाबदारी त्या प्रमुख स्त्रीवर पडली होती. . माझ्या मुलावर अतिशय गंभीर प्रसंग कोसळला आहे हे तिने मान्य केले अर्थात ही तिची समजूत त्याच्या कानाजवळील केसांच्या चट्ट्यामुळे असण्यापेक्षा त्यामुळे त्याच्या दृष्टीने अतिमहत्त्वाच्या ज्या दोन स्त्रियांच्या तावडीत तो सापडलेला होता त्याच व्यक्तींच्या तावडीत तीही सापडल्यामुळे झाली असावी अशी माझी धारणा आहे. या पेचप्रसंगावर तोड काढण्यासाठी आमच्या दोघांचे कटिंग करणाऱ्या कारागीर स्त्रीला तिने बोलावले व माझ्या मुलाच्या देखणेपणास केशकर्तनातील तिच्या निष्काळजीपणामुळे लागलेला बट्टा दुरुस्त करण्याचा आदेश तिने दिला.

माझा मुलगा त्या खुर्चीवर पुन्हा एकदा स्थानापन्न झाला. ती कारागीर नवशिकी असावी त्यामुळे तिने थोडीफार खटपट करून शेवटी त्या सलूनमधील सर्वात कुशल समजल्या जाणाऱ्या कारागीर स्त्रीला आवाहन केले. अर्थात माझ्या मुलाची उचलबांगडी तिच्या खुर्चीवर झाली. त्या कुशल कारागीर स्त्रीनेही आपल्यापरीने बरीच खटपट केली तरी ज्या दोन स्त्रियांनी हा प्रश्न मूळ उपस्थित केला होता त्या दोघींचे समाधान करणे तिला काही

शक्य झाले नाही खरे तर बिरबलाच्या गोष्टीतील कांड्या केलेला ऊस पुन्हा पहिल्यासारखा करून देण्याच्या आग्रहासारखाच हा प्रकार होता शेवटी त्या प्रमुख स्त्रीने त्यावर तोडगा काढला की आता केसांची झालेली अवस्था बदलणे शक्य नाही त्यामुळे यावेळी त्या कटिंगचे पैसे घेण्यात येणार नाही इतकेच नव्हे तर थोडे केस वाढल्यावर मुलाने पुन्हा त्याच सलूनमध्ये यावे व त्याची कटिंग अगदी मनासारखी व तीही मोफत करून देण्यात येईल त्यामुळे कटिंगमुळे थोडाफार देखणेपणा कमी झाला तरी त्यावरील निकालामुळे माझ्या मुलाचा, निदान एका कटिंगचे तरी पैसे वाचले या आनंदात माझा, कशी जिरवली सलूनची या आनंदात या नाटकातील दोन प्रमुख स्त्रियांचा व या नाटकात मुळीच सहभागी नसला तरी बाकी सगळे खूश आहेत हे पाहून नातवाचा असे सर्वांचे उजळलेले हसरे चेहरे घेऊनच आम्ही घरी परतलो. सध्या करोनाचा फायदा घेऊन भारतात बरेच लोक (ज्यात मीही आलोच) दाढी व कटींग दोन्हींनाही रजा देऊन माननीय पंतप्रधानांचे अनुकरण करू लागले आहेत.

# ४६. मार्गे पॅरिस

अमेरिकेला जाण्यापूर्वी जशी तेथे आपण व्यवस्थित पोचतो की नाही आणि पोचल्यावरही आपल्याला योग्य शिक्के मिळून आपण देशात प्रवेश करतो की नाही ही काळजी असते तशी परतताना नसते कारण ज्या आपल्या देशात कोणीही बिनदिक्कत घुसू शकतो तेथे आपल्याला प्रवेश तरी कोणी नाकारणार नाही याची खात्री असते. यापूर्वी दोन वेळा पॅरिसवरून एअर इंडियाच्या विमानाने उड्डाण केले होते पण त्या चारही वेळा पॅरिसचे नखही आमच्या दृष्टोत्पत्तीस येऊ नये याची दक्षता महाराजाने घेतली होती. उगीच वैभवसंपन्न नगरीच्या दर्शनाने भारतीयांची मति भ्रष्ट व्हायला नको असा विचार त्यामागे होता की काय कोण जाणे. पण पॅरिसमध्ये दोन तास विमान थांबले तरी तेथे उतरण्याची आम्हाला परवानगी नव्हती. त्यामुळे विमानाची साफसफाई खरंच करतात की नाही याची पाहणी मात्र आम्हांस करता येत असे, अगदी येश्टी स्टॅंडासारखे " साहेब जरा पाय वर करा " असे सफाई कर्मचाऱ्यांचे विनंतीवजा हुकूम ऐकत आपल्या पदस्पर्शाने त्यांचे मस्तक पवित्र होऊ न देण्याची दक्षता आम्हाला घ्यावी लागत असे, पण आम्ही पॅरिसपर्यंत केलेला कचरा पुढच्या प्रवासात आम्ही बरोबर बाळगत

नसल्याची खात्री झाल्याने नवा कचरा करण्यास आम्हाला पुरेशी मोकळीकही मिळत असे.

पण यावेळी मात्र डेल्टा एअर लाइनने गेल्यामुळे जाताना आम्ही जरी ॲमस्टरडॅअमवरून गेलो तरी परतताना मात्र एअर फ्रान्सशी त्यांचा समझौता झालेला असल्यामुळे आम्हाला एअर फ्रान्सच्याच विमानाने परतावे लागणार होते आणि त्यात पॅरिसला विमान बदलावेच लागत होते त्यामुळे पॅरिसचा विमानतळ काही झाले तरी पाहावा लागणारच होता त्यामुळे मी जरा आनंदात होतो पण माझ्या आनंदावर इतर पूर्वानुभवी प्रवाशांनी विरजण टाकले त्यात माझी बहीणही सामील होती. मागील वर्षी तीही त्याच विमानाने गेली असल्याने त्या विमानतळावर स्थानक (टर्मिनल) बदलावे लागते व त्यासाठी बसमधून जावे लागते असे तिने सांगितले त्याच बरोबर आमच्या एडिसनच्या वास्तव्यात त्याच प्रकारचा प्रवास केलेला एक ज्येष्ठ नागरिक भेटला व त्यानेही तेथे बयाच बसेस असतात व योग्य त्या बसमध्ये चढणे आवश्यक असते आणि मधला वेळ अगदी कमी असतो असे सांगून माझ्या विमानप्रवासाच्या भीतीत आणखी भर घातली त्यामुळे आपल्याला बस बरोबर पकडता न आल्यामुळे आपण पॅरिसच्या विमानतळावरच अडकून पडलो आहोत अशी भीषण दृश्ये मला दिसू लागली त्यामुळे बहिणीने केलेली"तू आपली

चाकखुर्चीच(व्हीलचेअर)कर" ही सूचना मला पसंत पडली कारण मग तो खुर्चीवाला बरोबर जेथे जायचे तेथेच सोडेल असे तिने सांगितले. तशा माझ्या सगळ्या बहिणी भावांना फार जपतात आणि ही लहान असली तरी त्याच पठडीत तयार झालेली!

चाकखुर्चीसाठी आम्ही नावे अगोदर तिकिटे काढतानाच नोंदवली असल्याने ती मिळण्याचा काही प्रश्न नव्हताच शिवाय मुंबई सहार विमानतळावरच आम्ही एकदा त्या सेवेचा अनुभव घेतला होताच त्यामुळे प्रत्येक ठिकाणी ती उपलब्ध असेच. तरी ऍमस्टर्डॅम व नंतर नेवार्क दोन्ही ठिकाणी मी त्या सेवेचा लाभ घेण्याचे टाळले होते कारण ऍमस्टर्डॅमला ज्या द्वारावर आमचे विमान थांबले आणि ज्या द्वारावरून ते पुन्हा सुटणार होते त्या दोन्ही मधील अंतर इतके कमी होते की ते चालण्यासाठी लागणाऱ्या वेळापेक्षा जास्त वेळ कदाचित चाकखुर्चीचा शोध घेण्यातच गेला असता, तर नेवार्कला बॅगा हुडकण्यासाठी आपण आपल्या पायावर उभे असलेले बरे असा दृष्टिकोण ठेवल्याने तेथेही चाकखुर्चीवाल्यांची मी निराशा केली होती त्यामुळे भारतातील खुर्ची वाहकांप्रमाणे अमेरिकन किंवा डच वाहक आपल्याला योग्य स्थळी पोहोचवल्यावर आपला निरोप घेण्यापूर्वी माझ्या स्वभावानुसार मी एकादा डॉलर त्याच्या हातावर टिकवल्यावर "साहेब जरा तरी गरिबाच्या पोटाचा विचार करत जा " या अर्थाचे

कोणते वाक्य म्हणतात याची मला कल्पना नव्हती. अर्थात अर्थखाते सांभाळणारी व्यक्ती फारच उदार असल्याने ती बहुधा त्यांच्या सगळ्या खानदानाचा विचार करून बक्षिशी त्यांच्या हातावर टिकवत असल्याने "द्येव तुज्या पोराबाळाचं कल्यान करील गं माय" हेच वाक्य कदाचित मला फ्रेन्च भाषेत कसे म्हणतात हे ऐकायला मिळण्याची शक्यता होती. तरीही यावेळी अगदी पहिल्या वेळेपासून म्हणजे नेवार्कपासूनच व्हीलचेअर सेवेचा लाभ आणि तो दोघांनीही घ्यायचा असे आम्ही ठरवले होते. त्याप्रमाणे नेवार्कच्या विमानतळावर बोर्डिंग पास घ्यायला गेल्यावर लगेचच खुर्चीची मागणी करायची असे ठरले.

पण प्रथम ग्रासे मक्षिकापात: असे झाले कारण पॅरिस पर्यंतच्याच बोर्डिंगपासवर आम्हाला बैठकक्रमांक मिळाले व पुढच्या प्रवासाचे बोर्डिंग पास मिळाले तरी बैठकक्रमांक मात्र पॅरिसलाच मिळतील असे सांगण्यात येऊन माझ्या काळजीत आणखी भर टाकण्यात आली कारण हे काम काही खुर्चीवाल्यांकडून होण्यासारखे नव्हते. अर्थात आलिया भोगासी असावे सादर म्हणत आम्ही खुर्चीची मागणी केली तेव्हा तुम्ही सुरक्षा पडताळणीस जाण्यासाठी तयार व्हाल तेव्हा येथेच मागणी करा म्हणजे मिळेल असे सांगण्यात आले. त्यांचेही बरोबरच होते कारण आम्हालाही आम्ही नेहमीप्रमाणेच भरपूर आधी म्हणजे

संध्याकाळी सव्वासातच्या उड्डाणासाठी दुपारी तीन वाजता गेल्यामुळे आमचे बोर्डिंग पास घेण्याचे काम आटोपल्यावर दोन अडीच तास खुर्चीवाल्यांच्या सहवासात बसून काढण्याचे कारण नव्हते त्यामुळे विमानतळावर वरच्या मजल्यावरील खान पानसेवेचा लाभ घेण्यासाठी गेलो व तेथील कार्यभाग आटोपल्यावर खालच्या मजल्यावर खुर्चीसाठी जायला निघालो तर ज्या गेटमधून आमच्या उड्डाण स्थळाकडे जायचे ते वाटेतच दिसले व चिरंजीवांनी आम्हाला याच गेटने जायचे आहे असे सांगितल्यावर मग खाली जाऊन खुर्ची घेऊन परत वर येण्यासाठी आत्ता होते त्या अंतराच्या दुप्पट अंतर चालण्याचा द्राविडी प्राणायाम करण्या ऐवजी सरळ त्या गेटने चालतच आत का जाऊ नये असे माझ्या मनात आले व तसे बोलून दाखवल्यावर सर्वांना विशेषत: सौ. लाही योग्य वाटले त्यामुळे आम्ही चिरंजीव व कुटुंबीयांचा तेथेच निरोप घेऊन आत शिरलो. डॉ. ए पी जे कलाम, जॉर्ज फर्नांडिस, शाहरुख अश्या बड्या बड्या लोकांना अडवणाऱ्या अमेरिकन सुरक्षा कर्मचाऱ्यांना आमच्याकडे मात्र ढुंकूनही पाहावे वाटत नाही तसेच आताही झाले व यावेळी सौ. नेही आपले सगळे धातूचे पदार्थ अगोदरच टोपलीत काढून ठेवल्याने तिलाही काही अडकावे लागले नाही आणि दहा पंधरा मिनिटातच तेथून मोकळे होऊन आम्ही टोपलीतील बूट घड्याळ,

पॅन्टचा बेल्ट असा सर्व ऐवज पुन्हा आपल्या अंगावर चढवत असताना एक प्रवासी इथेही बोटाचे ठसे कशाला लागतात या चोरांना असा निषेधात्मक सूर काढत आमच्या जवळून गेला अर्थात आम्ही त्याच्याकडे सहानुभूतीचा कटाक्ष टाकण्यापलीकडे काही मदत करू शकलो नाही. व आमच्या उड्डाण द्वारापाशी जाऊन बसलो.

सध्या इंधनदरातील प्रचंड वाढीमुळे विमानकंपन्यांच्या काटकसर मोहिमेत विमानाच्या बैठकांचा आकारही बराच आक्रसला असल्यामुळे आठ नऊ तास त्या खुर्च्यांवर बसून काढणे हे अगदी मोठे संकट वाटते. मात्र खाद्यपेयांचा मारा करून या असुविधेकडे प्रवाशांचे दुर्लक्ष होईल असे त्यांना वाटत असावे. सध्या बरोबर न्यावयाच्या सामानासाठीची मर्यादा आणखीनच कमी करून आता फक्त २३ किलोच्या एका बॅगेवर आणली आहे. काही दिवसांनी प्रवाशांचेही वजन करून अधिक वजनाच्या प्रवाशांसाठीही अधिभार लावायची कल्पना त्यांना सुचली तर नवल नाही. आम्ही जातानाचे तिकिट घेताना ती डेल्टा एअरलाईनने दोन बॅगांपुरती ठेवली असल्याने आम्हाला यावेळी तरी आमचे सामान नेण्यास अडचण आली नाही.

नेवार्क ते पॅरिस हा प्रवास फक्त पारिसला (खरा उच्चार पारी इति मीना प्रभु)पोचल्यावर काय होणार याची काळजी करण्यात गेला या विमानात आम्हाला खिडकीजवळच्या व दोन आसनांच्या बैठकी मिळाल्या त्यामुळे उठण्यासाठी काही अडचण आली नाही. खानपान व्यवस्था चांगली होती. या विमानात प्रथम श्रवणयंत्र (हेडफोन्स) देण्यात आले नव्हते त्यामुळे समोर दूरदर्शन पडदा असूनही त्याचा आस्वाद कसा घ्यायचा याचा पेच सौ. ला पडला. यापूर्वी अमेरिकेत एका स्थानिक विमानप्रवासात आम्हाला त्यासाठी पाच डॉलर्स मोजावे लागणार होते. तसे झाले असते तर कदाचित मी श्रवणसुखावर पाणी सोडले असते पण ते सौ. ला शक्य झाले असते की नाही सांगता येत नाही पण नंतर एकादा खाद्यपदार्थ द्यावा तसा आम्हाला श्रवणयंत्र बहाल करण्यात आल्यावर सौ. चा जीव भांड्यात पडला व लगेच तिने कानाला ते लावून दूरदर्शनवरील वाहिन्या धुंडाळायला सुरवात केली. मी बरोबर घेतलेले पुस्तक वाचण्याचा प्रयत्न करत होतो पण नंतर एक इंग्रजी चित्रपट पाहण्याचा प्रयत्न केला शेवटी सौ. च्या सल्ल्यानुसार " माय नेम इज कलाम" या इंग्लिश नावाचा हिंदी चित्रपट पाहिला व तो छोटा व बरा वाटला. नंतर काही संगीत कार्यक्रम ऐकले व मध्ये मध्ये डोळे मिटून झोप घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. पॅरिसला पोचायला अपेक्षित वेळ ८ तासांचा होता व तेवढ्याच वेळात

आम्ही पोचलो पण विमानतळावर पोचल्यावर जी उद्घोषणा झाली त्यानुसार आम्हाला वीस पंचवीस पायऱ्यांची शिडी उतरून बसने आमच्या २ई या उड्डानस्थानकाकडे जायचे होते याचा अर्थ स्थानकापासून बरेच दूर विमान उभे करण्यात आले होते. .

आमच्या चाकखुर्ची घेण्याच्या निर्णयास नाट लागायला सुरवात नेवार्कला झाली होतीच तिचीच आवृत्ती येथेही झाली कारण २ई पर्यंत गेल्याशिवाय खुर्ची उपलब्धच होणार नव्हती. म्हणजे पॅरिस विमानतळावर आमच्या बस प्रवासाची सुरवात झाली व पॅरिस म्हणजे बसचा प्रवास हे समीकरण ठाम होण्यास विमानतळावरीलच पुढचा प्रवास कारणीभूत ठरला. पायऱ्या उतरल्यावर बस मात्र अगदी जवळ उभी होती व खाली विमानतळावरील एक कर्मचारिणी आम्हाला दिग्दर्शन करायला उभी होती. दोन तीन बसेस मधून आमची रवानगी २ई च्या दारात झाली व आम्ही २ई उड्डाणस्थानकामध्ये प्रवेशलो. तेथे आमच्यासारखेच एक जोडपे दिसत होते तरी त्या गृहस्थाची बायको बऱ्यापैकी त्याचे ऐकत होती. ते गुजराती असले तरी त्यातील पुरुष मुंबईत राहिल्यामुळे मराठी चांगले बोलत होता. या गायवाला नावाच्या गृहस्थाबरोबर माझी चांगली गट्टी जमली त्यामुळे आम्ही पुढील उड्डाणाचा द्वार क्रमांक तेथे लावलेल्या दिग्दर्शन फलकावर पाहू लागलो व तेथे तो सापडणार नाही हे

आमच्या दोघांचाही एकदमच लक्षात आले कारण आमच्या मुंबई कड़े जाणाऱ्या विमानाचे उड्डाणस्थानक २सी होते. आम्हाला नेवार्क वर जो बोर्डिंग पास मिळाले होते त्यात पॅरिस विमान तळावर कोणत्या स्थानकावर पोचल्यास इतर स्थानकाकडे कसे जायचे याचे स्वतंत्र नकाशे छापलेले होते. आनंदाची गोष्ट म्हणजे २ई स्थानकात आम्ही उभ्या असलेल्या जागीच २बी २ सी २ जी या स्थानकांकडे जाणाऱ्या बसची रांग दर्शवणारी पाटी होती व काही प्रवासी तेथे उभेही होते तेव्हा आम्ही व गायवाला दंपतीने त्या रांगेत उभे राहण्याचा निर्णय घेतला. खुर्चीवाले खरे तर आमची वाट बघत तेथे उभे होते पण बसनेच जायचे असेल तर मग त्यांची काय जरूरी हा माझा निर्णय बायकोलाही पटला. आम्ही रांगेत उभे असतानाच एकदम बस आल्याचे दिसले व बसमध्ये चढण्यासाठी असलेले स्थानकाचे दार उघडण्यात आले व आम्हाला त्यात चढण्यास सांगण्यात आले. यावेळी बसमध्ये बरेच कोंबून प्रवासी भरण्यात आले. तरी गायवाला जोडपे व आम्हाला बसायला जागा मिळाली. ती बस २बी २ सी २ जी कडे जात होती व पहिला थांबाच आमचा होता.

या बसने आम्ही २ सी स्थानकावर पोचल्यावर मात्र एक गहन प्रश्न उभा राहिला या स्थानकावर जाण्यासाठी एस्कलेटरचा उपयोग करावा लागणार होता व तेथे सौ. चे घोडे पेंड खाते. इतरत्र बहुधा

एस्कलेटरबरोबर पायऱ्यांचे जिने किंवा उद्वाहक असतात ते येथे नव्हते. मग मात्र मी तिला एस्कलेटरवर हात धरून नेण्याचे धाडस केले आणि यावेळी मात्र प्रथमच सार्वजनिक ठिकाणी माझा हात धरण्याचे लाजिरवाणे कृत्य लग्नानंतर प्रथमच तिला करावे लागले. फारच उच्च संस्कारात वाढलेली कन्या ना ती! आम्ही व गायवाला दंपती २ सी कड़े पोचलो व तेथील फलकावर आमच्या पुढील यात्रेच्या विमानाच्या द्वारक्रमांक लिहिलेला दिसला व पुन्हा एकदा येथेही एस्कलेटरवरून जाण्याचा योग आला व पहिल्यावेळची पुनरावृत्ती करावी लागली शेवटी ८८ क्रमांकाच्या दाराजवळील खुर्चीवर जाऊन बसल्यावर मी सुस्कारा सोडला. त्या दाराबाहेरील टेबलावर कोणीही कर्मचारी नव्हते व आम्ही जवळ जवळ दोन तास अगोदरच तेथे पोचलो होतो. आमच्याबरोबर आतापर्यंतच्या प्रवासातील एक गुजराती भगिनीने खुर्चीचा वापर केला होता ती आमच्यानंतर पोचली तिच्याकडून खुर्चीवाल्यांसाठी वेगळी बस असते असे कळले. ती नंतरच्या प्रवासात आमच्याच शेजारी होती.

पॅरिसला आम्ही सकाळी ८-१० ला पोचलो व पुढच्या उड्डाणाची वेळ १०-३० होती. बराच वेळ असल्याने मी व श्री गायवाला यांने विमानतळाचा फेरफटका घ्यायचे ठरवले. पॅरिस कितीही छान असले तरी ते किती छान हे अजून आम्हाला कळले नाहीच-आणि हा विमानतळही छान म्हणण्याच्या लायकीचा नसून

अगदीच छोटा वाटला. २सी या आमच्या स्थानकावर ८१ ते ९० क्रमांकाची द्वारे होती व त्यांच्यापुढील जागा प्रवाशांनी अगदी गच्च भरली होती त्यामुळे आमच्या फेरफटक्यातून परतताना बऱ्याच उड्डाणांची वेळ झाल्याने प्रवासी रांगेत उभे राहिल्यावर त्या रांगा एवढ्या लांब होत्या की परतीसाठी आम्हाला अगदी त्यांना बाजूस सारूनच परत यावे लागले त्यानंतरही आमच्या उड्डाणाचा पत्ता नसल्यामुळे आता भगिनी मंडळाने आता सौ. गायवाला, सौ. अस्मादिक व आणखी एक गुर्जर भगिनी असे मंडळ जमले होते-विमानतळाचा फेरफटका घेण्याचे ठरवले व त्यांचा फेरफटका आमच्या सारखा हा गेलो आणि हा आलो अशा स्वरूपाचा नव्हता बहुधा पुन्हा या विमानतळावर आपण कुठले यायला या विचाराने त्यांनी विमानतळातील असतील नसतील ती विक्रीकेंद्रे पाहण्याचे ठरवले असावे त्यामुळे आमच्या द्वारावर कर्मचारी आले व प्रवासी रांगेत उभे राहिले तरी त्यांचा पत्ता नव्हता व त्यात आमचे तिकिट प्रवासपरवाना वगैरे सर्व गोष्टी आमच्या सौ. च्या पर्समध्ये अर्थातच तिला शोधून आणणे मला भाग पडले व आता पुन्हा प्रवाशांच्या रांगांतून "माफ करा" चा मंत्र जपत मला ८१ क्रमांकाच्या द्वारापर्यंत जावे लागले तेव्हा भगिनी मंडळ पॅरिसलाच मुक्कामाला आल्याच्या थाटात वावरत होते मग मी ठेवणीतला आवाज काढून सौ, लाच द्वार क्रमांक ८८ कडे जाऊन बैठक क्रमांक घेण्यास

सांगितले व विमानात शिरण्यापूर्वी एकदा स्वच्छतागृहास भेट देण्याचे काम केले व नंतर मात्र शक्य तो जलद हालचाली करत परतलो तो काय आमच्या उड्डाणाच्या सर्व प्रवाशांची रांग लागलेली व सौ. ला बैठक क्रमांक मिळालेच नव्हते मग मी आम्हाला मिळालेले बोर्डिंग पास घेऊन प्रवेशद्वारावरील अधिकाऱ्याला आमच्या बैठकांची अडचण निवेदन केल्यावर त्याने रांगेतच उभे राहा तुम्हाला नवे बोर्डिंग पासेस मिळतील असे सांगून आणखी एक प्रश्न विचारला " तुम्हाला खुर्ची नको का?"आमच्या तिकिटावर खुर्चीची मागणी असल्याने हा प्रश्न होता पण आता विमानात चढताना खुर्ची कशाला हे मला समजेना व तसे मी त्याला सांगून इतका प्रवास बिनखुर्चीचाच केला असे सांगितल्यावर त्याचे समाधान होईल असे वाटले पण उलट त्याने "गेटमधून आत गेल्यावर पुन्हा जिन्यावरून खाली उतरावे लागेल आणि तेथून आणखी एका बसने विमानापर्यंत व तेथून आणखी पायऱ्यांच्या जिन्यावरून परत विमानात चढायचे आहे इतके सगळे तुला जमेल का?"असे विचारल्यावर आता माघार घ्यायची नाही असे ठरवून मी त्याला "त्याची मला काळजी नाही"असे सांगून परत जाऊन रांगेत उभा राहिलो.

रांगेतून प्रवेशद्वारापर्यंत गेल्यावर आम्हाला आसनक्रमांक असलेले बोर्डिंग पास मिळाले व नेवार्कच्या विमानतळावरील

कर्मचाऱ्यांनी आश्वासन दिल्याप्रमाणे ते शेजार शेजारचेच होते तरीही ते ई व एफ म्हणजे कडेचे नसावेत अशी शंका मला आली. पण विमानात चढेपर्यंत ते कळणार नव्हते. त्या अगोदर एकदा सुरक्षा तपासणी होती यावेळी नेहमीप्रमाणे आम्ही सर्व तयारीनिशी व अंगावरील कपड्याशिवाय बाकी सर्व पदार्थ टोपलीत टाकून गेल्यावर मला तर त्या चाळणीतूनही न जाता आत प्रवेश मिळाला व दुसऱ्या बाजूने आम्ही सर्व एका जिन्यावरून खाली उतरून आता तिसऱ्यांदा बसमध्ये बसून ए एफ १८ या उड्डाणाच्या विमानाकडे प्रयाण केले यावेळी मात्र पॅरिसहूनही बरेच भारतीय प्रवासी आलेले दिसले व बस अगदी मुंबईच्या बेस्ट सारखीच कोंबून भरण्यात आली त्यामुळे यावेळी आम्हाला बसमध्ये बसायला मिळाले नाही व बरोबरच्या अमेरिकन व युरोपियन प्रवाशांना "आता भारतातील बसमध्ये बसण्याचा सराव तुम्हाला होईल "असे मी विनोदाने म्हटले. ती बस विमानाच्या अगदी जवळ नेऊन उभी करण्यात आली व आम्ही आत शिरताना अगदी हिंदुस्तानी भाषेत आमचे स्वागत करण्यात आले. विमानकंपन्या आता भारतीय प्रवाशांना बऱ्याच भाव देऊ लागल्या आहेत. अगदी अमेरिकेत असतानाही आम्ही एडिसनहून फिनिक्सला यू. एस. एअरलाइनच्या विमानाने गेलो तरी कर्मचाऱ्यांनी आवर्जून हिंदीमध्ये आमचे स्वागत व आम्हाला निरोप दिला व त्याचीच आवृत्ती तेथेही झाली आता तर

हे विमान भारतातच चालले असल्याने उद्घोषणाही इंग्रजी, फ्रेन्च व हिंदी भाषेत करण्यात येत होत्या पण त्याही पुढचा धक्का आम्हाला आमच्या आसनांकडे गेल्यावर बसला, माझ्या अंदाजापमाणेच या बैठका कडेच्या नव्हत्या या विमानातली आसनव्यवस्था ३, ४, ३ अशी होती व मधल्या चार आसनातील मधली दोन आम्हांस मिळाली होती त्यात प्रवेश करताना कडेच्या अमेरिकन महिलेने आम्हाला " या बसा" म्हटल्यावर आता विमानातल्या कर्मचाऱ्यांप्रमाणे प्रवाशांनाही आमच्याशी संभाषण करता यावे म्हणून काही प्रशिक्षण देण्यात आले आहे की काय याची शंका मला आली पण नंतर त्या महिलेने आणखीही मराठी संभाषण करून आमच्या आश्चर्यात भर टाकलीच शिवाय ती चाळीस वर्षापासून भारतात येत असून महानुभाव पंथ, महाराष्ट्रातील काही वास्तूंचा अभ्यास पाणीप्रश्न यावर भारतात येऊन ती संशोधन करते व त्यावर तिने डॉक्टरेटही केली आहे अशी माहिती तिने दिली व कदाचित आमच्यापेक्षाही शुद्ध मराठी बोलत आम्हांस चकित केले. जुन्या मराठी साहित्याचाही तिचा अभ्यास होता.

बरेच भारतीय प्रवासी व अमेरिकन मराठी भाषातज्ज्ञ यांच्या सहवासात हा प्रवास फारसा कंटाळवाणा झाला नाही व अपेक्षित वेळेपेक्षा अर्धा तास उशीरा आम्ही मुंबई सहार विमानतळावर पोचलो व आता या शेवटच्या टप्प्यात मात्र चाकाची खुर्ची

वापरायचीच असे उभयतांच्या एकमताने ठरले. पॅरिसप्रमाणे येथे मात्र बसप्रवास नव्हता आम्ही बोगद्यातून बाहेर पडल्यावर खुर्चीवाले आमची वाटच पाहत बसल्यासारखे उभे होते त्यातील दोघांना आम्ही पकडले व आमचा विमानप्रवासाचा शेवटचा अध्याय सुरू झाला. येथे लगेचच उद्वाहकासमोर खुर्च्या उभ्या राहिल्या बरेच प्रवासी आमच्या सारखे खुर्चीधारी होये त्यामुळे उद्वाहकासमोर रांगच लावावी लागली कारण एका वेळी एकच खुर्ची वर जाऊ शकत होती नंतर आम्ही ज्या प्रवेश अधिकाऱ्याच्या समोर खुर्च्या आणल्या तोच कोठेतरी बेपत्ता झाला त्यामुळे खुर्चीमुळे सोयीच्या ऐवजी गैरसोयच होते की काय असे वाटू लागले पण मग दुसऱ्या टेबलावर आमची वर्णी लावण्यात आली व शेवटी तेथून आमचे प्रवास परवाने व आम्ही भरलेला तक्ता पाहून आम्हाला पुढे सोडण्यात आले.

बॅगेजच्या पट्ट्यापुढे मात्र आम्हाला बराच काळ खुर्च्यांमध्ये बसून राहावे लागले कारण आमच्या सामानाचा पत्ताच नव्हता. बऱ्याच प्रतीक्षेनंतर ते एकदाचे आले. आमच्याच उड्डाणातील वरच्या दर्जाच्या प्रवाशांचे सामान आलेच नव्हते. आमच्या खुर्चीचालकांनी सामान व प्रवासी असे दोन्ही भार सांभाळत आम्हाला बाहेर काढले व आमच्यासाठी पाठवण्यात आलेल्या

गाडीचा चालक येऊन आमचा व सामानाचा ताबा त्याच्याकडे देऊनच आमचा निरोप घेतला

# ४७. बायको हरवली आणि (हुश्श) सापडली!

बायको ही काय हरवण्याची चीज आहे?पण हरवल्यावर हुडकण्याची मात्र आहे. आणि आता ज्या वयात चष्मा कोठे ठेवला हे सापडत नाही. बाहेर पडताना शर्टाची बटणे बरोबर लावली की नाही आणि पॅंटची तर लावली की नाही हेही लक्षात न रहाण्याची शक्यता असते अश्या वेळी "एवढे कसे हो वेंधळे तुम्ही " असे म्हणून आठवण द्यायला दुसरे कोण सापडणार? पण ती हरवली आणि तेही रस्त्यात नाही तर अगदी अमेरिकेस जाताना विमानतळावर! आता बोला मग माझे कसे होणार?

अगोदरच अमेरिकेस जाताना बऱ्याच गोष्टींची मला काळजी वाटत असते. घर सोडून कुलुपबंद करून बाहेर पडल्यावर त्या घराचे कसे होणार. आपण परत येईपर्यंत त्याची परिस्थिती नीट राहील की नाही. एकदा उंदरांनी आमच्याच घरावर हल्ला करून घरातील बऱ्याच वस्तूंची वाट लावल्यामुळे आणि दुसऱ्या वेळी आमच्या एका मित्राचे घर अमेरिकेत असताना चोरांनी फोडल्यामुळे परत आल्यावर घराची काय हालत पहायला मिळते याविषयीची काळजी मनात असतेच पण त्याच वेळी अमेरिकेत पोचल्यावर जॉर्ज फर्नांडिस किंवा शाहरुक खान अश्या मोठ्या

माणसांनाही प्रवेश नाकारणारे अमेरिकन इमिग्रेशन खाते आपल्याला प्रवेश नाकारते की काय किंवा सहा महिन्याचा राहिला पण निदान जितक्या महिन्यानंतरचे परतीचे तिकिट काढलेले तेवढ्या मुदतीचा तरी स्टॅंप मारून देतील की नाही अश्या काळज्यांनी मन कुरतडत असते. एकदा इमिगेशनवरील बाईने अगदी तिकीट पाहूनच स्टॅंपिंग करून दिले होते. म्हणजे या अमेरिकनांच काम काही औरच! अगोदर व्हिसा देता देत नाहीत आणि तो दिल्यावरही परत नियमाप्रमाणे निदान सहा महिने का होईना पण तेही सुखासुखी राहू देत नाहीत. एवढं काय यांच्या देशाला सोनं चिकटलय काही कळत नाही. तरी आम्ही, म्हणजे कोण हे सांगायला नकोच, मिळालेला व्हिसा वापरून घ्यायलाच हवा या तत्त्वाला अनुसरून परत परत अमेरिकेला जायला निघतोच.

तसे आम्ही घराचा अगदी पुरता बंदोबस्त करून याही वेळी निघालो होतो. आमची कामवाली मावशीही या बंदोबस्तात आता चांगलीच तरबेज झाली आहे. कारण उंदरांनी धुमाकूळ घातला त्यावेळी तिलाही बराच त्रास झाला होता. घर बंद करून शेजाऱ्यांवा निरोप घेऊन त्यांना घरावर लक्ष ठेवायला सांगून व घराची एक चावी त्यांच्याकडे देऊन आम्ही ट्रॅव्हलच्या गाडीत दुपारी दोन वाजताच म्हणजे आमच्या उड्डाणाच्या वेळेच्या

तब्बल १२ तास अगोदर बसलो. . खरे तर आमचे उड्डाण दुसऱ्या दिवशी पहाटे दोन वाजता असल्यामुळे आम्ही दुपारी चारच्या गाडीने गेलो असतो तरी चालले असते. पण घरात माश्या मारत आणि काळजी करत बसण्यापेक्षा विमानतळावर जाऊन बसलेले बरे असा विचार मी नेहमीप्रमाणे केला होता. शिवाय घरात आम्ही दोघेच असल्याने व हे आमचे पहिलेच परदेशगमन नसल्याने निरोप घ्यायला अगर द्यायला येणाऱ्यांचीही वाट नव्हती त्यामुळे लवकर निघणे श्रेयस्कर होते.

एक पाय नेहमीच अमेरिकेस जाणाऱ्या विमानात असणाऱ्या, बायकोच्या बहिणीचा फोन गाडीत आला व आम्ही इतक्या लवकर निघालो हे पाहून तिने आमची बरीच फिरकी घेतली. आमच्याबरोबर आणखी एक प्रवासी होता पण त्याचे उड्डाण रात्री नऊचे होते त्यामुळे त्याला मात्र खरेच घाई होती. तो आमच्या अगोदरच टॅक्सीत बसला होता आणि अर्थातच चालकाशेजारीच बसलेला होता.

गाडी मध्ये धाब्यावर थांबली त्याबरोबर बायकोने मोबाइलची मागणी माझ्याकडे केली. इतक्या लवकर हिला कोणावी आठवण झाली हे मला समजेना. शेवटी तिला विचारल्यावर भ्रमाचा भोपळा फुटला, म्हणजे निघताना आपण

नीट दार बंद केले की नाही याविषयी ती साशंक होती असे कळले. म्हणजे माझ्या आईची एक आवडती म्हण होती "मोरीला बोळा आणि दरवाजा मोकळा " ही अलंकारिक अर्थाने नव्हे तर शब्दश: खरी करण्याचे सौ. ने मनावर घेतलेले दिसले कारण उंदरांनी मागे मोरी आणि संडासमधून प्रवेश केल्यामुळे त्या सर्व छिद्रात बोळे घालून व ती दारे अगदी व्यवस्थित बंद करून तिने पुढचे दारच उघडे ठेवलेले दिसले. आम्ही इतक्या लवकर निघालो होतो की पुन्हा घरी परत जाऊन त्याविषयी खात्री करणे सहज शक्य होते पण आमच्या सहप्रवाश्याने त्याला हरकत घेतली असती. त्यामुळे ज्या शेजाऱ्यांकडे किल्ली ठेवली त्याना फोन करून ती खात्री करून घेण्याचा विचार ती करत होती पण फोनच लागला नाही.

हे कारण कळताच आता मात्र कमाल झाली, अशा अर्थाने मी कपाळावर हात मारून घेतला पण हा माझा अभिनय फारच महागात पडला कारण दार नीट बंद न करण्याचे कारण मीच होतो असे माझ्या ध्यानात आणून देण्यात आले. म्हणजे गाडी घरासमोर आल्यावर मी सामानाबरोबर खाली जाऊन तिची वाट पहात उभा राहिलो असता खालून तिला लवकर येण्याची जी घाई लावली त्यामुळे दार नीट बंद झाले की नाही याकडे तिला नीट लक्ष देता आले नव्हते. शिवाय मी जर वर जाऊन पुन्हा स्वत: दार बंद झाल्याची खात्री करून घेतली असती तर असे झाले नसते.

थोडक्यात झाल्या प्रकाराला मीच जबाबदार होतो. म्हणजे पुढे काय होणार याची काळजी करायला लागण्यापूर्वीच मागे काय झाले असेल याचीच काळजी करण्याची पाळी आली.

आम्ही नऊ वाजता जाणाऱ्या प्रवाश्याच्या सोयीनेच विमानतळावर पोचलो. पोचल्यावर चालकाने व सहप्रवाश्याने आम्हाला सामान उतरवून ढकलगाडी शोधून त्यावर सामान चढवून आत जाण्यास तयारच केले. आमच्या सहप्रवाश्याने "तुम्हालासुद्धा आत सोडतील असे सांगितल्यावरून आम्ही तसा प्रयत्न केला पण विमानपत्तनाचे सुरक्षा कर्मचारी अधिक जागरूक असल्यामुळे आमच्या सारख्या आगंतुकांना आत सोडून आतील गर्दी वाढवण्याची त्यांची इच्छा नव्हती असे दिसून आले. त्याचबरोबर बाहेर आमच्यासारख्या प्रवाशांसाठी विश्रामस्थान आहे व ते सुशीतल आहे असे त्यांनी सागितले व ते ज्या प्रवेशद्वारापाशी आम्ही उभे होतो त्याच्यापासून बरेच दूर असलेल्या कोपऱ्यात आहे असे दिसून आले. जरा अधिक चौकसपणे पाहिले असते तर तसा आणखी एक विश्रामकक्ष त्या प्रवेशद्वाराच्या डावीकडे अगदी लागूनच होता हे समजले असते पण ही गोष्ट आमच्या चौकस बायकोच्या नजरेतून कशी सुटली समजत नाही. ती बरोबर आहे म्हटल्यावर माझ्या लक्षात येणे शक्यच नव्हते.

विश्रामस्थळापर्यंत जाऊन आत प्रवेश करताना तेथील द्वाररक्षकाने आत प्रवेश करण्यासाठी ५० रु. चा प्रवेशपरवाना लागेल असे सांगितले सुदैवाने परवाना खिडकी जवळ होती, अर्थातच आम्हाला दोन परवाने घेऊनच आत प्रवेश मिळाला. या बाबतीत अमेरिकन विमानतळाची सोय मला आवडते तेथे बरेच आतपर्यंत प्रवाश्यांना कितीही अगोदर जाऊन बसता येते. आतील खानपान सेवेचा लाभ घेता येतो आणि सोडायला येणाऱ्या व्यक्तींनाही अगदी सुरक्षा आचणीच्या द्वारापर्यंत जाता येते. आत गेल्यावर व आम्ही स्थानापन्न झाल्यावर पहिले काम अर्थातच आमच्या पुण्यातील शेजाऱ्यांना भ्रमणध्वनी करून आमच्या घराच्या सुरक्षाव्यवस्थेची चौकशी करणे हे होते व त्यांनी आमच्या सदनिकेपाशी जाऊन दार उघडून आणि पुन्हा बंद करून, आता ते खरोखरच बंद झाले आहे, याची खात्री करून आम्हाला तसे कळवले व आम्ही निश्चिंत झालो. त्यानंतर भ्रमणध्वनी सौ. ने आपल्याजवळच ठेवला.

आम्ही बरोबर काही खाद्यपदार्थ आणलेले असल्यामुळे त्या वेळी त्यांचा समाचार घेणे आम्हाला शक्य झाले. त्यानंतर आजूबाजूच्या लोकांचा समाचार सौ. ने घेतला व मी बरोबर आणलेले पुस्तक चाळत बसलो. आमचे उड्डाण पहाटे दोन वाजताचे असल्यामुळे रात्री दहा वाजता आत सोडत असतील या

अंदाजाने आम्ही परत एकदा सामानासह प्रवेशद्वाराकडे निघालो आणि आता मात्र आत शिरण्यास मुभा मिळाली व त्याच वेळी त्या प्रवेशद्वारापाशीच एक सुशीतल विश्रामकक्ष होता असे दिसून आले. व आम्ही अगोदर उगीचच दुसऱ्या टोकास जाऊन बसलो अशी हळहळ वाटली पण मग नाहीतरी आपल्याला वेळच घालवायचा होता अशी मनाची समजूत घालून घेतली.

चरकात घातलेले उसाचे कांडे जसे आपोआपच दुसऱ्या बाजूने बाहेर पडते तसे आपल्या विमानसेवेच्या एका बाजूने प्रवेश केला व रांगेत उभे राहिले की फारसा विचार न करता आपोआप आपण योग्य ठिकाणी पोचतो. सामान आम्ही नेहमीप्रमाणे तीनतीनदा वजन करून आणल्यामुळे कुठल्याही अडथळ्याशिवाय आत गेले, बोर्डिंग पासेस हातात पडले आता सुरक्षाचाळणीतून आत शिरण्याचेच बाकी होते आणि तेथेच सगळा घोळ झाला. तेथे स्त्री पुरुषांची वेगळी रांग होती. बरेच वेळा रांग एकच असते. त्यावेळी आम्ही शेवटपर्यंत बरोबरच असतो त्यामुळे एकमेकांची चुकामूक होण्याची शक्यता नसते. पण आता मात्र मुकाट्याने आपआपले कागदपत्र व सामान घेऊन आम्ही वेगवेगळ्या रांगेत उभे राहिलो.

बोर्डिंग पासवर आमचे बैठक कमांक व प्रवेशद्वार क्रमांक लिहिलेले होते. नेहमीप्रमाणे पुरुषांची रांग मोठी दिसत होती त्यामुळे सौ. ची तपासणी अगोदर होऊन ती बाहेर उभी राहील ही माझी कल्पना. नेहमीप्रमाणे बूट, बेल्ट, घड्याळ इ. जोखमीच्या(?) वस्तु बास्केटमधून तपासणीपट्ट्यावर ठेवल्यावर कसलाही आवाज न करता सुरक्षाचाळणीतून आत जाऊन पडल्या व मीही तपासणी चौकटीतून आत जाऊन तपासणी अधिकाऱ्याच्या तपासणीस तोंड देऊन बाहेर पडलो व परत सर्व वस्तु अंगावर जेथल्या तेथे स्थापन करून मागील दारातून बाहेर पडलो. तेथे एक खाली जाणारा जिना आहे तेथे सौ. चा पत्ता नव्हता त्यामुळे ती जिना उतरून खाली उभी राहिली असेल असे वाटून जिना उतरून खाली गेलो तर तेथेही ती नव्हती.

खरेतर नेहमीप्रमाणे ती माझी वाट पाहत बसलेली असेल असा माझा अंदाज होता पण यावेळी बरेच विमानप्रवास केल्यामुळे अधिकच हुशार होऊन व द्वार क्रमांक माहीत असल्यामुळे ती सरळ तिकडेच गेली असेल असे वाटून मी त्या दिशेने भरभर चालायला सुरवात केली. वाटले की या गतीने चालल्यावर आपण तिला गाठू. पण यावेळी तिने भलतीच चपळाई दाखवली असे दिसले कारण वाटेतही मी तिला गाठू शकलो नाही. आणि आमच्या बोर्डिंग पासात नमूद केलेल्या द्वारक्रमांकासमोरील विश्रामकक्षात ती

दिसेल अशा आशेने पहातो तो काय तेथेही तिचा पत्ता नाही. आता मात्र शंकेची पाल मनात चुकचुकली की ही वाटेत चुकली की काय. खरे तर विमानतळावर चुकण्याचे कारण नाही. बरं मोबाइलवर संपर्क साधावा तर आमच्या शेजाऱ्यांशी बातचीत करून आमच्या फ्लॅटच्या सुरक्षिततेची खात्री करून घेतल्यावर अतिशहाणपणा करून तो मी बंद करून ठेवण्यास सांगितला होता. आता तिला तो चालू करण्याची बुद्धी व्हावी अशी देवापाशी मी प्रार्थना केली व परत येताना एका ठिकाणी मदतकेंद्र होते तेथे जाऊन माझी बायको हरवली आहे तिच्याशी संपर्क करायचा आहे असे सांगितले.

मदत केंद्रावरील सुरक्षासेवकाने जत्रेत हरवलेल्या मुलासारख्या (त्या मुलाच्या दृष्टीने त्याची आई हरवलेली असते)माझ्या केविलवाण्या मुद्रेकडे पाहिल्यावर मी सांगितले नसते तरी याची बायको हरवली असणार हे समजून घेतले असते, त्यामुळे मला मोबाइल क्रमांक विचारून तो लावला व माझ्या हातात रिसीव्हर दिला पण "आप जिस मोबाइलसे संपर्क करना चाहते है वह अभी बंद है " असा संदेश मला मिळाला. आणि तो अपेक्षितच होता कारण मी बंद केलेला मोबाइल चालू करणे तिच्या लक्षात येईल अशी शक्यता फारच कमी होती

मग पुन्हा एकदा मी आमच्या विमानसेवेचे द्वार क्रमांक ३४ कडे मोर्चा वळवला. आशा होती की तेथे मला दिसेल. पण पुन्हा तेथे तिचा मागमूसही नाही. म्हणजे "स्वप्नवासवदत्ता " नाटकातील राजासारखे, "दशदिशांस पुसतो पुसतो वेड्या नभा, ती कुठे राजसा माझी प्रिय वल्लभा "असे म्हणत फिरण्याची वेळ आली. परत येताना पुन्हा त्या सुरक्षा जवानाला काय झाले ते सांगितले व अजूनही ती सुरक्षाचाचणीच्याच विभागात असेल तर तिच्या नावाचा पुकारा करून माझ्याशी संपर्क तिने साधावा असे घोषित करावे अशी विनंती त्याला केल्यावर त्याने तसे करण्याचे मान्य केले. त्यालाही कदाचित माझ्यावरील गंभीर प्रसंगाची कल्पना आली असावी.

सुरक्षा रक्षकाने सुरक्षा चाचणी चालू असलेल्या भागात उद्घोषणा करण्यासाठी तिकडे तसे कळवले म्हणजे आमची बायको हरवली ही आता ब्रेकिंग न्यूज झाली पण ती तिच्या कानावर पडण्याची शक्यता आहे की नाही याविषयी मी साशंक होतो म्हणून स्वत: शोध घेणे मात्र जारीच ठेवायचा निश्चय केला व सगळयात जास्त ती कोठे असण्याची शक्यता आहे याचा विचार करू लागलो.

वस्तू शोधण्याच्या बाबतीत आमच्या बायकोनेच घालून दिलेला जो नियम मी कटाक्षाने पाळण्याचा प्रयत्न करूनही माझ्याकडून पाळला जात नाही तो म्हणजे जिथे ती वस्तू असण्याची जास्तीतजास्त शक्यता असते ती जागाच अगदी कसोशीने शोधायची, पण याबाबतीत कसे काय कुणास ठाउक मी कमी पडतोच आणि नंतर ती शांतपणे त्याच ठिकाणातून ती वस्तू काढून"ही काय इथेच आहे" असे म्हणून माझ्या मते मला खिजवते, पण तिच्या मते ती फक्त दाखवते. तिच्या मुद्रेवरील भाव खरे तर मलाच कळतात पण असो, आता तिलाच शोधायला तिच्या या कसबाचा उपयोग होणार नसला तरी तिच्या या पद्धतीचाच वापर करावा लागेल असे मला वाटून अगदी निश्चितपणे ती थांबण्याची जागा म्हणजे सुरक्षाचाचणीतून बाहेर पडल्यावर म्हणजे जो जिना उतरून मी घाईने निघालो होतो त्याच जिन्याखालील जागाच नीट तपासणे आवश्यक आहे असा निष्कर्ष काढला आणि मी तेथे जाऊन पाहतो तो काय समोर साक्षात तीच उभी. पण नुसती नव्हे तर साक्षात महिषासुरमर्दिनीच्या अवतारात उभी!

आता Best way of defense is offense या तत्त्वानुसार मी तिला शोधण्यासाठी जी धावपळ केली त्याचा अहवाल देऊन "कमालच आहे तुझी सगळा विमानतळ पालथा घातला तुला शोधण्यासाठी, आणि मोबाइल चालू करायला काय झाले होते? "

अश्या चोराच्या उलट्या बोंबा मारण्याचा प्रयत्न केला. पण हा माझा बचाव करण्याचा प्रयत्न करून मी चांगलाच तोंडघशी पडलो. आतापर्यंत तिने दुर्गेचा अबतारच धारण केला होता पण आता तेवढ्यावर थोडेच भागणार होते? आमच्या द्वारक्रमांकापर्यंत जाईपर्यंत आणि नंतरही बराच काळ लग्नानंतर मी आजपर्यंत किती आणि कोणत्या चुका केल्या याचा पूर्ण इतिहास मला तिच्या तोंडून ऐकावा लागला. जणु अमेरिकेपर्यंत मी तिला चालतच यायला लावले आहे अश्या थाटात यापूर्वीही एकदा स्कूटरवर माझ्या मागे ती बसली असताना एका ठिकाणी काही कारणाने थांबावे लागले असता, नंतर गाडी सुरू करताना ती मागे बसलीच नव्हती याची दखल न घेता मी गाडी तशीच दामटून घरी गेलो आणि तिला कसे चालत घरी यायला लावले याही प्रसंगाची उजळणी झाली. तिच्याकडून मात्र आयुष्यात एकच चूक झाल्याचे तिने कबूल केले ती म्हणजे माझ्याबरोबर लग्न करणे, हेही समजले. तरीही माझ्या चुका पदरात घेणारी व्यक्ती सापडल्याच्या आनंदात ते सर्व मी शांतपणे ऐकून घेतले कारण आता आणखी चुका करायला मी मोकळा झालो होतो.

# ४७. मुक्काम मिनिओपोलिस

आमच्या पाचव्या वारीच्या काही दिवस अगोदरच जयवंतला एडिसनहून हलावे लागले होते. कारण टी. सी. एस. च्या ज्या प्रकल्पासाठी तो तेथे गेला होता तो संपला होता. त्यावेळी तो जी. ई. हेल्थ या कंपनीसाठी काम करत होता. त्यांनी त्यांचे खाते सत्यमकडे सोपवायचे ठरवले (त्यावेळी सत्यमचा घोटाळा बाहेर आला नव्हता)त्यामुळे त्याला दुसऱ्या जागी जावे लागणार हे उघडच होते कारण टी. सी. एस. चा दुसरा ग्राहक एडिसनजवळ नव्हता. त्याला दोन तीन जागा सुचवण्यात आल्या होत्या. हा सगळा प्रकार आम्ही चौथ्यांदा अमेरिकेस गेलो होतो तेव्हांच चालला होता. पण आम्ही परतल्यावर त्याला मिनिआपोलिसचे अलियांझ या कंपनीच्या कामावर रुजू व्हायला सांगण्यात आले आणि तो मार्चमध्ये तेथे सहकुटुंब गेला होता. आम्ही फेब्रुवारीत परतलो होतो त्यामुळे लगेचच परत जाऊ असे वाटत नव्हते पण आमच्या नातवांचा हट्ट आणि त्याना पुन्हा पहाण्याची इच्छा यांनी आम्हाला भारतात बसू दिले नाही आणि त्यामुळे आम्ही परत आलयावर सहा महिन्यातच परत जावे असे वाटू लागले आणि

पुन्हा २००८ च्याच ऑगस्ट महिन्याच्या २७ तारखेस आम्ही कॉंटिनेंटलच्या विमानसेवेने परत अमेरिकेत जावयास निघालो.

कॉंटिनेंटलने आम्ही यावेळी प्रथमच प्रवास केला. या उड्डाणाचा मोठा फायदा असा वाटला की हे मुंबईहून रात्री नऊ वाजता निघून कोठेही न थांबता सरळ पहाटे ५-४५ ला नेवार्कला जाणारे उड्डाण आहे, त्यामुळे मुंबईतून आडवेळेला निघावे लागत नव्हते, प्रवास जवळजवळ रात्रीच होत होता आणि नेवार्कला न्यावयास येण्यासाठी मुलाला रजा घ्यायचे कारण नव्हते. एकूण प्रवासही ठीक झाला.

नेवार्कला पोचल्यावर इमिग्रेशन अधिकाऱ्यानेही लगेचच सहा महिन्याच्या वास्तव्याची परवानगी दिल्यावर सुटकेचा निश्वास सोडून बाहेर पडल्यावर आम्हाला आमच्या बॅगा आमची जणु वाटच पहात असल्यासारख्या सामानाच्या पट्ट्यावरून फिरत असलेल्या दिसल्या. येऊनजावून त्यासाठी ट्रॉल्या मात्र सहा डॉलर भरून घ्यावयाच्या होत्या त्या बरोबर असणाऱ्या एका सहप्रवाशाने सोडवून दिल्यावर (अर्थात सहा डॉलर आम्ही दिले) लगेचच आम्ही बाहेर पडलो त्यावेळी पहाटेचे साडेसहाच वाजत होते. मात्र नेहमीप्रमाणे आम्हाला न्यावयाला येणाऱ्या सुजितचा वा संयुक्ताचा पत्ता नव्हता या वेळी जयवंत आणि त्यांचे कुटुंबीय तेथे नव्हतेच

त्यामुळे. आजपर्यंत प्रत्येक वेळी आम्ही बाहेर पडताच सर्व मुला नातवंडांचे चेहरे पहाण्याची संवय झालेल्या आम्हाला पहाटेच्या थंड वेळी अशा थंड्या स्वागताची अपेक्षा नव्हती. मग एक भारतीय व्यक्ती भ्रमणध्वनी करत्त असताना पाहिल्यावर तिलाच वेठीस धरून त्याच्या मोबाइलवर संयुक्ताचा नंबर लावला आणि तो लागला ती विमानतळावरच होती पण नेहमीप्रमाणे आम्ही एअर इंडियाने न आल्यामुळे तिचा अंदाज जरा चुकला होता. म्हणजे ती कॉंटिनेंटलसाठी राखीव पार्किंग बघूनच तिकडे गेली होती पण तेथील प्रवेशद्वार आंतरराष्ट्रीय विमानाच्या प्रवाशांना बाहेर किंवा आत जाण्यासाठी नव्हते ही सूचना तिला दिसली नव्हती. काहीका असेना आमचा संपर्क साधला होता त्यामुळे ती केव्हातरी येईल आणि आम्हाला घेऊन जाईल याची खात्री होती.

शेवटी आम्ही एकदाचे पाचव्यांदा अमेरिकेत पोचलो होतो. एडिसनला आम्ही पोचल्यावर लगेचच गणपती आणि गौरी यांची आगमन होत होते. खरे तर त्यांच्या स्वागतासाठीच इतके तडातापडीने आम्ही गेलो होतो. त्यामुळे आम्ही फारशी विश्रांती न घेता लगेचच तयारीला लागलो. यावेळी संयुक्ता पण नोकरीवर जाऊ लागली होती पण सुदैवाने त्या काळात तिला सुट्टी म्हणजे रजा मिळाली होती आणि त्यामुळे अगदी पुण्यात व्हावा तशाच उत्साहात गणपतीचे व गौरींचेही आगमन झाले. आजूबाजूच्या

भारतीय कुटुंबानी त्यात भाग घेऊन आमच्या उत्साहात भर घातली आणि त्यानंतर आम्हाला नवरात्र साजरे करण्यासाठी मिनिआपोलिसला जाण्याचे वेध लागले.

पहिल्यांदा २००९ मध्ये नेवार्कहून मिनिआपोलिसला २० सेप्टेंबरला निघणारी आणि तिकडून २५ डिसेंबरला परत येणारे कॉंटिनेंटलचेच उड्डाण आम्हाला मिळाले. हा प्रवास फक्त दोनच तासाचा असल्यामुळे आणि मिनिआपोलिसची प्रमाणवेळ एडिसनपेक्षा एक तासाने मागे असल्यामुळे आम्ही संध्याकाळी ५-४५ लाच मिनिआपोलिसला पोचलो.

डोमेस्टिक उड्डाणाच्या बाबतीत एक गोष्ट चांगली असते त्यात पोचवायला अगर न्यायला येणारी मंडळी अगदी बॅगेज ज्या विभागातून उतरवून घेतो तेथपर्यंत आत येऊ शकतात त्यामुळे आमच्यासारख्या नवागतांची पंचाईत होत नाही. आमचे विमान मिनिआपोलिसच्या विमानतळात शिरतानाच मी जयवंतला मोबाईलवरून संपर्क साधून आमचे उड्डाण तेथे पोचल्याची वर्दी दिली त्यामुळे बॅगेज क्लेमच्या पट्ट्यापाशीच तो आमची वाट पहात उभाच होता त्यामुळे पट्ट्यावरून सामान काढण्यापासूनच आम्हाला त्याची मदत झाली. सौ. भाग्यश्री आणि नातवंडे येण्याची अपेक्षा आणि आवश्यकता नव्हती.

मिनिआपोलिसमध्ये प्रवेश करतानाच हे जरा लहान शहर आहे हे जाणवले. येथे थंडी फारच आहे अशी भीती आम्हाला घालण्यात आली होती, आणि त्यात तथ्यही होतेच कारण आम्ही येण्यापूर्वीच एकदा तेथे हिमवर्षाव होऊन गेलाच होता. त्यामुळे आम्ही विमानात बसतानाच स्वेटर, जॅकेट असे कपड्यांचे एकावर एक थर चढवले होते त्याची काही आवश्यकता नव्हती असे खाली आल्यावर जाणवले. कारण आम्ही येणार असे कळल्यावर बहुधा थंडीने आपला मुक्काम हलवला होता इतका की त्या दिवशी एडिसनपेक्षाही हॉपकिन्स या जयवंत रहात असलेल्या उपनगराचे तपमान जास्त होते.

हॉपकिन्स या विभागात जयवंतची सदनिका होती. त्या रस्त्याचे नाव व्हॅन ब्यूरेन अवेन्यू नॉर्थ असे आहे आणि त्याच्या इमारतीचा क्रमांक ४२१ होता. या संकुलाचे नाव रॅम्सगेट असे असून त्यात तीन इमारती आहेत त्यातील बाकीच्या दोन ५०० आणि ७२५ क्रमांकाच्या होत्या. हे क्रमांक कसे देण्यात आले हे कोणालाच माहीत नाही पण बहुधा हे प्लॉट क्रमांक असावेत असे मला वाटते.

आमचे स्वागत जरी कमी थंडीने झाले तरी एकूण येथे थंडी खूपच असते. कधीकधी तपमान शून्याखाली २०-२५ अंश फॅ.

इतके जात असल्यामुळे रस्ते हिमवर्षावामुळे खराब होतात त्यामुळे त्यांची देखभाल चांगली असते आणि थंडी सुरू होण्यापूर्वीच रस्ते व्यवस्थित करण्याची दक्षता घेतात हे मला फिरायला जाताना पहावयास मिळाले. आणि पावसाळा सुरू आल्यावर गटारे साफ करायला सुरवात करणाऱ्या आपल्या महापालिकांची आठवण झाली.

# ४८. रॅम्सगेट संकुल

रॅम्सगेट संकुलाविषयी सांगणे आवश्यक आहे असे मला वाटते कारण अशा प्रकारचे संकुल असू शकते यावर निदान भारतातील तरी कुणाचाच विश्वास बसणार नाही इतकेच काय आम्ही आमच्या अमेरिकेतील परिचितांना फोन करून वर्णन केल्यावर त्यांनाही आश्चर्य वाटले. जयवन्तच्या सांगण्यावरून असेही कळले की त्याने एडिसनहून येतानाच त्याच्या मित्राला तेथे जागा घेऊन ठेवण्यास सांगितले होते तर तो त्याच्या कुटुंबासह तेथे पोचला तेव्हा त्याचा फ्लॅट त्याच्या स्वागतासाठी तयार ठेवण्यात आला होता. म्हणजे स्वच्छ करून रेस्ट रूममध्ये साबण, , टॉयलेट कागदाच्या गुंडाळया व डिसिन्फेक्टन्ट्ची बाटली एवढेच काय पण दिवाणखान्यात पुष्पगुच्छ अशी त्याच्या स्वागताची तयारी करून ठेवण्यात आलेली होती. मिनिओपोलिसम्ध्ये रहाण्याच्या जागा मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याचा परिणाम असेल कदाचित! नंतरही बऱ्याच ठिकाणी जागा भाड्याने देण्याच्या पाट्या आम्हाला बाहेर फिरू लागल्यावर दिसल्या.

ज्या दिवशी आम्ही रॅम्सगेटमध्ये पाऊल ठेवले त्याच दिवशी संध्याकाळी संकुलातर्फे संध्याकाळीचे गेट टुगेदर होते. त्यात सर्व

संकुलातील कुटुंबे ४२१ म्हणजे आमच्याच इमारतीच्या आतील पार्टी हॉलमध्ये जमली होती. अशाच पद्धतीने महिन्याच्या शेवटच्या रविवारी सकाळी नाश्त्यासाठी सर्व कुटुंबांना संकुलातर्फे बोलावण्यात येते. त्यामुळे गेलो त्याच दिवशी आमच्या संकुलातील चार पाच मराठी कुटुंबांचा परिचय झाला. त्यातील एकातील आजी आजोबा पण आले होते आणि ते आमच्यासारखेच पुण्याहून आले होते एवढेच नव्हे तर आमचे काही समान मित्रही आहेत याचा शोध लागला. भारतीय कुटुंबे तर इतकी होती की आम्ही अमेरिकेत आलो नसून काही अमेरिकनच भारतात पाहुणे म्हणून आलेत असे वाटू लागले. या सर्व मराठी माणसांचे स्नेहसम्मेलन दिवाळीत आमच्या सुनेने आणि तिच्या मैत्रिणीने पुढाकार घेऊन आयोजित केले त्याला ३०-३५ जण आले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी आमच्या मोठ्या नातवाने माझ्या फिरण्याच्या वेळी त्या भागाचे एक टुरिस्ट गाइडच्या थाटात त्याला व मला झेपेल एवढ्या मार्गावर हिंडवून मार्गदर्शन केल्यामुळे दुसऱ्या दिवसापासून मी एकटाच सकाळच्या माझ्या फिरण्याचे आयोजन करू लागलो.

रॅम्सगेट संकुलात तीन अगदी सारख्या इमारती एकमेकाकडे पाठी करून उभारण्यात आल्या आहेत आणि त्या तिन्ही इतक्या सारख्या आहेत की चुकून आपण दुसऱ्या इमारतीत शिरलो तरी पत्ता लागणे शक्य नाही. बाहेरूनही त्या अगदी सारख्या आहेत तेव्हा आत शिरताना नंबर पाहिला तरच आपण आपल्याच इमारतीत शिरतो याचा बोध होतो. एकमेकाशी काटकोन करून उभ्या असल्याने समोरील रस्ते मात्र वेगवेगळे आहेत. आमच्या ४२१ समोरील रस्ता व्हॅन ब्यूरेन अव्हेन्यू नॉर्थ तर बाकीच्या दोन इमारतीसमोरील रस्त्यांची नावे केंब्रिज रोड व लेक रोड अशी आहेत. माझा फिरण्याचा मार्ग लेक रोडवरून टायलर रोड त्याला काटकोनातील सेकंड स्ट्रीट, नंतर ब्लेक रोड व शेवटी केंब्रिज रोडवरून रॅम्सगेट असा होता. प्रत्येक इमारतीच्या समोर मोठे पार्किंग क्षेत्र तर आहेच पण समोर छान झाडी पण लावलेली आणि व्यवस्थित राखलेली आहे. समोर फुलांचे ताटवे पण आहेत. अर्थात आम्ही तेथे गेल्यावर पहिले काही दिवसच त्या सौंदर्याचा आस्वाद घेणे शक्य झाले कारण नंतर हिमवर्षावामुळे त्या सर्वांची वाट लागली एवढेच काय झाडांपैकी फक्त सूचिपर्णी झाडेच काय ती टिकून राहिली बाकी सर्व झाडांवर एकही पान पहायला मिळत नव्हते आम्ही गेल्यावर काही दिवस आम्हाला फॉल कलर पहायला मिळाले. प्रवेशद्वारासमोर रॅम्सगेटचा छाप म्हणजे

मेंढ्याच्या मुखवट्याचे चित्र आहे, आणि छोटासा पाण्याचा हौद आणि त्यात काही प्रदर्शनीय दगड धोंडे छोटासा शोभेचा धबधबा पण होता. थॅंक्स गिव्हिंगपासून त्यात हरीण, रेनडियर व स्नोमॅन यांच्या प्रतिकृतींचे लोखंडी सांगाडे विद्युतमाळांनी प्रकाशित केलेले ठेवले होते ते बहुधा नाताळपर्यंत ठेवत असावेत.

प्रत्येक इमारतीत शिरण्यासाठी एक काचेचे मोठे प्रवेशद्वार आहे त्यातून आत शिरल्यावर एक छोटा मोकळा भाग असून त्यात उजव्या बाजूस छोटे बाक ठेवलेले आहे. . डाव्या बाजूस इमारतीतील भाडेकरूंची नावे लिहिलेली यादी एका काचेच्या चौकटीत लावलेली दिसते. जर तुमच्याकडे किल्ली असेल तर आतील काचेचा दुसरा दरवाजा तुम्ही उघडू शकता पण तुम्ही पाहुणे असाल तर ज्यांच्याकडे तुम्ही आला असाल त्यांच्या नावासमोरील क्रमांक समोरील फोनसारख्या तबकडीवर दाबला की त्या घरातील व्यक्ती येऊन तो दरवाजा उघडते व तुम्हाला इमारतीत प्रत्यक्ष प्रवेश मिळतो. (आता पुण्यातील आमच्या सदनिकेतही अशीच सोय आहे. मात्र हे काचेचे दार बंद करण्याची खबरदारी फारच थोडे रहिवासी घेतात. मध्ये एकदा मात्र मी बाहेर पडताना प्रवेशकार्ड न घेता बाहेर पडलो. आणि परत आल्यावर पहातो तो काय काचेचे दार बंद! नंतर एक महिला तिच्या दोन मुलींना घेऊन आली. मोठी मुलगी दहा बारा वर्षाची तर धाकटी

कडेवर होती. तिच्याकडे कार्ड असेल असे वाटले पण ते नव्हतेच आणि आमच्या सदनिका क्रमांकाची बटणे दाबूनही वरची घंटी वाजय नव्हती त्यामुळे आम्ही सगळेच अड्कून पडलो तेव्हां त्या महिलेने आपल्या मोठ्या मुलीला “हं दे धक्का “म्हटल्यावर मी तिला विचारू लागलो, ”अहो काय करताय?असे बळजबरीने दार उघडलं तर ते बिघडेल रात्री पण आपली सुरक्षितता कमी होईल पण ती माझा सल्ला ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हती व आपल्या मुलीला तिने जोर लावून दार उघडायला सांगितले व तसे ते उघडलेही. मग तिच्याबरोबर आत जाताना माझे नागरिकशास्त्रावरील भाषण तिने ऐकून घेतले पण तिच्या कडेवर मुलगी होती त्यामुळे असे करावे लागले असे मलाच सुनावले होते.)येथे आत शिरल्यावर आतील भाग वातानुकूलित असतो. आम्ही गेलो तो थंडीचा काळ असल्याने हीटर्स चालू होते.

आमच्या इमारतीत संकुलाची कचेरी आहे ती या काचेच्या दारातून प्रवेश केल्यावर जो मोठा हॉल आहे त्याच्या दोन बाजूच्या मोठ्या दालनात असून आठवड्यातील सातही दिवस तेथे एक वा दोन कर्मचारी असतातच त्यामुळे काही तक्रार नोंदवायची असेल तर कोणीतरी उपलब्ध असतेच. ऑफिसातच सुटी नाणी मिळण्याची सोय आहे कारण वॉशिंग मशीनसाठी ती लागतात. समोरच्या हॉलमध्ये आपल्याला पाठवावयाच्या पत्रांसाठी

पोस्टाची पेटी आहे आणि भाडेकरूंना आलेली पत्रे टाकण्यासाठी त्याच भागात प्रत्येक सदनिकेसाठी वेगळया छोट्या छोट्या पेट्या बसवलेल्या आहेत. त्याची किल्ली सदनिकाधारकाकडे असते. या हॉलच्या आत गेल्यावर वर जाण्यासाठी जिना आणि त्याचशेजारी एलेव्हेटरही आहे पण तो फार हळू चालतो इतका की त्याच्या शेजारी "In case of immergency use the staircase"सूचना आहे हे वाचून हसू येईल पण हा एलेव्हेटर खरे तर जड सामान घेऊन आलेल्या वरच्या भाडेकरूंसाठी आहे. येथे आठवड्यातून एकदा अगर दोनदाच खरेदीसाठी बाहेर पडता येत असल्याने एकदम बरेच सामान आणावे लागते आणि इतके सामान घेऊन जिन्यावरून चढणे अवघड जाते. सामान वाहून नेण्यासाठी ट्रॉलीजही ठेवल्या आहेत त्या जिन्यावरून चढवणे शक्यच नसते म्हणूनच एलेव्हेटर लागतो नाहीतर दोनच मजले असल्यावर त्याची आवश्यकताच नाही. त्यामुळे जिन्यावरून वर चढणे आणि एलेव्हेटरमधून खाली येणे हा आमच्या धाकट्या नातवाचा आवडता खेळ होता. जिन्याच्याजवळच डावीकडे व उजवीकडे जाणारे पायरस्ते असून ते खालच्या सदनिकांकडे जातात. त्यांच्या प्रवेशद्वारांवर कोणत्या क्रमांकाच्या सदनिकांकडे ते जातात ते क्रमांक लिहिलेले आहेत.

या हॉलमध्ये दोन मोठी गोल टेबले व त्यांच्यासभोवती चार चार खुर्च्या, त्याव्यतिरिक्त दोन बाक. एक छोटे टेबल व त्यावर एक

शोभेची कपबशी ठेवलेली वर काच लावलेली छोटी लाकडी पेटी, तिच्या शेजारी दोन खुर्च्या, मध्ये एक मोठे आडवे टेबल याशिवाय भिंतीवर काही चांगल्या लाकडी चित्रांच्या चौकटी याशिवाय भिंतींवर आणखीही काही शोभेच्या चिनी मातीच्या वस्तु यांनी हॉल सजवलेला आहे, हॉलमध्ये हवा वातानुकूलित असूनही दोन पंखे चोवीस तास चालूच असतात व शोभेचे व प्रकाश देणारे हंड्यांमध्ये चोवीस तास जळणारे दिवे आहेत. इमारतीच्या रचनेत लाकडाचा सढळपणे वापर ही येथील थंड हवेमुळे आवश्यक बाब बनली आहे. त्याच बरोबर आगीचाही धोका बराच असतो त्यामुळे आगीची सूचना देणारे गजर सदनिकांकडे जाणाऱ्या आतील पायवाटावर जागोजागी आहेत त्यांच्या साखळया इतक्या खाली लोंबतात की एकादे लहान मूलही मजा म्हणून सहज ओढू शकेल. एकदा एक भारतीय गृहिणी त्या पायवाटेवर उभी राहून तिच्या मैत्रिणीशी गप्पा मारत उभी होती, तिच्या खांद्यावर लहान मूल होते त्याने सहज ती साखळी ओढली आणि अतिशय जोराचा आवाज करणार भोंगा सुरू झाला. आम्ही व सगळेच लोक घाबरून आपापल्या महत्वाच्या सामनाच्या बॅगा भरून बाहेरच्या मोकळया जागेत जमा झाले. दोनच दिवस अगोदर सगळया सुरक्षा यंत्रणेची पहाणी करायला सदनिकेचे अधीक्षकवर्ग येऊन गेले होते आणि त्यानी अशा वेळी काय दक्षता घ्यायची त्याच्या सूचना दिल्या

होत्या, त्यानुसार आमच्यासारखे पाहुणे आपले पासपोर्ट व व्हिसा एका बॅगेत भरून मध्ये जमा झाले. जरी त्या छोट्या मुलाच्या आईने आपल्या मुलाची करामत कबूल केली तरी पहाणी करायला अग्निशामक दलाची गाडी येऊन त्यांनी परवानगी दिल्यावरच आम्हाला आपापल्या सदनिकेत जाता आले.

प्रत्येक इमारतीस तीन बाजूस सदनिका असून मागील एक बाजू मोकळी ठेवून त्यात काही झाडे लावलेली होती. शिवाय कृत्रिम रीतीने टेकडीसारखा उंचवटाही मुद्दाम करून सर्वत्र भरपूर हिरवळ लावलेली आहे या मागील बाजूनेही बाहेर पडण्यासाठी इमारतीला काचेचे दरवाजे असून ते उघडण्यासाठी भाडेकरूला आपल्याकडील किल्लीचा वापर करावा लागतो. त्याच भागात दोन बार्बेक्यू भट्ट्या असून त्याच जवळ काही बाके व खुर्च्या ठेवलेल्या असतात. हवा चांगली असताना काही कुटुंबे त्या भट्टीचा वापर करून पार्टीची मजा लुटू शकतात. लहान मुलांसाठी बिंगोसारखे काही खेळ वगैरे या भागातही हवा चांगली असताना संकुलातर्फे घेण्यात येतात. या भागात आणि सर्वत्रच सीमेंटचे पायरस्ते असून हिमवर्षावानंतर बहुधा लगेचच ते साफ करण्यात येतात असे दिसले. त्यासाठी नेमलेले सेवक संकुलातच रहातात.

बहुतेक दोन शयनकक्षांच्या सदनिका असून आत डिशवॉशर, रेफ्रिजरेटर, गॅसच्या शेगड्या व गॅसचे कनेक्शन, एक पूर्ण व एक अर्धी बाथरूम. त्यात एक टब व गरम व थंड पाण्याचे नळ तसेच वॉश बेसीनवरही, आणि स्वयंपाकघरातील बेसीनलाही, वातानुकूलन आणि उष्ण हवेसाठी वेगळी व्यवस्था या सगळ्या व्यवस्था बहुतेक सर्वच सदनिका संकुलाप्रमाणे. पण येथील वैशिष्ट्य म्हणजे माझा मुलगा रहायला आला तेव्हा बाथरूम व स्वयंपाकघरात कागदी हातरुमाल व टॉयलेट पेपर, छोटी सेंटची बाटली व वेलकमची छोटी पाटी त्याच्या स्वागतासाठी संकुलातर्फे ठेवण्यात आलेले पाहून त्याला आणि हे ऐकून आम्हाला आश्चर्य वाटले. नंतर त्याच्याच विभागासाठी भारतातून आलेल्या त्याच्या सहकाऱ्याला हाच अनुभव आला. त्याच्यासाठी सदनिका राखून ठेवल्याबद्दल जयवंतला २०० डॉलरची भेटही मिळाली. येथे सदनिकांची संख्या बरीच असल्यामुळे असेल पण भाड्याने देणे च्या पाट्या जागोजागी दिसल्या आणि सध्या (त्यावेळी म्हणजे २००९ मध्ये) जागांचे भावही पडल्याने विकाऊ घरांच्या पण! अशी स्थिती आपल्याकडे कधीच येणे शक्य नाही.

संकुलातर्फे महिन्याच्या एक तारखेस ऑफीससमोरील टेबलवर कुकीज व थंड वा गरमही पेय सकाळी आठ वाजल्यापासून संध्याकाळी सहा वाजेपर्यंत ठेवलेले असते. प्रत्येक

व्यक्तीने दोन कुकीज व एक ग्लास वा कप पेय घ्यावे अशी अपेक्षा असते. महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी वा शुक्रवारी संध्याकाळी सात वाजता अपार्टमेंटच्या पार्टी रूममध्ये डेसर्ट या नावाखाली केक्स, पाय व आणखी काही वस्तू ठेवलेल्या असतात आणि सात ते आठ आपल्या सोयीप्रमाणे जाऊन तेथील टेबलांवर बसून तुम्ही खाऊ शकता अथवा वेळ नसेल तर डिशमध्ये घेऊन घरी जाऊ शकता. एका गुरुवारी डिनर असते. ते संध्याकाळी ६-३० ते ८ या काळात असते. एका संध्याकाळी ४ ते ५-३० या काळात चित्रपट दाखवण्यात येतो. महिन्याच्या चौथ्या रविवारी सकाळी कॉंटिनेंटल ब्रेकफास्ट ९-३० ते ११ या काळात असतो यात कुकीज, केक्स, फळे व गरम वा थंड पेय यांचा समावेश असतो. या प्रत्येक कार्यक्रमास संकुलाचे कर्मचारी हसतमुखाने प्रत्येकाचे स्वागत करून देखरेख करीत असतात. आश्चर्य म्हणजे ११ वाजल्यानंतर त्यातील काही वस्तू उरल्या तर त्या कर्मचाऱ्यांच्या घरी न जाता ऑफीस समोरील टेबलवर त्या ठेवल्या जातात आणि जे सकाळी येऊ शकले नसतील असे भाडेकरू त्यांचा आस्वाद घेऊ शकतात याशिवाय अडल्ट बिंगो किड्स बिंगो, चिल्ड्रेन्स क्राफ्ट असे कार्यक्रमही असतात.

याशिवाय होमवर्क हेल्पर असा एक उपक्रमही राबवला जातो त्याला थोडी फी असते व त्यासाठी वेगळी खोली असून तेथे लहान

मुलांची बरीच पुस्तके काही खेळणी व शैक्षणिक साहित्य ठेवलेले आढळले. काही ठराविक दिवशी शाळेत जाणाऱ्या मुलाना गृहपाठ करण्यास मदत केली जाते. प्रत्येक आठवड्याच्या सुरवातीला त्या आठवड्यातील कार्यक्रमाची छापील माहितीपत्रिका प्रत्येक इमारतीत प्रवेश करण्याच्या प्रत्येक दारात प्रवेश केल्यावर दिसेल अशी काचेच्या फ्रेममध्ये लावून ठेवलेली असते.

या संकुलाचे आणखी एक मजेशीर वैशिष्ट्य असे आहे की तुम्हाला जर कराराच्या मुदतीपूर्वी जागा सोडून जावे लागले तर तुम्ही संकुल व्यवस्थेतर्फेच त्या काळात पोटभाडेकरू ठेऊ शकता आणि त्या काळात पुढील काळाचे भाडे तुम्हाला भरावे न लागता तो पोटभाडेकरू भरतो, मात्र तुम्ही तसे न करता जागा सोडली तर कराराची मुदत भरेपर्यंत भाडे तुम्हाला भरावे लागते, अर्थात हा नियम सर्वच संकुलात असतो पण इतरत्र ही पोटभाडेकरू ठेवण्याची सोय नसते. प्रत्यक्षात तुमची कराराची मुदत संपल्यावर जर तुम्हाला पुढे रहायचे असेल तर भाडे काही प्रमाणात वाढते पण तेच तुम्ही दुसऱ्या कोणी जागा सोडल्याने पोटभाडेकरू म्हणून गेलात तर मात्र पूर्वीचेच भाडे चालू रहाते त्यामुळे बरेच लोक भाडे वाचावे म्हणून कराराची मुदत संपल्यावर कोणी त्याचा करार संपण्यापूर्वी सोडून जात असला तर त्याच्या सदनिकेत स्थलांतरित होतात. अगदी पोटभाडेकरू म्हणून न जाता कराराची मुदत

संपल्यावर याच संकुलातील दुसऱ्या सदनिकेत नव्याने जाता येते आणि भाडेवाढ वाचवता येते अर्थात स्थलांतराची कटकट बरीच असते पण तरी पैसे वाचवण्यासाठी बरेच लोक अनेक वेळा स्थलांतर करताना आढळले.

# ४९. मनोरंजन?

तिन्ही इमारतींच्या बरोबर मध्यावर एक मोठी इमारत रेक सेंटर म्हणजे recreation club सारखी असून तेथे दोन टेबलटेनिसची टेबले, एक बिलिअर्ड टेबल एका मोठ्या हॉलमध्ये आणि त्यास लागून असणाऱ्या दुसऱ्या हॉलमध्ये तीन ट्रेड मिल्स, एक सायकलिंग मशीन, दोन वेगळी व्यायामाची मशीन्स, शिवाय डंबेल्स, व्यायाम करण्यासाठी योग्य छोटी टेबले अशी साधने ठेवलेली. त्या खोलीत टी. व्ही. , पंखे, वातानुकूलन अर्थातच असते. व्यायाम करायला येणाऱ्या स्त्रियांना सोयीचे जावे म्हणून एका छोट्या खोलीत लहान मुलांच्या खेळण्याची काही साधने. मुख्य हॉलच्या उजव्या बाजूस एका मोठ्या हॉलमध्ये टी. व्ही. पाच सहा आरामशीर खुर्च्या. दोन मोठी टेबले असून त्यावर बुद्धिबळ वगैरे बैठे खेळ खेळण्याची सोय असते. त्यास जोडूनच पुरुष आणि स्त्रियांची वेगळी प्रसाधन गृहे. या मुख्य हॉलमध्ये प्रवेश करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक चाव्या सर्व सदनिकाधारकांना दिलेल्या असतात. तसेच काचेचे दार मागील बाजूसही असून त्यातून बाहेर पडल्यावर एक मोठा व एक छोटा असे पोहण्याचे तलाव आहेत अर्थात आम्ही गेलो तेव्हां थंडीमुळे ते बंद होते. त्याच्या पलीकडेही

थोडा उंच भाग करून त्यावर टेबल खुर्च्या ठेवलेल्या असून उन्हाळयात त्यावर बसून सूर्यस्नानाचा किंवा काही पेयपान करायचे असेल तर त्याचा आनंद लुटता येतो. त्या आनंदासही थंडीचे दिवस असल्यामुळे आम्हाला मुकावे लागले. या भागातून आत प्रवेश करायला पुन्हा चावी वापरावी लागते नाहीतर आतून कोणालातरी दार उघडावे लागते.

या दारामुळे आम्ही एकदा मोठ्याच अडचणीत सापडलो होतो. डिसेंबरमध्ये तपमान अगदी कमी म्हणजे शून्याखाली गेल्यावर हिमवर्षाव होऊ लागल्यावर सकाळच्या फिरण्याच्या कार्यक्रमास आम्हाला रजा द्यावी लागली त्यामुळे त्याऐवजी रेकसेंटरमध्येच ट्रेडमिलवर आपला चालण्याचा हप्ता पूर्ण करावा असा विचार आम्ही केला आणि त्याप्रमाणे आम्ही सकाळीच तेथे जाऊ लागलो. एक दिवस हिमवर्षाव बराच झाल्याने त्या पार्श्वभूमीवर काही छायाचित्रे घ्यावीत असा विचार करून आम्ही खेळ साहित्याबरोबरच कॅमेरा पण घेऊन गेलो. हिमवर्षाव झाला असूनही चक्क छान ऊन पडले होते त्यामुळे मागील भागात गोठलेल्या तलावाच्या पार्श्वभूमीवर फोटो काढण्याचा मोह सौ. ला झाला. अर्थात त्यात आमच्या छबीपेक्षा पार्श्वभूमीच महत्वाची होती हे उघडच होते. आम्ही जाताना गरम जाकिटे, हातमोजे, गरम कपडे असा सगळा जामानिमा करून जात होतो इतका की आत

शिरल्यावर आम्हाला घामच यावा त्यामुळे आत शिरल्यावर ते सगळे ओझे आम्ही उतरवून ठेवले आणि त्यानंतर फोटो घेण्याची स्फूर्ती सौ. ला झाली. त्यामुळे नेहमीच्या कपड्यावरच मागील काचेच्या दारातून आम्ही बाहेर पडलो. बाहेर पडताना चावी घेतली आहेस का हा प्रश्न मी तिला विचारला आणि तिनेही अगदी आत्मविश्वासपूर्ण होकारार्थी उत्तर दिल्यावर त्यावर शंका घ्यायचे मला काहीच कारण नव्हते.

एकुलता एक फोटो काढल्यावर आम्ही आत जाण्यासाठी सौ. ने किल्ली बाहेर काढली आणि ती पाहून बेशुद्ध पडण्याची पाळी माझ्यावर आली कारण ती चावी रेकसेंटरची नसून घराची होती आणि रेक सेंटरची आम्ही काढून ठेवलेल्या जाकिटामध्ये राहिली होती. रेक सेंटरमध्ये काहीजण व्यायाम करत होते पण त्यानी आतील टी. व्ही. जोरात चालू ठेवला होता त्यामुळे आम्ही दारावर कितीही ठोठावले तरी त्यांचे लक्ष जाऊ शकत नव्हते. मागील बाजूस अगदी भक्कम कुंपण असल्याने आम्हाला पुढील भागात येता येणे शक्य नव्हते कारण पुढील दारावर ठोठावले तर आतील व्यक्तींना ऐकू येण्याची जास्त शक्यता होती. शिवाय पुढील दाराने बऱ्याच वेळा किल्ली घरी विसरून येणाऱ्या व्यक्ती ठोठावून आत प्रवेश मिळवत. मात्र पुढील दाराने प्रवेश करूनच मागेजाता येत असल्यामुळे कोणी दीडशहाणे किल्ली आत ठेवून मागील

बाजूस जातील अशी शंका आतील व्यक्तींना येणे शक्य नव्हते, शिवाय मागील दार व्यायामाच्या जागेपासून पुढील दारापेक्षा जास्त अंतरावर होते. त्यामुळेही त्यावरील ठोठावणे आतल्या व्यक्तीना ऐकू जाणे अवघड होते. या सर्व कारणामुळे मी आता गोठून जाण्याची मानसिक तयारी केली. मागील कुंपणावरून चढून बाहेर पडून पुढे जाण्याचा प्रयत्नही मी करून पाहिला आणि तो माझ्या वयाला साजेसा नव्हता हे कळल्यावर तो लगेच सोडूनही दिला कारण कुंपणावरून पडून हातपाय मोडून घेण्यापेक्षा काही काळ गोठून जाणे परवडण्यासारखे होते. कारण केव्हातरी कोणाचेतरी लक्ष जाईल व आमची तेथून सुटका होईल हे निश्चित होते. सुदैवाने ऊन बऱ्यापैकी कडक असल्याने पारा जरी शून्याखाली असला तरी अगदी असह्य होत नव्हते. मी वेगवेगळ्या पद्धतीने बाहेर कसे पडता येईल याचा विचार करत होतो. अशा थंडीत कोणी घराबाहेरही पडायला तयार नव्हते नाहीतर कोणी दिसले असते तर त्याला सांगून पुढील बाजूने ठोठावण्यास सांगता आले असते. अशी पंधरा मिनिटे गेली तीसुद्धा आम्हाला अगदी अनंत काळासारखी वाटली. सुदैवाने त्याच वेळी एका संकुलातून एक गृहिणी बाहेर पडून रेक सेंटरजवळून बाहेर जाण्याच्या विचारात होती. आश्चर्य म्हणजे नुकताच जयवंतच्या ऑफीसमध्येच रुजू झालेल्या त्याच्या सहकाऱ्याचीच ती पत्नी होती. आम्ही रेक सेंटरच्या मागील बाजूस

हिमविहार करण्याचा आनंद लुटत आहोत असा तिचा समज झाला व आमच्याकडे पाहून हात हालवून ती पुढे जाऊ लागल्यावर सौ. ने आम्ही तेथे मजा लुटत नसून ती आमच्या मूर्खपणाची सजा भोगत आहोत हे सांगून पुढे जाऊन पुढचा दरवाजा ठोठावण्यास सांगितले, त्यानंतर आतील कसरतपटूंना जाग येऊन त्यानी मागील दार उघडून आम्हाला आत घेतले आणि मग आमच्या शरीरात ऊब व जिवात जीव आला.

# ५०. मिनिओपोलिस दर्शन

मिनिओपोलिसच्या आमच्या मुक्कामात दिवस थंडीचे असल्यामुळे आम्हाला बाहेर पडून कितपत फिरता येईल याविषयी शंकाच होती पण थंडीने आमच्यावर मेहेरबानी केल्यामुळे सुरवातीला आम्ही मॉल ऑफ अमेरिका या अमेरिकेतील सर्वात मोठ्या मॉलला भेट देऊ शकलो. या तीन मजली अतिभव्य मॉलमध्ये वस्तू खरेदीप्रमाणेच लोकांना निरनिराळ्या राइडसचाही अनुभव घेता येतो. अर्थात आम्ही डिस्ने लॅंडमध्ये बऱ्याच राइडसचा अनुभव घेतला असल्यामुळे आणि आमच्या वयोमानानुसार चढण्यापेक्षा घसरण्याचाच आमचा व्यासंग दांडगा असल्यामुळे आम्ही त्या फक्त पाहणेच पसंत केले मात्र आमच्या मुलांनी व नातवंडांनी काही राइडसमध्ये बसून त्यांचा आनंद उपभोगला.

मॉलमध्ये प्रवेश करताच एक मोठे लेगो सेंटर लागते त्यात प्लॅस्टिकच्या एकमेकात फसवता येणाऱ्या लहानलहान तुकड्यांपासून (यांनाच लेगो म्हणतात)पृथ्वीचा गोल, ताजमहाल, स्पेस क्राफ्ट अशा मोठ्या वस्तू बनवून त्यांचे प्रदर्शन केले होते त्यासाठी कोट्यावधी लेगो तुकड्यांचा वापर करावा लागला होता.

शिवाय एका टेबलावर लेगोचे अगणित तुकडे ठेवून लहान मुलांनी हवी ती वस्तू बनवावी असे मुलांसाठी आकर्षण करून ठेवले होते आणि त्याभोवती पाचपंचवीस बाळे आणि त्यांची माता पितरे बागडत होती. अर्थात या संधीचा लाभ न घेईल तो प्रथमेश कसला त्याने थोडा वेळ तेथे बसकण मारलीच आमचा वस्तू खरेदीचा विचार नसल्यामुळे सर्व मॉल हिंडून पाहणे आणि जमल्यास मुलांना राइडसचा आस्वाद घेऊ देणे एवढाच कार्यक्रम होता तरीही मध्ये खानपानासाठी विश्रांती घेऊन आम्ही पाच सहा तास त्या मॉलमध्ये काढून सायंकाळी घरी परतलो. त्या मॉलमध्येही एक महाराष्ट्रीय कुटुंब आम्हास भेटलेच आणि थोड्याफार ओळखी पण निघाल्या. आणि मग त्यांच्याबरोबर एक छायाचित्र घेऊन पुढे गेलो.

दोन वेळा प्रथमेशबरोबर फिरायला बाहेर पडून त्याची शाळा पहायला जाण्याचा योग आला तो फार आनंददायक वाटला. नेहमी तो बसने शाळेस जातो पण तशी शाळा बरीच जवळ आहे त्यामुळे दोनदा रविवारी शाळेला सुट्टी असूनही माझ्या फिरायला जायच्या वेळी तोही जागा झालेला होता नाहीतर एरवी तो सुट्टी असल्यामुळे नऊपर्यंत झोपण्याचा आनंद लुटायचा. तो उठून माझ्याबरोबर येतो म्हणाला आणि खरेच तो मला शाळेपर्यंत घेऊन गेला. हॉपकिन्स डाउनटाउन कडे जाणाऱ्या रस्त्यावर त्याची शाळा होती आणि त्याने मला व्यवस्थित चालवत शाळेपर्यंत नेले. वाटेतच

हॉपकिन्सचे ग्रंथालयही लागते. तेथेही आम्ही एकदा गेलो. यावेळी येथील मुक्कामात या ग्रंथालयात बऱ्याच वेळा आलो. आमच्या घरात प्रथमेशनेच या ग्रंथालयाचा जास्तीतजास्त वापर केला असावा.

ग्रंथालयात पुस्तके घेण्यासाठी आपल्याला एक प्लस्टिकचे ओळखपत्र मिळते ते प्रवेशद्वाराशेजारी असलेल्या यंत्राच्या फटीत सारल्यावर पुस्तके ठेवा असा आदेश येतो मग एक एक पुस्तक टेबलावरील खूण केलेल्या जागेवर ठेवताच त्याची नोंद होते. अशी सर्व पुस्तके घेवून झाल्यावर ते ओळखपत्र काढून घेतल्यावर संपूर्ण यादी बाहेर येते त्यावर सर्व पुस्तकांची नावे घेतल्याचा दिनांक व परतीचा दिनांक याची नोंद झालेली असते. . पुस्तक वेळेवर परत न केल्यास काही रक्कम दंड म्हणून वसूल करतात आणि ती देईपर्यंत नवीन पुस्तके मिळत नाहीत. या सगळ्या सेवेसाठी आणि पुस्तके मिळण्यासाठी मात्र काहीही शुल्क लागत नाही. एका वेळी तुम्ही कितीही पुस्तके घेऊ शकता. एकटा प्रथमेशच एकावेळी वीस वीस पुस्तके घेत असे आणि ती महिन्याभरातच वाचून त्यांचा फडशा पाडत असे. ग्रंथालयात त्याच्याच बरोबरीची बरीच मुले येऊन वाचन करत असलेली पाहून आनंद वाटला. वयाच्या आठव्या वर्षी अगदी सहज संगणकावर आपल्याला हव्या असलेल्या पुस्तकाचे नाव लिहून ते उपलब्ध आहे का हे पाहून

तेथील कर्मचाऱ्यास ते केव्हा उपलब्ध होईल याविषयी तो चौकशी करत असलेला पाहून मला मोठे कौतुक वाटले. आपल्याकडे ग्रंथालयाचा लाभ घेणारी या वयाची मुले फारच कमी आढळतात. त्याचे मुख्य कारण चांगले ग्रंथालय घराजवळ नसतेच म्हटले तरी चालेल आणि जितक्या सुलभतेने मुलांना पुस्तके उपलब्ध होत होती त्या सुलभतेचा अभाव. आपल्याकडील ग्रंथालयात आपल्याला हवे ते पुस्तक मिळणे म्हणजे अगदी कपिलाशष्ठीचा योग. चुकून ते पुस्तक असलेच तर ते कोणीतरी नेलेले असते आणि ते आपल्याला केव्हा मिळेल हे सांगणे ग्रंथालय चालकाला शक्य नसते. येथे मात्र प्रथमेशने मागितलेले पुस्तक त्याला किती महिन्यानी उपलब्ध होईल हे बरोबर सांगण्यात आले. तुम्ही मागितलेले पुस्तक उपलब्ध होताच तुम्हाला विरोपाने कळवले जाते मात्र ते तुम्ही न नेल्यास तुम्हाला थोडा दंड भरावा लागतो.

मिनिआपोलिसमध्ये आणखी एक संस्मरणीय सहल म्हणजे बसने डाउनटाउनला प्रवास. या बसेस आगदी आमच्या संकुलाच्या दारातच थांबत होत्या त्यामुळे एक दिवस कारने गावात न जाता बसने जायचे ठरवले. सकाळी अकरा वाजता निघणाऱ्या बसने आम्ही निघालो. कोठेही गेले तरी तिकिट तेवढेच म्हणजे पावणेदोन डॉलर प्रत्येकी होते. बसचा पासही असतो. बसला दोन दरवाजे असतात त्यातील पुढचा चालकाशेजारचा मोठा असतो.

त्यातून आत शिरल्यावर तिकिटाएवढी रक्कम चालकाशेजारील पेटीत टाकल्यावर तोच तिकिटे देतो. पास असल्यास तो दाखवल्यावर आत प्रवेश मिळतो. एकादा अपंग माणूस बसस्टॉपवर चाकाच्या खुर्चीवर असेल तर समोरील दाराची रचना बदलून एक उतरती फळी पुढील दारातून रस्त्यापर्यंत जाते मग चालक खाली उतरून त्यावरून त्या अपंग माणसास खुर्चीसह आत ढकलतो. चालकाच्याच मागील भागात खुर्चीसाठी जागा असते आणि बस चालू झाल्यावर खुर्ची हालू नये म्हणून तिच्या पायात अडकवण्यासाठी साखळी असते. हे सर्व काम अपंग व्यक्तीबरोबर दुसरे कोणी नसेल तर चालकच करतो. आणि त्या व्यक्तीस योग्य त्या थांब्यावर उतरवूनही तोच देतो. या अपंगांना तिकिटातही सवलत असते, तशीच सवलत ज्येष्ठ नागरिकांनाही असते आमच्याकडे तसे प्रमाणपत्र नसल्यामुळे आम्ही त्याचा वापर करू शकलो नाही. सर्व लोक व्यवस्थित चढल्यावर बसची दारे लागतात आणि मगच बस सुरू होते.

बसची लांबी बरीच असते आणि मागील भाग जरा वरच्या पातळीवर असतो. काही जागा ज्येष्ठ नागरिकांसाठी (खरोखरच) राखलेल्या असतात. मागील दार बसच्या लांबीच्या मध्यावर असते आणि मागील भागातील प्रवासी त्याचा वापर करतात पण ते दार जोपर्यंत तुमचा हात विशिष्ट खूण केलेल्या भागात असतो

तोपर्यंतच उघडा राहतो त्यामुळे तुम्ही खाली उतरला की ते आपोआप बंद होते त्यामुळे ते बंद करण्याकडे चालकास लक्ष द्यावे लागत नाही. पुढचे दार उघडणे आणि बंद करणे ही मात्र त्याची जबाबदारी असते. बस वातानुकूलित असल्यामुळे दारे घट्ट बंद असणे आवश्यक असते. मात्र या सर्व गोष्टींमुळे बसला एकूण प्रवासास बराच वेळ लागतो. म्हणजे ती रॅम्सगेट संकुलासमोरूनच निघाल्यावर डाउनटाउनच्या शेवटच्या थांब्यावर पोचायला सहज एक तास घेत असे. त्यामुळे मला आम्ही काही काळ सोलापुरात राहत होतो त्याकाळात सोमपा (सोलापूर महानगरपालिका)च्या बसने केलेला प्रवास आठवला. म्हणजे आम्ही राहत होतो त्या कुमठा नाकापासून सुटणारी बस शेवटी गावात जात असे तिचा मार्ग विकासनगर, सात रस्ता करून सोलापूर स्टेशन वरून महापालिका ते हुतात्माचौक असा होता. आमची मुले त्या बसने शाळेत जायची आणि ती त्यावेळी वयाने लहान असल्याने विकासनगरमधील शाळेपर्यंत त्यांना सोडायला माझी पत्नीच जायची. दोनतीन वेळा तिला पाहिल्यावर एके दिवशी वाहकास दया येऊन त्याने तिला सांगितले, "बाई तुम्ही कशाला त्रास घेताय त्या मुलांना आम्ही बरोबर शाळेसमोर उतरवू आणि ती शाळेच्या फाटकात शिरल्यावरच बस हलवू मग तर झाले? "अशा प्रेमळ वाहक चालकामुळे कुमठानाक्यापासून हुतात्मा चौकात जायला ती बस

बरोबर एक तास घ्यायची शिवाय स्टेशनच्या थांब्यावर वाहक चालक बदलत असत त्यामुळे आणखी पाच दहा मिनिटे सहजच जायची.

त्यावेळी सोलापुरच्या लोकांच्या सहनशक्तीचे मला कौतुक वाटत होते पण आता मिनिआपोलिसमधील डाउनटाउन बस हा तिचाच अवतार आहे हे पाहून आता मिनिआपोलिसकरांचेही कौतुक करावे वाटायला लागले. या बसचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे एकदा घेतलेले तिकिट तीन तास चालत असे त्यामुळे तुम्ही मध्ये उतरून काही काम आटोपून पुढे जायचे असेल आणि ते काम तीन तासाच्या आत आटोपले तर पुढे किंवा परत त्याच तिकिटावर जाऊ शकता, त्यामुळे त्यादिवशी आम्ही गावातील चक्कर आटोपून त्याच तिकिटावर परत निवासस्थानी गेलो. एकाद्या थांब्यावर एकादा अपंग प्रवासी उभा असेल तर त्यासाठी बसच्या प्रवेशद्वाराजवळील पायऱ्यांच्या जागी एक रॅम्प टाकून चालक स्वत: उतरून त्या प्रवाश्यास आत चढवतो, नंतर तो रॅंप काढून दार बंद करून मग गाडी सुरू करतो. त्यामुळे ही बस प्रवाश्यास लागणाऱ्या वेळेच्या बाबतीत सोलापूरच्या बसवर वरताण करते.

याच बसने आणखी एकदा आम्ही डाउनटाउनला गेलो ते थॅंक्स गिविंगची परेड बघायला. ती संध्याकाळी सहा वाजता निघत

असे. त्यामुळे आम्ही चार साडेचार वाजताच्या बसने गेलो. त्या परेडमुळे बसचे मार्गही जरा बदलले होते त्यामुळे बस नेहमीच्या ठिकाणी थांबणार नव्हती पण बसमधील एका प्रवासी महिलेने अगदी उत्साहाने ती कोठे थांबते आणि परेड कशी जाते याचे वर्णन केले आणि त्यामुळे आम्ही योग्य ठिकाणी उतरलो. आश्चर्य म्हणजे ज्या रस्त्यावरून परेड जाणार होती त्याच्या दुतर्फा लोकानी अगदी जत्रेत करावी तशी गर्दी केली होती, रस्त्यात उघड्यावर थंडी बरीच वाजत असल्याने आणि मॅसीज या मोठ्या मॉलच्या वरच्या मजल्यावरूनही ती परेड चांगली बघता येते असे कळल्यामुळे आम्ही मॅसीजमध्ये शिरून तिसऱ्या मजल्यावरील दोन भागांना जोडणारा जो मोठा बंद मार्ग होता त्याच्यावर गेलो. तो वरून बंदिस्त केलेला असल्यामुळे व बाजूला काच बसवलेली असल्यामुळे तेथून परेड चांगली दिसण्याची शक्यता होती, पण मजा म्हणजे तेथेही लोक अगदी खुर्च्या, शाली सतरंज्या घेऊन पाच वाजल्यापासूनच ठाण मांडून बसलेले होते. दोन बाजूला तात्पुरते कठडे करून बघणाऱ्या लोकांनी त्याच्या आतच राहून मधला मार्ग येणाऱ्या जाणाऱ्या लोकांसाठी खुला राहील याची दक्षता पोलिस घेत होते.

बरोबर सहा वाजता परेड सुरू झाली आणि डिस्नेची निरनिराळी पात्रे (मिकी माउस सिंड्रेला वगैरे)मिरवणुकीने येऊ

लागली. सहा वाजले तरी सूर्यास्त संध्याकाळी चार वाजताच होत असल्याने अंधार बऱ्यापैकी होता अर्थात परेडमधील पात्रांवर बऱ्यापैकी प्रकाशदीप होते तरीही त्यांच्यावर फारसा उजेड पडत नव्हता आणि त्यामुळे इतक्या उंचावरून त्याना नीट पाहता येत नव्हते. अशा प्रकारची परेड आम्ही भर दिवसा कॅलिफोर्नियाच्या डिस्नेलॅंडमध्येच पाहिली असल्याने आम्हाला त्याची फार अपूर्वाई वाटली नाही. अशाच प्रकारची न्यूयॉर्कमधील परेड फारच प्रेक्षणीय असते म्हणे.

त्या परेडनंतर खालच्या मजल्यावर जे प्रदर्शन होते त्यात नाताळाची सर्व तयारी दाखवली होती. त्यात मुलांनी सांताला पाठवलेल्या पत्रांचे गट्ठे घेऊन जाणारा पोस्टमन त्या ओझ्याने पडलेला, कॅंडीज बनवणाऱ्या स्त्रिया, त्याची तयारी इत्यादी गोष्टी छोटे छोटे पुतळे करून दाखवले होते. तसे हे छोटेच प्रदर्शन होते. सर्वात शेवटी एका हॉलसमोर बरीच मोठी रांग दिसली आणि आम्ही थोडावेळ तेथे उभे राहिल्यावर ती सांताबरोबर फोटो काढून घेण्यासाठी होती हे कळल्यावर आम्ही तेथून ताबडतोब काढता पाय घेतला कारण आमच्याबरोबरच्या कोणत्याच बालकाला सांताबरोबर फोटो काढायचा नव्हता. आणि तसाही इशानने अपर्ट्मेन्टच्या सान्ताच्या अगदी मांडीवर आणि कडेवर बसून फोटो काढले होते.

आपण सर्वसाधारणपणे बर्फ हा एकच शब्द वापरतो आणि हिम हा दुसरा माहीत असलेला शब्द आपण बहुधा काव्याबिव्यातच वापरतो. मात्र इकडे स्नो. आइस, फ्लरी असे वेगवेगळे शब्द बर्फाच्याच निरनिराळ्या प्रकारास वापरणे आवश्यक ठरते, कारण स्नो बराच हलका व भुसभुशीत असतो तोच घट्ट झाल्यावर त्याचा आइस होतो आणि भुरभुर पडत असेल तर त्याला फ्लरीज म्हणतात. मिनिओपोलिसमधील बर्फ लवकर घट्ट होत नसल्याने त्यावर चालायला त्रास होत नाही पाय त्यात बुडतात पण चांगले बूट असतील तर बाहेर काढले की पाय स्वच्छच राहतात. उलट एडिसनमधला मात्र धोकादायक असतो कारण तो थोड्याच वेळात कडक व पारदर्शक होतो त्यामुळे साधा रस्ताच आहे या समजुतीने आपण नेहमीसारखे चालायला गेलो तर मात्र त्यावरून घसरण्याचा धोका असतो. येथे या दिवसात तपमान बऱ्याच वेळा शून्याखालीच असल्यामुळे आणि हिमवर्षाव जोरदार होत असल्यामुळे साफ केलेले रस्ते आणि घराची छपरे उतरती असल्यामुळे तेवढीच काय आपले मूळ स्वरूप दाखवतात एरवी सगळीकडे फक्त शुभ्र पांढरा रंग दिसतो. त्या काळात तेथील एक तलाव पहायला गेलो तो पूर्णपणे थिजून गेला होता आणि त्याच्यावर आइस हॉकीसारखे खेळ खेळले जात होते. गोठलेले तलाव बघायलाही येणारी आमच्यासारखी हौशी मंडळी खूप होती.

मिनिटोंका येथील तलावाला भेट देण्यासाठी गेलो पण तो गोठण्याच्या अवस्थेत होता त्यामुळे तेथील बीच बंद होता. तेथे गेलो तेव्हा चक्क ऊन पडले होते त्यामुळे जवळ लहान मुलांना खेळण्यासाठी केलेल्या हिरवळीवर आम्ही भरपूर बागडलो आणि मुलांनी घसरगुंड्या वगैरे साधनांचा आनंद लुटला. आणखी मिनिहाहा येथे एका बागेत लहान धबधबा आहे असे कळल्यावरून तो पाहण्यासाठी गेलो. तेथे जॉर्ज बुश येऊन गेले असा उल्लेख होता पण तेथे गेल्यावर मात्र तेथे पाण्याचा एक थेंबही नव्हता असे दिसले एवढेच काय बुशसाहेब येथे आले त्यावेळी बाहेरून पाणी पंप करून हा धबधबा वाहता केला होता असा फलकच तेथे लावला होता. एकूण मिनिहाहाने आमचा अगदी मक्सिहाहा केल्याचे जाणवले

आमचा मिनिओपोलिसचा मुक्काम थंडी असूनही जयवंतच्या घरात मात्र हीटरची उष्णता भरपूर असल्यामुळे आम्हाला कुठलाच त्रास न होता पार पडला इतका की त्या काळातही पातळ चादरीशिवाय काही पांघरण्याची आम्हाला गरज पडली नाही. आम्ही एडिसनला २५ डिसेंबरला जाणार होतो आमचे परतीचे तिकिट निघायच्या वेळीच काढले होते कारण त्या एकाच दिवशी परतीच्या उड्डाणात जागा उपलब्ध होत्या त्याचे एक कारण ख्रिसमसच्या दिवशी कोणी प्रवास करायला शक्यतो

निघत नसावे. आमची कॉंटिनेंटलची परतीची तिकिटे होती आणि उड्डाणाची वेळ संध्याकाळी सहाची होती. त्यादिवशी जयवंतला सुट्टीच होती त्यामुळे निघायला काही अडचण नव्हती. विशेष म्हणजे अगोदर दोन तीन दिवस हिमवर्षाव चालू असूम आमच्या निघण्याच्या दिवशी मात्र थांबला होता त्यामुळे आम्हाला विमानतळापर्यंत पोचायला काहीच त्रास झाला नाही.

कोंटिनेंटलच्या कौंटरसमोर काही गर्दी नव्हतीच त्यामुळे सामान देऊन बोर्डिंग पासेस घेउन ठेवावे असा विचार केला. आम्ही एक एक केबीन बॅग व एक एक बॅग एवढेच सामान घेऊन चाललो होतो. जाताना एक बॅग जास्त होती यावेळी सामान कमी असल्यामुळे मोठ्या बॅगेत छोटी बॅग ठेवून एकूण बॅगांची संख्या आम्ही कमी केली होती. स्थानीय (डोमेस्टिक) प्रवासात एकच मोठी २३ किलो वजनाची आणि विशिष्ट आकाराची (हा आकार आणि वजन आंतर्देशीय प्रवासासाठीही तेवढाच लागू आहे)बॅग प्रत्येकी नेता येते, मात्र आंतर्देशीय प्रवासात प्रत्येकी दोन बॅगांचे लगेज नेण्याची परवानगी असते. त्यामुळे मिनिआपोलिसला जाताना एका जादा बॅगेसाठी $२५ भरावे लागले होते ते वाचावे हा उद्देश! कदाचित त्यामुळे किंवा काही प्रवाशांचे सामान तपासून पहायचे या उद्देशाने आमच्या त्या बॅगेची तपासणी करण्याचे त्यांनी ठरवले. अगोदरच बॅगेला कुलूप आहे का हे त्यानी विचारल्यावर

आम्ही किल्ली त्याच्या तपासणी अधिकाऱ्याकडे दिली. मोठ्या बॅगेत छोटी बॅग बसवून सौ. ने अतिशय कौशल्याने बसवलेले सामान त्या अधिकाऱ्यानेच बॅग उघडून बाहेर काढले त्यात त्याला आक्षेपार्ह काही सापडले नाहीच पण मग त्यानेच तशाच पद्धतीने ते सामान भरण्याचा प्रयत्न जरी केला तरी तो त्याला तितकासा जमला नाही पण तरीही त्याने ती जबाबदारी स्वत:च पार पाडली आणि कुलूप लावून किल्ली आमच्याकडे दिली. मुंबई विमानतळावर पहिल्यांदा परतताना मात्र कस्टम अधिकाऱ्याने आमची बॅग आम्हालाच उघडायला आणि बंद करायला लावली होती याची त्यावेळी आठवण झाली. अर्थात बॅग उघडण्याच्या माझ्या कूर्मगतीमुळे त्याचा तपासणीचा उत्साह बराच थंड पडला हे वेगळे! शेवटी कोठेही असलो तरी आपण भारतीय आहोत हे विसरता येतच नाही.

आम्ही घरातून निघतानाच संगणकावर बैठकांचे क्रमांकही ठरवून ठेवले होते त्यामुळे त्याच क्रमांकाचे बोर्डिंग पासेस मिळाले. आमचे सामान आत पाठवले जाऊन फक्त केबिनबॅगा घेऊन आम्ही पुढे निघालो. जयवंतने तेथील अधिकाऱ्याशी बोलून आम्हाला आतपर्यंत सोडण्यासाठी पासही मिळवला त्यामुळे तो आम्हाला गेटपर्यंत सोबत करू शकत होता आणि ते फारच बरे झाले कारण आम्ही घरातून दुपारी चारलाच निघून एडिसनला रात्री पोचणार

असल्याने आत जाण्यापूर्वी काही खाद्यपदार्थ बरोबर आणलेले खाऊन मगच सुरक्षातपासणी करून आत शिरावे कारण ते खाद्यपदार्थ आत नेऊ देणार नाहीत या उद्देशाने बाहेरील बाकावर बसून खाण्याचा विचार करत असतानाच जयवंतचा भ्रमणध्वनी वाजला आणि तो ऐकून त्याने आम्हाला सूचना केली, "अगदी सावकाश जेवण करून घ्या विमान तीन तास उशीरा म्हणजे नऊ वाजता सुटणार आहे. आमच्या उड्डाणाची माहिती असल्याने सुजितने एडिसनहून चौकशी केली तेव्हां त्याला हा संदेश मिळाला होता आणि तो त्याने आम्हाला कळवला होता. त्यामुळे जयवंतने आम्हाला आत सोडून मगच घरी जाण्याचा निर्णय घेतला. कारण उड्डाणात एकदा विलंब होण्याची सुरवात झाली की मग ते निश्चित केव्हां सुटेल हे सांगता येत नाही. त्यामुळे शांतपणे खाद्यपेयांचा समाचार घेतला व सुरक्षायंत्रणा पार करून आमच्या उड्डाणासाठी नियत द्वाराच्यासमोरील सोफ्यावर जाऊन बसलो आणि तेथे आमच्याशिवाय आणखी कोणीही प्रवासी नव्हते.

आज नाताळामुळे फारच थोडे लोक प्रवासासाठी बाहेर पडलेले दिसले. प्रवेशद्वारापाशी उभ्या असणाऱ्या कर्मचारी युवतीकडे चौकशी केल्यावर तिने ते विमान जेथून निघते तेथेच त्यात दोष आढळल्यामुळे मूळ विमान बदलून त्या जागी दुसरे विमान पाठवत असल्याने विलंब होत असल्याचे सांगितले.

आश्चर्य म्हणजे त्या बाजूस जेवढी प्रवेशद्वारे होती त्यापैकी फक्त आमच्याच प्रवेशद्वारासमोर काही तुटपुंजे प्रवासी दिसत होते बाकी इतरत्र अगदी शुकशुकाट होता. मध्ये आम्ही आतील रेस्टॉरंटमध्ये कॉफी घेतली तेथील कर्मचारीदेखील ते बंद करून घरी जाण्याच्या घाईत दिसले म्हणजे आमची कॉफी पिऊन होईपर्यंत त्यानी खरोखरच शटर ओढून घेतले म्हणजे मला अगदी एकाद्या खेडेगावातील एस. टी. स्टॅंडवर असावे तसे वाटू लागले अर्थात असा दिव्यांचा झगझगाट तेथे असणार नाही हे उघडच आहे. बराच वेळ असल्याने आम्ही दुसऱ्या विभागाची जरा चक्कर मारली त्या बाजूला मात्र बरेच प्रवासी व हालचालही दिसली. तिकडील दुकाने व खाद्यपेयांचे स्टॉल्सही बऱ्यापैकी चालू होते.

थोड्या वेळाने चौकशी केल्यावर विमान दहा वाजता येईल अशी माहिती मिळाली. एकून त्या भागात आम्ही दोघे प्रवासी आणि कोंटिनेंटलचे तीन कर्मचारी असे पाच जण आणि आम्हाला सोडायला आलेला जयवंत सहावा असे लोक होतो त्यामुळे प्रवासी नाहीत म्हणून उड्डाण रद्द तर होणार नाही ना अशी शंका मला येऊ लागली पण बाहेर गप्पा मारत बसलेल्या कर्मचाऱ्यांपैकी एकाने तसे होणार नाही असा दिलासा आम्हाला दिला. साडेनऊ वाजता एक प्रवासी स्त्री धावत धावत आली आणि प्रवेशद्वाराजवळील कर्मचारी ललनेला फ्लाइट उशीरा झाली आता

माझी जेवणाची वेळ झाली असे सांगितल्यावर तिला त्या ललनेने एक कुपन देऊन तेथील खाद्यवस्तू विकत घेण्याची विनंती केली, मग जयवंतलाही ते कळल्यावर त्यानेही दोन कुपन्स मिळवली व आम्हाला जेवायचे नसल्यामुळे तो बाहेर जाऊन खाऊन आला. त्याचबरोबर त्याने कार तात्पुरत्या पार्किंगमध्ये लावली होती आता तेथे जादा आकार पडेल अशी तक्रार केल्यावर त्यासाठी मात्र आता आकार भरून एअरलाइन त्याची भरपाई करेल असे त्याला आश्वासन देण्यात आले.

शेवटी दहा वाजता एकदाचे विमान आले. त्यातून मोजून सात आठ प्रवासी उतरले त्यातील काही उशीराबद्दल कर्मचाऱ्यांकडे तक्रार करत होते पुढील उड्डाण ज्याना गाठायचे होते त्यांना ताबडतोब विमानतळावरील छोट्या गाड्यांमधून योग्य त्या प्रवेशद्वारापर्यंत पोचवण्याची व्यवस्था करण्यात आली. शेवटी आम्ही दोघे आणि आणखी दोन तीन प्रवासी असे पाच सहाजण आम्ही विमानात बसलो. विमानसुंदरींनी कोठेही बसा सगळे विमान तुमचेच आहे असे लक्ष्मण देशपांड्यांच्या यांच्या "होल वावर इज युवर्स" या थाटात सांगितले आणि आम्ही दोघे प्रथमच अगदी दोन वेगवेगळया रांगेतील खिडकीजवळील बैठकांवर बसलो. आत बसल्यावर भ्रमणध्वनीवरून आत स्थानापन्न झाल्याचे जयवंतला सांगून भ्रमणध्वनी बंद केला. थोड्यावेळाने "एकटीला फारच

कंटाळवाणे होते" म्हणत सौ. आपली बैठक सोडून माझ्याचजवळ येऊन बसली. असं बऱ्याच दिवसात प्रथमच घडत होतं.

विमान उडाल्यावर एक विमानसुंदरी आमच्याजवळ येऊन गप्पा मारत बसली. प्रवासी इतके कमी असल्याने तिलाही काही उद्योग नव्हता एकूण पाच सहा प्रवासी आणि दहा बारा कर्मचारी अशी त्या उड्डाणाची अवस्था होती. मध्ये एकदा पेयपान झाले आणि थोडा वेळ जातो न जातो तोच एडिसन आल्याची वैमानिकाने सूचना केलीच तसे त्याने सूचना देण्यापूर्वीच सौ. ने IKEA व Toys 'R'Us ही नेवार्क विमानतळाशेजारील मोठी दुकाने विमानातूनच पाहून मला सांगितले होते पण इतक्या लवकर पोचू असे मला वाटत नसल्याने मी तिच्यावर विश्वास ठेवला नव्हता पण मग अशी उद्घोषणा झाल्यावर विजयी मुद्रेने तिने माझ्याकडे पाहिले.

आम्ही बाहेर पडण्यापूर्वीच सुजितला भ्रमणध्वनी करून कळवल्यामुळे त्यामुळे बॅगेज क्लेम पाशी तो उभाच होता आणि आमच्याच दोन बॅगा त्या पट्ट्यावरून दोन तीन चकरा मारून आमच्या येण्याची प्रतीक्षाच जणू करत होत्या आम्ही बाहेर पडताच सुजितने त्या ताब्यात घेतल्या आणि त्यांच्यासह त्याच्या कारमधून

आम्ही एडिसन १० हेदर ड्राइव्ह ला पोचलो तेव्हां एक वाजला होता

# ५१. पुण्याहून थेट नेवार्क आणि परत

आमच्यासारखे लोक जाऊन जाऊन कितीवेळा परदेशी जाणार? आमची परदेशात जाण्याची सुरवातच मुळी अगदी "लागले नेत्र रे पैलतिरी " म्हणण्यासारख्या वयात नसली तरी आम्ही शासकीय सेवेतून निवृत्ती घेतल्यानंतरच आणि तीही केवळ आमच्या पुढील पिढीने परदेशात जाण्याचे धाडस दाखवल्यामुळे झालेली! त्यामुळे आणि शिवाय दुसऱ्या वेळी व्हिसा देताना त्या खिडकीवरील अधिकाऱ्याने तुम्ही फारच वेळा अमेरिकेत जाता बुवा असे म्हणून आम्हाला व्हिसा न देण्याचा दम दिल्यामुळे "आता नाही पुन्हा असे होणार " असे आश्वासन आम्ही देऊन बसलेलो (त्याच्या अगोदर तर त्या खिडकीवरील खडूस ललनेने तेवढ्याच कारणाने आम्हास व्हिसा नाकारलेला!)त्यामुळे "आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास " अशी परिस्थिती झालेली अर्थात त्यामुळे अगदी मोजक्या वेळीच आमचे अमेरिकेस जाणे घडते. म्हणूनच प्रत्येक भेटीतील किंवा प्रवासातील अनुभवही अगदी रोमहर्षक नसले तरी काही कारणामुळे तरी अगदी लक्षात रहाण्यासारखे असावेत यात आश्चर्य कसले?

२०१८ मध्ये अमेरिकेस जाण्याची मानसिक तयारी नसली तरी चिरंजीव दस्तुरखुद्द काही कारणामुळे भारतात आल्यामुळे जाताना आम्हाला घेऊनच जायचे असा त्याने निश्चय केलेला व त्यासाठी यावेळी पहिल्यांदाच पुण्याहूनच थेट नेवार्क (नूअर्क?प्रभूबाईंइतके शहराच्या नावाच्या उच्चाराबद्दल दक्ष रहायचे म्हटले तर) असे प्रवासाचे आम्हा तिघांचे तिकीटही त्याने काढलेले त्यामुळे आता ते तिकीट वाया जाऊ नये म्हणून तरी अमेरिकेस जाणे प्राप्तच झाले. आतापर्यंत आमचे तिकीट नेहमी मुंबई ते नेवार्क असे त्यामुळे पुणे मुंबई हा प्रवासाचा एक टप्पाच असायचा. व बहुधा पावसाळ्यातच आमचे प्रयाण होत असल्याने पुणे मुंबई हा प्रवासच सुरळीत न होण्याचा “प्रथमग्रासे मक्षिकापात:।“ असा योग कधी दरड कोसळून तर कधी शेतकरी आंदोलन अश्या विविध अडचणींनी साधला जायचा कधी कधी तर चाकखुर्चीच्या अनुपलब्धतेमुळेही आमचे उड्डाण चुकते की काय अशी आशा मी बाळगून होतो पण तरीही आमच्या सहचारिणीच्या तीव्र इच्छाशक्तीपुढे काही न चालून आम्ही नुआर्कपर्यंत पोचायचेच.।

यावेळी हा अडचणीचा पहिला टप्पाच टाळण्याची चतुराई आम्ही दाखवली होती, म्हणजे सरळ पुण्यातूनच आमच्या विमानप्रवासाची सुरवात करायची संधी आता उपलब्ध झाल्यामुळे

पुण्याहूनच थेट नूआर्क अशी प्रवास योजना आम्ही केली होती. अर्थात या प्रवासातही मुंबई आम्ही टाळू शकत नव्हतोच आणि तेथेही चांगला चार तासाचा मुक्कामही करावा लागणार होता त्यामुळे अगदीच काळजीमुक्त प्रवास घडण्याचा योग याही वेळी आमच्या नशिबात नव्ह्ता, कारण यंदाही त्या काळात वेधशाळेने पाऊस न पडण्याचा अंदाज व्यक्त केल्यामुळे पुण्यात भरपूर पाऊस पडत होता. पुणे मुंबई मार्गावर दरडी कोसळून अथवा इतरही काही कारणाने वाहतूक कोंडी होण्याचा उपद्रव आम्हास न झाल्यामुळे त्याची उणीव भरून काढण्याचा पावसानेच चंग बांधला होता

आम्ही ज्या दिवशी निघणार होतो त्यादिवशी तर पाऊस अधिकच जोरात पडत होता पण घरापासून लोहगाव विमानतळ येवढेच अंतर जायचे असल्यामुळे व प्रवासाची सर्व सूत्रे आमच्या मुलांवर व सर्वसत्ताधारी त्यांच्या मायवर सोपवून आम्ही म्हणजे मी बेफिकीर होतो. आमचे उड्डाण संध्याकाळी साडेपाचचे होते. पुण्याहून मुंबई व पुढे तेथे चार तास थांबून नुआर्कचे जेट एअर वेजचे उड्डाण होते. पुणे विमानतळावर दुपारी३-३० च्या दरम्यान पोचावे म्हणून दोन गाड्या पुण्यातील चिरंजीवांनी सांगून ठेवल्या होत्या. पुणे सोडेपर्यंत सर्व व्यवस्थेचा तो सूत्रधार होता. जेवणखाण आटोपून आम्ही त्या दोन गाड्या दु. एक वा. पर्यंत येतील या अपेक्षेने सामान वगैरे आवरून बसलो. पण पावसामुळे त्या गाड्या

जेथे गेल्या होत्या तेथून परतच आल्या नव्हत्या त्यामुळे त्यांचा येण्याचा विचार नाही असे कळले. शेवटी उबर ओला वगैरेना फोन केले, आमची घरची गाडी व आणखी कोणाची गाडी मिळते का याची चाचपणी झाली अखेर दोन छोट्या गाड्या मिळाल्या. सुजितचे तो स्वत: त्याची पत्नी व आमचा नातू असे तिघेजण व आम्ही दोघे व आमचे सामान या सगळयांना त्या अपुऱ्याच होत्या. पण कसेबसे माणसे व सामान यांचे नियोजन केले व लोहगाव विमानतळावर वेळेत म्हणजे ३-३० ला पोचलो व सुटकेचा श्वास सोडला

पण तेथेही आणखी एक अडचण उपस्थित होती. ती म्हणजे पावसाच्या अतिरेकामुळे विमानतळावरील संगणकाचा सर्व्हर बंद होता किंवा अतिशय मंद गतीने चालत होता. त्यामुळे आम्ही तेथे पोचून एक तास झाल्यावरही फक्त दोन प्रवेश परवाने(बोर्डिंग पास) छापले गेले होते त्या गतीने सर्व प्रवाशांना बोर्डिंग पास मिळायला रात्रीचे बाराच वाजले असते. एकदा संगणकाची सवय लागल्यावर हाताने काम करण्याची संवय सुटलेले विमानतळ कर्मचारी (हाताने काम करायचे नसल्याने)हातावर हात धरून बसले होते आणि अतिशय मंद गतीने बोर्डिंग पास देण्याचे काम चालू होते चेन्नईचे उड्डाण आमच्याही बरेच अगोदर असल्यामुळे एका

अधिकाऱ्यास शहाणपण सुचले आणि परवाने हाताने लिहून देण्यास त्याने फर्मावले आणि कामास थोडी गती आली. .

हा इतका वेळ आम्हास रांगेत उभेच रहाण्याची पाळी आली असती पण सुदैवाने

आम्हाला चाकखुर्च्या अगोदर मिळाल्यामुळे निदान रांगेत उभे राहून खडा पहारा देण्याचे आमचे काम टळले. हाताने काम करण्याची संवय सुटलेले कर्मचारी घाई गडबडीत सुजितचे नाव सुजित श्याम ऐवजी श्याम सुजित अश्या ढोबळ चुका करत होते. शिवाय त्यानंतर चुकीची दुरुस्ती करण्याचाही इतका आळस की पुढील कर्मचाऱ्यापर्यंत तो परवाना तसाच पाठवून चुका करणारी ललना त्याला फोन करून चुकीची दुरुस्ती करण्याची सूचना देत होती. एकूण चटपटीतपणा जो काय असेल तो फक्त वेषभूषा आणि केशभूषा यातच! तरीही दोन तासानंतर का होईना पण प्रवेशपरवाने हातात पडून विमानात चढण्यासाठी आम्हाला रवाना करण्यात आले.

विमान मुख्य इमारतीपासून बऱ्याच अंतरावर उभे होते व पाऊस २०१८ मध्येही त्यादिवशी भविष्यात म्हणजे २०१९ मध्ये पडणाऱ्या पावसाची चुणुक दाखवत होता पण याबाबतीत आमची काळजी घेऊन विमानतळ कर्मचारी छत्र्या घेऊन उभे होते आणि

त्या छत्र्याही अगदी ऐसपैस ज्यामुळे आम्ही अंगास पाण्याचा एक थेंबही न लागता विमानात शिरू शकलो.

एवढ्या मोठ्या विमानात अगदी मोजके म्हणजे वीस पंचवीस प्रवासी होते. आमचे उड्डाण अगदी अर्ध्या तासाचेच असल्यामुळे एवढ्या प्रवासासाठी खान पान पुरवण्याची आवश्यकता जेट एअर वेजला वाटली नसावी आणि आम्हालाही तशी आवश्यकता नव्हती. मुंबईत ६-३० ला पोचलो. आता चार तास विमानतळावर बसायचे, कारण पुढच्या उड्डाणाची वेळ रात्री १०-३० होती आता चार तास विमानतळावर इकडे तिकडे हिंडायचे, विमानतळावरच्या चहाची किंमत ऐकून धाडस झाले तर चहापान करायचे अश्या मनस्थितीतीत आम्ही असताना आमचा वेळ वाया जाऊ नये अशी सोय पुणेकर विमानतळ कर्मचाऱ्यांनी अगोदरच करून ठेवली होती. आमच्या चाकखुर्ची चालकानी आमच्या अगोदरच्या उड्डाणाची माहिती असल्याने आता तुमचे सामान तुम्हाला पुन्हा परत घेऊन ते पुन्हा सामानाच्या चाळणीतून न्यावे लागेल असा इशारा दिला. हे चालक या सर्व गोष्टींना सरावलेले असल्यामुळे पुण्यात झालेल्या गोंधळामुळे जरी पुण्यात आमचे सामान पुढच्या उड्डाणाकडे वळवले जाईल असे आश्वासन दिले असले तरी तसे होत नाही असे त्यानी अगदी खात्रीपूर्वक सांगितले आणि याचा प्रत्यय सामान ज्या मार्गाने पुढच्या उड्डाणाकडे नेले जात होते

त्यातून आमची एक बॅगच बरोबर आमच्या चाकखुर्च्यांच्या समोरच येऊन पडल्यावर आम्हाला आला अर्थातच ते सर्व सामान गोळा करून पुन्हा योग्य ठिकाणी नोंदणीपत्रक तयार करून ते योग्य ठिकाणी जाईल हे पहाण्याचा उद्योग करावा लागला व त्यात दोन तीन तास व्यवस्थित व्यतीत झाले. आम्हा खुर्ची धारकाना काही काळ खुर्ची ऐवजी विमानतळावरील स्वच्छतागृहे व आसनांचा लाभ घेणे येवढाच उद्योग त्या काळात करणे शक्य होते.

त्यामुळे आमच्याबरोबरचे सर्व प्रवासी सामान वाहून नेणाऱ्या पट्ट्याजवळ थांबले व आपापल्या बॅगा घेऊन पुन्हा चेकिंगसाठी गेले आमच्या मात्र उरलेल्या बॅगा गुल झाल्या होत्या, त्यामुळे त्या पुढच्या प्रवासास गेल्या असाव्यात असा समज करून घेण्यात फारसा अर्थ नव्हता. आम्ही मुंबईपर्यंत जेट एअरवेजने आलो होतो व पुढे नेवार्कला मात्र युनायटेड ने जाणार होतो त्यामुळे आमच्या चाकखुर्चीचालकानीही आमचा ताबा त्या उड्डाणाच्या चाकखुर्चीवाल्यांकडे दिला व या हस्तांतरणानंतर बक्षिशी कोणाला द्यायची हा पेच आम्हाला पडला पण तशी अपेक्षा त्यानी न दाखवल्यामुळे आणि शिवाय आम्ही मुलाबरोबर जात असल्याचा फायदा घेऊन या गोष्टी आमच्या अखत्यारीत नाहीत असे दाखवले, त्यानंतर जेट एअरवेजला फोन लावल्यावर आमच्या उर्वरित बॅगा युनायटेडकडे गेल्या असाव्यात पण त्या आमच्याच आहेत याची

खात्री करून घ्यावी अशी सूचना मिळाली, त्याची खात्री सुजितने करून घेतल्यावर आमच्या एका बॅगेसह आम्ही युनायटेडच्या खिडकीवर विमानाचे प्रवेशपरवाने (बोर्डिंग पास)घेतल्यावर पुन्हा सुरक्षाचाचणी वगैरे उपचार पार पडून आमची विमानात शिरण्याची वेळच आली व आत प्रवेश करेपर्यंत ११ वाजले व ११/२० ला वैमानिकाने धावपट्टीवर विमान हलवण्यास सुरवातही केली थोडक्यात मुंबईस द्रुतगति मार्गावरून विलंबित गतीने न जाता विमानाने अतिद्रुत गतीने जाऊनही आम्हास एक तास उशीरच झाला होता त्यामुळे मुंबई विमानतळावर आमचा वेळ कसा जाईल याची काळजी ही अशी घेण्यात आली त्याचे श्रेय पावसास की बंद पडलेल्या आंतरजाल सेवेस की आणखी कोणाला द्यायचे याचा विचार करण्याचे आता कारणच उरले नाही. आणि आता १५ तासाचा तुरुंगवास सुरू झाला होता,

. कमीतकमी खर्चात विमानप्रवास होण्याच्या दृष्टीने काढलेल्या तिकिटावर केलेल्या विमानप्रवासात आपण किती वेळा स्वच्च्हतागृहाकडे गेलो व खाद्यपेये कितीवेळा पुरवली गेली (तेही आपण त्या कालात झोपेच्या गुंगीत नसलो तर) यापलीकडे आपल्या आसनासमोरील पडद्यावर आपल्याला हवा असणारा एकादा चित्रपट पहायला मिळण्याचा कपिलाषष्ठीचा योग कधी कधी आलाच तर त्या चित्रपटाचे नाव एवढ्याच गोष्टी प्रवासानंतर

लक्षात रहाण्याची शक्यता असते. अश्या प्रवासात एकदा एलिझाबेथ एकादशी तर एकदा पिकु पहाण्याचा योग आला होता या वेळीही असाच काही योग येतो का याचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्याचा विचार केला, माझ्या या योजनेत विघ्न येण्यास एक कारण घडले म्हणजे “आधीच उल्हास (या म्हणीची पुनरावृत्ती कितीदा होणार कुणास ठाऊक ---- कारण आधीपासूनच सगळा उल्ह्हासच होता) तश्यातला प्रकार! कारण आश्चर्य म्हणजे समोर चित्रपट अथवा इतर गोष्टी दिसत असताना माझ्या समोरील गृहस्थाला आपल्या लॅप्टॉपवर काहीतरी शोध घेण्याची उबळ आली. अर्थात त्याला माझी काही हरकत असण्याचे कारण नव्हते पण त्याच्या लॅप्टॉपचा प्रखर प्रकाश माझ्या डोळ्यावर येऊन मला माझ्या पटलावर काही पहाण्याची किंवा ते न जमलेच आणि झोप घ्यावीशी वाटली तर ती मिळण्याची शक्यता कमी झाली. . सुदैवाने काही वेळाने त्याने तो नाद सोडला हे माझे भाग्य! तोपर्यंत सौ. ने तिच्या पडद्यावर निम्मा चित्रपट पाहिलाही होता. त्यामुळे आता मला स्वतंत्र चित्रपट किंवा तत्सम काहीतरी शोधून पहाणे प्राप्त झाले. Bend it like Beckman पाहिला येवढे तरी आठवते. आणि बॅंक चोर अर्धवट पाहिला. मधून मधून झोप लागत असावी. यावेळी चाकखुर्चीवाल्यांनी मेहरबानी केली होती म्हणजे अगदी पुण्यापासून जणु आम्ही चाकखुर्चीवरूनच प्रवास केला की काय

असे वाटावे इतकी तत्परतेने चाकखुर्च्या उपलब्ध होत होत्या अर्थातच नेवार्कलाही तोच अनुभव आला शिवाय तेथे चिरंजीव बरोबर असल्याने सामानाची अदलाबदल करायला सौ. ला वाव नव्हता आणि चाकखुर्चीवाल्याला किती डॉलर द्यायचे हा यक्षप्रश्नही मनात नव्हता. सगळेच बरोबर असल्याने ओला कॅब लगेच मिळून आम्ही पहाटे सहाला घरी पोचलो देखील.

# ५२. सेवर्ड जोन्सन्स स्कल्पचर गार्डन

आमच्या नव्या व्हिसावर केलेल्या पहिल्या अमेरिका वारीतील या गार्डनला भेट हा लक्षात रहाण्यासारखा अनुभव होता. हा शिल्पकार न्यू जर्सीमध्येच १६ एप्रिल १९३० ला जन्मला. चित्रकलेपासून सुरवात करून अतिभव्य शिल्पे त्याने तयार केली. प्रिन्स्टन मधील हॅमिल्टनमध्ये ४२ एकर इतक्या मोठ्या क्षेत्रफलावर अनेक वैशिष्ट्यपूर्ण शिल्पांचे हे प्रदर्शन होते व त्यातील शिल्पे काही अतिशय प्रचंड तर बरीचशी इतकी हुबेहूब की त्या प्रत्यक्ष व्यक्ती किंवा प्राणी असावेत असे वाटावे. प्रदर्शनात शिरतानाच आमचे



स्वागत करणाऱ्या व्यक्ती हे पुतळेच होते आणि खरेच आमचे स्वागत ते करत आहेत असा भास आम्हाला झाला. या प्रदर्शनातील मर्लीन मन्रो चे शिल्प तसेच नर्सचे चुंबन घेणारा नाविक (Unconditional surrender हे त्या शिल्पाचे

नाव) ही शिल्पे जवळ जवळ आठ मीटर उंचीची आहेत, त्याव्यतिरिक्त तशीच भव्य बरीच शिल्पे व हुबेहूब आकाराची अनेक शिल्पे अशी २७० शिल्पे त्यावेळी प्रदर्शनात होती, मर्लीन



मन्रोचे शिल्प आम्ही गेलो त्या काळावधीतच तेथे ठेवण्यात आले होते व नंतर ते वॉशिन्टनच्या दुसऱ्या प्रदर्शनात हलवण्यात येणार होते. . एकूण ५००च्या जवळपास शिल्पे त्या संग्रहात असून त्यातील २७० आम्ही भेट दिली होती त्यावेळी मांडण्यात आली होती. ते प्रदर्शन अतिशय भव्य असल्याने एका वेळी पूर्ण पहाणे शक्य नसल्यामुळे पन्ध्रा दिवसांनी पुन्हा एकदा गेलो तेव्हा काही शिल्पे नवी होती पण मर्लीन मन्रोचे शिल्प अजून होते. प्रवेशद्वाराजवळ न्यूयोर्क टाइम्स वाचणाऱ्या ग्रुहस्थाच्या हतातील पेपर सुद्धा शिल्पाचा भाग असला तरी खराखुरा वाटतो. संपूर्ण प्रदर्शनाच्या वाटेवर अनेक प्रेक्षणीय फुलबागा, वृक्ष (हे मात्र खरोखरीचे), वैशिष्ट्यपूर्ण रस्ते, जलाशय असून काही पुतळे मोठ्या दालनात तर बोठे उघड्या मैदानात असा

तो परिसर सकाळी ११ वा. पासून संध्याकाळी ४ वाजेपर्यंत दोन वेळा जमेल तेवढा पाहिला.




सेवर्ड जोन्सन्स च्या व्यतिरिक्त इतरही काही शिल्पकार व रंगकर्मींच्या कलाकृती त्या प्रदर्शनात ठेवण्यात येतात. १८ एप्रिल १९३० मध्ये जन्मलेल्या सेवर्ड यांचे मार्च १०, २०२० मध्ये निधन झाले.

# ५३. एडिसन टॉवर

आठ नऊ वेळा अमेरिकेस तेही एडिसन या गावी जाऊनही आम्ही एडिसन टॉवर मात्र पाहिला नव्हता. आम्ही त्या रस्त्यावरून अनेक वेळा जात येत होतो व प्रत्येक वेळा चिरंजीव “आपल्याला एडिसन टॉवर बघायचाय असं म्हणायचा शेवटी तो योग अचानक आला. तोसुद्धा अगदी शेवटच्या वारीत म्हणजे २०१८ मध्ये आम्ही आणखीनच कुठल्या तरी कामासाठी सकाळी बाहेर पदलो असताना परत येताना एडिसन टॉवर वरूनच येत असताना मी आपण इतक्या वर्षात राहूनही व इतक्या जवळ असून तो पाहिलाच नाही असे म्हटल्यामुळे उतरून ते स्थळ पहाणे झाले. तेथे एक संग्रहालयही असून त्यात एडिसनने लावलेल्या शोधांची छायाचित्रे, काही प्रतिकृती ठेवलेल्या होत्या. त्यामुळे एडिसनने तयार केलेला पहिला फोनोग्राफ (ग्रामोफोन) पहायला मिळाला. विद्युद्दीपासाठी त्याला अनेक प्रयोग करावे लागले. त्याच्यापूर्वीही अनेक जणांनी असे प्रयोग केले होते व त्या प्रयोगांमध्येच काय उणीवा आहेत याचा शोध घेत प्रथम कार्बन फिलॅमेन्ट चा वापर करण्याचा त्याचा प्रयोग यशस्वी झाला. १८७९ मध्ये त्याने तयार केलेल्या त्या दिव्याची प्रतिकृती तेथे ठेवली आहे.

# ५४. लंकेस्टर व आमिश फार्म

अमेरिकेतील आम्ही भेट दिलेल्या संस्मरणीय अशा स्थळात लॅन्कास्टर व आमिश फार्म यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. लॅन्कास्टर पेन्सिल्वानिया स्टेटमध्ये असून एडिसनपासून खूप जवळ म्हणजे १६२ मैल एवध्या अंतरावर असून आम्ही सकाळी निघून कारने दुपारी २-३० वा. पोहोचलो. वाटेत जाताना देवी या नावाच्या भारतीय खाद्यपदार्थ मिळणाऱ्या रेस्टॉरंटमध्ये फारच छान भारतीय जेवण मिळाले. फ़ुल्टन स्तीमबोट इन हे हॉटेल नावाप्रमाणेच बोटीच्या आकाराचे आहे. सभोवती जलाशय, त्यात मासे, बदके, कारंजे, जलाशयाच्या काठावर खुर्च्या ठेवून त्यावर बसून गप्पा मारण्याची सोय, बाजूस बालोद्यान, त्यात एक आजूबाजूला रम्य निसर्ग, जलाशय व आरामशीर खोल्या, या जलाशयातच बोटीच्या आकाराचे ही इमारत आहे. समोरील रस्ता ओलांडून गेल्यावर खेळाचे बंदिस्त मैदान(प्लेस्टेशन) असून त्यात मिनिगोल्फक्लब होता. त्यात अठरा ठिकाणी केलेल्या बिळात आपला चेंडू घालवणे असा गोल्फचा प्रकार होता. वेगवेगळ्या रंगाचे चेंडू घेऊन आमच्या पाच जणांनी ती अठरा बिळे संपवण्याचा प्रयत्न केला व अपेक्षेप्रमाणे अगदी वयोमानपरत्वे

नातवाचा पहिला व माझा शेवटचा नंबर लागला, याही बाबतीत सौ. वर मात करणे मला व त्याच्या सौ. वर मात करणे सुजितलाही जमले नाही. त्याच भागात एक छोटा धबधबा होता. एकूण पर्यटकांना वेळ कसा गेला हे समजणे अवघडच! शेवटी नाइलाजानेच तेथून परत स्टीमबोटीकडे यावे लागले

दुसऱ्या दिवशी आमिश वस्तीकडे जाण्याचा बेत ठरला होता. आमिश. अतिशय साधी रहाणी, साधा वेश, कोणत्याही यांत्रिक अवजारांचा उपयोग न करणे या प्रकारच्या जीवनपद्धतीचे अनुसरण करणारी ख्रिश्चन जमात आहे. सर्वत्र रोमन कॅथॉलिक ख्रिश्चन धर्म वाढत असताना मार्टिन ल्युथर सारखे त्यातील काही त्यातील काही त्या तत्वांना विरोध करणारे निघाले व प्रोटेस्ट म्हणजे विरोध यावरून त्याना प्रोटेस्टन्ट म्हणू लागले. असे ख्रिश्चन रोमन कॅथॉलिकांना नकोसे झाले आणि त्यामुळे ते वेगवेगळ्या देशात स्थलांतरित झाले. तसेच मेन्नो सायमन याचे काही अनुयायी स्वत:स मेनोनाइट चर्चचे सदस्य म्हणवून घेऊ लागले. जन्मताच बाप्तिस्मा देण्याच्या पद्धतीस त्यांचा विरोध होता त्यामुळे त्याना ऍनाबाप्टिस्ट म्हणू लागले व त्याना रोमन कॅथॉलिक व प्रोटेस्टन्ट या दोन्ही चर्च मानणाऱ्या लोकांचा विरोध सहन करावा लागला, आणि क्वचित प्राणासही मुकावे लागले. त्यामुळे त्याना वेगवेगळ्या देशात परागंदा व्हावे लागले. अठराव्या शतकाच्या

प्रारंभी हे अमिश (तुच्छ व्यक्ती या अर्थी) अमेरिकेच्या पेन्सिल्वानिया या भागात स्थलांतरित झाले आणि अमेरिका हा देशच स्थलांतरितांचाच असल्याने त्याना तेथे त्यांची जीवनओअद्धती राखून रहाणे शक्य झाले.

आमिश हा पेन्सिल्वानिया मधील स्विस जर्मन व अल्सेशियन ॲनाबाप्पि्टस्ट जर्मनांचा एक समुदाय आहे. इराणमध्ये झोरोथ्रुस्ट्रचे अनुयायी म्हणजे पारशी लोक जसे मुस्लीम आक्रमणामुळे पर्शिया सोडून आले व भा्रतात स्थायिक झाले व आपल्या वेगवेगळया परंपरा चालीरीती जपून राहू लागले तसाच काहीसा हा प्रकार. या चर्चचा जन्मत: बाप्तिस्मा देण्यास विरोध आहे त्यामुळे बाप्तिस्मा सोळा ते तेवीस वर्षे या वयात देण्यात येतो. आधुनिक अवजारांचा उपयोग न करणे यामुळे आम्ही उतरलो होतो त्या होटेलपासून फक्त काही किलोमिटर अंतरावर रहाणारे हे लोक अजूनही वहातुकीसाठी घोड्यांकडून ओढली जाणारी बग्गी किंवा टांगा वापरत होते. विजेचा वापरही न करण्याकडे त्यांचा कल आहे, त्यांच्या शाळा एकाच खोलीच्या असून आठव्या वर्गापर्यंतच शिक्षण दिले जाते. दोन आठवड्यातून एका रविवारी त्यांचे चर्च कोणाही एका सदस्याच्या घरीच भरवण्यात येते. कुटुंब नियोजनास त्यांचा विरोध आहे त्यामुळे त्यांची संख्या बऱ्याच पटीने वाढत आहे,

तेथे आमच्या कारने गेल्यावर मात्र कार सोडून बग्गीचा प्रवास आम्हाला करतच ती वसाहत पहावी लागली. या घोडागाड्यात १०-१२ जण बसू शकत होते. अश्या घोडागाडी तळावरच आम्ही कार थांबवून घोडागाडीसाठी रांग लावून बसलो. आम्हाला तिकिटे व क्रमांक देण्यात आले होते. तिकिटे देणाराही एक अमिश म्हातारा होता व तिकीट देताना काहीतरी विनोदी बोलत होता अर्थात अमेरिकन इंग्रजीच कळण्याची मारामार असलेल्या आम्हाला त्यातील विनोद कळणे अवघड होते. चार घोडागाड्या होत्या त्यापैकी एकीत आम्हा सर्वांना बसायला जागा मिळाली. यापूर्वी टान्याचा प्रवास औरंगाबादला गेल्या गेल्या व सायकल रिक्षाचा प्रवास अमरावती व आंबेजोगाई येथे केला होता त्याची आठवण झाली. बग्गीचा चालक मात्र तरूण व गमत्या होता व विनोदी भाषेत आम्हाला माहिती देत होता त्याचे भाषांतर करून सुजित व सॅमी आम्हाला सांगत होते. अर्थात गावात यंत्रविरहित शेती, विद्युतदीपाशिवाय घरे अश्या गोष्टी पहावयास मिळाल्या, एका मोठ्या घराच्या वरच्या मजल्यावर अमिश जीवनपद्धतीचे दर्शन घडवणारे प्रदर्शनच होते त्यात स्त्रियांचे, पुरुषांचे लहान मुलाचे वेगवेगळ्या प्रकारचे कपडे. शेतीची अवजारे असे प्रकार पहायला मिळाले.

# ५५. काही अनायास स्थलदर्शन

मुद्दाम जाऊन पहिलेल्या स्थळांशिवाय पहिल्या भेटीत आम्ही चार महिन्यातच परत अल्यामुळे आम्ही पाहू न शकलेला अमेरिकेतील एक सुंदर देखावा म्हणजे फ़ॉल कलर्स! दुसऱ्या वारीपासून आम्ही बहुधा मे जून मध्ये जाऊन सहा महिने राहिल्यामुळे प्रत्येक वेळा कोठेही न जाता आम्हाला हे पहाता यायचे. सेप्टेम्बर महिन्यात झाडांच्या पानांना अतिशय मोहक लाल, पिवळे रंग यायला लागतात आणि त्याचबरोबर पाने गळायला (fall) सुरवात होते त्यामुळे या कालास फ़ॉल सीझन असेच नाव आहे. आपल्याकडेही त्या काळात पिवळी होऊन झाडांची पाने गळतात. पण असे मोहक रंग त्याना येत नाहीत. एडिसन किंवा अमेरिकेत सर्वत्रच असे रंग पालटतात, काही ठिकाणी ते अधिक सुंदर असतात. त्यामुळे आम्ही रस्त्यात फिरताना झाडांचे रंग पालटताना अनायास पहायला मिळायचे. अर्थात काही ठिकाणी अधिक मोहक रंग झाडांच्या पानांना येतात तेथे नंतर मुद्दामही जाऊन आम्ही भेट दिली.

पण नोव्हेंबरनंतर झाडांना एकही पान उरत नाही त्यावेळी त्यांच्याकडे अगदी पहावत नाही. झाडे म्हणजे उलटे खराटे असेच

वाटू लागते. त्यातून सुटतात ती फक्त सूचिपर्णी वृक्ष! ख्रिसमस ट्री अश्या झाडांपैकी एक असते, त्यामुळेच नाताळाच्या दिवशी त्याची सजावट करतात. भारतातही काश्मीरच्या काही भागात ही रंगांची उधळण पहायला मिळते म्हणे, म्हणे म्हणण्याचे कारण आम्ही अमेरिकेला आठ वेळा गेलो पण काश्नीरला गेलो नाही.

आमच्या पहिल्या वारीत आम्ही सेप्टेंबरमध्येच परतल्याने फ़ॉल काळात आम्ही परतलो होतो. त्यावेळी आम्ही हिडन व्हॅली ड्राइव्हला रहात होतो. तेथे प्रवेश करताना इतकी दाट झाडी होती की सुजितच्या घ्राच्या समोर उभे राहिल्यास फकत हिरवागार पडदाच दिसायचा. पुढच्या वेळेस मात्र आमचा मुक्काम फ़ेब्रुवारीपर्यंत तेथे असल्यामुळे नोव्हेंबर अखेरीस त्या झाडांची सगळी पाने गळून एकदम पलीकडे पण एक बैठ्या घरांची वसाहत आहे हे दिसू लागले. पण सेप्टेंबरपासून महिनाभर रंगांची उधळण पहाण्यासारखी असते. त्या काळात सुर्योदय उशीरा व सूर्यास्त लवकर होत असल्यामुळे पाने क्लोरोफिल हरितद्रव्य निर्मिती करू शकत नाही व त्यामुळे त्याना येणारा हिरवा रंग न आल्याने त्यांचे मूळचे लाल, पिवळे रंग उघडे पडून ही रंगांची उधळण दिसू लागते आणि ती पहाण्यासाठी कोठ जावे लागत नाही रस्त्यांवर ती आपोआपच दृष्टोत्पत्तीस पडते.

पहिल्या वारीत मित्र जालेल्या श्री. लोणकर यांच्या संकुलात बरेच गुजराती लोक रहात होते व ते भलतेच हौशी होते. त्यांचा मोठा मेळावा जवळ जवळ दरवर्शी अटलांटिक सिटीला भेट देई व तेती समुद्रकिनारा व विशेषत: कॅसिनो यांना भेट देई. त्यांच्या आग्रहावरून त्या मेळाव्यात अम्ही दोनदा सामील झालो. पहिल्यावेळी एक अनपेक्षित प्रसंग घडला. अम्ही त्यावेळी हेदर ड्राइव्ह ला रहावयास गेलो होतो.

अटलांटिक सिटीला जाणारी बस आम्ही प्रथम ज्या हिडन व्हॅली वसाहतीत रहात होतो, तेथेही मोठी गुजराती वस्ती होती, त्यामुळे बस तेथून निघनार होती. श्री. लोणकरांच्या निरोपाप्रमाणे आम्ही सकाळी आठ वाजता तेथे पोचलो, तेव्हां श्री. लोणकर आलेले नव्हते पण एक उंचनिंच गृहस्थ आम्हाला पाहून आमच्याकडे आले आणि “आपण श्याम कुलकर्णी ना?” असे विचारू लागले, अर्थात आमचे होकारार्थी उत्तर ऐकून त्यानी स्वत:ची ओळख “मी गुगळे “ अशी करून दिली, ते माझ्याबरोबर पुण्याच्या अभियांत्रिकि महाविद्यालयात एक वर्ष शिकायला होते. अर्थात आम्ही ४०-४२ वर्षांनी भेटत असल्याने एकमेकास ओळखणे शक्यच नव्हते, पण ते श्री. लोणकरांचे शेजारी असल्यने व लोणकरांनी पूर्वकल्पना दिली असल्यामुळे त्यानी मला हेरले. श्री. व सौ. लोणकरही नंतर आले.

अटलांटिक सिटीत अनेक कॅसिनो म्हणजे जुगाराचे अड्डे आहेत व ते येथे कायदेशीर उद्योग म्हणूनच चालवले जातात. आम्ही पुढे लास व्हेगासला गेलो होतो तेथेही असेच कॅसोनो आम्ही ज्या होटेलमध्ये उतरलो होतो तेथे होते. पण अटलांटिक सिटीत आम्ही खास तेवढ्यासाठीच गेलो असल्याने प्रथम आम्हास जुगाराची चटक लावण्यासाठी आत प्रवेश करताना प्रत्येकाला $20 ची तिकिटे देऊन

त्याचा वापर करून खेळण्यास प्रवृत्त केले गेले व बऱ्याच वेळा आम्ही जिंकलो व पैसे मिळू लागले की आणखी खेळायची बुद्धी होऊन त्यांनी दिलेले डॉलर्स संपवून आपल्या खिश्यातील डॉलर्स्चींही वाट लागली की मग खेळणे आपण थांबवतो. आमच्या बसमधील थोडे कसलेले खिलाडू सोडले (अर्थात ती सगळी गुज्जू मंडळीच होती) तर बाकीच्यांनी आपल्याला मिळालेले २० डॉलर्स तरी कमीतकमी आपल्याजवळ शिल्लकच रहातील याची काळजी घेतली. आमच्यातही काही भाग्यवान लोकांनी तर १०० डोलर्सपर्यंत प्राप्तीही केली. आम्ही आमचे २० डॉलर्स तरी सुरक्षित रहातील याची काळजी घेतली व अश्या प्रकारे ट्रिप फुकटात पाडली. श्री. गुगळे आम्हाला मार्गदर्शन करण्याचेच काम मुख्यत्वे करत होते. त्यानंतरच्याही एका वारीत आम्ही अटलांटाला असेच गेलो होतो.

याशिवाय दोन तीन वेळा बीचवर गेलो होतो. अर्थात अमेरिकेतील बीचेस आपल्याकडील बीचहून काही फार वेगळे नसतात हे आम्ही गोवा, अंदमान, केरळ येथील बीचेसना भेट दिलेली असल्यामुळे म्हणू शकतो.

आणकी एक वेगळा अनुभव बलून वारीचा! वायुभारित मोठा फुगा व त्याच्या खालील पेटीत आपण उभे राहून हवेत तरंगण्याचा तो अनुभव आनंददायक असतो अर्थात अश्या बलून राइड्स आपल्याकडेही असतात. महाराष्ट्रात त्या कामशेतला आहेत म्हणे! आम्हाला त्यासाठी अमेरिकेत ब्लूम्नरग्ला जावे लागले येवढेच! खालील चित्र आपल्याकडील

# ५६गोळी कशी गिळू मी!

.

अमेरिकेत जाताना आमच्या नेहमीच्या आजाराच्या म्हणजे माझा उच्च रक्तदाब आणि सौ. चा डायबेटिस व शिवाय इतरही किरकोळ दुखणी अश्या गोळयांचा मोठा साठाच घेऊन जातो. साध्या दुखण्यासाठी औषधाच्या दुकानात सरळ सरळ नाव सांगितले की विकत मिळणाऱ्याही गोळया तिथल्या औषधांच्या दुकानात मिळतात किंवा त्या ग्राहकाला स्वत:च निवडून घेता येईल अश्या पद्धतीने ठेवलेल्या असतात त्याना ऑ टी सी (over the counter) म्हणतात. आपल्याकडे फारच थोड्या गोळयांना डॉक्टरांचे प्रमाणपत्र (किंवा चिठ्ठी)लागते. त्यामुळे आपली सगळीच औषधे ओ टी सी असतात. अश्या पद्धतीने घेतलेल्या टायनेलॉन या वेदना शामकाच्या पाचशे गोळयांचे डबडे माझ्या मुलाकडे पडलेले असते. .

सर्व प्रकारच्या दक्षता घेऊनही अमेरिकेत असताना एकदा मला सर्दी झालीच मला सर्दी झाली असे समजताच लगेच मुलाने ऑफिसमधून येतानाच सर्दीवरील अमेरिकेतील रामबाण इलाज असणाऱ्या गोळया आणल्याच, व त्याने त्या काढून मला दिल्या त्या दिवसा वेगळया व रात्री वेगळया अश्या स्वरूपाच्या होत्या.

दिवसाच्या डेक्विल व रात्रीच्या नाइक्विल. त्या गोळयांचा आकार पाहून मी एकदम सटपटलोच खरे तर गोळया सटकन गिळण्यात माझा हातखंडा आहे अशी माझी समजूत होती. नाहीतर बऱ्याच लोकांना गोळया गिळताच येत नाहीत आणि मग त्याना गोळीचे चूर्णच करून घ्यावे लागते श्या लोकांना डेक्विल व नायक्विल म्हणजे रोगापेक्षा उपाय भयंकर म्हणावा लागेल कारण मीसुद्धा डेक्विल कशी बशी गिळली. त्या गोळया तुकडे करून किंवा भुकटी करून घेणेही शक्य नव्हते कारण पारदर्शक आवरणात द्रव औषध (लिक्विकॅप्सूल)असा त्या गोळयांचा प्रकार होता, त्यामुळे पूर्ण गोळी गिळणे हीच एक पद्धत वापरणे शक्य होते. रात्रीची गोळी नाइक्विल तर डॅक्विलपेक्षाही मोठी म्हणजे एकाद्या छोट्या पक्षाचे अंडे असावी तशी! तरी बराच मोठा घसा ताणून मी ती तोंडात सारली व पाण्याच्या घोटाबरोबर गिळण्याचा प्रयत्न केला पण गोळीचे आवरण गुळगुळीत असून व त्यावर पाण्याचा मोठा घोट घेऊनही गोळी घशातून खाली उतरायला तयार नाही अशी परिस्थिती झाली बरं ती घश्याच्या इतकी आत गेलेली की बाहेर काढावी म्हटले तर तेही शक्य नाही अश्या प्रकारे औषधाच्या गोळीने श्वास कोंडून मृत्यू पावणारा जगातील पहिला रुग्ण होण्याचा मान मला मिळून शिवाय ही गोष्ट अमेरिकेत घडल्याने हौडी मोदीसारखीच त्याला प्रसिद्धी मिळणार (आणि मरणोत्तर प्रसिद्धी

मिळून मला त्याचा काय उपयोग हे आणखी वर दु:ख) की काय अशी भीती वाटू लागली. खरे म्हणजे बऱ्याच मोठ्या आकाराच्या कॅप्सूल घेण्याचा मला सराव होता तरीही ही कॅप्सूल मात्र रोगहारक न ठरता रुग्णसंहारक ठरणार की काय अशी भीती वाटू लागली. पण बऱ्याच प्रयत्नानंतर कशी बशी ती घश्यातून आत न जाता (कारण ती आशा मी सोडूनच दिली होती)बाहेर पडली व गोळीपेक्षा सर्दी परवडली असा विचार करून मी ती गोळी घ्यायची नाही असे ठरवले व गोळीच्या तावडीतून माझी सुटका करून घेतली.

, नंतर जालावर शोध घेतला असता नाइक्विल आणि तत्सम कॅप्सूल्स गिळण्याविषयी अनेक लोकांनी आपले अनुभव नोंदवलेले दिसले. त्यात एका प्रकारात गोळी मान वर करून कशी घ्यावी अगदी ती गोळी ओठावर कोठे ठेवावी व मानेचा कोन कसा करून पाण्याची बाटलीच तोंडाला लावून घोट कसा घ्यावा इतक्या बारिकसारिक सूचनाही त्यात होत्या तर दुसऱ्या प्रकारात मान खाली करूनही अशीच अगदी सुलभतेने गोळी कशी गिळली जाते याचे आकृतीसह वर्णन केलेले आढळले. यावरून ही समस्या केवळ माझ्यापुरतीच मर्यादित नसून त्याला जागतिक परिमाण आहे हे ध्यानात आले. इतक्या मोठ्या आकाराची लिक्विकॅप्सूल केल्याबद्दल बऱ्याच लोकांनी खास अमेरिकन थाटात कंपनीला शिव्या मोजल्या आहेत असेही दिसले (एका गृहस्थाने तर अगदी

वैतागून ही गोळी वरून न घेता खालून घ्यावी की काय असाही प्रश्न केला आहे) तरी कंपनीने एक मोठी गोळी करण्या ऐवजी छोट्या दोन गोळ्या का केल्या नाहीत समजत नाहीत. या गोष्टीला तीन वर्षे झाली आता कंपनीने कॅप्सूलच्या ऐवजी साध्या गोळ्या ज्यांचे तुकडे करता येतील किंवा चूर्ण करता येईल अश्या तयार करायला सुरवात केली असून. तेच औषध द्र्वरूपातही उपलब्ध केले आहे असे समजते. एकूण बऱ्याच लोकांचे शिव्याशाप खाऊन कंपनीला सुबुद्धी सुचली म्हणायची!

-------------------------------------------------------

# परिशिष्ट

१)राम गणेश गडकरी यानी बाळकराम या नावाने लिहिलेल्या विनोदी लेखाचा संदर्भ मी दिला आहे अलिकडील बऱ्याच वाचकाना तो माहीत नसेल आणि तो इतक्या सहजासहजी उपलब्धही होणार नाही म्हणून त्यातील काही भाग येथे उद्धृत करीत आहे.

स्वयंपाकघरातील गोष्टी ले. बाळकराम ऊर्फ राम गणेश गडकरी

राष्ट्राचे खरे जीवन स्वयंपाकघरावरच अवलंबून आहे ---- स्वामी विवेकानंद

अन्नाद्भवंती भूतानी (असतील शिते तर जमतील भुते) श्रीमद्भगवद्गीता

**चापटपोळ्या**

स्वतःखेरीज दुसरी चांगलीशी पाठ घ्यावी. आपल्या हाताची बोटे नीट पसरून हात खूप जोराने त्या उघड्या पाठीवर आपटावा. असेच पाच सहावेळा करावे. चांगल्या चापटपोळ्या होतात.

**बर्फीची चटणी**

चांगली शेर दीड शेर सुरती बर्फी घ्यावी व सहज हाताला येईल अशी उघडी ठेवावी. स्वयंपाक करतांना अगर येताजाता तिचा एकएक बकाणा भरत जावे. घटकेच्या आत सगळ्या बर्फीची चटणी होते. माझ्या एका भगिनीने कुरकूर केली आहे की " दररोज नवीन चटणी करण्यास फार अडचण होते". माझ्या मते कोणत्याही आवडत्या पदार्थाची तेव्हांच चटणी करून टाकता येते.

**गुळाचा गणपती**

आपलेच तीन चार वर्षाचे पोर घ्यावे. त्याला नेहमी स्वयंपाकघरामध्ये बसवून ठेवावे. नेहमी त्याच्या हातावर गोडाधोडाचे काहीतरी ठेवीत जावे. त्याला इकडची काडी तिकडे करू देऊ नये. शाळेत सुद्धा जाऊ देऊ नये. खायला हवे तेव्हा घालावे. पण जागचा हलू देऊ नये. लौकरच मुलगा अगदी गुळाचा गणपती होतो. हा पुष्कळ वर्षे टिकतो.

***येथून भारतात परत गेल्यावर रस्यावर बाहेर पडल्यावर मनात विचार आला***

## २. चालू कुठे कसा मी?

(येऊ—कशी प्रिया – च्या चालीवर म्हणून पहा)

चालू कुठे कसा मी येथे मुळी न जागा
रस्त्यात वाहनांच्या दिसतात फक्त रांगा
दिसतात चालताना रस्त्यात लोक चार (?)
परि चालतात त्याना बसती शिव्याच फार
'कैसे मधेच घुसता?पथ काय बापजाद्या
आंदण आहे दिलेला?'डोळे तपासुनी घ्या"
अर्धाअधीक रस्ता तोडून ठेवलेला
होता दुरुस्त, जागा मिळणार चालण्याला
ऐसी मनात आशा नच शक्य पूर्ण होणे
रस्ता कितीजणांचे लागे सदैव देणे
त्या तीन चाकि रिक्षा, ट्रक आणखीच मोठे
संख्या किती तयांची ते राहणार कोठे?
फळभाजी हातगाड्या करण्यास सोय तुमची
करण्या दुरुस्ति चपला आणि वाहनांची
मिळण्या चहा फराळास्तव खाद्यवस्तु

चाय्नीज मिळेल, जागा नच चालण्या परंतु
महनीय व्यक्तिमत्वां नगरात स्वागताचे
अतिभव्य फलक मध्ये रस्त्यात लावलेले
जणु सर्व जनप्रवाह त्यासाठि थांबलेला
जरि तेच वाचण्याला नच वेळही कुणाला
तैसी सिलिन्डरांची ही माळ लाललाल
किति सोय ही जनांची होई तिन्ही त्रिकाळ
गायीगुरे म्हशीही त्या मात्र संथ शांत
घोडेहि दौडतात रस्त्यात या प्रशांत
पाहू जिथेजिथे मी सर्वत्र धूळधूर
अन फलक प्रदुषणाचा लाजून होइ चूर
मन्दीर चर्च दर्गे रस्त्यात मांडतात
भावीक भक्त सगळे तेथेच भांडतात
जरि चालण्यास रस्ता आहे पुरा निकामी
मोर्चे सभा मिरवणुका याना सदा इनामी
कधि ती गणेशमूर्ती ताबूत वा कधीचे
कधि ही जयंति अथवा कधि लग्नही कुणाचे
यासाठि मार्ग बन्द हा आज तो उद्याही
आहेत जागि रस्ते या सूचनेत ग्वाही!

# ३. गड्या आपुला देश भला

मन्त्रि न कुणि मी महापौर
किंवा न कुणी महाचोर
त्यामुळे जायचे परदेशी
स्वप्नातच याची खात्रीशी
पण प्रयत्न केले लेकाने
अन् साथ त्या दिली नशिबाने
त्यामुळे जाय तो अमेरिका
मग मीहि साधला तो मौका
परदेश त्यामुळे एक भला
तो यू. एस्. ए. ची असे मला
स्वर्गात कोण जाउनी आले
पण जे सगळ्यानी वर्णियले
ते वर्णन लागू येथ पडे
जणु स्वर्गद्वारचि हो उघडे
सुंदर रस्ते सुंदर जागा
सुंदर झाडे सुंदर बागा
सुंदर नारी सुंदर बाळे
पाहतो सर्व भरुनी डोळे

विस्तीर्ण पसरली किति जागा
जे हवे हवे सगळे मागा
अर्थात खिसा डॉलरभरला
तर असेल देखावा सगळा
रस्त्यात पाय ना ठेवावे
नच कारविना कोठे जावे
पण असुनी सगळे सौख्य मला
बंधनी जीव जणु सापडला
खाउनी पान मग पिचकारी
मारण्या इथे होई चोरी
रस्त्यात घशामधि कफ दाटे
थुंकण्या शिंकण्या भय वाटे
स्वातन्त्र्यदेवतेचा पुतळा
नुसता बेट्यानी उभारला
स्वातंत्र्य कसे उपभोगावे
आम्हीच तयाना शिकवावे
स्वातन्त्र्य कसे कुठले घ्यावे
ना कठिण त्यां कसे सांगावे?
स्वातन्त्र्य किती आपल्याकडे
बागडा मुक्त जिकडेतिकडे

स्वातन्त्र्य आम्हाला सगळ्याचे
सर्वत्र हवे ते करण्याचे
रस्त्यावर नाचुन घेण्याचे
(चालणे जरी अवघड साचे)
बागेतिल पुष्पे खुडण्याचे
सिग्नल वा तोडुन जाण्याचे
ऑफिसात काम ना करण्याचे
पथि गुरांस सोडुन देण्याचे
रस्त्यातच टपरी घालुनिया
वा बसून धंदा करण्याचे
वेठीवर धरुनी जनतेला
मोक्यावर संपहि करण्याचे
स्वातन्त्र्य तिथे नसते असले
शिस्तीत वागती ते सगळे
त्यामुळे न तेथे गमे मला
हो गड्या आपला देश भला

1 White House




2 White House




3 Capitol hill





4 Capitol hill



5 Capitol hill




6 Washington
A.Lincon monument






7 Rainbow bridge
Niagara



8 Niagara






9 Niagara




10 Niagara



Sculpture Garden



11 Sculpture Garden



12 Sculpture Garden



13 Sculpture Garden



14 Sculpture Garden








15 Sculpture Garden

16 Sculpture Garden






बलून राइड



# दुर्ग दुर्घट भारी

*आसेतूहिमाचल*

## सुंदर हा देश

त्या सुंदर यात्रेसाठी

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्याआमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण...

कारण आपण लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. ते प्रसिद्ध पर्यटनस्थळ असेल वा नसेल. तुम्हाला ते स्थळ आवडलं ना? मग लिहा. पाठवा. अलंकारिक भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ.

संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या “मी पाहिलेला…” सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. वाटा आणि वळणांचा आनंद वाटत रहा.

आपल्या लेखनाची मेल व foto पाठवा.

esahity@gmail.com